# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# बोली अभ्यास

**एम. ए. भाग २ : मराठी**

**सत्र ३ : अभ्यासपत्रिका क्र. १२.३**

**सत्र ४ : अभ्यासपत्रिका क्र. १६.२**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

# घटक -१
# भाषा बोली आणि समाज

**उद्दिष्ट्ये :**

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपणास पुढील गोष्टी समजून येतील.

- ✻ भाषा व बोलीचे स्वरूप अभ्यासणे.
- ✻ भाषा व बोलींचे समाजातील स्थान समजून घेता येईल.
- ✻ भाषा आणि समाजाचा सहसंबंध स्पष्ट होईल.
- ✻ बोली आणि समाजाचा सहसंबंध जाणून घेता येईल.
- ✻ बोलीची समाजविशिष्टता समजून घेता येईल.
- ✻ भाषा व बोलीच्या कार्याचा परामर्श घेता येईल.
- ✻ भाषा व बोलींची गुण वैशिष्ट्ये स्पष्ट होतील.

## १.२ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्र हो ! प्रस्तुत घटकात आपण 'भाषा बोली आणि समाज' यांचा सर्वांगिण अभ्यास करणार आहोत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भाषावैज्ञानिक आणि भाषाशास्त्रीय दृष्टीकोनातून भाषा, बोली आणि समाज यांचे स्वरूप, स्थान, सहसंबंध, भाषा व बोलींचे कार्य, बोली आणि समाजाचा सहसंबंध आणि भाषा व बोलींच्या गुण वैशिष्ट्यांचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या रेट्यात बोली भाषांवर इंग्रजीसारख्या भाषांचा प्रचंड मारा होवून बोली समूळ नाश पावतात की काय अशी भिती निर्माण झाली आहे. अशा वेळी बोलींचे संवर्धन करणे आणि भाषा, बोली व समाज यांचा सहसंबंध अभ्यासण्याच्या दृष्टिकोनातून 'बोलीअभ्यास' हा अभ्यासक्रमच महत्त्वाचा ठरतो.

आपल्या देशातील संशोधनाचे बरेच श्रेय पाश्चात्य विद्वानांना जाते. पूर्वी भाषेचा अभ्यास म्हणजे प्राय:लिखित भाषेचा अभ्यास असे. परंतु आधुनिक भाषा वैज्ञानिकांनी या बाबतीतला दृष्टिकोन बदलला त्यामुळे स्वाभाविकपणे बोलींकडे पाहण्याची वृत्तीही बदलली. प्रमाण भाषा ही सुद्धधा एक बोलीच असते, तिचे जसे व्याकरण किंवा शब्दकोश रचले जातात तसे स्थानिक बोलींची व्याकरणे किंवा शब्दकोश रचने शक्य आहे, हे उघड झाले आहे. बोली भाषेच्या अभ्यासामुळे त्या-त्या प्रांतातील संस्कृती, समाजातील चाली-रिती, सण-वार, आचार-विचार, आहार, पोशाख इ. गोष्टी समजून घेता येतात. आधुनिक काळात भाषेच्या अभ्यासाने बोलीकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. पूर्वी बोली भाषा अशुद्ध, कनिष्ठ मानली जात असे. बोली बोलणाऱ्यास

गांवडळ म्हणून हिनवले जात होते. मात्र आज बोलीभाषा भाषेला समृद्ध करत आहेत. त्यामुळे बोलीभाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वगतशील असायला हवा.

### १.३ विषय विवेचन

भाषा हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे भाषेचा अभ्यास ही प्रत्येक समाजाची शैक्षणिक व सांस्कृतिक गरज असते. आजच्या प्रगत मानवाच्या जीवनाकडे पाहता भाषाहीन समाजाची कल्पनाही करता येत नाही. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात भाषा अपरिहार्य आहे. प्रत्येक भाषा ही एक स्वायत्त सामाजिक संस्था असल्यामुळे तिचा इतिहास इतर सामाजिक संस्थांच्या इतिहासाप्रमाणे लिखित साधनांच्या आधारे तयार करता येतो. भाषा सामाजिक स्वरूपाची असल्याने ज्या समाजाकडून ती बोलली जाते. त्या समाजाचा इतिहास समाजात घडून आलेली स्थित्यंतरे, सामाजिक प्रवृत्ती समजून घेणे गरजेचे आहे.

भाषा एका विशिष्ट वर्गाची मालमत्ता नसून ती एक सर्वोपयोगी सामाजिक संस्था आहे. भाषा सर्व वर्गांच्या सहजीवनाचे आणि सहकार्याचे एकमेव अपरिहार्य साधन आहे. बोली भाषा हे दैनंदिन व्यवहाराचे स्वभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुख परंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. बोली साधी पण परिणामकारक असते.तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य. समाजातील सुशिक्षित किंवा उच्च समजल्या जाणाऱ्या स्तरातील लोकांकडून प्रमाण भाषेचा वापर केला जातो. तर समाजातील फार मोठ्या प्रमाणातील कष्टकरी, कामकरी, अशिक्षित किंवा कनिष्ठ स्तरातील लोकांकडून भाषेचे एक वेगळे रूप वापरले जाते त्याला 'बोली' म्हटले जाते. बोली म्हणजे विशिष्ट समाजगटाची परस्पर विनिमयाची बोलभाषा होय. त्यातील शब्द, उच्चार, रूपे शेजारच्या समाजगटाला समजत असले तरी, त्यांच्या बोलीतील शब्दोच्चार व रूपे यापेक्षा थोडे भिन्न असतात.

समाज निर्माण करणे आणि सामाजिक बनणे माणसाला केवळ भाषेमुळे शक्य होते.माणूस हा सामाजिक प्राणी आहे. भाषेच्या माध्यमातून माणूस परस्परांशी आचार-विचारांची आणि भावनांची देवाण घेवाण करू शकतो. त्यातून समाजाची बांधणी होते. कुटुंब, शाळा, सामाजिक संस्था, शासनसंस्था या साऱ्या सामाजिक संस्था भाषेच्या आधारेच विकसित होतात. म्हणून भाषा, बोली आणि समाज यांचा अभ्यास या घटकात करायचा आहे.

एखाद्या समाजाची एकूण स्थितीगती काय आहे हे त्या समाजाच्या केवळ भाषेचे मोजमाप घेऊन सहज समजू शकते. समाजाची संपन्नता, प्रगती, अप्रगती, ज्ञान, अज्ञान, सुसंस्कृतपणा-असंस्कृतपणा या साऱ्या गोष्टी भाषेच्या जोरावर जोखता येतात. म्हणून समाजाची ओळख करून घेण्यासाठी समाज वापरत असलेली भाषा, त्या भाषेच्या विविध बोली, स्थानिक भेद, भौगोलिकता, भाषा व बोली यांचे समाजातील स्थान, भाषा व बोलीचा समाजाशी असलेला सहसंबंध आणि भाषा व बोलींचे कार्य या साऱ्यांचा येथे अभ्यास करणे गरजेचे आहे.

### १.४.१ भाषेचे समाजातील स्थान

आजच्या प्रगत मानवाच्या जीवनाकडे पाहता भाषाहीन समाजाची कल्पनाही करता येत नाही. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये भाषा अपरिहार्य आहे.भाषा या शब्दाचा प्रयोग अनेक अर्थांनी केला जातो. म्हणून

‘मानवी संदेशनाची मौखिक अथवा लिखित पद्धती म्हणजे भाषा होय.’ मानवी जीवनाचे प्रत्येक अंग भाषेने व्यापले आहे. भाषा आणि समाज यांचा संबंध अनन्यसाधारण आहे. भाषा सांस्कृतिक संक्रमण करते. भाषेच्या मार्फत सांस्कृतिक संचिते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात.

पाश्चात्य संस्कृतीचे वारे अधिक जोमाने वाहू लागले तसे जग जवळ येऊ लागले. तशी भाषिक प्रश्नांची तीव्रता आणि गुंतागुंतही वाढत गेली. इंग्रजीने संपर्काची भाषा म्हणून आपले हातपाय पसरले. या साऱ्याचा परिणाम समाज जीवनाच्या इतर क्षेत्रांबरोबर भाषेवरही होतो आहे. बदलत्या सामाजिक प्रवृत्ती आणि बदलत्या आर्थिक धोरणामुळे भाषानिवडीवरही परिणाम झाला. जागतिकीकरणाच्या या भोवऱ्यात इंग्रजीच्या वाढत्या प्रभावामुळे अनेक भाषा अस्तंगत होत आहेत. मराठी प्रमाण भाषेचीही अशीच अवस्था आहे. अशावेळी भाषांचे जतन, संवर्धन करणे आणि त्यांचा अभ्यास करणे गरजेचे बनले आहे.

२०१९ च्या जनगणनेनुसार भारतात मराठी बोलणाऱ्यांची संख्या दहा कोटींवर आहे.मराठी ही जगातली १९ व्या क्रमांकाची भाषा आहे. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात समाविष्ठ केल्या गेलेल्या बावीस भाषापैकी मराठी ही महत्त्वाची भाषा आहे. भाषा म्हणजे प्रमाण भाषा ‘एकभाषिक समाजातील सर्व व्यक्तींना बव्हंशी समजली जाणारी, समाजातील ‘शिष्ट’ लोकांनी लेखनासाठी मान्य केलेली भाषा’ प्रमाण भाषा म्हणून ओळखली जाते. शिष्टमान्य लेखन त्या भाषेसाठी केले जाते.

प्रमाणभाषेचे विनिमय क्षेत्र फार मोठे आहे. प्रमाण भाषा लिखित स्वरूपात असल्याने बोलीचे क्षणभंगुरत्व तिला नसते. भाषा हा माणसाच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. भाषेमुळेच माणसाला समाजात राहणे, सामाजिक संस्था निर्माण करणे आणि संस्कृतीचा विकास करणे शक्य झाले आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत माणूस भाषेच्या माध्यमातूनच व्यवहार करत असतो. इतर प्राणिमात्रांच्या तुलनेने माणसाने स्वतःची जी प्रगती केली आहे, तिच्या मुळाशी त्याची भाषा आहे.भाषा ही एक संकेत-प्रणाली आहे. ध्वनी हे भाषेचे माध्यम आहे. भाषेची संकेत व्यवस्था ध्वनिसंकेतावर आधारलेली असते. इतर संकेतप्रणालींच्या तुलनेत भाषा अधिक सुटसुटीत, लवचिक, उपयुक्त, वैविध्ययुक्त आणि केव्हाही सहज वापरता येणारी संकेत प्रणाली आहे. मानवी भाषा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत संक्रमीत होते ती सामाजिक व सांस्कृतिक जीवनाद्वारे. भाषा म्हणजे काय? हा प्रश्न काहीसा संदिग्ध आहे. कार्याच्या दृष्टीने विचार केला तर मानवी जीवनात संदेशवहन किंवा संदेशन करण्याचे सर्वात महत्त्वाचे साधन म्हणजे भाषा होय.

आजच्या युगातील प्रगत मानवाच्या जीवनाकडे पाहता भाषाहीन समाजाची कल्पना करता येत नाही.मानवी जीवनात भाषेला अत्यंत महत्व असून ‘बोलणारा प्राणी’ असे माणसाबद्दल म्हटले जाते. एखाद्या विशिष्ट समूहाकडून वापरले जाणारे शब्द, त्यांचे उच्चार, आणि त्यांच्या उपयोजनाची पद्धत म्हणजे भाषा होय. तर अर्थपूर्ण व प्रचलित चिन्हे, ध्वनी, हावभाव किंवा खुणा यांच्या साह्याने विचार आणि भावना यांचे प्रेषण करण्याचे एक माध्यम म्हणून भाषेचा विचार करणे संयुक्तिक ठरते. मानवेतर सृष्टीतील संप्रेषणपद्धती प्रमाणेच मानवी भाषा एक संदेशन व संप्रेषणाचे माध्यम आहे. चार्ल्स हॉकेट या भाषाशास्त्रज्ञाने मानवी भाषेची लक्षणे सांगितली आहेत. म्हणून कोणतीही नैसर्गिक संदेशन व्यवस्था मानवाच्या संदेशनासारखी नाही.

समाज म्हणजे तरी काय? समान आचार- विचार, रिती-रीवाज, चाली-रिती, श्रद्‌धा यांनी एकत्र आलेल्या माणसांनी समाज बनतो. तर भाषा हा समाजातल्या माणसांना जोडणारा एक समान धागा असतो. समाजात घडणारे परिवर्तन भाषेतून प्रकट होते. भाषिक परिवर्तन सामाजिक संदर्भातून होते. भाषा मानवी समाजजीवनाला सतत पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील असते. भाषा सामाजिक- सांस्कृतिक व्यवहारातील एक प्रमुख प्रक्रिया बनते. या मुलभूत विचारावरच सामाजिक भाषाविज्ञानाची चौकट उभी आहे.समाजातील विविध वर्गांचा व स्तरांचा परिणाम भाषेवर होतो. तसेच सामाजिक स्तर भाषेच्या वापरात प्रतिबिंबित होत असतात. भारतीय समाज बहुधर्मी, बहुजाती व बहुसंस्कृतिक असल्याने त्या बाबतीत अधिक प्रकर्षाने हे पाहायला मिळते. शिवाय समाजात भाषा विविध पातळ्यांवर वापरली जाते. भाषेच्या भेदांना विशेष महत्त्व असून त्या भेदांमध्येच सामाजिकता आहे. कोणतीही मानवी भाषा एकाच प्रकारचे सामाजिक कार्य करताना दिसत नाही.सामाजिक व्यवहारात भाषेला अनेक प्रकारचे संदेशन करावे  लागते. समाजाकडे व त्यातील प्रत्येक व्यक्तीकडे भाषा असते. समाजातील व्यक्ती आपल्या गरजेनुसार भाषेचा विनियोग करत असते. समाजातील या भाषिक बहुजिनसीपणाचा अभ्यास करताना फर्ग्युसन या सामाजिक भाषावैज्ञानिकाने ‘भाषाद्वित्व’ ही संकल्पना वापरली.

समाजजीवनातल्या प्रत्येक क्षेत्रातील व्यवहार सामूहिक सवयींनी चाललेला असतो. व्यक्तीच्या सवयीप्रमाणे समाजालाही आपापले जीवन व्यवस्थित रीतीने पार पाडण्यासाठी काही सवयी असणे इष्ट असते. बदललेल्या काळाचा समाजावर होणारा परिणाम ध्यानात आला म्हणजे सामाजिक जीवनाकडे पाहण्याची एक वास्तववादी दृष्टी निर्माण होऊ शकेल. सामाजिक संस्था म्हणजे भाषा आणि रूढी म्हणजे लेखन मनुष्य हा समूहजीवी प्राणी आहे. हे समूहजीवन यशस्वी होण्यासाठी काही नियम पाळणे आवश्यक असते. या सवयी प्रत्येक व्यक्ती आपल्या आधीच्या पिढीकडून शिकते, तो एक समाजिक वारसा आहे.या सवयी म्हणजे सामाजिक संस्था होय. या सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे भाषा ही संस्था नसेल तर समाजजीवनच अशक्य बनेल. आपले अनुभव व विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे साधन असल्याशिवाय सामाजिक व्यवहार शक्य होणार नाही. एवढेच नाही तर समाजही अस्तित्वात येऊ शकणार नाही, आणि आलाच तर जनावरांचे कळप किंवा मधमाश्यांचे थवे असे स्वरूप असेल. हा व्यवहार भाषेने शक्य होतो, म्हणून भाषा ही सर्वश्रेष्ठ सामाजिक संस्था आहे.म्हणून भाषा हे मानवी प्रगतीचे सर्वश्रेष्ठ साधन आहे

भाषा ही सानुक्रम ध्वनिरचनांच्या सांकेतीकरणावर आधारलेली संज्ञापन प्रणाली आहे. भाषिक संज्ञापन ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. म्हणून भाषा ही एक नियमबद्‌ध व्यवस्था आहे. अशा प्रकारे भाषा समग्र मानवी जीवनाला वेढून राहिली आहे. इतकेच नाही तर ती मानवी संस्कृतीचा पाया आहे. भाषेचे भौगोलिक क्षेत्र, भाषेचा इतिहास, पोटभाषा वा बोली यांची निर्मिती प्रमाण भाषा, उपभाषा व बोली यांच्या परस्परसंबंधाचे एक शास्त्र बनले आहे.

मराठी भाषा सध्या संक्रमण काळातून जात आहे हे निर्विवाद सत्य आहे. विज्ञान तंत्रज्ञानातील बदलामुळे भाषेचा चेहरा मोहरा इतका बदलून गेला आहे की ‘मोबाईल’ आणि ‘कॉम्प्युटर’ यांच्याशी निगडीत नवी परिभाषा आणि शब्द प्रयोग यांचा सुळसुळाट झाला आहे. भाषा ही समस्त समाजाची देणगी असून सर्व बदलांची कारणे अनेक पदरी आहेत. वेगाने सुरू झालेले सामाजिक अभिसरण हे त्यापैकी एक कारण आहे. भाषा हा सर्वांच्या

जिव्हाळ्याचा विषय आहे. भाषेचे जीवनानुभवाशी व समाजाशी साक्षात नाते असते. भाषा ही सामाजिक संस्था असल्यामुळे सामाजिक परिस्थितीनुसार भाषा बदलत राहते. भाषेतील सुप्त प्रकाश माणसाला स्थलकाल निरपेक्ष अशा विशाल भाषिक परंपरेशी जोडून देत असतो. आपण एका मोठ्या समाजाशी बांधले आहोत, या जाणिवेने आपल्या मनाला उभारी येते. ही संलग्नतेची जाणिव व्यक्ती आणि समाज यांच्यातील वीण घट्ट करणारी असते.

जागतिकीकरणाच्या या कालखंडात नोकरी धंद्यानिमित्त स्थलांतर करण्याची गरज निर्माण होत आहे.स्थलांतरित समाजाला निज भाषा आणि परिसर भाषा दोहोंना सारख्या इतमामाने जपणे शक्य होत नाही.अशावेळी भाषाशिक्षणाचे नवे मार्गही उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. शास्त्रीय सर्वेक्षणाच्या आधारे नियमांची फेरतपासणी करायला हवी.कारण ह्या भाषांना हजारो वर्षाची समृद्ध वाङ्मयीन परंपरा आहे.पण भाषा विषयक दृष्टिकोन भाषांच्या विकासाला पूरक नाही. त्यासाठी सामाजिक संस्था आणि शासन यांची भूमिका महत्त्वाची आहे. माध्यमांचा सुयोग्य वापर करून घ्यायला हवा 'इंटरनेट' सारख्या माध्यमावर स्वार व्हायला हवे.

भाषा माणसाच्या अस्तित्वाची खूण असून, त्यामुळे माणसाचे सामाजिक अस्तित्व लक्षात येते. भाषेवरून माणसाचा आर्थिक, सामाजिक व प्रादेशिक स्तर ओळखता येतो. भाषा माणसाच्या जगण्याचा आणि जीवन व्यवहाराचा केंद्रवर्ती गाभा म्हटले पाहिजे. भाषा सामाजिक आदान-प्रदानाचे माध्यम आहे. प्रमाणभाषा, बोलीभाषा, समाजभाषा, पोटभाषा व लोकभाषा या सर्वांच्या माध्यमातून सामाजिक भावनिक आदान-प्रदानाची क्रिया घडत राहते. भाषेत सतत बदल होत राहतो. या संदर्भात डॉ. र. भा. मंचरकर यांचे विवेचन महत्वपूर्ण ठरते. 'सामाजिक गरजा भागविण्यासाठी तिची स्वाभाविक परिवर्तनशिलता पुरेशी पडताना दिसत नाही. अशावेळी स्वाभाविक परिवर्तनाची गती वाढविण्यासाठी योजना आखल्या पाहिजे.' प्रमाणभाषा ही शिष्ट व राज्य मान्य भाषा आहे. शासन व्यवहारामध्ये प्रमाणभाषेचे प्राबल्य आढळते. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, ग्रंथलेखन, भाषणे इ. अनेक ठिकाणी प्रमाण भाषा विपुल प्रमाणात आढळते.

जगात निरनिराळ्या देशात निरनिराळ्या भाषा बोलल्या जातात. ह्या सर्व भाषा एकमेकीपासून पूर्णपणे भिन्न आहेत. समाजात माणसांचे अनेक गट पाडलेले असतात. ते व्यवसाय भिन्नतेमुळे, सामाजिक प्रतिमेमुळे, वर्णजातीमुळे तर कधी वय व लिंग यामुळे पडलेले असतात. या प्रत्येक गटाची जीवन शैली काही प्रमाणात भिन्न असते. या भिन्नतेचा परिणाम स्वाभाविकपणे त्याच्या भाषेवर होतो. परिणामी समाजातच एका गटाची भाषा दुसऱ्या गटाच्या भाषेपेक्षा गरजेनुसार वेगळी होते. एकूणच भौगोलिक अंतरामुळे ज्याप्रमाणे एकाच भाषेची भिन्न-भिन्न रूपे तयार होतात, तशीच ती सामाजिक अंतरामुळेही होतात. भाषा ही समाजाच्या मालकीची यंत्रणा आहे. पण प्रत्यक्षात तिचा वापर मात्र एकेका व्यक्तीकडून होत असतो. एकाच कुटुंबातल्या प्रत्येक व्यक्तींची भाषिक ढब वेगळीच असते. समाज जी एकसारखी म्हणून भाषा बोलत असतो, त्या भाषेत व्यक्तिभाषा अडथळा आणत नाही. व्यक्तीने कुटुंब, गाव, गट व समाजापासून फार वैशिष्ट्यपूर्ण वाटावे असे वेगळेपण स्वीकारलेले नसते. कुटुंबाचा, गावचा, गटाचा व समाजाचा एक भाग म्हणून व्यक्ती वावरत असते. एकूणच भाषेचे समाजातील स्थान काय? तेव्हा असे लक्षात येते की भाषा व समाज यांच्यात अन्योन्य संबंध आहे. भाषेशिवाय समाज व समाजाशिवाय भाषा असू शकत नाही.

### १.४.२ बोलींचे समाजातील स्थान :

बोली हे दैनंदिन वापराचे, प्रत्यक्ष व्यवहारातले भाषिक साधन असल्याने ती आपोआपच जिवंत व स्वाभाविक स्वरूप धारण करते. ना. गो. कालेलकरांनी या संदर्भात केलेले विधान असे, ''बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुख परंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते... तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य...'' (भाषा : इतिहास आणि भूगोल पृ. ७०) म्हणून एकभाषक समाजाचा विशिष्ट प्रदेशातील गटाकडून देवाणघेवाणीसाठी, दैनंदिन व्यवहारांसाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषिक रूपास बोली म्हणता येईल. बोलीभाषा या आजच्या काळातील नव्हे, तर शेकडो वर्षाच्या प्रवासातून व रोजच्या व्यवहारातून विकसित झालेल्या आहेत. त्यामुळे बोली ह्या तिथल्या समाजाची आणि प्रदेशाची अभिव्यक्ती असतात. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या मुलखांतून बोलली जाणारी स्थानिक भाषा म्हणजे बोली भाषा. जगभरातले भाषेचे अभ्यासक म्हणतात की, बोली टिकल्या तर भाषा टिकतील. भाषा टिकल्या तर संस्कृती टिकेल आणि संस्कृती टिकली तर समाज आणि त्याची मूल्यव्यवस्था टिकून राहील. विशिष्ट बोलीतून विशिष्ट परिसर, संस्कृती, समाज आणि त्याच्याशी निगडीत तिथल्या माणसांची मानसिकता समोर येते.

कोणत्याही भाषिक समूहाची भाषा कधीच एकरूप नसते. समाजातील भेदानुसार ती भिन्न भिन्न रूपे धारण करते. व्यवसायनिष्ठ बोली, प्रादेशिक बोली, सामाजिक बोली असे विविध प्रकार त्यात येतात. भारत हे बहुभाषिक राष्ट्र आहे. इथे राज्यांची रचना भाषावर झाली आहे. इंग्रजीसह २३ अधिकृत प्रमाणभाषा आणि असंख्य बोली भाषा भारतात बोलल्या जातात.

अमेरीकेतील डायनीयल एब्राम या गणिती तज्ज्ञाच्या मते २१ व्या शतकाच्या अखेरपर्यंत जगात ३०० भाषा अस्तित्वात राहू शकतात. जगात आजमिथीला अस्तित्वात असणाऱ्या ६००० हजारांहून अधिक बोली भाषांपैकी निम्म्या भाषा कायमच्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. सर जॉर्ज ग्रिअर्सनच्या 'लिग्विंस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया' (१९०३-१९२३) नुसार भारतात त्या काळात १७९ भाषा आणि ५४४ बोली होत्या. भारतात-१९६१ च्या जनगणनेनुसार १६५२ भाषा बोलल्या जात होत्या. भाषा धोक्यात आलेल्या देशांत भारत प्रथम क्रमांकावर असून १९८ भारतीय भाषा मृत्यूपंथावर आहेत, असा इशारा युनेस्कोने दिला आहे. बोलींचे प्रदेशावर, जिल्हावार भेद आढळून येतात. काही भेद जात तत्त्वावरही अवलंबून असल्याने एकंदर मराठी बोलींची संख्या शंभराहून अधिक असण्याची शक्यता आहे. अहिराणी, वऱ्हाडी, हळवी, पोवारी, नागपूरी, कोकणी, ठाकरी, वारली, डांगी, सामदेवी, नगरी, कोल्हापूरी, सोलापूरी, पुणेरी, चित्पावनी, चंदगडी असे अनेक प्रकार आढतात.

एकाच समाजातील लोक आतल्या आत भिन्न भिन्न गट करून राहतात. असे गट तयार होण्यामागे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, व्यावसायिक, जातीय असे कोणतेही कारण असू शकते. समाजातील गटांची वेगळी बोली कधी व कशी निर्माण झाली, या संदर्भात डॉ. ना.गो. कालेकर म्हणतात,'' समाजाच्या सर्वच व्यक्ती सदोदित एकत्र येऊन आपले व्यवहार करत नाहीत. काही व्यवहार एखाद्या विशिष्ट वर्गापुरते मर्यादित असतात, कारण समाजरचनेचा एक आवश्यक असा भाग आहे. अशा वर्गातल्या लोकांच्या भाषेचे स्वरूप आणि तिची पातळी सामान्य भाषेपेक्षा वेगळी होते. अशा रीतीने भिन्न असणारी ही भाषा एकाच व्यवसायातल्या अनेक

व्यक्तींना एकत्र आणणारी, पण सामान्य भाषेहून दूर असलेली एक बोली होते.'' (भाषा आणि संस्कृती पृ.४२) सामाजिक व्यवहाराच्या गरजेतून विविध गट तयार होणे हे बोलींच्या निर्मितीचे एक कारण आहे.

भाषा माणसाच्या अस्तित्वाची खूण आहे. त्यामुळे माणसाचे सामाजिक अस्तित्व लक्षात येते. भाषा माणसाच्या जगण्याचा आणि जीवन व्यवहाराचा केंद्रवर्ती गाभा आहे.भाषा माणसाच्या सामाजिक अस्तित्वाची खूण आहे. भाषा सामाजिक आदान-प्रदानाचे माध्यम, कला कल्पनांचे द्रव्य, अशा अनेक पातळ्यांवर माणसाला भाषेवर अवलंबून राहावे लागते. प्रमाणभाषा, समाजभाषा, बोलीभाषा, लोकभाषा व पोट भाषा या सर्वांच्या माध्यमातून सामाजिक आदान-प्रदानाची क्रिया घडत असेल तर बोली हे एखाद्या निश्‍चित भौगोलिक क्षेत्रात बोलले जाणारे स्वरूप असेल. मौखित परंपरा हे बोलींचे महत्त्वपूर्ण वैशिष्टय होय. बोली खरे तर लोकभाषाच आहेत. मौखिक परंपरेने त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात. बोलीभाषेची निर्मिती स्वाभाविकपणे होत असते. बोलींना हजारो वर्षांचा इतिहास आहे. बोली साधी, सरळ, सोपी आणि सहजसुंदर असते. समाज बोली असेही बोलीचे स्वरूप आढळते.

कोणत्याही सामाजिक प्रश्नाचे उत्तर शोधत असतांना बोलींचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. विशेषतः लोकसमूहाचे सामाजिक आणि सांस्कृतिक वर्तन आणि त्याचा आशयाच्या संरचनेशी व घाटाशी असलेला अन्योन्यसंबंध यांचे ज्ञान भाषेवरील प्रभुत्वाशिवाय अशक्य आहे. बोलींच्या अभ्यासाचा प्रारंभ संकलनाने होत असतो. बहुसंख्य बोली या केवळ बोलभाषा असल्याने त्यांना लेखननिविष्ट करावे लागते. बोलीमुळे प्रमाण भाषेला शब्दसंपदा प्राप्त होत असली तरी त्यांचे स्वरूप मात्र प्राचीन आहे. अहिराणी, पावरा, कोकणी, मावची, नायरा, भिल्ली, गोंड, लेवा, गुजरी, कैकाडी, रंगारी या सर्व बोली स्वयंभू आहेत. बोली ही प्रमाणभाषेच्या आगोदर उदयाला आलेली लोकसमूहाची लोकसंवादी भाषा असते. उदा. अहिराणी, कोकणी, पावरी, भिल्ली इ. बोली वापरणाऱ्या समाज-गटाच्या स्वतःच्या अशा काही कल्पना संकेत व समजुती असतात. कित्येकदा समाजाचे काही भाषिक प्रश्न व समस्या असतात. त्यांच्या निवारणासाठी बोलींचा अभ्यास फलदायी ठरतो.

सामाजिक एकात्मतेच्या दृष्टीने समाजात बोलल्या जाणाऱ्या विविध बोली महत्वपूर्ण ठरतात. बोलींच्या अभ्यासामुळे प्रमाणभाषा व बोली यांचे अनुबंध नीट समजण्यास मदत होते. म्हणूनच की काय, समाजातील सर्व घटकांची समान प्रगती साधायची असेल तर प्रारंभिक व प्राथमिक शिक्षण बोलीतून दिले जावे असा एक विचार प्रवाह पुढे येतांना दिसतो आहे. अनेक सामाजिक व भौतिकशास्त्रे संपन्न होण्यासाठी बोली उपयुक्त ठरतात. म्हणून मराठी समाज हा कसा नि किती प्रकारे भाषिक दृष्ट्या विभागला गेला आहे, हे जाणून घेणे सामाजिक विकासाच्या दृष्टीने गरजेचे आहे. भाषिक संरचनेच्या दृष्टीने सर्व बोली सारख्याच असतात. वास्तविक पाहता कोणतीही बोली स्वतःच्या समाज क्षेत्रात गरजेनुसार विकसित होत असते. प्रत्येक बोलीचा स्वतःचा असा शब्दसंग्रह असतो. परंतु बोली म्हणजे गावंढळांची, अप्रतिष्ठितांची किंवा अशुद्ध व चुकीची भाषा होय. असा गैरसमज तयार झालेला दिसतो. बोली भाषा साधी असून ती अलंकृत असतेच असे नाही.सहजपणा व सोपेपणा हा तिचा स्वाभाविक गुणधर्म दिसतो. बोलीला राजकीय व सामाजिक स्थैर्य प्राप्त झाले तर ती प्रमाणभाषा बनू शकते.

महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या समाजातून बोलली जाणारी स्थानिक भाषा ही बोली भाषा असते. लोक आपली बोली बोलणे सहजासहजी सोडू शकत नाहीत. मोजक्या शब्दांत मोठा आशय व्यक्त करणाऱ्या म्हणी बोलीतील

अत्यंत अमूल्य असा खजिनाच असतात. प्रत्येक बोली तिच्या विशिष्ट भूप्रदेशाशी एकनिष्ठ असते. ती भूगोलाशी जोडली गेलेली असून माणसाशीही एकरूप झालेली असते. भाषा किंवा बोली ही त्या समाजाचे प्रतिबिंब असते. समाजाला काय वाटते अथवा त्याचे काय मत आहे, यासारख्या प्रश्नांची उत्तरे भाषा व बोलीतूनच मिळतात. बोलीचा शब्दकोश तयार करताना भाषिक समाजाचा सांस्कृतिक पार्श्वभूमीचा विचार करावा लागतो.

बोलीला इंग्रजीत Dialect म्हणतात. व्यवहारात केवळ बोलण्यासाठी व सामाजिक वर्तुळात बोलीचा वापर होतो. 'बोली,बोलण्यासाठी वापरली जाते. काही विशिष्ट प्रसंगी ती लिहिली जाते. प्रमाण भाषेत नसलेला अनौपचारिकपणाचा अंश बोलीत ठळकपणे आढळून येतो. कोणतीही प्रमाणभाषा प्रथम बोली असते. एका प्रमाणभाषेत अनेक बोली असू शकतात. विविध व्यक्तींच्या विविध गटांकडून बोलल्या जाणाऱ्या विविध बोलींचे विविध गट बनतात. उदा. कुटुंब-बोली, जाती-बोली, व्यवसाय बोली इ. दोन भिन्न भाषिक समाज काही कारणास्तव एकत्र येवून आपली प्रारंभिक बोली टाकून दुसऱ्या समाजाची बोली स्वखुशीने स्वीकारतो. एका मोठ्या प्रदेशात बोलली जाणारी बोली कालांतराने त्या प्रदेशाच्या वेगवेगळ्या भागात कमी-अधिक प्रमाणात परिवर्तित होते. भौगोलिक परिस्थिती हे बोली निर्मितीचे महत्त्वाचे कारण आहे. भौगोलिकदृष्ट्या प्रांतांचे स्वरूप वेगवेगळे असते, त्यानुसार समुद्रसपाटी, घाटमाथा, जंगली, डोंगरी असे भाग पडतात. परभाषेचा सतत येणारा संपर्क देखील बोलींच्या निर्मितीस कारण ठरू शकतो. समाजाची सर्वांगीण प्रगती करताना भाषा या माध्यमात उच्चनीच, शुद्धअशुद्ध असे भेद करून चालत नाही. सर्वांना एकत्र आणणारे माध्यम प्रवाही व्हावे आणि समाज जीवनाच्या विकासाला गती प्राप्त व्हावी यासाठी प्रमाण भाषेबरोबरच बोलींची प्रतिष्ठा उंचावली पाहिजे.

भाषा आणि तिच्या बोली यांचे चित्र समोर आले की, एखादी पसवलेली केळ आणि तिच्या अवतीभवती उगवणारे मुनवे असे दृश्य समोर उभे राहते. भाषा आणि बोली यांच्यातील संबंध समजेपर्यंत अशी समजूत होती की बोलीभाषांच्या अस्तित्वामुळे प्रमाणभाषा कमकुवत होते, तिच्या विकासाला अडसर निर्माण होतो, भाषेचे शुद्ध रूप बोलीमुळे बिघडते. परंतु प्रमाणभाषेची निर्मिती बोलीतूनच होत असते. समाजात व्यक्त होणारी संस्कृती बहुविध असते. त्या संस्कृतीतील मानवांच्या गरजा, त्यांच्या पूर्तीची साधने यांच्या अनुषंगाने भाषाही समृद्ध बनते. ऐकणारा व बोलणारा या दोघांनी मिळून झालेली भाषा समाज व्यवहारात एकविध असते. त्यातूनच भाषिक व्यवहार सुरळीत होत असतात. विविध विनिमयाचे साधन भाषा असून कोणत्याही समाजात विविधता असतेच. स्वाभाविकपणे भाषा व बोलीत विविधता येते. दर बारा कोसावर भाषा बदलते असे म्हटले जाते. एवढेच नाही तर एकाच सामाजिक स्तरातील एकभाषीय व्यक्तींच्या भाषेत अंतर जाणवते. समाजातील बोलींचे स्थान महत्त्वपूर्ण असून बोली आणि समाज यांचा स्वतंत्र विचार आपण करू शकत नाही.

### १.५.१ भाषा व बोली यांचा सहसंबंध

समाजजीवन व व्यक्तिजीवन यांची अभिव्यक्ती अत्यंत सूक्ष्म व तरल होत जाते. त्यमुळे प्रमाणभाषेच्या मदतीला बोली भाषांची मदत घ्यावी लागते. वेगवेगळ्या समाज जीवनाला व्यक्तरूप देतांना त्या समाजात वापरात असलेले विशेष शब्द, वाक्प्रयोग साहित्यिकाला वापरावे लागतात. त्यामुळे पर्यायाने भाषा समृद्ध होते. प्रमाणभाषेत न आढळणारे आशयगर्भ शब्द बोली भाषेत असतात त्यांची उसनवारी केली जाते. प्रत्येक मानवाच्या व्यक्तिमत्वाची जडण-घडण त्याच्यावर होणाऱ्या संस्कारांनी होत असते. जन्मापासून त्यांच्यावर जे काही संस्कार

घडतात ते बोलीभाषेच्या माध्यमातून. प्रमाण भाषेचे संस्कार हे तो शाळेत जायला लागल्यापासून सुरू होतात. प्रमाणभाषेचे संस्कार जाणिवपूर्वक केले जातात तर बोलीचे संस्कार भावनिक व शारीरिक गरजे पोटी आपोआप होतात.

बोली प्रमाणभाषेला आणि ललित साहित्याच्या अभिव्यक्तीला मूलद्रव्य पूरवीत असतात. मराठी साहित्यातील बोलींचे अस्तित्व आशय, अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत किती महत्वाची भूमिका बजावू शकते, हे सिद्ध केले आहे. शंकर पाटील, उध्दव शेळके, आनंद यादव, राजन गवस, सदानंद देशमुख, बाबाराव मुसळे अशा अनेक सहित्यिकांनी बोलींचा समर्थ वापर आपल्या साहित्यातून के ला आहे. दलित आत्मकथनांतील बोलींचा वापर तिथल्या व्यथा-वेदनां व वास्तव जीवनचित्रणांसह मांडला आहे.

प्रमाण भाषा म्हणजे भाषा व इतरत्र बोलली जाणारी विविध रूपे होय. बोली म्हणजे भाषा आणि बोली व्युत्पतीनुसार समानार्थी शब्द असले तरी त्यांना वेगळी अर्थछटा आहे. भाषा ही अधिक व्यापक तर बोली थोड्या लहान परिघात सामावलेल्या असतात. तसे पाहिले तर भाषा व बोली यांना एकत्र अर्थ आहे. जी बोलली जाते ती भाषा किंवा बोली अर्थांच्या दृष्टीकोनातून त्यात फरक नाही. सर्वच भाषा प्रथम बोली असतात. भाषा ही भाषाच असते, ती शुद्ध, अशुद्ध असू शकत नाही. वेगवेगळ्या प्रादेशिक छटांकडे भाषेचे सौंदर्य म्हणून पाहिले पाहिजे. मात्र व्यवहार व भाषा आणि बोली यात फरक केला जातो. भाषेतील सर्व बोलींची मध्यवर्ती बोली असते, तिला प्रमाणभाषेचा दर्जा प्राप्त होतो. प्रमाणभाषा सर्व बोलींना आणि सर्व बोली प्रमाणभाषेला आकलनक्षम असतात. बोलींना लेखनाच्या नियमात बांधणे जितके कठीण अनावश्यक तितकेच प्रमाण भाषेला लेखनाचे सुसंगत नि पुरेसे नियम असणे नैसर्गिक.

सर्व बोली बोलणाऱ्या लोकांना प्रमाणभाषा कळते. एकमेकांच्या बोली समजून घेण्यासाठी प्रमाणभाषेचा उपयोग होतो. प्रमाणभाषेच्या तुलनेत बोली अधिक जिवंत आणि चैतन्यमय असते. तिला वेग व विविध हेल असतात. त्यामुळे बोली प्रमाणभाषेपेक्षा जास्त आकर्षक असते. बोलींचे प्रभाव क्षेत्र प्रमाणभाषेच्या तुलनेत खूपच लहान असते. निरनिराळ्या भागांतील लोक निरनिराळ्या प्रकारची मराठी बोलत असतात; तरीही ह्या सगळ्या ठिकाणचे महाराष्ट्रीय लोक बोलतात ती मराठी भाषा, मराठी ही निरनिराळ्या बोलींना सामावून घेणारी प्रमाणभाषा आहे. कोणतीही बोली पुन्हा तिच्या प्रदेशात किंवा तिच्या गटात सर्वत्र सारखी बोलली जाते असे नाही. बोली भाषा तिच असते. पण एखाद्या ठिकाणी ती लक्षणीय बदल होऊन बोलली जाते. बोली वापरणारे लोक परस्परांमध्ये व्यवहार करताना ज्या भाषिक रूपाचा आश्रय घेतात., त्याच प्रमाणभाषा किंवा प्रमाणबोली असतात. प्रमाणभाषेचे अनेक स्थानिक भेद असू शकतात. हे भेद खूप वैशिष्ट्यपूर्ण झाले की त्यांना बोलीचे स्वरूप येते. बोली हे खेड्याचे अस्पष्ट रूप होय. खरे म्हणजे प्रमाणाभाषा ही देखील एक बोलीच असते. प्रमाणभाषेचे व्याकरण, शब्दकोश जसे असतात, तसे बोलीचेही असायला हवेत.

बोली म्हणजे ज्याच्या त्याच्या वर्गाच्या व्यवहारात स्वाभाविकपणे वापरली जाणारी भाषा. हीच बोली काही वर्गाच्या बाबतीत प्रमाणभाषेच्या फार जवळची असते. तर काही वर्गाच्या बाबतीत फार दूरची असते. प्रमाणभाषा व बोली यांच्यातील हे जवळ दूरचे नाते ध्वनी, शब्द, रूपविचार आणि वाक्यरचना ह्या सर्व स्तरांवर असू शकते. उदा. खानदेशी, बोली व प्रमाण मराठी ह्यांच्यातील काही ध्वनींचे नाते. बोली मुख्यतः मौखिक

असते. पण भाषा लिखित स्वरूपात असते. बोलीमधून एक भाषा बनते, मग एका भाषेतून अनेक उपबोली तयार होत असतात. भाषा आणि बोली यांच्यातील काही भेद मान्य करूनही त्यांच्यातील सहसंबंधही तितकेच महत्त्वाचे आहेत. कोणतीही भाषा व्यापक अर्थाने बोलीच असते.''बोली या भाषेला अनेकदा पूरकच ठरतात. भाषेचे लेखन पारंपारिक आणि कृत्रिम असते. यामुळे भाषेची स्वाभाविकता हळुहळु नाहीशी होऊन ती कृत्रिम आणि साचेबंद होत चाललेली असते. हा साचेबंदपणा कमी करण्यासाठी बोली उपयोगी पडत असतात. एखादा शब्द प्रमाणभाषेत वापरून इतका गुळगुळीत झालेला असतो की त्याचा हवा तो परिणाम अशक्य होऊ लागतो. त्यावेळी त्याला पर्यायी शब्दरचना बोलीच पुरवत असतात. त्यामुळेच भाषेचा जिवंतपणा टिकून राहिलेला असतो. या दृष्टीने प्रसारमाध्यमांतील जाहिरांतीमध्ये वापरली जाणारी बोली लक्षात घेण्यासारखी असते''. (मराठी वर्णनात्मक भाषाविज्ञान पृ. क्र. १७८) म्हणून भाषा आणि बोली यांच्यातील सहसंबंध लक्षात घेतल्यावर अनेक गैरसमज दूर होण्यास मदत होते. यामुळे बोली या भाषेला मारक असतात हा गैरसमज दूर होतो. कारण भाषा शेवटी बोलीच असतात.

बोलीच्या मूळ केंद्रापासून समाज जसाजसा दूर सरकत जातो तसा त्या समाजाचा मूळ केंद्राशी संपर्क कमी होतो. पर्यायाने केंद्राच्या बोलीशी संपर्क कमी होतो.याच वेळी केंद्रापासून सरकणाऱ्या समाजाचा विविध बोलींशी संबंध येतो. त्यामुळे बोलीत बदल होऊन, विनिमयासाठी बोलींमध्ये देवघेव सुरू होते. यातून केंद्रापासून सरकणे आणि इतर बोलींशी संपर्क येणे या दोन कारणांमुळे एकाच प्रदेशातील एकाच बोलीमध्ये बदल होऊ लागतात आणि एकाच बोलीतून अनेक बोली निर्माण होतात. नव्याने निर्माण होणाऱ्या या बोली परस्पर भिन्न असल्यातरी त्या मूळ बोलीशी संवादी असतात. नैसर्गिक आणि स्वाभाविक रीतीने वेगळे होऊन आपले स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करणे यातून बोली निर्माण होतात. तर व्यवहाराच्या सोयीसाठी एखाद्या बोलीचा एकजिनसीपणे वापर करणे यातून भाषा निर्माण होतात.

अनेक बोलीपैकी एखाद्या बोलीतून जेव्हा सामाजिक, सांस्कृतिक साहित्यिक आणि शैक्षणिक चळवळी होतात, तेव्हा तिचे वर्चस्व वाढत जाते. पुढे हीच बोली सर्व घटकांच्या विकासाला मदत करते. या बोलींना पुढे प्रमाणभाषेचा दर्जा प्राप्त होतो. त्यामुळे प्रमाणभाषेच्या सांस्कृतिक आणि राजकीय वर्चस्वाखाली वाढणाऱ्या बोली बोलणाऱ्या समूहांना मान्य कराव्या लागतात. लेखनाच्या प्रक्रियेत प्रामान्य निश्चित करून, विविध बोलींशी संवादी असावे लागते. त्या बोलीला मग प्रमाणभाषेचा दर्जा प्राप्त होऊ लागतो. त्यामुळे त्या मुद्दाम शिकवाव्या लागतात. यामुळे भाषेला कृत्रिम स्वरूप प्राप्त होऊ लागते. या कृत्रिमपणे शिकाव्या लागणाऱ्या प्रमाण भाषेच्या राजकीय वर्चस्वाखाली, तिच्याशी सांस्कृतिक संबंध असणाऱ्या बोली विनिमय साधत असतात. मराठी ही प्रमाणभाषा असून सांस्कृतिक संबंध असणाऱ्या अहिराणी, वऱ्हाडी बोली तिच्याशी विनिमय साधत असतात. भाषेचे भौगोलिक परिक्षेत्र विस्तृत असून, त्या तुलनेत बोलीचे भौगोलिक परिक्षेत्र मर्यादित असते. बोलीच्या सीमा मर्यादित असल्याने तिचा वापर कमी व त्यामानाने भाषा अधिक विस्तृत प्रमाणात वापरली जाते.

कोणत्याही भाषेत प्रमाण भाषेव्यतिरिक्त बोलींचा स्वतंत्र समूह असतो. प्रदेशनिहाय आणि समाजनिहाय बोलींचे रूप बदलते. मानवी जीवनात लोक बोलीची निर्मिती लोकव्यवहारात लोकांमुखी स्वाभाविकपणे होते. त्यात कमालीचा जींवतपणा व ताजेपणा असतो. बऱ्याच बोली विविध भाषांच्या मिश्रणातून तयार झाल्या आहेत.

ह्या बोली एकमेकींवर अवलंबून असतात. काही बोलीवर तिच्या भाषाकुलाचा प्रभाव दिसतो. तर काहींवर तिच्या भौगोलिक पर्यावरणाचा प्रभाव जाणवतो. महाराष्ट्रातील अनेक आदिवासी बोली मराठीच्या सावलीतच रांगताना दिसतात. कोरकू, भिलोली, गोंडू, कोलामी, हलवा या बोलींनी स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व अबाधित राखले आहे. बोली या आदिम भाषा आहेत. आज भारतभर पंधराशे बोलींचे अवशेष सापडतात.

सर्व घटक बोली गटांना समजेल अशी प्रमाणभाषा आपोआप रूढ होत असते, ती बोलींच्या आधारानेच प्रमाणभाषा बोलींचे सामर्थ्य घेऊन प्रवाहित होत असतात. प्रमाण भाषेतील बहुतांश शब्दही बोलीमधून उचललेले असतात. जी प्रमाण भाषा आपल्या घटक बोलींचे शब्द जास्तीत जास्त प्रमाणात वापर करतील, ती भाषा टप्प्याटप्याने समृद्ध होत जाते. उलट जी भाषा आपल्या शुद्धतेच्या नावाखाली सोवळे पाळायला लागते ती लवकरच मृत होते. याचे प्रमुख उदाहरण म्हणजे संस्कृत भाषा. आजची प्रमाणभाषा काही वेगळी नसून सर्वांना सलोख्याने एकत्र आणण्यासाठी निर्माण केलेले एक माध्यम आहे. प्रमाणभाषा समाजातील बहुविध संस्कृतीला एकत्र आणणारा दुवा आहे. अशा बहुविध संस्कृतीतील व्यक्तींना एकत्र आणण्याची जी मोठी जबाबदारी तिने उचललेली असते ती पार पाडण्याचे सामर्थ्य प्रमाणभाषेला ह्या बोली भाषेतूनच प्राप्त होते. अशा परिस्थितीत प्रमाणभाषा आणि बोलीभाषा ह्यात उच्चनिच मानणे विसंगत ठरेल.

एखादी बोली वापरणारा समूह कोणत्या भाषेशी 'विनिमय' साधतो त्यावरून त्या बोलीचा भाषेशी असलेला संबंध निश्चित केला जातो. कालेलकरांच्या मते त्या समूहाची 'बांधिलकी' कोणत्या भाषेशी अधिक आहे, त्यावर बोलीचे संबंध अवलंबून असतात. ग्वाल्हेरमधील मराठी भाषक आजही मराठी भाषेचे आहेत हेही महत्वाचे असते. भाषा आणि बोली यांच्यातील सहसंबंध यांचा अभ्यास आपण इथे केलेला आहे.

### १.५.२ भाषा आणि बोली : साम्यभेद

भाषा आणि बोली यांच्यातील सहसंबंध स्पष्ट केल्यानंतर त्यांच्यातील साम्यभेद खालीलप्रमाणे नोंदवता येईल.

१) भाषा ही प्रमाण आणि एकरूपत्वाकडे झुकणारी असते. बोलित अशा स्वरूपाचे प्रमाणत्व आणि एकरूपत्व गृहीत धरलेले नसते.

२) प्रमाणभाषा ही प्राय केंद्रस्थानी असते. त्यामुळे दोन पूरस्थ वा सीमेवरील बोलींना ती जवळची असते.

३) बोली प्रमाणभाषेशी साधर्म्याप्रमाणेच वैधर्म्यही दर्शवीत असते.

४) बोलींचा वापर करणारा असा एखादा गट असतो. तसाच प्रमाणभाषेचा वापर करणाराही एखादा गट असतो. हा गट जेव्हा बोलण्याच्या पातळीवर प्रमाणभाषेचा वापर करत असतो तेव्हा तो वापर लेखनाप्रमाणे जसाच्या तसा नसतो म्हणून त्या भाषेस 'प्रमाण बोली' असे म्हणतात.

५) प्रमाणभाषेच्या सीमाक्षेत्रावरील बोलीत भाषामिश्रण आढळते. त्यातून द्वैभाषिक समस्या उद्भवतात.

६) एखाद्या स्थानिक बोलींच्या आकलनक्षेत्राहून प्रमाणभाषेचे आकलनक्षेत्र अधिक विस्तृत असते.

७) शिक्षण, शासकीय कामकाज, साहित्य निर्मिती इत्यादींसाठी भाषेचा वापर केला जातो. बोलींचा वापर दैनंदिन विनिमयासाठी केला जातो. अलिकडे ललित साहित्यात बोलींचा वापर होऊ लागला आहे.

८) प्रमाणभाषा ही लिपिबद्ध असते, उलटपक्षी बहुतेक बोलींना लिपी नसते. गोमंतकी-कोकणीला पूर्वी लिपी नव्हती.

९) लिपीबद्धतेमुळे बोलीपेक्षा प्रमाणभाषेत व्यक्तिसापेक्ष साम्यभेदांचे प्रघात कमी प्रमाणात आढळून येतात.

१०) लिपिबद्धतेमुळे प्रमाणभाषेला अभिव्यक्तीला विशिष्ट स्तरावरील ठरीवपणा प्राप्त होतो. त्यामुळे तिला औपचारिकता आणि कृत्रिमताही येत असते.

११) प्रमाणभाषेतून लुप्त झालेले जुने शब्द किंवा व्याकरणिक रूपं बोलीच्या वर्तमान स्वरूपात जशीच्या तशी राहिलेली आढळून येतात.

१२) लेखनाचे आणि व्यापक विनिमयाचे माध्यम म्हणून भाषेकडे पाहिले जात असल्याने तिच्यात कृत्रिमता, घडविण्याची प्रवृत्ती असते.याउलट बोलीत सहजता आणि घडणे या प्रवृत्ती असतात. बोली मुद्दाम घडवावी लागत नसते. ती प्रादेशिक पर्यावरणात आपोआप घडत असते.

१३) बोली बोलणाऱ्यांचा सांस्कृतिक दर्जा आणि महत्त्वकांक्षा बोलीला प्रमाणभाषेच्या योग्यतेस पोहोचवू शकते.

१४) प्रमाणबोली आणि स्थानिक बोली यांच्यातील साम्यभेद ध्यानात घेऊनही भाषावैज्ञानिक दृष्ट्या ध्वनिविचार, स्वनिमविचार, पदिमविचार आणि वाक्यविचार या सर्व स्तरांवर प्रमाण बोली प्रमाणेच स्थानिक बोलीचेही वर्णनात्मक व्याकरण यथार्थपणे तयार करणे शक्य आहे.

१५) लेखनाचे आणि व्यापक विनिमयाचे माध्यम म्हणून भाषेकडे पाहिले जात असल्याने, तिच्यात कृत्रिमता, घडविण्याची प्रवृत्ती असते. बोली मुद्दाम घडवावी लागत नसते. ती प्रादेशिक पर्यावरणात आपोआप घडत असते.

१६) व्यवहाराच्या सोयीसाठी भिन्न भाषा शिकाव्या लागतात. बोली शिकाव्या लागत नाहीत.

१७) विशिष्ट पातळीवर समाज एकजिनसी राहण्यासाठी आणि व्यापक विनिमयाच्या सोयीसाठी प्रमाणभाषेची निर्मिती केली जाते. अशी एकजिनसी स्वरूपाची जाणीवपूर्वकता बोलीमध्ये नसते.

१८) ज्याप्रमाणे एकाच भाषेच्या बोली 'परस्परांस आकलन' होतात तशा भिन्न भाषा होत नाहीत. दोन किंवा दोनपेक्षा जास्त भाषेमध्ये विनिमय शक्य होण्यासाठी एखाद्या संपर्क भाषेची गरज असते.

१९) प्रमाणभाषेचे क्षेत्रफळ विशाल असते. त्या तुलनेत बोलीचे क्षेत्र मर्यादित असते.

२०) भाषेचे एक प्रमाण रूप असते, परंतु बोलीचे प्रमाण रूप नसते.

२१) भाषा बोलणाऱ्यांची संख्या जास्त असते. त्या मानाने बोली बोलणाऱ्यांची संख्या कमी असते.

२२) बोलीमधून एक भाषा बनते मग एका भाषेतून अनेक उपबोली तयार होत असतात.

### १.५.३ भाषा, बोली आणि समाज : सहसंबंध

बोली ही खऱ्या अर्थाने मानवाची मातृभाषा असते. तर शालेय जीवनापासून शिकली जाणारी प्रमाणभाषा ही त्याची शिक्षक भाषा म्हणता येईल. याच्या नंतर समाजातील भौतिक - गरजा पूर्तीसाठी वापरली जाते, ती

त्याची समाजभाषा असते. बोलीमध्ये भेद भौगोलिक दृष्टीने एकमेकांना जितके जवळचे तितके त्यांच्यातले साम्य अधिक आणि जितके दूरचे तितका त्यांच्यातील फरक तीव्र होत जातो. प्रत्येक बोली बोलणाऱ्या समाजाची स्वतःची एक पृथक संस्कृती असते, जी इतर बोलीभाषक समाजाशी काही बाबतीत साम्य तर काही प्रमाणात भिन्नता दर्शवीत असते. म्हणून दोन जवळच्या भाषा आणि बोली यांचे परस्पर संबंध तपासून पाहता येतात. एकाच भूभागात लहान मोठ्या बोली एकमेकींच्या सहवासात आपापसात देवाण-घेवाण करून गुण्यागोविंदाने नांदत असतात. प्रमाणभाषा व बोली याबाबतीत 'चांद्यापासून बांद्यापर्यंत' उभ्या महाराष्ट्रासाठी मराठी भाषेचे सर्वमान्य रूप गृहीत धरले आहे. एकूणच कोणत्याही समाजाला, कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही काळात प्रमाणभाषेची आवश्यकता असते. प्रमाण भाषा नसेल तर त्या समाजाचा व्यवहारच थांबू शकेल.

माणसाला भाषा सामाजिक संदर्भात शिकावी लागते. म्हणून एका विशिष्ट वंशाचे किंवा विशिष्ट भाषक गटात जन्मलेले मूल दुसऱ्या भाषक गटात वाढले, तर ते त्या गटाची भाषा शिकते. क्षेत्रबोलीनंतर 'सामाजिक बोली'ही संकल्पना आली. लबव्ह यांनी सामाजिक दबाव व भाषा व्यवस्थेचा दबाव यातून भाषेत बदल होतात.हे संशोधनातून सिद्ध केले. भाषेचा प्रसार ती नवी का जुनी यापेक्षा तिच्या वापराला सामाजिक प्रतिष्ठा आहे का यावर असतो. सामाजिक प्रतिष्ठेवर भाषाबाबीचा स्वीकार व प्रसार अवलंबून असतो. समाजातल्या विशिष्ट वर्गानुसार भाषेत बदल होतो. सामाजिक वर्गाच्या आधारे बोली ठरविता येतात. बोली भाषेची स्वरूपे अनेक असून लिखित मराठी हे सर्व मराठी भाषिक समाजासाठी उपयोगात आणले जाणारे व्यवहार्य साधन आहे. स्थानिक बोलींवर आधारलेले आणि समाजातील विशिष्ट वर्गाचे जीवन रंगवणारे साहित्य या नियमाला अपवाद आहे.

सामाजिक जीवनात आपण स्वीकारलेल्या उच्चनिचतेच्या श्रेणी भाषेला लागू करणे योग्य नाही.अनेकदा भाषेचा संबंध समाजातील प्रतिष्ठित वर्गाशी जोडला जातो. प्रतिष्ठितांनी किंवा समाजावर वर्चस्व गाजवणाऱ्यांची भाषा खरी आणि समाजातील अन्य वर्गाची भाषा म्हणजे असंस्कृत, गावंढळ भाषा असा भेद केला जातो. समाजाचा प्रत्यक्षातील भाषिक व्यवहार बोलीतून जास्त प्रमाणात होत असतो. असे असले तरी समाजावर प्रमाण भाषेचे वर्चस्व जास्त दिसते. सर्व बोली गटांकडून शिक्षण, शासन, व्यवहार, देवाण-घेवाण, नोंदी, कागदपत्रे, धर्मव्यवहार व साहित्यनिर्मिती यासाठी प्रमाणभाषेचा वापर केला जातो. बोलीच्या तुलनेत प्रमाणभाषा वापरण्याचा प्रसंग त्या गटावर फार कमी वेळा येत असतो. एकूणच प्रमाणभाषा संपूर्ण समाजाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक, वाङ्मयीन संवर्धनासाठी आणि सामाजिक विनिमयासाठी, राजकीय अस्तित्वासाठी व लौकिक विकासासाठी वापरली जाते. प्रमाणभाषेला तिच्या आश्रयाने वावरणाऱ्या आणि प्रत्यक्ष व्यवहारात जास्ती वापर असणाऱ्या बोलीपेक्षा महत्व प्राप्त होते. ''मानवी समाज व भाषा यांचा संबंध अतूट असतो, याचा पुरावा समाजागत व व्यक्तिगत असा दुहेरी आहे. एक म्हणजे स्वतःची भाषा व बोली नाही असा एकही मानवी समाज आढळत नाही.'' (आधुनिक भाषाविज्ञान संरचनावादी पृ.क्र. १५)

दोन भिन्न भाषक समाज एकत्र येऊन त्यापैकी एक, साामन्यतः न्यूनगंड असलेला समाज, सार्वजनिक व्यवहारात आपली भाषा सोडून देऊन त्या दुसऱ्या समाजाच्या भाषेचा स्वीकार करतो. तो करताना जे संक्रमण होते, त्यातून एक नवीन बोली जन्माला येऊन त्या समाजाची नवी पिढी ही बोली वापरायला लागते. उदा. बेळगाव भागाची मराठी. मानवी समाज व भाषा यांचा संबंध अतूट असतो, याचा पुरावा समाजगत व व्यक्तिगत असा

दुहेरी आहे. स्वत:ची भाषा व बोली नसलेला एकही मानवी समाज आढळत नाही. मानवी भाषेला जैविक, अनुवंशिक अधिष्ठान असले पाहिजे, परंतु त्याबरोबर विशिष्ट भाषा अवगत होण्यासाठी सामाजिक संदर्भ व संपर्क अपरिहार्य असतो. सामाजिक संबंध निर्माण करायचे, राखायचे, वाढवायचे आणि काही वेळ तोडायचे ही कामे भाषेच्या वापरामुळे सुलभपणे होतात. भाषा ही मानवाची सर्वात महत्वाची संदेशनपद्धती असून मानवी समाज व संस्कृती यांचा अविभाज्य घटक आहे. सामाजिक व सांस्कृतिक जीवनामध्ये आवश्यक असणाऱ्या संपर्क क्रियेसाठी व सहकार्यासाठी मानव अनेक प्रकारच्या संदेशनाच्या व्यवस्था वापरतो. बोली, भाषा, समाज आणि संस्कृती आपल्याला टिकविण्यासाठी भौगोलिक व भाषिक प्रांत वेगळे करून चालणार नाहीत.

कोणत्याही भाषेत व्यक्तिगत बोली, सामुहिक बोली, प्रादेशिक बोली असे विविध बोलीप्रकार असतात. या सर्व प्रकारच्या बोलीतून भाषा आकारत असते. अशा भाषा विशिष्ट देशांच्या किंवा राज्याच्या असू शकतात. यामुळे प्रादेशिक अशा स्वरूपाचे जे सामाजिक आणि सांस्कृतिक संचित असते ते बोलीने टिकवलेले असते. बोली ही खऱ्या अर्थाने मानवाची मातृभाषा असते. तर शालेय पातळीपासून शिकली जाणारी प्रमाणभाषा ही त्याची शिक्षकभाषा म्हणता येईल. यानंतर त्या-त्या समाजातील भौतिक गरजा-व्यवहारपूर्तीसाठी वापरली जाते, ती त्याची समाज भाषा होय. प्रत्येक बोलीभाषक समाजाची स्वत:ची एक पृथक संस्कृती असते. जी इतर बोलीभाषक समाजाशी काही बाबतीत साम्य तर काही प्रमाणात भिन्नता दर्शवीत असते. समाजजीवनात आपोआप निरनिराळी वर्तुळे निर्माण होत राहतात आणि त्या गटाच्या जगण्याच्या शैलीला पोषक रूप भाषा धारण करते. त्यातूनच बोलींची निर्मिती होत राहते. प्रमाणभाषा समाजाला धैर्य देते. प्रत्यक्ष दैनंदिन वापरात असल्यामुळे बोली लवचिक व सदैव परिवर्तनशील असतात. तर बोलींच्या तुलनेत प्रमाणभाषा समाजाच्या दैनंदिन वापरात कमी वापरली जात असल्याने तिचे रूप बरेच स्थिर असते. शिवाय लेखन व्यवहारासाठी प्रमाणभाषा वापरली जात असल्याने समाजस्थैर्याला पोषक व पुरक ठरतात.

समाजातील कोणत्याही एका वर्गासाठी भाषेचे अस्तित्व असत नाही. सर्व समाज घटकांना उपयुक्त ठरणारी, समाजाच्या सहजीवनाची ती सामुहिक व्यवस्था असते. भाषा जरी सामाजिक असली तरी बोलणे मात्र व्यक्तिनिष्ठ आणि विविध स्थानिक संदर्भात असते. भाषा ही विचार व भावनांच्या अभिव्यक्तिसाठी आहे. बदलत्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिप्रेक्षात आज अशा भाषिक मोहरांची किंमत जरी कमी झाली नसली तरी भाषेच्या बोलीवरील अतिक्रमणामुळे त्या लुप्त होतील की काय अशी भिती वाटू लागली आहे. प्रमाणभाषा, राजकारण, समाजकारण, संस्कृती व शिक्षण या क्षेत्रांत वापरली जाते आणि समाजाकडून लेखन व्यवहारासाठी स्वीकारली जाते. लेखन व्यवहारासाठी समाजातील सर्व घटक प्रामुख्याने प्रमाणभाषेचाच आश्रय घेतात. समाजातल्या निरनिराळ्या गटाकडून आपापसात व्यवहार करण्यासाठी तिचा वापर करतात. एक भाषक समाज तिचा आदर्श स्वरूपात का होईना वापर करीत असतो. प्रमाणभाषा समाजाच्या दैनंदिन व्यवहारात कमी वापरली जात असल्याने तिचे रूप बरेच स्थिर असते. प्रमाणभाषा व तिच्या आश्रयाने वावरणाऱ्या विविध बोली यांचा समाजाशी सहसंबंध असतो. एकमेकांच्या खूप जवळ असणाऱ्या बोली यांची बेरीज म्हणजे प्रमाणभाषा होय.

बोली दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन असून, परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. भाषेच्या शब्दसंग्रहात भाषिक समाजाच्या जीवनपद्धतीचे पूर्ण प्रतिबिंब पडलेले असते. प्रत्येक

भाषिक समाजात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भौगोलिक या कारणांनी उत्पन्न झालेल्या गटांच्या विविध बोली व व्यवसाय बोली आढळतात.

समाज ही एक सामाजिक संस्था आहे. मनुष्य हा समुहप्रिय प्राणी आहे. समाजव्यवहार निटपणे चालविण्यासाठी भाषा या संस्थेचा उपयोग माणसाला होत असतो. भाषा या संस्थेमुळे माणसांची संस्कृती टिकण्यास मदत होते. एकूणच भाषेचे अस्तित्व समाजाकडून होणाऱ्या वापरावर अवलंबून असते. सहयोग-सहकाराच्या विनिमयाचे साधन म्हणून भाषेचे महत्त्व फार मोठे असते. भाषा कुणा एका व्यक्तीच्या मालकीची नसून समाजाच्या मालकीची असते. तिचा वारसा परंपरेने सर्वांनाच मिळालेला असतो. परंपरागत संकेत मोडले तर समाजाला ते मान्य नसतात. परस्पर विनिमय होण्यासाठी समाजमान्य संकेत असलेली भाषाच वापरावी लागते. भाषा अर्जित वस्तू आहे. भोवतालचा समाज, परिस्थिती, स्वत:ची आई यासारख्या घटकांकडून मूल भाषा शिकते. सर्वसामान्य असलेले ध्वनिसंकेत अर्थासह ते मूल आत्मसात करते. ''समाजाच्या वृत्ती-प्रवृत्ती व्यक्तीत उतरतात तर व्यक्तिगत सवयींचा परिणाम भाषेवर होत असतो. भाषाच सामाजिक संबंध प्रस्थापित करीत असते. मानवाश्रित असूनही समाजसापेक्ष असल्यामुळे भाषा स्वयंसिद्ध सामाजिक संस्था आहे. मात्र ती अर्जित असल्यामुळे भाषेत परिवर्तनशीलता शक्य असते. मानव आणि समाज यांच्या गरजेनुरूप भाषा नवी-नवी रूपे धारण करते. त्यातूनच स्थळ काळानुरूप भाषा बदलत जाते. त्यामुळे भाषेचे परिपूर्ण व अंतिम रूप असू शकत नाही.'' (भाषा विज्ञान परिचय पृ. क्र. ८) 'एक सहजक्रिया' म्हणून भाषेचा वापर केला जातो. प्रामुख्याने 'पहिली भाषा हा एक संस्कार आहे.' भाषा समजण्यापूर्वीच अनुकरणाने आणि निरीक्षणाने ती आत्मसात केलेली असते.

विविधरूपता हे भाषेचे वैशिष्ट्य असून परिवर्तनशीलता हा भाषेचा धर्म आहे. एकच भाषा बोलणाऱ्या समाजात व्यवसायधंद्याच्या निमित्ताने वर्ग निर्माण होतात. तेव्हा भाषेचे बहुरूप प्रकट होते. संकेत हा भाषेचा आधार असतो. ध्वनिसंकेताच्या बाबतीतील समानता भाषेच्या संवादाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रमाणभाषेच्या आधारे अनेक बोली वावरत असतात. सांस्कृतिक परंपरा आणि स्थानिक रीतिरिवाज अशा अनेक कारणांनी भाषा या संकल्पनेमध्ये भाषिक व्यवहार आणि भाषिक व्यवस्था यांचा अंतर्भाव होतो. भाषेचे संदेशन भाषिक व्यवस्थेवर अवलंबून असते. अनेक व्यक्तींच्या भाषेतून भाषिक व्यवस्था सिद्ध होत जाते. मात्र भाषिक व्यवस्था आणि एखाद्या व्यक्तीची भाषा यात फरक असतो. भाषा आणि भाषण यात फरक असतो. व्यक्तिच्या बोलण्यातून भाषा घडते. भाषण हे व्यक्तीशी निगडीत असेल तर भाषा समाजाशी, त्या व्यक्तिसमुहाशी निगडीत असते.

भाषा आपल्या इतकी अंगवळणी पडलेली असते की जितक्या सहजतेने आपण श्वासोच्छ्वासाची क्रिया करतो. बोलली जाणारी उच्चार भाषा आणि लिहिली जाणारी लेखन भाषा ही भाषेची दोन रूपं आहेत. भाषा उच्चारली, बोलली जाते ते तिचे ध्वनिरूप असते. भाषेला लेखनासाठी लिपीची गरज असते. बोलीभाषेतील रूप भाषेचे मूळ रूप मानले जाते तर लेखनातील रूप दुय्यम मानले जाते. भाषा बोलता येणे हे त्या समाजात साहित्याने जमू शकते मात्र लेखनासाठी संबंधित भाषेच्या लिपीचे ज्ञान आवश्यक असते. एकाच भाषेची दोन्ही रूपे सारखी असावीत यासाठी प्रत्येक भाषेत प्रयत्न सुरू असतात. जसजसा भाषेचा अभ्यास होत गेला तसा भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत गेला. नव्या दृष्टिकोनानुसार कोणताही माणूस त्याला परिस्थितीनुसार प्राप्त झालेली भाषा स्वाभाविकपणे बोलत असतो. या स्वाभाविक भाषेत शुद्ध-अशुद्ध असे काही नसते. भाषा कोणकोणत्या

प्रकारे बोलली जाते याचे सुक्ष्म वर्णन करताना भाषेच्या अभ्यासकाने पूर्वग्रह बाळगायचे नसतात.

**१.६.१ प्रमाणभाषेची वैशिष्ट्य :**

१) प्रमाणभाषा सर्व बोली वा स्तरबोली बोलणाऱ्यांना आकलनीय असते.

२) प्रमाणभाषा व बोलीभाषा यांचे मिळून भौगोलिक-सांस्कृतिक वर्तन असते. मग अंतर्गत संबंध कमी असो वा जास्त.

३) प्रमाणभाषा, बोलीचा वापर व्यवहारसुलभतेसाठी करतात.

४) प्रमाणभाषा ग्रंथनिविष्ट असते. राजमान्य असते. एकूणच ती बोलली जाणारी व व्यवहारात रूळलेली असते.

५) प्रमाणभाषा प्रदेशाला आंतर्बाह्य जोडते.

६) प्रमाणभाषा व बोली यात आदानप्रदान चालू असते. ते शब्दसंग्रहापासून व्याकरणिक, संरचनेपर्यंत असू शकते. उदा. अनेक व्यवसाय बोलीतून व जाती बोलीतून प्रमाण मराठीने अनेक शब्द स्वीकारले आहेत.

७) प्रमाणभाषेमागे सुलभतेचा गुण असतो. मातृबोली ते मातृभाषा यांतील अंतर वाढत गेले की ही सुलभता संपते, हिंदी-गुजराथी जशी सहजतेने येऊ शकते, तशीच कोकणी, डांगी बोलणाऱ्यांना मराठी त्यापेक्षाही सुलभतेने येऊ शकते.

८) प्रमाणभाषा सर्वांना एकत्र जोडणारी असून हे जोडणे घनात्मक व ऋणात्मकही असू शकते.

९) मुख्यभाषा, ग्रांथिक भाषा, प्रमाणभाषा अशा नावांनी ती ओळखली जाते.

१०) प्रमाणभाषा शिष्टसंमत असते. शिक्षण, वृत्तपत्रे, ग्रंथलेखन व शासकीय कामकाज यात तिला मानाचे स्थान मिळते.

११) संस्कारबद्‌धता, सुशिक्षितांची मान्यता, थोर साहित्यिक, नियमांचे बंधन या कारणांनी प्रमाणभाषा संपन्न असते.

१२) प्रमाणभाषेचा वापर सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय व्यवहारासाठी केला जातो.

१३) लेखन व्यवहारासाठी प्रामुख्याने समाजातील सर्व घटक प्रमाणभाषेचाच आश्रय घेतात.

१४) समाजातील विविध गटांकडून आपापसात व्यवहार करण्यासाठी प्रमाणभाषा संपन्न असते.

१५) प्रमाणभाषा समाजाच्या स्वतंत्र अस्तित्वाची खूण असून, त्यामुळे समाजाचे एकसंधत्व टिकविले जाते.

१६) प्रमाणभाषा इतिहास, समाजाचा ज्ञानव्यूह व सांस्कृतिक वारसा जतन करते.

१७) प्रमाणभाषेमुळे एका समाजाचे दुसऱ्या समाजापासूनचे लक्षणीय वेगळेपण जपले जाते.

१८) भाषेत एकच आशय सूचित करण्यासाठी अनेक रचना असतात.

१९) अर्थदृष्ट्या किंवा आशयाचे सूचन करण्याच्या बाबतीत सर्व मानवी भाषा यादृच्छिकतेचे तत्व वापरतात.

२०) एकमेकांच्या भाषिक रचनेत अदलाबदल करणे हे केवळ मानवी भाषेत शक्य होते. प्राण्यांच्या भाषेत नाही.

२१) स्थलकालाची बंधने ओलांडून आशयाचे सूचन भाषेद्वारे करता येते.

२२) भाषेचा वारसा परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असतो. प्रत्येक वेळी नवी पिढी त्यात भर घालत असते. प्रत्येक पिढीत समृद्ध होत जाणारी भाषा नवी पिढी आत्मसात करते. म्हणून भाषा हे मानवी जीवनाला लाभलेले एक वरदान आहे.

२३) प्रमाणभाषेचे खरे रूप तिच्या बोलण्यातून समजत असते.

**१.६.२ बोलीभाषेची वैशिष्ट्ये :**

१) बोली म्हणजे पोटभाषा नसून, बोलीला प्रमाणभाषेची पोटभाषा संबोधता येणार नाही.

२) बोलीची निर्मिती स्वयंभू असते.

३) बोली ही प्रमाणभाषेच्या अगोदर उदयाला आलेली लोकसमुहाची लोकसंवादी भाषा असते.

४) बोलीमध्ये भावनांचा ओलावा असल्यामुळे जिवंतपणा जाणवतो. बोलीभाषेतून बोलण्याची लकब अस्सल असते.

५) नैसर्गिक सहजता हे बोलीभाषेचे महत्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.

६) बोलीभाषेमुळे भावनिक प्रेमाचे संबंध, आपुलकीचे नाते-संबंध तयार होण्यास मदत होऊ शकते.

७) बोलीभाषेतून चर्चा अधिक परिणामकारक होतात आणि खासगीतील संवाद चांगल्या पद्धतीने साधता येतात.

८) आपुलकीची भावना निर्माण करण्याचे महत्वाचे माध्यम बोलीभाषेला मानले जाते.

९) बोलीमध्ये सहजता आणि संवादांना गती येत असल्याने अलीकडे निवडणुकीत उभे राहिलेले उमेदवार त्यांच्या मतदार संघात बोलीभाषेतून संवाद साधून आपलेपणा निर्माण करून, मते मिळवू शकतात.

१०) बोलीला राजकीय सामाजिक स्थैर्य प्राप्त झाले तर ती प्रमाण भाषा बनू शकते.

११) बोलीमुळे प्रमाणभाषेला विपुल प्रमाणात शब्दसंपदा प्राप्त होऊ शकते.

१२) बोलीभाषेतून त्या-त्या प्रदेशातील संस्कृतीचे मूर्तिमंत दर्शन घडते.

१३) बोलीभाषा तिथल्या समाजाची आणि प्रदेशाची अभिव्यक्ती असते.

१४) बोलीभाषेत उच्चार आणि लेखनाचे नवनवे प्रयोग स्वाभाविकपणे घडत असतात.

१५) बोलीभाषा प्रमाणभाषेच्या तुलनेत अधिक जिवंत आणि जास्त आकर्षक असतात.

१६) प्रत्येक बोली तिच्या विशिष्ट भूप्रदेशाशी एकनिष्ठ असते. तिचे वापरक्षेत्र जवळपास निश्चित असते. जशी ती भूगोलाशी जोडलेली असते, तशीच ती माणसांशीही एकरूप झालेली असते.

१७) बोलीभाषेचे रूप प्रवाही व अर्थवाही असते.

### १.६.१ भाषा व बोलीचे कार्य :

संज्ञापन हे भाषेचे मुख्य कार्य आहे. कारण भाषा हा मानवी जीवनाचा एक अपरिहार्य भाग आहे. संदेशन हाच भाषेचा मूळ हेतू. त्यामुळे भाषेचे मुलभूत कार्य म्हणजे सामाजिक संदेशन होय, मराठीत डॉ. अशोक केळकर यांनी भाषेची विविध कार्य सांगितली आहेत.

१) **उपयुक्ततेवर आधारित कार्य :** संवादाची व संप्रेषणाची गरज भागविण्यासाठी माणसाने भाषेचा शोध लावला. सभोवतालचा परिसर समजून घेणे, उपजिविका आणि स्वसरंक्षण यासाठी भाषेचा वापर केला जातो.

२) **सामाजिकतेवर आधारित कार्य :** मानवाची भाषा मानवेतर प्राण्यांच्या भाषेपेक्षा वेगळी आहे, ती तिच्या सामाजिकतेमुळे भाषेमुळे सामाजिक वर्ग, भौगोलिक अंतरे यांना जोडून एक सुसंघटीत समाज उभा राहतो आणि आपली संस्कृती व वेगळेपण जपू शकतो.

३) **आत्मिक कार्य :** साहित्य, तत्वज्ञान, अध्यात्म, उखाणे, कोडी, भेंड्या या निरनिराळ्या माध्यमातून मनाशी संवाद साधण्यासाठी भाषेचे माध्यम वापरले जाते.

क्लेटन आल्डरफर यांनी - सांगितलेल्या गरजांच्या तीन पातळ्या इथे जुळतात. आल्डरफर यांनी आस्तित्वाची गरज, नाते-संबंधांची गरज आणि उन्नतीची गरज अशा माणसाच्या तीन गरजांचे विश्लेषण केले आहे. रोमन याकबसन या संरचनावादी अभ्यासकाने भाषिक चिन्हविचारामध्ये चिन्हांच्या कार्यासंबंधीचा तात्विक विचार आणला. त्यामध्ये भाषिक संदेशनाच्या प्रक्रियेमध्ये १) प्रेषक २) ग्रहणकर्ता ३) परिसर /संदर्भ ४) संपर्क ५) माध्यम ६) संदेश हे सहा मूलघटक मांडले तर याकबसनच्या मते मूलघटकांच्या प्राधान्यानुसार भाषेची सहा कार्य पुढीलप्रमाणे- १) आविष्कारात्म २) परिणामनिष्ठ ३) संदर्भनिष्ठ/ निर्देशात्म ४) संपर्कनिष्ठ ५) अतिभाषात्म/ चिन्नव्यवस्थाविषयक ६) काव्यात्म/ सौंदर्यात्म.

भाषा हे केवळ विचारविनिमयाचे साधन नसून, विचार करण्याचेही साधन आहे. त्यामुळे ज्ञाननिर्मिती, ज्ञानरक्षण, ज्ञानसंवर्धन याकरिता भाषा उपयुक्त ठरते. भाषेमुळे प्राणीजगतापासून माणसाचे वेगळेपण दिसून येते.मानवी समूहजीवन व संस्कृती भाषेमुळेच शक्य झाले आहे.‘‘ भाषा हे संस्कृती संरक्षण-विकासाचे साधन आहे.शिक्षण धर्मकारण, समाजकारण, राजकारण, इतिहास, भूगोल भौतिकशास्त्रे ही सारी समजाच्या संस्कृतीची घटक अंगे असतात; आणि त्यांचे जतन भाषा करीत असते. भाषा ही बोली स्वरूपात असली काय किंवा लिखित असली काय? ज्ञान सुरक्षित ठेवण्याचे तसेच त्यांचे संवर्धन विकसन करण्याचे काम भाषा करते. भाषेद्वाराच ज्ञानाचा वारसा एक पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असतो, म्हणून भाषेखेरीज मानवी संस्कृतीची कल्पना करता येत नाही?’’ (भाषा विज्ञान परिचय पृ.क्र.११) म्हणून व्यक्ती व समाज जीवनात भाषेचे स्थान अनिवार्य आहे.भाषा आणि विचार यांचा अतूट संबंध असल्याने भाषेशिवाय विचार करणे अशक्य आहे. भाषेला एक स्वतंत्र मूल्य आहे. मनातल्या मनात विचार करायचा म्हटला तरी या मानसिक क्रियेचा आधार भाषाच असतो.

व्यवहार पूर्ततेसाठी आणि व्यवहार सुकरतेसाठी भाषा हेच प्रमुख साधन आहे.आपल्या मनातील भाव इतरांना कळविणारे आणि व्यक्ती भिन्नत्वाला मूर्त रूप देणारे भाषा हे सामाजिक विनिमयाचे साधन आहे. समाजव्यवहारात भाषा अनेक पातळीवर वापरली जाते. भाषेतून मानवी व्यवहार प्रतिबिंबित होत असल्यामुळे

व्यक्ती व समूहमनाचा आरसा म्हणजे भाषा असे म्हणता येईल. कारण ‘भाषेने मनुष्य निर्माण केला आणि मनुष्याने भाषा निर्माण केली’ असे असले तरी प्रमाणभाषा व बोलीभाषेची काही महत्त्वाची कार्य पुढीलप्रमाणे-

१) प्रमाणभाषा समाजाचे एकसंधत्व टिकविण्याचे कार्य करते.

२) शिक्षणाचे व ज्ञानार्जनाचे माध्यम म्हणून प्रमाणभाषा महत्त्वाची भूमिका पार पाडते.

३) प्रमाणभाषा समाजाचा ज्ञानव्यूह, इतिहास व सांस्कृतिक वारसा जतन करते.

४) एका समाजाचे दुसऱ्या समजापासूनचे लक्षणीय वेगळेपणा जपते.

५) सामाजिक संदेशन हे भाषेचे मूलभूत कार्य होय.

६) असंख्य प्रकारची सामाजिक-सांस्कृतिक कार्य करण्यासाठी मानव भाषेचा वापर करीत असतो.

७) सामाजिक सहकार्याचा व्यवहार फार मोठ्या प्रमाणावर भाषेद्वाराच घडत असतो.

८) प्राग प्रणालीच्या भाषा वैज्ञानिकांच्या मते भाषेला दोन प्रकारची कार्य पार पाडावी लागतात.
उदा. १) संदेशनात्मक आणि २) सौंदर्यात्मक / कलात्मक

९) भाषेचा वापर साहित्य, शिक्षण व प्रशासनात होतो तर बोलीचा वापर दैनिक बातचीत व लोकसाहित्यात होतो.

१०) आपापल्या प्रदेशातील लोकांशी गप्पागोष्टी मारण्याचे मौखिक कार्य बोली करते.

११) भाषेचा सर्वात जास्त उपयोग शिक्षण, प्रशिक्षण व ज्ञान विज्ञानाच्या क्षेत्रात होतो.

१२) प्रमाणभाषा अनेक बोली-भेदांना व स्थानिक भेदांना सामावून घेण्याचे काम करते.

१३) दैनंदिन व्यवहार सुरळीत पार पाडण्यासाठी बोली महत्वाची भूमिका पार पाडते.

१४) प्रमाण बोली समाजात अत्यंत महत्वाचे सांस्कृतिक कार्य पार पाडतात

१५) सामाजिक व्यवहार आणि परिस्थिती यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य भाषा करते.

१६) भाषेमुळे संस्कृतीचा विकास, जडणघडण आणि जतनसंवर्धन होत असते.

१७) प्रमाणभाषा शिक्षणाचे व ज्ञानार्जनाचे माध्यम म्हणून काम करते.

## १.८ समारोप

एकंदरीत ‘बोलीअभ्यास’ या महत्वाच्या विषयाच्या अनुषंगाने विभाग१ मध्ये भाषा,बोली आणि समाज यांचा सविस्तर अभ्यास केला. यामध्ये प्रामुख्याने भाषा आणि बोली यांचे समाजातील स्थान, भाषा व बोलींचे समाजातील महत्व, भाषा व बोलींच्या अभ्यासाची गरज यांचे सविस्तर विवेचन केले आहे. प्रमाणभाषेचा आणि बोलीभाषेचा समाजाशी असलेला साम्यभेद व सहसंबंध आत्तापर्यंत आपण लक्षात घेतला. प्रमाणभाषेची वैशिष्ट्ये आणि बोली भाषेची वैशिष्ट्ये आणि समाजविशिष्टता समजावून घेता आली. आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भाषा व बोलींचा ऱ्हास, भाषा व बोलीची कार्य यांचाही ऊहापोह करता आला. भाषिक कार्याचा अभ्यास करतांना भाषेची विविध कार्य-डॉ.अशोक केळकर यांची भाषेची त्रिविध कार्य, क्लेटन, आल्डरफर यांनी

सांगितलेल्या गरजांच्या तीन पातळ्या, रोमन याकबसन यांनी सांगितलेली सहा भाषिक कार्य यांचे सविस्तर विवेचन घटक क्र १ मध्ये करता आले. एकूनच ‘बोली स्वरूप,वैशिष्ट्ये’ या पुढील घटकाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने या विषयाची मांडणी करता आली.

**१.९ स्वयं अध्ययन :**

**योग्य पर्याय निवडा.**

१) नैसर्गिक सहजता हे कोणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये मानले जाते?

अ) प्रमाणभाषा ब) बोलीभाषा क) पोटभाषा ड) संस्कृती

२) भाषेचा मूळ आणि मुख्य हेतू कोणता?

अ) संदेशवहन ब) ज्ञानार्जन क) सामाजिक बांधिलकी ड) समाजविकास

३) भाषिक चिन्हविचारांमध्ये चिन्हांच्या कार्यासंबंधीचा तात्विक विचार कोणी मांडला?

अ) डॉ. अशोक केळकर ब) क्लेटन आल्डरफर क) रोमन याकबसन ड) ग.ना. जोगळेकर

४) कोणाचे सर्वांना एकत्र जोडणे घटनात्मक व ऋणात्मकही असते?

अ) समाज ब) पोटभाषा क) शिक्षण ड) प्रमाणभाषा

५) दोन किंवा दोनपेक्षा जास्त भाषेमध्ये विनिमय शक्य होण्यासाठी कोणाची आवश्यकता असते?

अ) प्रमाणभाषा ब) बोलीभाषा क) संपर्कभाषा ड) पोटभाषा

६) भाषेच्या जिवंतपणाची महत्वाची खूण कोणती?

अ) परिवर्तन ब) ऱ्हास क) देवाण-घेवाण ड) विचार-विनिमय

७) बोली निर्मितीचे सर्वात महत्वाचे कोणते कारण सांगितले जाते?

अ) भौगोलिक परिस्थिती ब) राजकीय परिस्थिती क) सामाजिक परिस्थिती ड) सांस्कृतिक परिस्थिती

८) मराठी ही जगातील कितव्या क्रमांकाची भाषा आहे?

अ) सतराव्या ब) आठराव्या क) एकोणिसाव्या ड) विसाव्या

९) भाषेची लक्षणे कोणत्या भाषा शास्त्रज्ञाने सांगितली आहेत.?

अ) रोमन याकबसन ब) चार्ल्स हॉकेट क) क्लेटन आल्डरफर ड) फर्ग्युसन

१०) मानवाला समाजातील भौतिक गरजा पूर्तीसाठी कोणती भाषा वापरावी लागते?

अ) प्रमाणभाषा ब) बोलीभाषा क) समाजभाषा ड) पोटभाषा

**उत्तरे –** १) ब, २) अ, ३) क, ४) ड, ५) क, ६) अ, ७) अ, ८) क, ९) ब, १०) क

**१.१० सरावासाठी प्रश्न :**

**दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) भाषा व बोली यांचे समाजातील स्थान स्पष्ट करा.

२) प्रमाणभाषा व बोली भाषा यांचा समाजाशी सहसंबंध स्पष्ट करा.

**लघुत्तरी प्रश्न :**

१) भाषा व बोलीचे कार्य विषद करा.

२) भाषेची वैशिष्ट्य तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

३) भाषा, बोली आणि समाज याविषयी थोडक्यात लिहा.

**१.११ अधिक वाचन :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ना. गो. कालेलकर | : | भाषा आणि संस्कृती |
| २) | डॉ. वसंत कुबरे | : | भाषा विज्ञान परिचय |
| ३) | सोनाली देशपांडे-गुजर | : | भाषा समाज आणि संस्कृती |
| ४) | डॉ. महेंद्र कदम | : | मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान |
| ५) | डॉ. रमेश धोंगडे | : | सामाजिक भाषाविज्ञान |
| ६) | डॉ. मु. श्री. कानडे | : | मराठीचा भाषिक अभ्यास ऐतिहासिक आणि वर्णनात्मक |
| ७) | डॉ. विजय इंगळे | : | मराठी भाषा : भाषा शास्त्र आणि व्याकरण |
| ८) | डॉ. दत्तात्रय पुंडे | : | सुलभ भाषाविज्ञान |

**१.१२ पूरक वाचन :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. कैलास सार्वेकर | : | बोली, समाज, साहित्य आणि संस्कृती |
| २) | ना. गो. कालेलकर | : | भाषा इतिहास आणि भूगोल |
| ३) | डॉ. निलिमा गुंडी | : | भाषा प्रकाश |
| ४) | प्र. न. जोशी | : | सुबोध भाषाशास्त्र |
| ५) | रा. सो. सराफ | : | भाषा मातृभाषा आणि परभाषा |
| ६) | मिलिंद स. मालशे | : | आधुनिक भाषाविज्ञान सिद्धांत आणि उपयोजन |
| ७) | शिविम संशोधन पत्रिका | : | बोली विशेषांक |
| ८) | अक्षर वाङ्मय | : | त्रैमासिक |

**१.१३ उपक्रम :**

* आपण ज्या परिसरात राहता तेथील किंवा नजीकच्या ग्रामीण भागातील बोलींचे संकलन करून त्याचा संशोधन प्रकल्प तयार करा.

* प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांच्या संवर्धनासाठी जनजागृती करा.

***

# घटक – २

# बोली : स्वरूप, वैशिष्ट्ये

**उद्दिष्ट्ये :**

१) बोलीभाषेचे स्वरूप व वैशिष्ट्ये समजून घेणे.

२) प्रमाणभाषा, बोली परस्परसंबंध अभ्यासणे.

३) बोलीच्या व्याख्या, बोली म्हणजे काय समजून घेणे.

४) बोलीभाषेचे कार्यक्षेत्र, क्षेत्रमर्यादा अभ्यासणे.

## २.१ प्रास्ताविक :

भाषा ही माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात माणूस कोणती ना कोणती भाषा वापरत असतो. भाषा ही गोष्ट माणसाच्या भावनेशी, प्रत्येक विचाराशी, प्रत्येक कृतिशी निगडित असते. भाषाच अवगत नाही असा मानव समूह पृथ्वीवर उपलब्ध नाही. इतर प्राणिमात्रांच्या तुलनेने मनुष्याने जी प्रगती केली आहे. तिच्या मुळाशी भाषाच आहे. माणूस एकटा रहात नाही तो समाजात राहतो. सामाजिक जीवनासाठी एकमेकांशी संपर्क साधणे, विनिमय साधणे, निरनिराळ्या असंख्य संदेशाची देवाण–घेवाण करणे आवश्यक असते. अशा तऱ्हेचा संपर्क विनिमय व संदेशन भाषेमुळे सहजशक्य आहे. भाषा ही समग्र मानवी जीवनाला वेढून टाकणारी गोष्ट आहे. ती एक सामाजिक संस्था आहे. मानवी समाज जसजसा प्रगत होत गेला तशी भाषा विकसित होत गेली. जगात निरनिराळ्या देशामध्ये निरनिराळ्या भाषा बोलल्या जातात. ही संख्या प्रचंड आहे. एका देशात एकच भाषा बोलली जात नाही. उदा:– आपल्या भारत देशात मराठी, गुजराती, पंजाबी, बंगाली, तेलगू, कन्नड, मल्याळम् अशा कितीतरी भाषा बोलल्या जातात. या भाषा एकमेकांपासून पूर्णपणे वेगळ्या आहेत. जगातील कोणतीही एक भाषा बोलणाऱ्या माणसाला दुसरी भाषा आपोआप समजत नाही. ती त्याला मुद्दाम शिकावी लागते. आकलनातील अडथळ्यामुळे दोन भाषामध्ये असणारे भिन्नत्व आपण पटकन मान्य करतो, पण कोणत्याही एका भाषेत अनेक प्रकारचे भेद असतात ही एक वस्तुस्थिती आहे.

महाराष्ट्रात एकाच प्रकारची मराठी भाषा सर्वत्र बोलली जात नाही. तिच्या अनेक बोली आहेत. वेगवेगळ्या भागातील लोक निरनिराळ्या प्रकारची भाषा बोलत असतात. तरीही आपण त्या सर्वांनाच मराठी भाषा म्हणून संबोधतो. म्हणजे भौगोलिकतेमुळे काही प्रमाणात वेगळेपण असलेली ती एकरूप अशी मराठी भाषाच असते. एका मोठ्या प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या एकाच भाषेचे असे भौगोलिक भेद असू शकतात. तसेच समाजात माणसाचे अनेक गट पडलेले असतात. सामाजिक प्रतिष्ठा, वर्णजाती, व्यवसाय भिन्नता, वय, लिंग यामुळे हे गट पडलेले दिसतात. या प्रत्येक गटाची जीवनशैली दुसऱ्या गटाहून काही प्रमाणात, काही बाबतीत भिन्न असते. या

भिन्नत्वाचा परिणाम अपरिहार्यपणे त्यांच्या भाषेवर होतो. परिणामी समाजाच्या आतच एका गटाची भाषा दुसऱ्या गटाच्या भाषेपेक्षा वेगळी होते. त्यालाच आपण बोली म्हणतो. अशा अनेक बोलींना समाविष्ठ करून घेणारी प्रमाणभाषा असते.

भाषा शुद्ध-अशुद्धतेच्या कल्पना नेहमीच प्रमाणभाषेला केंद्रस्थानी ठेवून मांडल्या जातात. प्रमाणभाषा प्रगत असते आणि बोली अप्रगत, अविकसित, अशुद्ध, गावंढळ भाषा असते अशी एक समजूत आहे. ही समजूत भाषा विज्ञानाच्या कसोटीवर टिकणारी नाही. वास्तविक समाजाच्या दैनंदिन व्यवहारामध्ये बोलींचाच प्रत्यक्ष वापर होत असतो. बोली हेही एक परिपूर्ण भाषिक रूप आहे. विचारांचे आदान-प्रदान करणे हे भाषेचे मुख्य काम बोलीही करतात. बोली शुद्ध-अशुद्धतेच्या कसोटीवर टिकणाऱ्या नाहीत. बोलींचा लेखनासाठी वापर करता येत नाही अशी एक समजूत रूढ आहे. परंतु आज जगात सर्वत्रच निरनिराळ्या बोली बोलणारे लोक आपले अनुभव सांगण्यासाठी सिद्ध व उत्सुक झाल्याचे चित्र दिसते. यापैकी बहुतेकांनी आपल्या बोलीत समर्थपणे लेखन केलेले आहे. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत.

वरील सर्व गोष्टींचा विचार करता बोलीचा अभ्यास अतिशय महत्त्वाचा आहे, हे स्पष्टपणे जाणवते. तो अभ्यास करताना प्रमाणभाषा व बोली, बोली म्हणजे काय? बोली आणि प्रमाण भाषेतील फरक, बोलींची कार्यक्षेत्रे, बोली भाषेची क्षेत्रविशिष्टता आणि बोली भाषेची विविध वैशिष्ट्ये यांचा ऊहापोह आपणास या घटकात करायचा आहे.

## २.२ विषय विवेचन :

मनुष्य हा समूहजीवी प्राणी आहे. दैनंदिन जीवनात अनेकविध कारणासाठी समाजातील व्यक्तींना एकत्र यावे लागते. त्यातूनच एकमेकांचे विचार समजून घेणे आवश्यक असते. हे सर्व भाषिक व्यवहारातून घडत असते. म्हणूनच भाषा ही समाजातील व्यक्तींना जोडणारा दुवा असते. तसेच ती संस्कृतीचे वाहक असते.

भाषा ही समाजमान्य घटना आहे. त्या त्या समाजातील मान्य संकेतानुसार भाषेचा वापर होत असतो. एखाद्या भाषिक समाजाचा स्वभाव समजून घ्यावयाचा असेल तर त्या विशिष्ट भाषक समाजाची सांस्कृतिक मूल्यव्यवस्था याचे प्रतिबिंबउब त्या समाजाच्या भाषेतून पडलेले असते. म्हणून भाषा हेच सामाजिक वास्तव असते. मराठी भाशक समाजाची आंतरिक संरचना आणि मूल्यव्यवस्था जाणून घेण्यासाठी भाषेचा अभ्यास कसा उपयोगी पडू शकतो. ह्याची कल्पना या अभ्यासातून तुम्हाला येईल.

महाराष्ट्रात एकाच प्रकारची 'मराठी' ही भाषा सर्वत्र बोलली जात असली तरी वेगवेगळ्या भागातील लोक निरनिराळ्या भाषा बोलतात. वेगवेगळ्या समाजातील लोकांच्या भाषेत फरक दिसून येतो. त्यालाच आपण बोली म्हणतो. अशा अनेक बोलींना समाविष्ट करुन घेणारी प्रमाणभाषा असते. प्रस्तूत प्रकरणात प्रमाणभाषेचे स्वरूप व वैशिष्ट्ये विविध भाषा वैज्ञानिकांची मते, प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातील संबंध बोली भाषेची संकल्पना, स्वरूप व वैशिष्ट्ये बोली म्हणजे काय? बोलीच्या निर्मितीची कारणे, बोलीच्या अभ्यासाची गरज, बोलींची कार्यक्षेत्र व क्षेत्रविशिष्टता यांचा अभ्यास करावयाचा आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता बोलीचा अभ्यास अतिशय महावाचा आहे हे स्पष्टपणे जाणवते.

## २.३ प्रमाणभाषा स्वरूप व वैशिष्ट्ये :

एका विस्तृत प्रदेशात बोलली जाणारी, अनेक बोली-भेदांना व स्थानिक भेदांना समाविष्ट करून घेणारी, राजकारण, संस्कृती व शिक्षण या क्षेत्रांमध्ये वापरली जाणारी आणि समाजाकडून लेखन व्यवहारासाठी स्वीकारली गेलेली भाषा म्हणजे प्रमाणभाषा असे म्हणता येईल.

गाय म्हटल्यावर अनेक गायी आपल्या समोर असतात. उंच, लहान, थोराड, काळ्या, पांढऱ्या, भाकड इत्यादी मात्र असे कितीही फरक असले तरी सर्व मिळून एक 'गो' तयार होते. त्यालाच आपण गाय असे म्हणतो. म्हणजेच गाय म्हटल्यावर एक विशिष्ट गाय अपेक्षित नसते तर साधारणपणे ठराविक गुण असणारा प्राणी आपण गाय म्हणून गृहीत धरतो तसेच भाषेचे आहे. सर्वच भाषा या बोली असतात. त्यापैकी जास्तीत जास्त समान धागे जिच्याशी जुळतात ती प्रमाणभाषा म्हणून अस्तित्वात येते.

एखाद्या विशिष्ट परिसरात समान वैशिष्ट्ये असणारी बोली सर्वजण बोलत असतात. शेजारच्या परिसरातही अशीच किंचित फरक असणारी बोली त्या परिसरातील नागरिक बोलत असतात. अशा विविध परिसरातील बोलींमध्ये काही शब्द खूप वेगवेगळे असतात. बोलण्याच्या लबकी वेगळ्या असतात दर दहा मैलांवर भाषा बदलते असे म्हणतात. भाषेतील हा बदल अतिशय सूक्ष्म असल्याने चटकन लक्षात येत नाही. उदा:- कोल्हापुरी भाषेतील- डांब (खांब), चावी (नळ), खानदेशी बोलीतील- गावडी (गाय), अंडोर (मुलगा), नागपुरी- छकडा (शेकडा), घुटका (घोट), वऱ्हाडी- हाड्या (कावळा), पावणी (विळी), कोकणी- बाएल (बायको), घोऊश (नवरा) किंवा विदर्भातल्या माडिया गोंडांच्या बोलीभाषेत येणारे गाटो (भात), मेंज (अंडे), उल्लिंग (कांदा), मंता (आहे), तिंदाना (खाणे), इत्यादी शब्द वापरून कोणी संभाषण करू लागले किंवा पुस्तक पत्रव्यवहार लिहिला तर ते कुणालाही समजणार नाही. त्यामुळेच सर्वांना समजेल अशी एक बोली विविध कारणांमुळे सर्वसमावेशक रूप धारण करते. जी त्या विशिष्ट प्रदेशाची, विशिष्ट बोलींची प्रमाणभाषा म्हणून मान्यता मिळवते. म्हणून व्यवहाराच्या सोयीसाठी सर्वच बोलींना समान वाटणारी, सर्व बोली भाषकांना सहजगत्या आकलन होणारी एखादी बोली मध्यवर्ती स्थान मिळवते. तिलाच प्रमाणभाषा असे म्हटले जाते. प्रमाणभाषा अस्तित्वात येताना काही राजकीय किंवा सांस्कृतिक कारणे असतात. मराठीच्या बाबतीत पुणेरी बोलीला प्रमाणभाषेचे स्थान मिळाले. इतिहासात वळून पाहिले असता शिवाजी महाराज्यांपासून पेशव्यांच्या कारकिर्दीपर्यंत मराठ्यांच्या सत्तेचे केंद्र दीर्घकाळ पुणे हेच राहिले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या सर्व भागातील लोक पुण्यात येत असत. त्यांचा व्यवहार पुण्यातील बोलींच्या प्रभावाखाली होत असे. त्यामुळे तेथील भाषा सर्वांना कळणे सहज शक्य झाले. पुढे इंग्रजांच्या काळातही शिक्षणखाते पुण्यातच तयार केले गेले. शालेय शिक्षणासाठी तयार झालेल्या पाठ्यपुस्तकांच्या लेखनात मराठी करता प्रख्यात इंग्रज पंडित थॉमस कॅन्डीने केलेल्या बदलांमुळे पुण्यातील ब्राम्हणवर्गात बोलल्या जाणाऱ्या भाषेला प्रमाण समजले गेले.

प्रमाणभाषेचे विनिमय क्षेत्र फार मोठे असते. कारण समाजाच्या प्रत्येक व्यवहारात, विविध क्षेत्रात आज तिचा वापर होत आहे. छपाई कलेचा शोध लागल्यामुळे प्रमाणभाषेचे व्यवहारक्षेत्र फार मोठे झाले आहे. व्यक्तिगत जीवनाशिवायच्या कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा घराबाहेरच्या जीवनव्यवहारात प्रमाणभाषा प्रतिष्ठेची ठरते आहे. त्यामुळे प्रमाणभाषेचा वापर करणे म्हणजे प्रतिष्ठेचे, सुसंस्कृत मानले जाते. याशिवाय सरकारी कार्यालय,

कायदा-कानून या ठिकाणी प्रमाणभाषेचा काटेकोर वापर केला जातो. कारण ते एक सार्वजनिक ठिकाण आहे. तसेच वर्तमानपत्र, मासीके, नियतकालीके, ललित वा ललितेत्तर वाङ्मय याठिकाणी प्रमाण भाषेचा प्राधान्याने वापर केला जातो. प्रमाणभाषेद्वाराच समाजात जास्त संपर्क प्रस्थापित होऊ शकतो. प्रमाणभाषेला विशिष्ट दर्जा असल्यामुळे व्यक्तिच्या संभाषणातून त्याचा दर्जा कळतो. हा दर्जा तिच्या शिष्ट मान्यतेतून येतो. प्रमाण भाषेला ग्रांथिक भाषा असेही म्हणतात.

प्रमाणभाषेचे अस्तित्व आवश्यक असणारा आणखी एक मुद्दा आपण विचारात घेऊ. स्थानिक वेळ जशी दर रेखांशागणिक बदलते तशी बोलण्याची भाषा दर बारा कोसावर बदलते असे म्हणतात म्हणून कोणी रोजच्या व्यवहारात स्थानिक वेळा वापरत नाही. एकमेकांच्या वेळा सांभाळता याव्यात म्हणून प्रमाणवेळ असते. तशीच प्रमाणभाषाही आवश्यक असते. थोडक्यात प्रमाणभाषा म्हणजे श्रेष्ठ आणि बोली म्हणजे कनिष्ठ असा ग्रह करून घेण्याचे कारण नाही. उलटपक्षी सहज आकलन आणि व्यवहार सुकरता ह्या दोन निकशांच्या आधारे प्रमाणभाषा अस्तित्वात येते हे लक्षात ठेवायला हवे.

### २.३.१ भाषा वैज्ञानिकांची मते :

भाषा वैज्ञानिकांमध्ये प्रमाणभाषा संकल्पनेबाबत एकमत असल्याचे दिसत नाही. प्रमाणभाषा ही संकल्पना पुढीलप्रमाणे वेगवेगळ्या रीतीने स्पष्ट केलेली दिसते.

१) प्रमाणभाषा ही एक कल्पना आहे. साम्यभेद दर्शविणाऱ्या काही बोलींच्या समुहाला लावली जाणारी अशी ही कल्पना आहे असे त्यांचे म्हणणे आहे. एकमेकांच्या खूप जवळ असणाऱ्या बोली यांची बेरीज म्हणजे प्रमाणभाषा असे, हे मत काही भाषा वैज्ञानिक मानताना दिसतात.

२) काही भाषा वैज्ञानिक असे मानतात, की प्रमाणभाषा ही एक आदर्श अशी बोली आहे. उच्चार, व्याकरण व शब्दसंग्रह या बाबतीत तिच्यापेक्षा थोडेफार भिन्नत्व असणाऱ्या इतर बोली बोलणारे लोक या आदर्श बोलीला मान्यता देऊन तिचा प्रमाणभाषा म्हणून स्वीकार करतात.

३) तिसरे एक मत असे आहे की, थोडेफार भिन्नत्व असणाऱ्या एकमेकींच्या जवळ असणाऱ्या, एकच इतिहास परंपरा असणाऱ्या बोलींचा समूह वाङ्मयनिर्मिती, लेखन व्यवहार, शिक्षण व सांस्कृतिक संचिताची जपणूक यासाठी ज्या भाषेचा अगर बोलीचा वापर करतो ती प्रमाणभाषा.

४) भाषा वैज्ञानिकांचे पूर्वापार चालत आलेले एक मत म्हणजे प्रमाणभाषा ही सर्वसामान्य भाषा असते. समाजातील एखाद्या घटकांकडून तिचा विशिष्ट वापर केला जात असताना या सर्वसामान्य भाषेच्या रूपात आवश्यक ते बदल करून घेतले जातात. अशी बदल झालेली भाषिक रूपे म्हणजे बोली आणि मूळ सर्वसामान्य भाषा म्हणजे प्रमाणभाषा.

प्रमाणभाषा व तिच्या आश्रयाने वावरणाऱ्या विविध बोली यांच्या वेगवेगळ्या संबंधावर भर देऊन ही मते तयार केली गेली आहेत. हे सहज लक्षात येते.

### २.३.२ प्रमाणभाषेची वैशिष्ट्ये :

१) प्रमाणभाषा एका विस्तृत भौगोलिक प्रदेशात वापरली जाते.

२) लेखन व्यवहारासाठी समाज-प्रमाणभाषेचाचा वापर करतो.

३) प्रमाणभाषा महत्त्वाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व्यवहारांसाठी वापरली जाते.

४) प्रमाणभाषा शिक्षणाचे व ज्ञानार्जनाचे माध्यम म्हणून वापरली जाते.

५) प्रमाणभाषेमुळे समाजाचे एक संघत्व टिकविले जाते.

६) प्रमाणभाषेचे अनेक भेद असू शकतात. हे भेद खूप वैशिष्ट्यपूर्ण झाले की त्यांना बोलीचे स्वरूप येते.

७) प्रमाणभाषा समाजाचा ज्ञानव्यूह, इतिहास व सांस्कृतिक वारसा जतन करत असते.

८) प्रमाणभाषेमुळे एका समाजाचे दुसऱ्या समाजा पासूनचे लक्षणीय वेगळेपण जपले जाते. त्यामुळे ती समाजाच्या स्वतंत्र अस्तित्वाची जणू खूणच असते.


९) प्रमाणभाषा समाजाला स्थैर्य देते.

बोलीच्या तुलनेने प्रमाणभाषा समाजाच्या दैनंदिन व्यवहारात कमी वापरली जात असल्याने तिचे रूप बरेच स्थिर असते शिवाय लेखन व्यवहारासाठी प्रमाणभाषाच वापरली जात असल्याने आणि लेखन प्रक्रिया सहज परिवर्तनक्षम नसल्याने प्रमाणभाषा जास्त स्थिर असते. तिची ही स्थिरता समाज स्थैर्याला पोषक ठरते.

### २.३.३ प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातील संबंध :

प्रमाणभाषा ही एक स्वतंत्र व स्वयंपूर्ण संज्ञा आहे तर बोली ही संबंधदर्शक संज्ञा आहे. प्रमाणभाषेच्या अंतर्गत एक किंवा अधिक बोलींचा समावेश होतो. पण बोलीत भाषा अंतर्भूत होत नाहीत. बोलींच्या समुहाला सामावून घेणारे म्हणजेच प्रमाणभाषेचे आकलन क्षेत्र हे बोलींच्या आकलन क्षेत्रांहून व्यापक असते. उदा:- प्रमाण मराठीचे आकलन सर्व महाराष्ट्रभर होऊ शकते. पण अहिराणी किंवा वऱ्हाडी बोली सर्वांनाच समजते असे नाही.

बोलीमध्ये भाषेचे प्राचीन रूप जपलेले आढळते. कोणतीही प्रमाणभाषा मुळात बोलीच असते हे लक्षात घेतले तर बोली हे भाषेचे पूर्वरूप व प्रमाणभाषा हे उत्तररूप असते.



या आकृतीच्या आधारे आपण प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातील परस्परसंबंध कसे असतात ह्यावर प्रकाश टाकू शकतो. मराठी प्रमाण भाषेचा विचार केला तर तिच्यामध्ये, अहिराणी, वऱ्हाडी, हळबी, नागपूरी, सोलापूरी, कोल्हापूरी, मालवणी अशा विविध बोलींचा समावेश होतो. एकाच वेळेस या बोली आणि प्रमाणभाषा एकाच ठिकाणी अस्तित्वात असतात.

१) सर्व बोली बोलणाऱ्या लोकांना प्रमाणभाषा कळते तसेच वेगवेगळ्या बोली समजून घेण्यासाठी प्रमाणभाषेचाच उपयोग होतो.

२) बोली या प्रमाणभाषेशी जवळीक साधून असतात आणि त्या वेगळ्याही असतात.

३) एखाद्या बोलीचे प्रभावक्षेत्र प्रमाणभाषेच्या तुलनेत खूपच लहान असते. प्रमाणभाषा ही सर्व बोलींना व्यापून टाकते. ती विस्तीर्ण भौगोलिक प्रदेशात पसरलेली असते तर बोली मात्र एका विशिष्ट भागापूरतीच मर्यादित असते.

४) प्रमाणभाषेत उच्चार आणि लेखन यात नवनवे प्रयोग होत नाहीत ती बऱ्यापैकी स्थिर असते. तर बोलींमध्ये मात्र उच्चार आणि लेखनाचे नवनवे प्रयोग स्वाभाविकपणेच घडतात परंतु बोलींना पूर्णपणे लिखाणात स्थान प्राप्त झालेले असतेच असे नाही.

५) प्रमाण भाषेच्या तुलनेत बोली ही अधिक जिवंत आणि चैतन्यमय असते ही प्रमाण भाषेपेक्षा जास्त आकर्षक असते.

| **प्रमाणभाषा** | | **प्रमाणबोली** |
|---|---|---|
| १) तो करणार आहे | – | तो करेल आहे |
| २) केले तसे भरले | – | केल तसं भरलं |
| ३) तलवार उपसून काढा | – | तल्वार उप्सून काढा |

प्रमाणभाषा व प्रमाणबोली यातला फरक मानसशास्त्रीय स्तरावर चर्चेला घ्यावा लागतो. एखादी व्यक्ती आपल्यात बोलताना 'मेला हिटलर कुणाचे आडणार आहे खेटर?' असे प्रमाण बोली भाषेत म्हणणारा प्रत्यक्षात मात्र 'आदरणीय बाळासाहेब देवाघरी गेले, पण आम्हाला मात्र दुःख भोगण्यासाठी ठेवून गेले.' अशी आपल्या वरीष्ठांबद्दल खास प्रमाणभाषा वापरेल.

तर्कशुद्धता, निबंधात्मकता, भावनाशुन्यता, औपचारिकता, संकेत इत्यादींनी प्रमाणभाषा 'सपाट' झालेली असते. उलट प्रमाणबोली ही खळखळत्या प्रवाहागत असते. बोलीभाषेत संवेदनदर्शक, सुचक व गोचर शब्दांचे प्रमाण अधिक असते. तर प्रमाणभाषेत प्रतीकात्मकता, तर्कसुचक, अतार्किक अनुमान, कुशल शब्दांचे प्रमाण अधिक असते. प्रमाणबोली ही क्षणभंगूर तर प्रमाणभाषा ही कायमस्वरूपी टिकणारी असते. बोलीचा झुकाव बदलाकडे असतो तर प्रमाणभाषेचा न बदलण्याकडे असतो.

अशाप्रकारे प्रमाणभाषेत व प्रमाणबोलीत काही साम्य-भेद असले तरी मनुष्य, कोणत्या ठिकाणी, कोणत्या प्रसंगी, कोणती भाषा वापरावी याचा विचार करूनच जीवनाची वाटचाल करत असतो. आता बोलीभाषा, संकल्पना, स्वरूप व वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करू.

## २.४ बोली : संकल्पना, स्वरूप व वैशिष्ट्ये

सुमारे पन्नास हजार वर्षापूर्वी सर्वच मानव समुहांच्या भाषा घडू लागल्या आणि दहा हजार वर्षापूर्वीपासून संदेश वहनाचे साधन म्हणून त्या वापरात येऊ लागल्या. संवाद आणि संप्रेषण ही कोणत्याही भाषेची प्रमुख अट आहे. संप्रेषणाच्या स्तरावर सर्व भाषांची कार्यप्रणाली जवळ-जवळ समानच असते. 'अर्थवाहकता' हा भाषेच्या संप्रेषणाचा हेतू असतो आणि हाच भाषेचा अंत:स्तर होय. विचार आणि भावना व्यक्त करण्यासाठी मुखावाटे उच्चारले जाणारे ध्वनी हवेत विरून जातात. ध्वनीचे हे क्षण कालाचे अस्तित्व दिर्घकाळ टिकण्यासाठी ध्वनींना 'चिंन्हे' दिली गेली या चिन्ह व्यवस्थेमधूनच भाषेचे लेखन सुरू झाले. म्हणजे लेखन ही भाषाव्यवहारातील नंतरची क्रिया ठरते.

'बोलली जाणे' ही कोणत्याही भाषेची पहिली आणि प्रधान अट असते मुळातच 'भाष' म्हणजे बोलणे यावरून 'भाषा' ही संज्ञा रूढ झाली आहे. मानवी व्यवहाराच्या विनिमयाचे प्रधान माध्यम भाषा असते. भाषिक विनिमय 'संवादाच्या' पातळीवरचा असतो. यामुळे भाषा आणि बोली यात तात्विक अंतर राहात नाही. जी भाषा बोलली जाते तेंव्हा ती कोणती तरी 'बोली' असते. ती व्यक्तिगत बोली, जातिबोली, कुटुंबबोली, प्रांतबोली, गटबोली, प्रमाणबोली किंवा आणखी कोणत्यातरी निकषावर घेतलेल्या भाषेच्या छंदकाची अंगभूत बोली असते. हे सुहासिनी लद्दूंचे मत पटण्यासारखे आहे. परंतू यातून 'बोली' या संज्ञेची व्यापकता येथे प्रस्तुत नाही, जर ही व्यापकता गृहीत धरली तर भाषा आणि बोली हे भेदच निरूपयोगी ठरतात. येथे फक्त 'एखाद्या व्यापक भाषिक परिसरातील प्रादेशिक भाषा या अर्थाने 'बोली' ही संज्ञा वापरली आहे.'

### २.४.१ बोली म्हणजे काय?

बोलीचे वेगवेगळे स्तर आहेत. त्यापैकी व्यक्तिगत बोली भाषांमध्ये समाविष्ट करता येते. कुटुंबाची बोली, जातीची बोली, गटाची बोली, यांचे वेगळेपण मान्य केले तरी हे घटक ज्या प्रादेशिक पर्यावरणात राहतात त्या प्रादेशिक वातावरणाचा परिणाम या घटकांवर झालेला असतो. म्हणजेच विशिष्ट भौगोलिक परिसीमांनी बद्ध झालेल्या सांस्कृतिक पर्यावरणातच हे घटक वाढत असल्याने त्यांचे वेगळेपण मान्य करूनही यांचा समावेश 'प्रादेशिक बोली' मध्ये करावा लागतो. दुसरी एक बाब येथे लक्षात घ्यावी लागेल ती म्हणजे बोली भाषा या आताच्या काळातील नव्हे तर शेकडो वर्षांच्या प्रवासातून व रोजच्या व्यवहारातून विकसीत झालेल्या आहेत. त्यामुळे बोली भाषा या तिथल्या समाजाची आणि प्रदेशाची अभिव्यक्ती असते. एकाच प्रमाण भाषेच्या राजकीय आणि शैक्षणिक वर्चस्वाखाली वावरणाऱ्या बोलींमध्ये साम्य अधिक आणि स्वाभाविकच आहे. हे साम्य दुसऱ्या बोलीशीही असते. बोलींचा जो समूह असतो, तो केवळ एकरूप वाटणारा नसतो तर त्या समुहाच्या भाषेवर तो समूह ज्या प्रादेशिक पर्यावरणात जगत असतो त्या प्रदेशाचा फार मोठा प्रभाव असतो.

खरे पाहता भाषा आणि बोली यांना एकच अर्थ आहे. जी बोलली जाते ती भाषा किंवा बोली अर्थाच्या दृष्टीने त्यात अंतर नाही. सर्वच भाषा प्रथम बोली असतात. मात्र व्यवहारात भाषा आणि बोली यात फरक केला जातो. प्रामुख्याने प्रमाण भाषा म्हणजे भाषा आणि अन्यत्र बोलली जाणारी विविध रूपे म्हणजे बोली. असा साधारण समज प्रचलित आहे. म्हणजे भाषा आणि बोली हे व्युत्पत्तीनुसार प्रत्यक्षात समानार्थी शब्द असले तरी

त्यांना वेगळी अर्थछटा प्राप्त झालेली आहे. उदाहरणार्थ – भाषा म्हणजे मराठी आणि बोली म्हणजे अहिराणी, कोकणी, चंदगडी, वऱ्हाडी, डांगी, वगैरे म्हणजेच भाषा ही अधिक व्यापक तर बोली ह्या थोड्या लहान परिघात सामावलेल्या अशी साधारण समजूत दिसते. परंतू बोली म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी येथे बोलीच्या व्याख्या पाहणे उचित ठरेल.

**२.४.२ बोलीच्या व्याख्या :**

मराठी विश्वकोषातील व विविध भाषा अभ्यासकांनी मांडलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

**१) तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी ''विश्वकोष खंड ११''** – ''ज्या व्यक्तिसमुहाला आपण पूर्णपणे एकरूप असे भाषिक रूप वापरतो असे वाटते, त्याची भाषा म्हणजे बोली'' येथे व्यक्तिसमुह व त्यांची भाषा याला गृहीत धरून व्याख्या केल्याचे दिसते.

**२) ना. गो. कालेलकर** – ''बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुखपरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो ती साधी पण परिणामकारक असते. आपले रूप प्रतिष्ठेच्या आरशात पाहून इतरांना ते आकर्षक असे करण्याचा प्रयत्न करायला तिला वेळ नसतो. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य काहींना ते मोहक वाटेल, काहींना ते ओंगळ वाटेल हा ज्याच्या त्याच्या मनोवृत्तीचा आणि संस्कारांचा प्रश्न आहे.''

वरील व्याखेत ना. गो. कालेलकरांनी मौखीक परंपरा, बोलीतील जीवंतपणा, साधेपणा, परिणामकारकता, स्वाभाविकता, इत्यादी वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

**३) स. ग. मालसे** – ''एखाद्या विशिष्ट लोक समुदायातील किंवा भौगोलिक प्रदेशातील व्यक्तींच्या अंगवळणी पडलेले आणि त्यामुळे प्राय: मुद्दाम शिकावे न लागणारे व विचारांची देवाण घेवाण करण्यासाठी सहजगत्या उपयोगी पडणारे ध्वनिरूप साधन म्हणजे बोली''

वरील व्याख्येत प्रादेशिकता व लोक समुदाय यांचा विचार केल्याचे दिसते.

**४) विजया चिटणीस माडगूळकर** – ''बोली म्हणजे परभाषाकांना जवळ-जवळ पूर्णपणे कमी अधिक प्रमाणात सारख्या वाटणाऱ्या तर तद्भाषकांना पूर्णपणे एकरूप वाटणाऱ्या व्यक्तीभाषकांचा समूह होय.''

वरील व्याख्येत भाषिक समुहांना वाटणाऱ्या मतांचा विचार केल्याचे दिसते.

**५) डॉ. दत्तात्रय पुंडे** – ''एक भाषक समाजाच्या एका गटाकडून किंवा एक भाषक समाजाच्या एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकांकडून देवाण घेवाणीसाठी, दैनंदिन व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषिक रूपास बोली असे म्हणता येईल.''

येथेही विशिष्ट प्रदेश आणि समाजातील गट यांचा विचार करून दैनंदिन व्यवहारात वापरली जाण्याला महत्त्व दिल्याचे दिसते.

**६) सोनाली देशपांडे गुजर** – ''बोलीभाषा या आजच्या काळातील नव्हे, तर शेकडो वर्षाच्या

प्रवासातून व रोजच्या व्यवहारातून विकसित झालेल्या आहेत. त्यामुळे बोली भाषा या तिथल्या समाजाची आणि प्रदेशाची अभिव्यक्ती आहे.''

**७) डॉ. मु. श्री. कानडे –** ''एक भाषक समाजाच्या एका गटाकडून किंवा एकभाषक समाजाच्या एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकांकडून देवाण घेवाणीसाठी दैनंदिन व्यवहारांसाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषिक रूपास बोली म्हणता येईल.''

अशा प्रकारे भाषाअभ्यासकांनी आपापल्यापरीने बोलीच्या विविध व्याख्या केल्याचे दिसते. काहींनी समाजातील एखादा गट आणि विशिष्ट भूप्रदेश यांना महत्व दिले. तर काहींनी मौखिक परंपरेला महत्व दिले तर काहींनी दैनंदिन व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या भाषिक रूपाला महत्व दिले. एकंदरीत या सर्व व्याख्यांवरून बोली म्हणजे काय? हे समजू शकेल. पुढे आपल्याला बोलीची विविध वैशिष्ट्ये पहायची आहेत. तसेच बोलीची विविध वैशिष्ट्येही सांगता येतील.

**बोली भाषेची विविध वैशिष्ट्ये :**

१) बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे.

२) एखाद्या विशिष्ट लोकसमुदायातील किंवा भौगोलिक प्रदेशातील व्यक्तींच्या अंगवळणी पडलेली असते. आणि तेच त्यांच्या अभिव्यक्तीचे साधन आहे.

३) शेकडो वर्षापासून ती मुखपंरपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारची लवचिकता, साधेपणा व जिवंतपणा असतो.

४) बोली साधी व परिणामकारक असते. त्यामुळे तिची स्वाभाविकता हेच तिचे एक वैशिष्ट्य होय.

५) बोलीमुळे परंपरेने चालत आलेल्या संस्कृतीचे जतन होते.

६) विशिष्ट लोकसमुहाची संस्कृती काही प्रथा-परंपरा बोलीतून व्यक्त होत असल्याने ती त्या लोकसमुहाला प्रिय असते.

७) स्थळ, काळ परत्वे बोलीत बदल झालेले दिसून येतात.

८) अलीकडे बोलीला लिपी चिन्ह प्राप्त झाल्यामुळे ती लेखन व्यवहारातही दिसू लागली आहे.

९) व्यवसायपरत्वे, लिंगभेदपरत्वे, वयोगटपरत्वे आणि प्रसंगपरत्वे माणसाच्या बोलीमध्ये वेगळेपण दिसून येते.

१०) विविधता आणि वैचित्र्य ही बोलीची प्रकृती असते.

११) बोलीभाषा विशिष्ट समाजाच्या विशिष्ट प्रांतातील लोकसमुहाच्या स्वतंत्र अस्तित्वाची खूण असते.

बोलीभाषेची विविध वैशिष्ट्ये पाहिल्यानंतर बोली निर्मितीची कारणे कोणती हे जाणून घेणे गरजेचे वाटते.

### २.४.४ बोलीच्या निर्मितीची कारणे :

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. सर्व सामाजिक संस्था या परिवर्तनशील असतात. तशीच भाषादेखील सतत परिवर्तन पावणारी संस्था आहे. भाषा ही एक बाजूने चिवट संस्था असली, जीवनाला चिकटूनच राहणारी

संस्था असली, तरी तिच्यात आवश्यक तेवढी सहजपरिवर्तनाची क्षमता असते. कारण ती ध्वनींनी सूचित होणाऱ्या संकेतांनी बनली आहे. भाषेतील या दुहेरी व्यवस्थेमुळे (Duality of Patterns) दोन गोष्टी साध्य झाल्या.

१) आवश्यक ते परिवर्तन घडण्याची क्षमता तिच्यात आली.

२) सतत विस्तारत, बदलत जाणारे मानवी जीवन आपल्या कवेत घेण्याची व्यापकता तिच्या ठायी निर्माण झाली.

३) एकाच समाजातील लोक भिन्न-भिन्न गट करून राहतात. याचे कारण, सामाजिक, राजकीय, आर्थिक, व्यवसायिक, शैक्षणिक, जाती असे कोणतेही असू शकते. अशा कारणाने निर्माण झालेल्या गटातल्या लोकांची स्वत:च्या गटापुरती अशी विशिष्ट भाषा तयार होते. ही भाषा संपूर्ण समाज वापरत असलेल्या सर्वसाधारण भाषेशी काही-काही बाबतीत भिन्नता राखून असते. हा गट प्रमाणभाषेपासून जितका दूर असेल तितकी त्या गटाची भाषा प्रमाणभाषेशी विभेद राखून असते. त्यामुळे बोली निर्माण होतात.

४) काळाच्या ओघात भाषेत परिवर्तन होत जाते. हे परिवर्तन भाषा ज्या-ज्या भागात किंवा प्रदेशात बोलली जाते त्या सर्व ठिकाणी सारख्याच स्वरूपात होत नसते. काळाच्या ओघात एकाच भाषेची भिन्न-भिन्न प्रदेशात, भिन्न-भिन्न रूपे विकसीत होतात. अशा रीतीने बोलींचा जन्म होतो.

५) राज्य लालसेमुळे किंवा अन्य प्रकारच्या फायद्यासाठी एखादा समाज दुसऱ्या प्रदेशावर आक्रमण करून तेथे स्थायिक होतो. काहीवेळा प्रचंड रोगराई, भीषण दुष्काळ, भूकंप यामुळेही एखादा एक भाषिक समाज दुसऱ्या ठिकाणी जाऊन राहतो. अशा रीतीने एकच भाषा बोलणाऱ्या समाजाच्या ठिकाणी स्थलांतर झालेल्या गटांमध्ये सततचे आदानप्रदान राहत नाही. आपापसातील दळणवळण कमी झाल्याने त्यांची भाषा वेगवेगळी होत जाते व बोलींची निर्मिती होते.

६) राजकीय वर्चस्व, परभाषेचा स्वीकार, व्यवहारीक कारण, अस्तित्वाचा प्रश्न अशा एखाद्या कारणाने समाज आपल्या स्वत:च्या भाषेचा त्याग करतो आणि दुसरी भाषा स्वीकारतो. परंतु असा परभाषेचा स्वीकार केल्यावरही स्वभाषेतील काही सवयी, काही लबक, काही उच्चारविशेष, काही व्याकरणविशेष तसेच टिकून राहतात. त्यामुळे जी परिभाषा समाजाने स्वीकारलेली असते. तिचेच रूप बदलून नवे रूप तयार होते. म्हणजेच त्या परभाषेची एक नवी बोली तयार होते.

७) भारतात जातिसंस्थेचे अस्तित्व फार प्राचीन काळापासून आहे. प्रत्येक जातीनुसार आचारविचार, जीवनशैली, यानुसार गट तयार होतात. आणि त्या-त्या जातीची भाषा तयार होते. त्यामुळे जातिसंस्था हे भारतापुरते बोलींच्या निर्मितीचे एक कारण ठरताना दिसते.

८) व्यवसाय भिन्नतेमुळेही बोलींची निर्मिती होताना दिसते. एकच व्यवसाय करणारे लोक एकत्र येऊन व्यवसाय व्यवहार करत असताना त्यांच्या व्यावसायिक गरजेमुळे त्यांच्यापुरती त्यांची एक भाषा बनते व बोलीचा जन्म होतो.

९) समाजामध्ये काही प्रभावक्षेत्रे असतात. उदा :- राजकीय हालचाली किंवा आर्थिक हालचाली यामुळे अशी क्षेत्रे निर्माण होतात. याउलट समाजात काही दबलेले गटही असतात. प्रभावगट आणि दुर्बल गट अशी

समाजात विभागणी होताना दिसते. या प्रभाव गटाची एक बोली तयार होते. तसेच दुर्बल गटाचीही बोली तयार होते. मुख्य म्हणजे हे गट एकमेकांच्या संपर्कात असतात, पण आपापल्या बोलींमध्ये भिन्नता राखून असतात.

१०) लिंगभेदामुळेही भाषाभेद निर्माण होते. असे निरीक्षण भाषा वैज्ञानिक नोंदवितात. स्त्रिया पुरूषांपेक्षा काही प्रमाणात वेगळी अशी भाषा बोलताना दिसतात. एक तर त्यांची अनुभवक्षेत्रे निराळी असतात. तसेच स्त्रियांवर कुटुंबाची, समाजाची अशी काही बंधने असतात. स्त्रियांच्या बोलण्या-वागण्याचे काही संकेत ठरवून दिलेले असतात. या सर्वांचा परिणाम स्त्रियांच्या भाषावापरावर होतो आणि स्त्रियांची भाषा अशी स्वतंत्र बोलीच अस्तित्वात येते.

स्त्रियांप्रमाणेच वृद्ध तसेच बालके यांचीही आपापली अशी बोली तयार होते. आयुष्याच्या उतार वयात वृद्ध मंडळी जीवनामुळे गंभीरपणे पाहत असतात आणि दुसरे म्हणजे शरीर थकणे, कुटुंबातील स्थानात बदल होणे, कर्तेपण हरवणे, अनुभव प्रदेश संकुचित होणे, नव्या जीवनशैलीबद्दल पूर्वसवयीमुळे स्वागतशील नसणे. इ. मुळे वृद्ध मंडळींची बोली अस्तित्वात येते.

वृद्धांच्या अगदी विरूद्ध स्थिती बालकांची असते. अत्यंतिक उत्साह व उर्जा असणे, प्रत्येक नवा अनुभव स्वत: घ्यावासा वाटणे, अपार कुतूहल असणे अशी बालकांची एका बाजूला स्थिती असते. आणि दुसऱ्या बाजूला जीवनाचे सर्व स्पर्शित्व व सखोलपण न कळणे जीवनशक्तीचा आणि विचार शक्तीचा पूर्ण विकास झालेला नसणे, यामुळे आपोआपच 'बालभाषा' नावाच्या बोलीचा जन्म होतो.

९) समाजजीवनामध्ये आपोआप निरनिराळे गट किंवा वर्तुळे निर्माण होत राहतात. आणि त्या-त्या गटांच्या किंवा वर्तुळाच्या जगण्याच्या शैलीला पोषक असे रूप भाषा धारण करते. त्यातून बोलींची निर्मिती होत राहते. अशा प्रकारे समाजातील विविध घटक व प्रसंग बोलींच्या निर्मितीस कारणीभूत ठरतात.

### २.४.५ बोलींच्या अभ्यासाची गरज :

कोणत्याही सामाजिक प्रश्नांचे उत्तर शोधायचे असेल तर बोलींचा अभ्यास करणे क्रमप्राप्त असते. प्रारंभीच्या काळातील जगातील सर्वच संशोधक, मग ते समाजशास्त्राचे असोत अथवा मानववंशशास्त्राचे वा इतिहासाचे असोत किंवा राज्यशास्त्राचे अशा विविध ज्ञानशाखांतील संशोधकांस प्रत्यक्ष क्षेत्रामध्ये जाऊन निरीक्षणे व टिपणे करणे आवश्यक ठरते. अशावेळी अध्ययनाचा विषय झालेल्या समाजाच्या बोलीचे ज्ञान त्यांस नाना पटींनी उपयुक्त ठरते. विशेषत: लोकसमुहाचे सामाजिक आणि सांस्कृतिक वर्तन आणि त्यांचा आशयाच्या संरचनेशी व घाटाशी असलेला अन्योन्य संबंध त्यांचे ज्ञान भाषेवरील प्रभुत्वाशिवाय अशक्य होय. लोकसमुहाची संस्कृती सामाजिक व आर्थिक संघटन, ज्ञान, श्रद्धा, मुल्ये इत्यादी विषयक माहिती संकलित करून त्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे व त्यावर उपाय शोधणे शिवाय त्या-त्या प्रदेशाची भाषक ध्येय धोरणे ठरविणे यासाठी बोलींच्या अभ्यासाची गरज भासते.

आदिवासी जमातीच्या भाषेचे संशोधन होऊन त्यांची-त्यांची व्याकरणे लिहिणे. जसे, शब्दकोश तयार होणे व लोकसाहित्याचा संग्रह होणे या अत्यंत निकडीच्या गोष्टी आहेत. या कृती मराठी भाषेत आणि त्या बहुसंख्य वाचकांपर्यंत पोहोचून आदिवासींच्या समाज आणि संस्कृतीची ओळख त्यांस होणे शक्य आहे. शिवाय

उपेक्षितांच्या अंतरंगाची ओळख झाल्याने त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न होणेही शक्य आहे.

वाढता शिक्षण प्रसार, नागरी जीवनाची ओढ व बदलती सामाजिक मुल्ये यामुळे आदिवासी, भटक्या जमाती व दलीत वर्ग यांच्या जीवनात आज महान उलथापालत होऊ पाहत आहे. त्यांची राहणी, विचारसरणी, आशा-आकांक्षा व जीवनमुल्ये आमुलाग्र बदलत आहेत. या सर्वांचा परिणाम त्यांच्या भाषांवर होणे अपरिहार्य आहे. विशेषत: सुधारीत सामाजिक गटात दुर्बल सामाजिक गट विरून गेल्याने आज अनेक बोली नाममात्र राहिल्या आहेत. तर अनेक नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे व्याकरण, शब्दकोश, गद्य-पद्य पाठ संग्रह इत्यादीद्वारे त्यांच्या स्वरूपाविषयीच्या माहितीचे संकलन, संशोधन व जतन होणे ही आजची निकड आहे. एकापरीने बोलींचा अभ्यास हा भाषाविज्ञानाच्या प्रगतीस हातभार लावीत असतो.

भाषांच्या संरचनेतील साधर्म्ये व वैधर्म्ये यांची माहिती मिळविण्याचे ते एकमेव साधन आहे. या माहितीच्या आधारावर भाषेच्या सार्वत्रिक वैशिष्ट्यांचे ज्ञान होऊन भाषेसंबंधी तात्विक विचाराची प्रगती होते. या दृष्टीने बोलींच्या अभ्यासाचे क्षेत्र म्हणजे भाषाविज्ञानाची प्रयोगशाळाच होय.

### २.५ बोलींची कार्यक्षेत्रे :

प्रस्तावना :

भाषा आणि समाज हे एकमेकांशी अगदी निकटतेने बांधलेले असतात. समाजातील बदलाबरोबरच भाषेतही बदल घडत असतात. नवे शब्द तयार होणे, जुने शब्द वापरातून निघून जाणे परक्या भाषेतून शब्द स्वीकारणे, जुन्या शब्दांना नवे अर्थ दिले जाणे ही सतत घडत असलेली क्रिया आपणांस दिसून येते. महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रानुसार जशा अनेक बोली निर्माणझाल्या त्याबरोबर विविध समाजाची एक विशिष्ट बोली असते. तसेच जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रात भाषेचा वापर कसा होतो हे अभ्यासणे ही महत्त्वाचे आहे म्हणून धर्मकारण, अर्थकारण, राजकारण, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्र, आरोग्य आणि विज्ञान अशा प्रत्येक जीवनक्षेत्रात भाषेचा क्षेत्र विशिष्ट वापर होत असतो. त्या त्या जीवनक्षेत्राची म्हणून एक विशिष्ट परिभाषा रुढ झालेली असते ह्या क्षेत्र विशिष्ट शब्दातून तेथील मानवी व्यवहार आणि मानवी मुल्यांचे दर्शन घडते.

भाषा व्यवहाराच्या ह्या क्षेत्रविशिष्ट संदर्भक्षेत्राला 'लघुक्षेत्र' असे म्हणतात. त्या त्या लघुक्षेत्रानुसार शब्द भांडारातील कोणता शब्द वापरावा याचे संकेत त्या त्या भाषिक समाजाने ठरविलेले असतात. उदा. स्वर्ग, मोक्ष, कीर्तन, पूजा हे शब्द धर्मक्षेत्राशी संबंधीत आहेत. तसेच आर्थिक, राजकीय, सामाजिक, व्यावसायिक आणि प्रसार माध्यम या क्षेत्रातील विशिष्ट बोली जाणून घेतल्याशिवाय तिथली नैतिकता, मुल्ये या विषयीचे आपले आकलन पूर्ण होत नाही म्हणून कोणतेही वास्तव समजावून घ्यायचे असेल, विशिष्ट क्षेत्रातील समस्या स्पष्ट करवून घ्यायची असेल तर या क्षेत्रविशिष्ट भाषेच्या वापरातले बारकावे माहित असणे फायदेशीर ठरते.

म्हणून बोलींची कार्यक्षेत्रे अभ्यासणे ही बोली अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे.

#### २.५.१ धार्मिक कार्यातील बोली -

निरनिराळ्या भौगोलिक प्रांतात वेगवेगळे धर्म उदयास आले. या धर्मातील पूजाविधी, चालीरिती, प्रार्थना पद्धती, संस्कार इत्यादी बाबतीत भिन्नता आढळते. हे सर्व त्यांच्या भाषा व बोली वरून समजू शकते.

महाराष्ट्राच्या उत्तर भागातील म्हणजे नाशिक परिसरातील कोकण आदिवासींच्या भाषेत, प्रमाण मराठी पेक्षा वेगळे असणारे अनेक शब्द आढळतात. सणवारांची, दैवतांची, विधींची नावे यामध्ये हे वेगळेपण प्रामुख्याने दिसते. नागपंचमी = पचवी, रक्षाबंधन = पोवती पुनवी, सर्वपित्री अमावस्या = पितारपाट, पूजा करणे = पहांजी देणे, होळी पेटवणे = होळी चेटवणे, तसेच सामदेवी ब्राम्हणांच्या बोलीचे प्रतिबिंब उमटलेले मधाच्या घागरी (मदिशो घागरी - समदेवी भाषेतील लोकगीते) या पुस्तकातील ७३ स्त्री गीतांचा विचार करताना त्यांची भाषा त्या भाषेचे प्रमाण भाषेशी असणारे साम्यभेद, त्या गीतांवर पडलेली ख्रिश्चन संस्कृतीची छाया, त्या प्रभावामुळे दिसणारे घटक, सामदेवी समाज त्याच्या एका शाखेचे महाराष्ट्रातील अस्तित्व, त्यांच्या धर्मबदलामुळे त्यांच्या आजच्या अस्तित्वावरील प्रश्नचिन्ह वगैरे सर्व गोष्टी कळून येतात.

महाराष्ट्रात धार्मिक क्रिया कर्मांचा पगडा फार पुर्वीपासून आहे. विविध देव-देवता, भूत-पिश्चाच्छ, पाप-पुण्य, पुर्नजन्म, या विषयाच्या समजूती, यात्रा, सण, समारंभ प्रसंगी म्हटली जाणारी गीते देवतांना संतुष्ट करण्यासाठी म्हणले जाणारे मंत्र, आवाहने, ग्रंथपठन आजही चालू आहेत. जय जय रामकृष्ण हरी, बोला बजरंगबली की जय, हर हर महादेव, भंब भंब भोले, सुंबरान मांडल, गोंधळ मांडला देवांनो गोंधळाला यावे, जोतीबाच्या/खंडोबाच्या नावान चांगभलं, येळकोट येळकोट घे-घे. अशा काही वाक्यावरून परंपरेने चालत आलेल्या बोली भाषेच्या खूणा लक्षात येतात.

### २.५.२ आर्थिक व्यवहारातील बोली -

जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रातील अर्थकारण हे एक क्षेत्र आहे. या जीवनक्षेत्रात एक विशिष्ट परिभाषा रूढ झालेली दिसते. महाराष्ट्रातील अनेक व्यवसाय अर्थकरणाशी निगडीत आहेत. त्यातील प्रमुख व्यवसाय शेती आहे. शेतात पिकलेल्या मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. येथे ''भाव'' हा शब्द 'दर' या अर्थाने येतो. व्यापारी शेतकऱ्याकडून निरनिराळ्या नावाखाली 'सूट' घेतात. 'बारदान सूट','गाडी सूट','माती सूट' इत्यादी मिरची बाजारातील हमाल निरनिराळ्या प्रतीची मिरची एकत्र करतात. त्या कामाला 'पाला करणे' असे म्हणतात. धान्य बाजारातील हमाल दर पोत्यात शंभर किलो याप्रमाणे सर्व पोत्यात सारखे धान्य भरून थप्या लावायच्या असतात. या कामाला 'मुंडाफोड करणे' म्हणतात. त्याचबरोबर धान्य मोजण्याची प्रमाणे - पायली, मापट, कोळव, चिपट, अंतर मोजण्यासाठी कासराभर, पेंडभर, फरलांग, कोस असे शब्द ग्रामीण भागात पहायला मिळतात. देयक, पावती, धनादेश, ताळेबंद, आय-व्ययपत्रक असे शब्द म्हटले की ते अर्थव्यवहारातील आहेत हे चटकन लक्षात येते. काही भागात पैशाला नगद, रोकड, चलन, असे संबोधले जाते. ही अशा वेगवेगळ्या प्रदेशातील व्यवसायविशिष्ट बोली जाणून घेतल्याशिवाय तिथले सामाजिक-व्यावसायिक वास्तव, तिथली नैतिकता, मुल्ये या विषयीचे आपले आकलन पूर्ण होत नाही.

### २.५.३ राजकारणात बोलीचा वापर :

प्रत्येक क्षेत्रातील भाषेची काही खास वैशिष्ट्ये असतात आणि या दृष्टीने राजकीय क्षेत्रात भाषेचा उपयोग कसा केला जातो हे पाहणे मोठे उद्बोधक आहे. भाषा हे एक महत्त्वाचे साधन आहे आणि म्हणून साध्य पूर्ततेसाठी राजकीय क्षेत्रात जाणारे नेते भाषेचा उपयोग प्रभावीपणे करतात. राजकीय क्षेत्रातील ध्येयवादी नेत्यांना समाजाचे परिवर्तन घडवून आणावयाचे असते. आणि या ध्येयाबद्दलच्या तळमळीतून त्यांची भाषा घडत असते. शक्यतो

आपला प्रभाव पडण्यासाठी ते तेथील प्रादेशिक बोलीचा वापर करतात. त्याचप्रमाणे नेत्यांच्या व्यक्तित्वाचाही त्यांच्या भाषेशी निकटचा संबंध असतो.

सत्तेचा संघर्ष हा राजकारणातील महत्त्वाचा भाग आहे. अशा सत्तासंघर्षात भाषाही विविध तऱ्हेने वापरली जाते. जेथे संघर्ष समोरासमोर असतो तेथे राजकीय नेते आपली शक्ती आक्रमक भाषा वापरून व्यक्त करतात. विशेषत: शेतकऱ्यांचे प्रतिनिधी ग्रामीण भाषेचा अतिशय प्रभावी उपयोग करताना आढळून येतात. महाराष्ट्राच्या विधिमंडळात अर्थसंकल्पावर चर्चा चालली असता, एका कल्याणकारी योजनेच्या खर्चात काटकसर करून दुसऱ्या कल्याणकारी योजनेवर शासन खर्च करते हे सांगताना, एक आमदार म्हणाले, ''चिम्याला नटवण्यात सोम्याला नागवण्याचा हा धंदा बंद करा!'' दुसरे एक आमदार दुसऱ्या संदर्भात म्हणाले, ''सरकानं गरिबांच्या अंगावर घोंगडी टाकली पण ती इतकी अपुरी आहे की डोके झाकू लागले की पाय उघडे पडतात आणि पाय झाकू लागले की डोके उघडे राहते!'' तिसरे आमदार सरकार भलतीकडेच पैशाची उधळण करीत आहे हे सांगताना म्हणाले, ''रोग रेड्याला आणि औषध पखाल्याला'' असे सरकारचे चालू आहे. एका बाजूस प्रादेशिक भाषेचे हे वैभव प्रकट होत असले तरी दुसरीकडे इंग्रजी वळणाचे काही शब्दप्रयोगही महाराष्ट्राच्या विधिमंडळात रूढ झाले आहेत. 'माझ अस म्हणणं आहे असा मराठी वळणाचा शब्दप्रयोग करण्याऐवजी' 'मी सांगू इच्छितो' हे 'आय विश टू से' या इंग्रजी नावाचे भाषांतर सर्रास वापरले जाते. प्रत्येक आमदाराच्या भाषेमध्ये तो ज्या वर्गातून आलेला असतो त्याचे प्रतिबिंब पडते. शहरातील एक मध्यमवर्गीय आमदार अर्थव्यवस्था कुंठित झाली आहे हे सांगताना आपल्या अर्थव्यवस्थेचे विमान रन-वेवरच फिरतय या सरकारच्या हयातीत टेक-अप स्टेज येण्याची शक्यता दिसत नाही असे म्हणाले, तर हाच आशय व्यक्त करताना ग्रामीण भागातले दुसरे आमदार म्हणाले, आपल्या अर्थव्यवस्थेचा गाडा चिखलात रूतून पडला आहे आणि दिवसेंदिवस तो अधिकच खोलात चालला आहे. इत्यादी वरील उदाहरणांवरून राजकारणात प्रादेशिक भाषेचा वापर कसा प्रभावशील केला जातो हे दिसून येते.

### २.५.४ सामाजिक बोली –

मनुष्य समूहाने राहू लागल्यानंतर समाज विकासाच्या प्रक्रियेत ज्या सामाजिक संस्था उदयाला आल्या त्यात 'धर्मसंस्था' विविध जाती, संप्रदाय उदयास आले. (माणसाच्या व्यवहारावर धर्म संस्थांचा जबरदस्त पगडा असतो. कारण समाजाच्या अभौतिक संस्कृतीचा तो एक घटक असतो.) वेगवेगळ्या समाजाचे आचार-विचार अमूर्त कल्पना, सण-समारंभ, विधी याप्रसंगी गायली जाणारी लोकगीते, लोककथा, यावरून त्यांच्या भाषा व बोलींचा अभ्यास करता येतो. समाजाच्या निरनिराळ्या गटातील बोलीत काही वैशिष्ट्य पूर्णता निर्माण होतात. त्यामुळे त्यांचे स्वरूप समाजातील प्रचलित व्यवहारापेक्षा काहीसे वेगळे आणि लक्षणीय आहे. समाजात व्यक्तीचे लिंग, वय, स्तर, जात इत्यादी भेदांना अनुसरून जे निर्माण होतात त्यांच्या व्यवहार भाषेत काही वैशिष्ट्ये निर्माण होतात. संरचनेच्या दृष्टीने भाषेचे स्वरूप बोलीहून फारसे वेगळे नसले तरी व्यवसायाची साधणे, क्रियाप्रक्रिया, उत्पादित वस्तू इत्यादी संबंधी निराळा शब्दसंग्रह निर्माण होतो. वैशिष्ट्यपूर्ण वाक्यप्रचार निर्माण होतात.

गुप्तभाषा किंवा जिला महाराष्ट्रात 'पारशी' म्हणतात. तिचे स्वरूप भारतात अशा भाषांपेक्षा भिन्न असते ती केवळ स्वकीयांनाच कळावी. इतरांना कळू नये असाही गुपित बोली बोलणाऱ्यांचा कटाक्ष असतो.

फासेपारध्यांची गुप्त बोली व सांकेतिक चिन्हांची भाषा आहे. नंदिवाल्यांच्या गुप्त बोली प्रमाणेच मांग जातीचीही गुप्त बोली आहे. गुलनिवासी जाती जमातींच्या जीवनातील संरक्षणार्थ गुप्त वापरातून गुप्त भाषेच्या शब्दांचा उदय झालेला आहे. उदाहरणार्थ :- पेडा = जावा, निडळ सुडा = दारू प्या, चिलगाट ठिकलं = मुल थांबलं, अंबुज ठिकतो = मांग आहे इत्यादी अशा गुप्त बोलीचा वापर जात पंचायत, विवाह, सण, उत्सव, अनेक जातीच्या समुदायामध्ये, पोलीस स्टेशन याठिकाणी पहायला मिळतो. तसेच राजकीय कार्यकर्ता आपल्या जातीचा मेळावा आयोजित करतो. त्यावेळी आपण त्या जातीचे असल्याचा निर्वाळा देण्यासाठी प्रकर्षाने या बोलीचा वापर करताना दिसतो. त्याचबरोबर ग्रामीण भागातील अशिक्षित लोकांची बोलण्यातील एक वेगळी लबक पहायला मिळते. यावरूनच येथे सामाजिक क्षेत्रात बोली भाषेचा किती महत्त्वपूर्ण वाटा आहे हे दिसून येते.

### २.५.५ व्यवसायातील बोली –

विविध व्यवसायातील लोक एकत्र येऊन परस्परांशी आर्थिक व्यवहार करीत असतात. या निमित्ताने जी भाषिक देवघेव होते त्यातून भिन्न-भिन्न व्यवसायिकांचे भाषिक आदान-प्रदान होऊन शब्दसंग्रहात नवी भर पडत असते. वेगवेगळ्या व्यवसायातील संतांनी देखील आपापल्या व्यवसायातील रूपकात्मक शब्द घेऊन परमार्थ कथन केल्याचे दिसते. उदाहरणार्थ :- नरहरी सोनार -'त्रिगुणाची करूनी मूसा आत ओतिला ब्रम्हरस।। जीव-शिव करूनी फुंकी। रात्रंदिवस ठोकाठोकी ।।', सावता माळी - 'कांदा मुळा भाजी-अवघी विठाई माझी', सेना न्हावी - 'आम्ही वारीक वारीक । करू हजामत बारीक' सध्या सुद्धा प्रत्यक्ष त्या-त्या समाजातील नसुनही थोड्या ओळखदेखीमुळे व व्यवहारामुळे आपण काही-काही रूपके योजून त्यांना सामान्य शब्दांचा गौरवही प्राप्त करून दिला आहे. उदाहरणार्थ :-'इंगा फिरवणे'-(चांभार व्यवसायातील शब्द), 'ठिय्या देणे'-(सुतार कामातील शब्द) 'ओळंबा लावून पाहणे'-(गवंडी कामातील शब्द), 'तोंडावरची इस्त्री बिल्कूल बिघडू न देणे'- खळ फार लावणे,( परीट व्यवसायातील शब्द), 'पाणी लावून बसण/हजामत करणे'-(नाभिक व्यवसायातील शब्द) अशा व्यवसाय भाषेतील शब्दांचा, वाक्प्रचारांचा वापर समाजात नेहमी होताना दिसतो. यावरून असे स्पष्ट होते की, व्यवसायिक आदान-प्रदानामुळे एका क्षेत्रातील शब्द दुसऱ्या क्षेत्रात रूपकात्मक अर्थाने वापरले जातात व त्यामुळे भाषा समृद्ध होते.

### २.५.६ प्रसारमाध्यमातील बोली –

एकविसाव्या शतकात विज्ञान व तंत्रज्ञानाचा झपाट्याने विकास झाला. प्रसार माध्यमांचा विस्तार वेगाने झाला. सामाजिक संपर्क माध्यमे जनसामान्यांच्या हातात आली. ज्ञान, माहिती, मनोरंजन, जाहिरात आणि प्रबोधन हे घटक फक्त प्रसार माध्यमांची मक्तेदारी न राहता ती अबालवृद्धांपासून समाजातील सर्व घटकांची संपर्क स्थाने बनली. महाजालाचे अनन्यसाधारण महत्त्व माणसाला स्वीकारावेच लागले. या महाजालावर स्वत:ची नाममुद्रा उमटवण्याची संधी प्रत्येकाला प्राप्त झाली. वेगवेगळ्या 'ब्लॉग' किंवा 'अनुदिनी' च्या माध्यमातून लोक आपापल्या बोलीचा वापर करू लागले.

आकाशवाणी वरील 'रेडिओ जॉकी' सारख्या जनसंपर्क माध्यमात आपणास प्रादेशिक बोलींचा वापर पहावयास मिळतो. आकाशवाणी वरून उद्घोषणा, मुलाखती, संवाद, चर्चा, नभोनाट्य, यासारख्या कार्यक्रमात

लोकांशी जवळीक साधण्यासाठी जनसामान्यांच्या बोली भाषेचाच वापर केला जातो. शेतीविषयक उत्पादीत मालाची, जाहीरात करण्यासाठी खास ग्रामीण बोली वापरली जाते. (पशुखाद्य, ट्रॅक्टर, पाईप, ठिबक सिंचन) वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून स्थानिक बोली भाषेचा वापरही बऱ्याचवेळा पहावयास मिळतो. अलीकडे खास ग्रामीण भागातील समस्यांवर चित्रपट निर्माण होत आहेत. तो प्रभावशाली होण्यासाठी लोकांना, आपलासा वाटण्यासाठी त्यामध्येही कोणतीही कृत्रिमता न आणता ग्रामीण बोलीचा वेगवेगळ्या समाज घटकातील बोलींचा वापर पहावयास मिळतो. प्रसार माध्यमांच्या कार्यक्षेत्रात वर्तमान पत्रापासून इंटरनेट सुविधांपर्यंत सर्वच हक-श्राव्य माध्यमांत बोली ह्या प्रभावशाली ठरलेल्या पहावयास मिळतात.

**२.६ बोली भाषांची क्षेत्रमर्यादा –**

मनुष्य हा समुहजीवी प्राणी आहे. दैनंदिन जीवनात अनेक कारणांसाठी समाजातील व्यक्तींनी एकत्र येणे एकमेकांचे विचार समजून घेणे आवश्यक असते. आपले अनुभव, अभिप्राय अथवा विचार दुसऱ्यापर्यंत पोहचविल्याशिवाय सामाजिक व्यवहार शक्य होत नाही. भाषा विनिमयाचे साधन आहे. हे तर खरेच पण, त्याचबरोबर हेही लक्षात घ्यायला हवे की भाषा समुहातील व्यक्तींना जोडणारा दुवा आहे. ती संस्कृतीची वाहक असते.

अनुभव क्षेत्रांनुसार भाषा विविध रूपे धारण करते. अनुभवक्षेत्रे अक्षरश: अगणित असतात मात्र कोणतेही जीवनक्षेत्र असते त्यानुसार भाषेच्या उपयोजनात बदल होत असतात. प्रत्येक जीवनक्षेत्रात वापरला जाणारा शब्दसंग्रह वैशिष्ट्यपूर्ण असतो. भाषिक व्यवहार करणाऱ्या व्यक्तीला तो माहित असतो किंवा माहित करून घ्यावा लागतो. एकाच शब्दाला वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळा अर्थ असू शकतो. उदाहरणार्थ :– लग्नाची 'बेडी' वेगळी आणि पोलिसांची 'बेडी' वेगळी 'कर' म्हणजे हात, एकाअर्थाने काम कर, तर व्यवसायातील 'टॅक्स' भरणे म्हणजे कर भरणे होय. त्याचबरोबर एकाच आशयाला अथवा वस्तूला भिन्न जीवन क्षेत्रात भिन्न संकेत असू शकतात. उदाहरणार्थ :– कामाच्या मोबदल्यासाठी वेगवेगळ्या जीवन क्षेत्रात वेगवेगळे शब्द वापरले जातात. भटजीला 'दक्षिणा' मिळते, लेखकाला 'मानधन' मिळते, कामगाराला 'पगार' मिळतो तर मजुराला 'मेहनताना' मिळतो. कोणत्या प्रसंगी कोणते शब्द मोजावयाचे हे व्यक्तीला अनुभवाने आणि समाजात वावरल्याने समजते.

अनुभव क्षेत्रानुसार भाषा विविध रूपे धारण करते याचा अर्थ असा नव्हे की एका अनुभव क्षेत्रातील भाषा अन्य अनुभव क्षेत्रातील भाषेपेक्षा संपूर्णत: भिन्न असते. त्यात साम्य आणि भेद अशा दोन्ही गोष्टी असतात. प्रत्येक व्यवसायाचा, जाती धर्माचा, शब्द संग्रह भिन्न असतो. ही बाबही मर्यादीत अर्थानेच खरी आहे. शब्दांना असलेले अर्थ सदंर्भाने निश्चित होत असतात. म्हणून संदर्भ बदलला की अर्थही बदलतो असे अनुभवाला येते. 'स्वर' हा शब्द गायकाने वापरला आहे की व्याकरणाच्या शिक्षकाने वापरला आहे, 'धाव' हा शब्द लोहाराने वापरला आहे की क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूने वापरला आहे. 'पक्ष' हा शब्द पंचांगकर्त्याने वापरला आहे की राजकीय नेत्याने वापरला आहे. यावर त्याचा अर्थ ठरत असतो.

अनुभव क्षेत्रानुसार शब्दांचे अर्थ बदलण्याची क्रिया ज्या प्रमाणे घडते त्याचप्रमाणे एकाच वस्तुला अथवा कृतीला अनुभव क्षेत्रानुसार वेगवेगळे संबोधन प्राप्त होऊ शकते. उदाहरणार्थ :– घरात आपण पितो ते 'पाणी' असते. देवळात 'तीर्थ' असते. प्रयोगशाळेत $H_2o$ असते तर कवितेत 'जीवन' सुद्धा असते. तसेच अनेक

व्यवसायातून आलेल्या म्हणी व वाक्यप्रचारांनाही वेगवेगळ्या अर्थछटा प्राप्त झाल्या आहेत. 'हजामत करणे' 'धुलाई करणे' 'इंगा फिरविणे' 'कान टोचणे' 'पट्टा पडणे' इत्यादी वरून आपणास वेगवेगळ्या कार्यक्षेत्रातून आलेल्या बोली भाषेतील शब्दांच्या अर्थछटांचा अंदाज येतो आणि भाषा व्यवहार जीवन व्यवहाराबरोबरच समृद्ध होत असलेला दिसून येतो.

**२.७ समारोप :**

कोणतीही प्रचारात असलेली भाषा स्थिर आणि एकरूप नसते. तिच्यामध्ये तिने व्यापलेल्या प्रदेशातील भौगोलिक आणि सामाजिक भेदानुसार अनेक भेद निर्माण होतात. त्यांना 'बोली' असे म्हणतात. त्या बोलींना त्यांच्या प्रदेशावरून अथवा सामाजिक भेदावरून नावे दिली जातात. उदा :- वऱ्हाडी, कोकणी, ब्राम्हणांची बोली, कुणक्यांची बोली इत्यादी. सामान्य व्यवहारात बोलीचाच भाषा म्हणून निर्देश केला जातो. उदा:- पुणेरी भाषा, कोल्हापुरी भाषा इत्यादी पण त्या प्रत्यक्षात बोलीच असतात. या बोलीपैकी एखादी बोली ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक कारणांमुळे महत्त्व पावते आणि तिला प्रमाण बोलीचा दर्जा प्राप्त होतो. इतर सर्व बोली तिचेच अनुकरण करू लागतात. तिच्यातून गंभीर वैचारिक स्वरूपाचे लेखन होऊ लागते तेंव्हा तिला 'प्रमाणभाषा' असे म्हटले जाते. ही प्रमाणभाषा भाषेतील सर्व बोलींच्या क्षेत्रातही पसरते. त्यावेळी स्थानिक बोली आणि प्रमाणभाषा यांच्यात कार्यक्षेत्रांची आपोआप वाटणी होते. रोजच्या दैनंदिन व्यवहारांसाठी बोलीचा वापर होतो आणि शासकीय पत्रव्यवहार, न्यायालयीन लेखनव्यवहार, शिक्षणाचे माध्यम म्हणून केले जाणारे लेखन, सर्व प्रकारचे औपचारिक लेखन यासाठी प्रमाण भाषेचा वापर होतो. बोलींमध्ये भौगोलिक अंतरामुळे परस्पर आकलनक्षमता नसली तरी स्थानिक बोली आणि प्रमाणभाषा यांच्यात परस्परांमध्ये आकलनक्षमता असते. त्यामुळे प्रमाणभाषा सर्व बोलींना सारखीच आकलनक्षम असते. प्रमाणभाषा आणि बोली यांच्यात बरेच आदान-प्रदान होते. स्थानिक बोलीचे हेल प्रमाण भाषेत शिरतात. प्रमाण भाषेतील शब्द बोलीत उतरतात.

बोलींच्या निर्मितीस आंतरिक, ऐतिहासिक, भौगोलिक व सामाजिक कारणेही असू शकतात. त्यात प्रामुख्याने राजकीय व सांस्कृतिक परिणामांमुळे भाषा भेदांना निमंत्रण, भाषिक दुरावा, स्थलांतराचा मुद्दा, युद्ध, व्यवसाय, दुसऱ्या संस्कृतीचे दडपण, समाज व्यवस्था, वय, लिंग, घटनापरत्वे या गोष्टींचा समावेश होतो. त्याचबरोबर जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रात भाषेचा वापर कसा होतो हे अभ्यासत असताना धर्मकारण, अर्थकारण, राजकारण, सामाजिक व प्रसारमाध्यम क्षेत्र अशा प्रत्येक जीवनक्षेत्रात भाषेचा क्षेत्रविशिष्ट वापर होत असतो. त्या-त्या जीवनक्षेत्राची म्हणून एक विशिष्ट परिभाषा रूढ झालेली असते. ह्या क्षेत्रविशिष्ट शब्दातून तेथील मानवी व्यवहार आणि मानवी मुल्यांचे दर्शन घडते. भाषा व्यवहाराच्या ह्या क्षेत्रविशिष्ट संदर्भ क्षेत्राला 'लघुक्षेत्र' असे म्हणतात. त्या-त्या लघुक्षेत्रानुसार शब्दभांडारातील कोणता शब्द वापरावा याचे संकेत त्या-त्या भाषिक समाजाने ठरविलेले असताता. उदा :- स्वर्ग, नरक, मोक्ष, पाप-पुण्य, दिंडी, वारी, कीर्तन, प्रवचन, पारायण हे शब्द उच्चारले की ते धर्मक्षेत्राशी संबंधित आहेत हे कळते. त्याचबरोबर सामाजिक अभिसरणामुळे भाषा समृद्ध होते. भाषेतील अनुभवक्षेत्रानुसार येणारी विविध रूपे आणि भाषा समृद्धीच्या निरनिराळ्या दिशा पाहत असताना अनुभवक्षेत्रानुसार भाषा विविध रूपे कशा प्रकारे धारण करते हेही दिसून येते.

बोलींमध्ये मौखिक स्वरूपाचे साहित्य निर्माण होते. ते लोकसाहित्य या स्वरूपाचे असते. अलीकडे ललित साहित्यही वास्तवदर्शनासाठी बोलीचा वापर केला जाऊ लागला आहे. कथा, कादंबरी, काव्य, नाटक, आत्मचरित्र या वाङमय प्रकारात संवादासाठी गरजेनुसार त्या-त्या पात्राच्या बोलीचा वापर केला जातो. अलिकडील प्रादेशिक साहित्य, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य या चळवळीमुळे बोलींच्या वापराला खूप चालना मिळाली आहे. त्यामुळे संवाद आणि पात्रमुखी निवेदन एवढ्यासाठीच नव्हे तर लेखक मुखी निवेदनासाठीही बोलीचा वापर केला जात आहे. केवळ कथा निवेदनाचे साधन म्हणूनच नव्हे, तर आविष्काराचे माध्यम म्हणूनही बोलीचा गांभीर्याने विचार होऊ लागला आहे. त्यामुळे आज बोली अभ्यासाची गरज निर्माण झाली आहे.

**२.८ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**प्रश्न १ : योग्य पर्याय निवडा :**

१) प्रमाणभाषेचे विनिमयक्षेत्र कसे असते.

अ) लांब ब) मोठे क) लहान ड) उंच

२) लेखन व्यवहारासाठी कोणत्या भाषेचा वापर केला जातो.

अ) चिन्हांची भाषा ब) हावभावाची भाषा क) बोली भाषा ड) प्रमाणभाषा

३) प्रमाणभाषा समाजाला काय देते.

अ) स्थैर्य ब) गती क) प्रेरणा ड) परिवर्तन

४) प्रादेशिकता व लोकसमुदाय यांचा विचार कोणी मांडला.

अ) ना. गो. कालेलकर ब) स. ग. मालसे क) डॉ. दत्तात्रय मुंडे ड) डॉ. मु. श्री. कानडे

५) बोलीमुळे कशाचे जतन होते.

अ) संस्कृती ब) साहित्य क) लोकसाहित्य ड) मानवता

६) बोलीची प्रकृती कशी असते.

अ) एकता ब) विविधता क) सामाजिकता ड) प्रेरकता

७) जातीसंस्थेमुळे कोणती बोली निर्माण होते.

अ) व्यवसाय बोली ब) वृद्धांची बोली क) जातबोली ड) बालकांची बोली

८) बोलीचे प्रभावक्षेत्र कसे असते.

अ) मोठे ब) लहान क) लवचिक ड) कठोर

९) गुप्तभाषेला महाराष्ट्रात काय म्हणतात.

अ) पारसी ब) अहिराणी क) कोकणी ड) आसामी

१०) चिलगाट ठिकलं हे वाक्य कोणत्या भाषेतील आहे.

अ) धार्मिक क्षेत्र बोली ब) सामाजिकक्षेत्र बोली क) आर्थिक बोली ड) व्यवसायिक बोली

**उत्तरे :**

१ - ब, २ - ड, ३ - अ, ४ - ब, ५ - अ, ६ - ब, ७ - क, ८ - ब, ९ - अ, १० - ब

**प्रश्न २ दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) प्रमाणभाषा व बोली या संकल्पना स्पष्ट करून त्यांचे परस्परसंबंध स्पष्ट करा.

२) बोलीचे स्वरूप सांगून कार्यक्षेत्रांची माहिती लिहा.

३) बोलीच्या व्याख्या सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**प्रश्न ३ लघुत्तरी प्रश्न :**

१) प्रमाणभाषेची वैशिष्ट्ये सांगा.

२) बोली निर्मितीची कारणे विषद करा.

३) बोलीच्या अभ्यासाची गरज.

४) बोलीची क्षेत्रविशिष्टता स्पष्ट करा.

**उपक्रम :**

आपल्या परिसरातील बोली बोलणाऱ्या लोकांच्या मुलाखती घेऊन बोलीचे शब्द, वाक्य आणि म्हणी यांचा संग्रह करा.

**२.९ संदर्भ ग्रंथ :**


१) ना. गो. कालेलकर : 'भाषा इतिहास आणि भूगोल', मौज प्रकाशनग्रह खरकरवाडी, गिरगाव मुंबई, २०००

२) डॉ. मु. श्री. कानडे (संपा) : 'मराठीचा भाषिक अभ्यास', ऐतिहासिक आणि वर्णनात्मक स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००४

३) विश्वनाथ खैर : 'मराठी भाषेचे मूळ', समत प्रकाशन, पुणे, २००२

४) डॉ. विजय इंगळे : 'मराठी भाषा : भाषाशास्त्र आणि व्याकरण', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९९

५) डॉ. अलका मटकर : 'मराठी भाषेचा वैज्ञानिक अभ्यास', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१७

६) सोनाली देशपांडे गुजर : 'भाषा, समाज आणि संस्कृती', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१७

७) डॉ. मोहन लोंढे : 'मांग संस्कृती आणि भाषा', विजय प्रकाशन, नागपूर, २०१७

८) कैलास महाले : 'कोकणी समाजाचे भाषिक वेगळेपण', भाषा आणि जीवन, वर्ष-२३ अंक-१ हिवाळा, २००५

९) लीला अर्जुनवाडकर : 'मधाच्या घागरीच्या निमित्ताने', भाषा आणि जीवन, वर्ष-१५ अंक-४ दिवाळी, १९९७


***

# घटक – ३
# बोली भाषांची निर्मिती

**उद्दिष्टये :**

१. बोलीभाषांच्या निर्मितीची कारणे अभ्यासणे.

२. भाषा बोली आणि समाज प्रदेश यांच्या परस्पर अनुबंधावरप्रकाश टाकणे.

३. भौगोलिकता हे बोलीच्या निर्मितीचे एक महत्त्वाचे कारण आहे हे जाणून घेणे.

४. बोलींचा आविष्कार उत्कट, उत्स्फूर्त असा स्वाभाविक व नैसर्गिक असतो. तो समजावून घेणे.

५. बोलीमुळे भाषा समृध्द होते व भाषेचा विस्तार होतो हे समजून घेणे.

६. प्रमाण भाषेपेक्षा बोली या जिवंत, रसरशीत व अधिक प्रवाही असतात यांचा परामर्श घेता येईल.

७. बोली हे सामाजिक- सांस्कृतिक-ऐतिहासिक संचित असते.याचा आढावा घेता येईल.

८. जागतिकीकरणानंतर बदलत्या समाज स्थित्यंतरामध्ये बोलींचे अस्तित्त्व समजून घेता येईल.

**३.१ प्रस्तावना :**

मानवी जीवन सुखकर करणारी भाषा ही एक प्रवाही सामाजिक संस्था आहे. कोणतेही समाजजीवन कधीच स्थिर नसते. प्रत्येक समाजसंस्था समकालाशी बांधील असते. त्यामुळे तिचे स्वरूप हे नेहमी परिवर्तनशील असते. मानवाच्या सभोवतीच्या पर्यावरण परिसरामध्ये नित्यनुतन अनेक घटना घडत असतात. त्या घटना प्रसंगांच्या क्रिया प्रतिक्रियांचे प्रतिबिंब समाजाजीवनात नेहमी उमठत असते. त्याचे अनेक बरेवाईट परिणाम मानवी जीवनावर होत असतात. त्या परिणामांनी तेव्हा समाजजीवन अस्थिर होत असते. समकालीन सामाजिक, भौगोलिक, राजकीय स्थित्यंतरांच्या परिणामांनी समाजजीवन ढवळुन निघत असते. त्यावेळी स्थलकाल परिस्थिती space-time-context नुसार समाजात उलथापालथीनी घडून येत असतात. तेव्हा नव्या चालिरीती, प्रथा परंपरा समाजजीवनात रूढ होवून नवी जीवनपध्दती आकारास येत असते. मानवी सवयी, नवा व्यवयाय, आचारविचार, आहारविहार, आवडीनिवडी, वेशभुषा, केशभुषा, भिन्न भाषा संपर्क, संस्कृती संकर असे समाजात अंत: बाहय अनेक बदल घडून येत असतात. यावेळी अपरिहार्यपणे वेळोवळी समाजजीवन नवे रूप धारण करीत असते. तेव्हा या स्थित्यंतराचा समाज भाषेवर परिणाम होत असतो. या समाज परिवर्तनाला भाषा अपवाद राहत नाही. गतीशील समाजाप्रमाणे त्या प्रदेशाच्या भाषेलाही प्रवाहीपण येत असते. कारण भाषा कधीच स्थिर असत नाही. ती सदैव गतिमान असते. परिवर्तन हा भाषेचा स्वभाव आहे. तेव्हा समाजाप्रमाणे आंतरिक आणि बाह्य अशा दोन्ही पध्दतीने भाषेत अखंडपणे परिवर्तन घडून येत असते. ध्वनी–शब्द–अर्थ–रूप आणि वाक्य अशा पाचही अंगानी भाषेत परिवर्तन होत असते. भाषेच्या या प्रवाहीपणामुळे जुन्या शब्द संकेतांची जागा नवी शब्द रूपे घेतात. तेव्हा काहीवेळा जुने शब्द संकेत आणि उच्चाररूपे लुप्त होतात. आणि त्यांची जागी नवी शब्द रूपे घेतात. त्यानाच नंतर

बोलीस्वरूप प्राप्त होते. कारणपरत्वेभाषेच्या परिवर्तनाचा संबंध ती बोलल्या जाणाऱ्या समाजाशी, त्याच्या इतिहास आणि भूगोलाशी निकटत्वाने येत असतो.

गतीशीलता हा सृष्टीचा निसर्ग नियम आहे. तो पृथ्वी वरील सर्व प्राणीमात्रांना अगदी मानवासहित आणि त्यांने निर्माण केलेल्या कलांसहित सर्वांना लागू पडतो. चल आणि अचल स्वरूप हे प्रवाहीपणाचे आणि जीवंतपणाचे लक्षण मानले जाते. तिच गोष्ट समाजभाषेची आहे.समाज परिवर्तनाप्रमाणे त्या समाजाची भाषाही बदलत असते.ज्या प्रकारे साचलेले पाणी दुषित होते आणि प्रवाहीत पाणी मात्र शुध्द राहते. तशीच भाषेची गोष्ट आहे. जिवंत समाजाप्रमाणे भाषा ही सदैव गतिमान असते. भाषेच्या या परिवर्तनशील स्वभावाने आणि तिच्या स्थानिक भौगोलिक व सामाजिक वैशिष्टयांमुळे भाषेत स्थलकालातित अनेकरूपे निर्माण होतात. त्या विविध बहुरूपांनी भाषेला बहुभाषिकता येते. जसे कोकणी बोलीच्या जवळपास पंधरा ते वीस बोली आहेत. ज्या त्या भाषिक समाजाच्या गरजा आणि परिस्थितीनुसार भाषेचे स्वरूप निश्चित होते. प्राप्त काळ, सामाजिक वर्ग, त्याचाभिन्न व्यवसाय, राजकीय विभाजन, भौगोलिक अंतरीक दळणवळणाचे अडथळे यामुळे एकभाषिक समाज विभागला गेला की भाषेत अनेकविधता येते. एखादा विस्तृत एक भाषिक प्रदेश कितीही सलग असला तरी भौगोलिक व सांस्कृतिक दृष्टीने त्याचे अनेक स्वाभाविक भूभाग पडतात. त्याप्रमाणे विस्तीर्ण मराठीच्या महाराष्ट्राचे खानदेश, मराठवाडा, विदर्भ आणि कोकण असे प्रादेशिक भेद केले जातात.

भाषा आणि बोली हे एकमेकांच्या सहाय्याने अस्तित्वात येणारे भाषिक आविष्कार आहेत. महाराष्ट्र भूमिला समृध्द अशा बोलींचीवैभवशाली परंपरा लाभली आहे. मराठीच्या जवळपास पन्नासएक बोली भाषा आहेत. मराठी भाषेची ती विविध रूपे आहेत. त्यामध्ये पुन्हा विविध प्रादेशिक छटाही आहेत. या बोलींच्या शब्दांचे पाट आणि उच्चारी लकबीचा घाट मराठीला सतत येवून मिळत असतो. त्यामुळे बोलींनी मराठीची ताकद आणि साहित्यांदी कलांनी मराठीचा मानसन्मान वाढविला आहे. मराठीचा महाराष्ट्र अशी ओळख निर्माण केली आहे. मराठीच्या वऱ्हाडी, कोकणी, खानदेशी, दख्खनी,ठाकरी, वारली, आगरी अशा विविध बोलींचे मराठी हे एक महाकुटुंब आहे.या प्रादेशिक बोलींनी मराठीवर शब्द सौंदर्यरूपी हिऱ्यामोत्यांचा साज चढविला आहे. अशा संपन्न बोलींनी नटलेला थटलेला महाराष्ट्र आहे. बोली प्राचीनांची देण आहे. तसेचआपले संस्कृती वैभव आहे.त्यामुळे या वेगवेगळया प्रादेशिक बोलींरूपाकडे स्थानिक प्रदेशाचा सौंदर्यपूर्ण खजिना म्हणून बोलींकडे पाहणे अगत्याचे ठरते. बोलींना विशिष्टता देण्यात भौगोलिक परिस्थितीचा मोठा वाटा असतो. बोली नैसर्गिकतेचा जिवंत झरा आहेत.

आज विज्ञानयुगात माणसाला भाषेच्या नैसर्गिक सीमा बांधून ठेवता येणे शक्य नाही. त्याप्रमाणे आज विज्ञानापासून फार काळ माणसाला अलिप्त ही राहता येणे नाही. विज्ञान, शिक्षण, नोकरी, व्यवसाय, शहरी स्थलांतर, भिन्न भाषिकांशी संपर्क याच्यांशी संबंध अपरिहार्य आहे. वैज्ञानिक दळणवळण क्रांतीमुळे संबंध मानवी समाज व्यवहाराला आणि पर्यायाने जीवनाला गतिमानता आली आहे. नैसर्गिक अडथळे आणि मागासलेले जीवन यामुळे प्राचीन काळात बोलींची निर्मिती झाली. परंतु ती परिस्थिती आता राहिलेली नाही.बोलीसाठी अनुकूल असे नैसर्गिक अडथळे आणि मागासलेपणाचे प्रमाण आज दिवसेंदिवस उणावत चाललेले आहे. वैज्ञानिक दळणवळण क्रांतीमुळे माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार गतीने होत आहे. विज्ञाननिष्ठ भौतिक मूल्यांची समाजात रूजवात होत आहे.

त्यामुळे शहर-खेडे, शिक्षित-अशिक्षित, उच्च-निच्च, प्रगत-मागास हे भेद विरळ होत चालल्याने बोलीभाषांची विशिष्ठता कमी होत चालली आहे. बोली भाषांची निर्मिती कुंठित झाली आहे. भारतातील जवळपास २०० हून अधिक बोलीभाषा नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याची भीतीदायी शक्यता डॉ. गणेश देवी यांनी अशी दर्शविली आहे. त्यामुळे आज जगभरातील समाज भाषा संस्कृतीचे अभ्यासक,'' बोली टिकल्या तर भाषा टिकतील.भाषा टिकल्या तर संस्कृती टिकेल. आणि संस्कृती टिकली तर अर्थातच तो, तो मानवी समाज आणि त्याची वैशिष्टयपूर्ण मूल्यव्यवस्था टिकून राहील.'' अशी बोलींच्या स्थितीगतीची समाज प्रस्तुत सांगत आहेत.

तथापि भौगोलिक व सामाजिक वैशिष्टयांनी भाषा आणि बोलींची स्वाभाविक रूपविविधता स्पष्ट होत असते. बोली भाषा या समाजाचे वैभव आहे. बोली प्रदेशाचा इतिहास, त्याचा भूगोल, समाज संस्कृती, लोकमानस, परंपराधारी व्यवसाय अशी समाज अंगे बोलीमध्ये सामावलेली आहेत. या सामाजिक अंगा बरोबर बोलीची निर्मिती तसेच त्यांची परिवर्तन प्रक्रिया, बोलींचे अस्तित्व,बोलीची आशय अभिव्यक्ती, रूप आणि आविष्कार, ढंगदार उच्चारी लकबी भौगोलिक विशेषत्व अशा विशिष्ठतेमुळे बोलींना विशेषत्व प्राप्त झालेले आहे. त्या बोलींच्या वैविध्यपूर्ण खजिन्यांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

**३.२ विषय विवेचन :**

भारत हा बहुभाषिक, बहुसांस्कृतिक देश आहे. अनेक जाती, धर्म, पंथ, संस्कृती, परंपरा तसेच प्रादेशिक भाषा आणि बोली प्रचलित असणारा भारत एकमेव देश आहे. त्यामुळेच सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि भाषिक ऐक्याचे प्रतिक म्हणून जगात भारत ओळखला जातो. एकंदरीत या भौगोलिकता, जीवनपध्दती, संस्कृती, इतिहास या प्रदेश वैशिष्ठयांचा समाजजीवनांवर परिणाम होवून भारतीय भाषा, जीवन,संस्कृतीमध्ये प्रादेशिक विविधता आली आहे. समस्त भारतीय समाजजीवन सामाजिक, भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, भाषिक अशा विविधांगानी बहुभाषिक व बहुसांस्कृतिक बनले आहे. तथा भौगोलिक संपत्ती, भाषा व संस्कृतीने देशाची समृध्दी व ऐकता वृध्दिंगत होत असते. कोणतीही समाजभाषा लोकमानस घडविण्याचे महत्वपूर्ण कार्य करीत असते.भाषा मानवाने मानवाच्या विकासासाठी बनवलेली एक सामाजिक संस्था आहे. पण देश, प्रदेश, स्थान, भूभाग, परिसर, समाज, समूह, व्यक्तीपरत्वे भाषेला भिन्नत्व आले आहे. याशिवाय भाषेनेही जातीय, व्यवसायीक, भौगोलिक, प्रादेशिक बहुआयामी रूप धारण केल्याने हजारो लोकभाषा आज समाजव्यवहारात प्रचलित आहेत. परंतु आद्योगिकरण,जागतिकीकरण, व्यापारीकरण, नागरीकरण तसेच शिक्षण, दळणवळणाच्या आधुनिक विकास क्रांतीमुळे काळाच्या ओघात काही भाषा लुप्तही होत आहेत.त्याचा धोका संभवत, वाढत आहे. तसेच भाषेची काही नवी रूपही निर्माण होत आहेत. तेव्हा भाषिक परिवर्तनाची विकासी तसेच विकारी अशी दोन्ही रूपे पहावयास मिळत आहेत. आज जागतिकीकरणाने बोलीचा सांस्कृतिक भौगोलिक अस्सलपणा धुसर होत आहे. इतके बोलींमध्ये गतीने परिवर्तन घडून येत आहे. बोली संपल्या तर सांस्कृतिक विविधता नष्ट होण्याचा मोठा धोका संभवतो. बोली प्रदेशाच्या सामाजिक, सांस्कृतिक इतिहासाचा आणि भाषिक संपत्तीचा ठेवा संवर्धन आणि संक्रमणासाठी बोलीभ्यासाची नितांत गरज भासते. त्यामुळे भाषा बोलींचा अभ्यास, चिंतन आणि संशोधनाचा विषय होत आहे.

### ३.३ बोलीभाषांची निर्मिती प्रक्रिया :

भाषा आणि बोली हे एकमेकांच्या परस्पर सहाय्याने अस्तित्वात येणारे समाजव्यवहाराचेविनिमय साधन आहे. प्रथम बोलीमुळे भाषा अस्तित्वात येते.आणि नंतर भाषेतुन बोली उदयाला येतात. ज्याप्रमाणे गतीशिलता हा समाजसंस्थेचा एक विशेष आहे. त्याचप्रमाणे परिवर्तनशीलता हा भाषेचा स्वभाव आहे. समाजसंस्थेप्रमाणे भाषाबोली भौगोलिक, ऐतिहासिक तसेच सामाजिक, सांस्कृतिक कारणांनी स्थित्यंतरे घडून येतात. कारण भाषा हा समाजातील बहुविध संस्कृतीला जोडणारा एक अनुबंध आहे. गतिमान समाजाप्रमाणे भाषा ही बहुरूपधारण करते. बदल हा तिचा निसर्ग नियम आहे. साहजिकच भाषेची परिवर्तन प्रक्रिया एक अखंडरित्या चालणारी प्रक्रिया आहे. भाषेच्या अंतर्गत स्वरूपात तसेच बाहय परिस्थितीतही स्थित्यंतरे घडून येत असतात.तेव्हा भाषिक परिवर्तन घडून येत असते. भाषा स्थळ, काळ, परिस्थिती व व्यक्तिपरत्वे बदलत असते.

बोली कोणत्या एका कारणांनी निर्माण होत नाहीत. भाषा ज्या घटकांनी बनलेली असते त्यांच्या रचनेमध्ये वा रूपवैशिष्टयांमध्ये भाषा परिवर्तनाची अंतर्गत कारणे सामावलेली असतात. तर भाषा ज्या परिस्थितीशी बांधलेली असते तिच्या स्वरूपात भाषा परिवर्तनाची बाहयकारणे सापडतात.तथापि ''बोली निर्माण होण्याची कारणे म्हणजे एक समाज दुसऱ्या समाजापासून विभक्त होण्याची कारणे होत. ती निरनिराळी असू शकतात.''असे डॉ. र. बा. मंचरकर यांनी सूचक विधान केले आहे. त्यामुळे भौगोलिक स्थिती आणि मानवी दळणवळणाचा समाज भाषेवर होणारा परिणाम येथे विचार प्रवर्तक आहे. तेव्हा बोली भाषांच्या निर्मितीस भौगोलिकता, दळणवळण, शासनसंस्थांचा प्रभाव, मागासलेपण, भाषिकाची विशिष्ठता, भिन्नभाषा संपर्क, मानवी स्थलांतर अशी परिस्थितीजन्य अनेक कारणे कारणीभूत ठरतात. एकुणच स्थित्यंतरे आणि मानवी व्यवहार, समाजभाषेच्या परिवर्तन प्रक्रियेशी सबंधीत आहेत.भाषेचे अस्तित्व हे तिच्या विविध शब्द रूपांमध्ये असते. त्यामध्ये बदल होऊन भाषेची कोणती नवी रूपे उदयास येतात? नंतर स्वतंत्र भाषा किंवा बोली म्हणून तिची ओळख होते. या भाषिक परिवर्तन प्रक्रिया तसेच बोलींची निर्मिती प्रक्रिया समजून घेणे कामी भौगोलिक स्थिती आणि सामाजिक स्थित्यंतराचाआणि मानवी दळणवळणाचा समाज भाषेवर होणारा परिणाम येथे विचार प्रवर्तक आहे.

#### ३.३.१ भौगोलिक विविधता

भौगोलिकता हे बोली भाषांच्या निर्मितीचे एक महत्वाचे कारण आहे. भौगोलिक विविधता ज्या प्रदेशाला प्राप्त झालेली असते. त्या प्रदेशात बोलींची संख्या अधिक असते. भाषा मानवाच्या दळणवळणाचे एक प्रभावी आणि परिणामकारक साधन आहे. माणसाची वेशभुषा, केशभुषा तसेच अहारपध्दती, सवयी, अधिवास तेथील प्रदेशीय भौगोलिक हवामानावर ठरत असते. तसेच त्याची भाषिक अभिव्यक्ती होत असते. त्यामुळे प्रदेशीय बोलीना विशिष्ठत्व देण्यात भौगोलिक पस्थितीचा वाटा मोठा महत्वाचा असतो.

भाषा स्थल-काल-परिस्थितीनुसार बदलत असते. कोणताही एक भाषिक प्रदेश कितीही सलग असला तरी भौगोलिक व सांस्कृतिक विशेषांनी त्या प्रदेशाचे अनेक विभाग पडतात. उदा. उंच पर्वत, डोंगराळ प्रदेश, घनदाट जंगल, विस्तीर्ण वाळवंट, पाऊस, महापूर, विस्तृत नदी पात्र, दुष्काळ, रोगराई अशा नैसर्गिक अडथळयांमुळे एकभाषिक प्रदेशातील दळणवळणामध्ये आधेमधे खंड पडतो आणि एक भाषिक प्रदेशात असे आपत्तीजन्य नैसर्गिक अडथळे निर्माण होवून तेथील मानव विस्तृत प्रदेशापासून दूरावतो. मग तो लहानसहान गटात जेव्हा

विभागला जातो, तेव्हात्या भाषिक गटाच्या बोलींना हळूहळू वेगळे रूप येवू लागते. भाषाभेद वाढत जातो. आणि नंतर कालांतराने स्वंतत्र बोली भाषा म्हणून त्यांची ओळख होते.

पूर्वी दळणवळण साधनांचा अभाव, सहयाद्रीच्या पर्वतरांगा,खोलघाट,हवामान,पाऊस, जंगल दऱ्याखोऱ्यांमुळे भौगोलिकदृष्टया महाराष्ट्रीय प्रदेश आणि कोकण असा प्रादेशिक आणि भाषिक दुरावा निर्माण झाला. त्यातूनचमराठीची कोकणी ही प्रमुख बोली निर्माण झाली.पुन्हा कोकण व तळकोकण असा प्रादेशिकभेद निर्माण होवून उत्तर आणि दक्षिण कोकणीच्या अनेक पोटभाषा निर्माण झाल्या आहेत.उत्तर कोकणी मध्ये बाणकोटी,दमणी,घाटी,मावळी,संगमेश्वरी हे पोटभेद जाती,धंद्यावरून पडले आहेत. तसेच आगरी, भंडारी, धनगरी, वऱ्हाडी, किरिस्ताँव, कोळी, कुणबी, परभी, ठाकरी इत्यादी पोटभेद आहेत.पश्चिम घाट आणि अरबी समुद्र यांच्यातील घनदाट डोंगराळ किनारपट्टीच्या भूप्रदेशात अनेक बोली बोलल्या जातात. डॉ. सु. मं.कत्रे यांनी'द फॉर्मेशन ऑफ कोकणी' या भाषा ग्रंथात कोकणीच्या प्रमुख सहा बोलींचे प्रकार सांगितले आहेत.१.कर्नाटकी चित्रापूर सारस्वतांची कोकणी,२.गौडी सारस्वतांची कोकणी,३.श्री.वालावलीकरयांच्या लेखानातील गोव्याच्या हिंदूची कोकणी,४.मंगळूर आणि दक्षिण कर्नाटक जिल्हयातील ख्रिश्चनांची कोकणी ५.उत्तर कर्नाटक जिल्हयांतील ख्रिश्चनांची कोकणी ६.गोव्यांच्या ख्रिश्चनांची कोकणी. या प्रकारात गोव्याच्या उत्तरेकडे सावंतवाडी,वेंगुर्ले,मालवण,रत्नागिरी पर्यंत बोललल्या जाणाऱ्या कोकणीचा समावेश नाही. मालवणी बोलीचीही अशी वेगवेळी रूपे पहावयास मिळतात. भाषिक संपर्कामध्ये खंड पडून दुरावा कायम राहिल्याने पोट बोलींच्या निर्मितीस कारण ठरला.बोली वैशिष्टये सहजासहजी पुसून जात नाहीत.

आज आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाने दळणवळण क्षेत्रात क्रांती घडून आली आहे. संदेशनाची माध्यमे वाढली आहेत.क्षणार्धात देशविदेशात संपर्क साधू शकतो.त्यामुळे निसर्गाच्या सीमा माणसाला आणि त्याच्या भाषेला बांधुन ठेवता येत नाहीत.बोली भाषा निर्माण होण्याची शक्यता घुसर झाली आहे.परंतु प्राचीन काळी मानवाचा नैसर्गिक अधिवास होता. जंगल, दऱ्या खोऱ्यांमध्ये रानावनांमध्ये मानव समाज रहात होता.साहजिकच त्यामुळे नैसर्गिक अडथळयांच्या आपत्तीजन्य परिस्थितीमुळे मागास प्राचीन काळात बोली निर्माण झाल्या असे म्हणता येईल. विज्ञान तंत्रज्ञानाच्या दळणवळण क्रांतीमुळे येथून पुढे बोली निर्माण होण्याची शक्यता फार कमी वाटते.

### ३.३.२ राजकीय व सांस्कृतिक प्रभाव :

राजकीय व सांस्कृतिक प्रभावांमुळे भाषाभेद उन्नत होण्यास अवसर मिळतो.राजसत्तेच्या प्रभावामुळे भाषाभेदांना अधिक ठळकपणा येत जातो. आपल्या कार्यक्षेत्रातील प्रदेशावर वर्चस्व गाजविणाऱ्या कोणत्याही राजकीय शासनसंस्थेच्या अंमलाचा प्रभाव समाजमनांवर अधिक खोलवर परिणामकारकरित्या होत असतो. उदा.भारतात पोर्तुगीज सत्तेच्या ख्रिस्तीकरणांमुळे गोमंतकीय ख्रिस्ती बांधवांचा मराठीशी संपर्क हळुहळू कमी होवून कोकणी-ख्रिस्ती संमिश्र अशी गोवन भाषा निर्माण झाली. भौगोलिकतेपेक्षा राजकीय व सांस्कृतिक प्रभाव कोणत्याही समाज, भाषा, संस्कृतीवर अधिक परिणामकारक होत असतो.भौगोलिक विविधतेने वैशिष्टयपूर्ण प्रदेशावर एकाच राजसत्तेच्या दीर्घकाल अंमलाने भाषा संकर होऊन त्यांच्या भाषिक संदेशनामध्ये एकजिनसीपणा येतो आणि नव्या बोलीची रूपे निर्माण होतात.राजसत्तेमुळे भाषाभेदांना अधिक ठळकपणा येतो.

एकभाषी भूप्रदेश दोन परस्पर भिन्नशासनसंस्थाच्या अमंलाखाली असतो. तेव्हा तेथील भाषांना भिन्न रूप

प्राप्त होते. उदा. उत्तर कोकणी बोली मराठी भाषिकांच्या वर्चस्वाखाली आल्यामुळे मध्य वा दक्षिण कोकणीपेक्षा किती तरी वेगळी बनली आहे. तथापि राजकीय स्वायत्तेमुळे अत्यंत संपन्न भाषा निकट असूनही डच व पोर्तुगीज या बोलींना स्वतंत्र भाषांचा दर्जा प्राप्त होवून त्या साहित्यिक व सांस्कृतिक व्यवहाराचे माध्यम बनल्या.मात्र फ्रान्स-इटलीच्या प्रोव्हांसाल बोलीत स्वतंत्र वाङ्मय निर्माण होवूनही तिला स्वतत्र बोलीचा दर्जा प्राप्त होवू शकला नाही.फ्रेंचच्या राजकीय व सांस्कृतिक प्रभावाचाच हा परिणाम म्हणता येईल.अशी परस्पर विसंगती येथे विशेषत्वाने नोंदविता येईल.

मराठी भाषिक समाज दीर्घकाळ कानडी राजवटीच्या अंमलाखाली राहिल्यांने महाराष्ट्रीय मराठी आणि कर्नाटकमधील मराठी भाषिकांची बोली ही कानडी प्रभावीत आहे. त्याचप्रमाणे मराठवाडयावर निजामी राजवटीचा अंमल दीर्घकाळ राहिल्याने मराठवाडी बोली प्रभावित आहे. राजसत्तेच्या प्रभावामुळे भाषाभेदांना चालना मिळते आणि बोलींची निर्मिती होते.

### ३.३.३ शिक्षणाचा अभाव :

शिक्षणामुळे आर्थिक सुबत्ता येते. मागासलेपण दूर होऊन व्यक्ती तसेच समाजाचा विकास घडून येतो. त्यासाठी शासनसंस्थेची इच्छाशक्ती प्रबळ असणे आवश्यक असते. परंतु शिक्षणाचा प्रसार योग्यरित्या विस्तृत प्रदेशात न करणारी मध्यवर्ती शासनसंस्था ज्या भागात नसते. त्या प्रदेशातील मानव समूहाला सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक तसेच भाषिक मागासलेपण येते. तेव्हा तेथील मानव समूह उदरनिर्वाहासाठी भटकंती करीत करीत छोट्या मोठ्या गटात विभागला जातो. नंतर त्याच्या जीवनपध्दतीमध्ये वेगळेपणा येत जातो. हळूहळू बोलीतील फरक वाढत जाऊन भाषाभेद अधिक तीव्र होतो व तेथे बोली उदयास येतात. तेव्हा त्या कधी समाज तर कधी वर्गीय रूप धारण करतात. उदा. मागास दुर्गम, डोंगराळ प्रदेशातील आदिवासी समाज आणि त्यांच्या बोली.

### ३.३.४ स्थलांतर आणि समान भाषिक संपर्क :

दुष्काळ, महापूर, रोगराई अशा आपत्तीजन्य परिस्थितीमध्ये मानवी स्थलांतरे घडून येतात. त्यावेळी भाषिक आपल्या भाषिकांपासून लांब जातो. नव्या वाडया वस्त्यानी भिन्न भाषिक प्रदेशात रहातो. तेव्हा त्या भिन्न भाषिकांशी त्याचा संबंध येतो. त्यावेळी त्यांचा सानिध्य परिणाम आणि संकरातून नवी बोली रूपे उदयास येतात. नंतर त्यांतील भाषिक भेद वाढत जावून त्यांची वेगळी भाषाबोली निर्माण होते.

सारखीच भाषा बोलणारे लोक जेव्हा टोळयाटोळयांनी एखाद्या विस्तीर्ण प्रदेशावर आक्रमण करून तेथील वेगवेगळया भागात स्थायिक होतात.तेव्हा ते परस्परांशी नियमित दळणवळण ठेवू शकत नाहीत. त्यावेळी त्यांची बोली निरनिराळया वसतीस्थानात निरनिराळया प्रकाराने परिवर्तित होते. तेव्हा स्थानिक भाषाभेदांना त्या त्या भागांतील मूळ रहिवाशांच्या भाषिक संपर्कामुळे वैशिष्टयपूर्णता येते आणि नव्या बोलीभाषांची निर्मिती होते.उदा.उत्तर भारतातील आर्यांचे आक्रमण किंवा आर्यभाषिकांची महाराष्ट्रातील वसाहत ही या प्रकारची उदाहरणे म्हणून सांगता येतील.

### ३.३.५ भिन्न भाषिक संपर्क :

जेव्हा भिन्न भाषिकांच्या संपर्कात आल्यावर काही भाषक स्वभाषा टाकून परभाषा स्वीकारतात. त्यामुळे परंपरागत ती भाषा बोलणारे लोक आणि नव्याने ती भाषा स्वीकारणाऱ्या लोकांच्या बोलण्यात अंतर निर्माण होते. भिन्न भाषिक संपर्कामुळे नवी बोली उदयाला येत असते. भारतातील इंडोयुरोपियन भाषांत आणि भारताबाहेरील इंडोयुरोपियन भाषांत फरक आढळतात. त्याचा उलगडा प्रस्तुत कारणाने करता येतो. आर्यभाषा बोलणारे आजचे बहुसंख्य भारतीय मूळचे परभाषिक समाजाचे वंशज असावेत असे त्या फरकाचे स्पष्टीकरण करण्यात येते.

### ३.३.६ परभाषेचा संन्निकर्ष :

परभाषेचा संन्निकष हे बोलीच्या निर्मितीचे कारण सांगितले जाते. भिन्नभाषिक प्रदेशांच्या सीमेवरील समाजाचे अन्यभाषिक समाजाशी सामाजिक, सांस्कृतिक, व्यवसाय अशा कारणांनी सततचे संबंध येतात. तेव्हा त्यांच्या भाषेच्या मूलरूपावर त्याचा ठळक परिणाम होतो. त्यावेळी एक वेगळी बोली जन्माला येते.उदाहरणार्थ पूर्वीच्या मुंबई इलाख्यात समाविष्ट झालेली कर्नाटकची भाषा वांशिकदृष्टया भिन्न असूनही दीर्घकाल मराठीच्या प्रभावाखाली राहिल्याने ती म्हैसूरच्या कानडीहून वेगळी बनली आहे.

माणदेशी बोली सर्व बाजूनी मराठी बोलींनी वेढलेली बोली आहे. हळबी ही मराठी आणि हिंदी यांच्या संक्रमण पट्टयात आहे, खानदेशी आणि डांगी गुजरातीला चिकटून आहेत, तर दक्षिण कोकणी कानडीला जावून भिडली आहे. द्राविड भाषेशी दीर्घकाळ येवून सुध्दा कोकणीचे मूळ ओळखता येते, तिचा वंश कोणता हा संभ्रम उत्पन्न होत नाही, कारण बोलीभाषिक वैशिष्टये ही सहजासहजी पुसून जात नाहीत.

### ३.३.७ भाषिक विशिष्ठता

एकच भाषा जेव्हा एखाद्या विस्तीर्ण प्रदेशात बोलली जात असते. तेव्हा भाषेच्या परिवर्तनशील स्वभावानुसार त्या प्रदेशाच्या वेगवेगळया भागात ती कमीअधिक प्रमाणात बदलत जाते. यातून नंतर स्वाभाविक क्रमाने निरनिराळया बोली अस्तित्वात येतात. काळाचे अंतर जसजसे वाढत जाते, तसतसे एकाच भाषेच्या भिन्न ठिकाणच्या रूपांमधील किरकोळ फरक वाढत जाऊन त्यांना स्पष्ट रूप येत जाते. भाषेच्या स्वाभाविक परिवर्तनशीलतेमुळे निर्माण होणाऱ्या बोलींतील अंतर कालांतराने तीव्र होऊन त्यांना विशिष्टता प्राप्त होते. मराठीच्या चंदगडी बोलीचे उदाहरण म्हणून घेता येईल. पूर्वेकडील कानडी प्रभावित चंदगडी बोली आणि पश्चिमेकडील कोकणी प्रभावित चंदगडी बोली मध्ये असे विशिष्टत्व आले आहे. शिक्षण, वय, व्यवसाय, लिंगभेद आणि प्रसंगपरत्वे उच्चाराला वेगळेपणा येतो.याशिवाय कधीकधी सामाजिक दर्जा, भौगोलिक समीपता वा दूरता,वैवाहिक संबंध, धार्मिक वा सांस्कृतिक संबंधातूनही बोलीत फरक पडतो. त्या भाषाभेदास भाषिकाची व्यक्तिगत विशिष्ठता कारण ठरते. भाषा ही व्यक्ती विशिष्ठ असते. वय, हवामान, आहार, सवयी, व्यवसाय, भौगोलिक स्थितीचा भाषिकाच्या प्रकृतीवर परिणाम होऊन त्यांच्या भाषा व्यवहाराला उच्चारी वेगळी लय प्राप्त होत असते.

एकंदरीत भाषेची स्वाभाविक परिवर्तनशीलता आणि कालांतराने वाढत जाणारी भाषाभेदांची तीव्रता, एकभाषिक प्रदेशातील निसर्गनिर्मित भौगोलिक भेद तसेच मानवनिर्मित राजसत्ता व सांस्कृतिक प्रभाव, शिक्षणाचा

अभाव, व्यवसायभिन्नता, जातिभेद, आर्थिक व्यवहार यामुळे निर्माण होणारे समाजगट, नव्या प्रदेशातील वसाहत, स्थलांतर, भिन्नभाषिकांचा संपर्क आणि परभाषेचा संन्निकर्ष, शिक्षणाचा अभाव आणि मागासलेपण अशा कारणांनी थोडयाफार फरकाच्या बोली निर्माण होतात. स्वाभाविक रीतीने भिन्न होत जाणे आणि प्रासंगिक कारणामुळे थोडया अधिक प्रमाणात आकर्षिले जाणे ही परस्परविरोधी प्रवृत्ती भाषेतही दिसते. प्राचीन काळात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय स्थित्यंतरे तसेच प्रादेशिक,भौगोलिक अनुकूल परिस्थितीमुळे पुष्कळ बोली भाषा उदयास आल्या.मात्र आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानयुगात दळणवळणाने क्रांती केली आहे.शिक्षणाच्या प्रसारामुळे आर्थिक सुबत्ता येवून विकासी दृष्टीने मानवी समाजाचे मागासलेपण दूर होत आहे. संदेशवहनाच्या गतीमानतेमुळे नव्या बोलीं निर्मितीचा वेग थंडावला आहे.शिक्षण व साहित्यामुळे भाषा आणि बोलीमधील भाषाभेदांची दरी कमी करून समानता आणण्याचा प्रयत्न होत आहे.

**३.४ बोलीभाषांमधील परिवर्तनाची प्रक्रिया :**

'चार कोसपर बदले पाणी, बारा कोसपर बदले वानी' या लोकोक्ती नुसार सृष्टीतील प्रत्येक घटकामध्ये सातत्याने घडून येणारी परिवर्तने ही एक प्रक्रिया आहे आणि तो एक निसर्ग नियम आहे. पृथ्वीवरील कोणताच घटक चिरस्थायी नाही. तो परिवर्तनशिल आहे.उत्पत्ती, विकास आणि विनाश या त्याच्या तीन अवस्था आहेत.परंतु वरील लोकोक्ती नैसर्गिक भौगोलिक घटकांचा मानवी भाषाबोली आणि जीवनपध्दतीवर परिणाम दर्शविणारी आहे.''परिवर्तनशीलता हा सजीवांचा विशेष आहे. जीवचैतन्याच्या प्रवाहीपणाचेच ते एक रूप आहे. कोणी त्याला विकार म्हणतात तर कोणी विकास.'' असे डॉ.र.बा.मंचरकर यांनी म्हटले आहे. येथे चांगल्या वाईटाचा सापेक्षतेने विचार करणे आवश्यक ठरते. भाषा हे मानवी समाज व्यवहाराचे एक प्रभावी प्रवाहित साधन आहे.व्यक्तीच्या आणि समूहाच्या मनोव्यापाराचे ते जिवंत प्रतिबिंब आहे. मनोव्यापारांना प्रकट करताना त्यांना आकार व वळण देण्याची शक्ती भाषेत आहे. म्हणून परिस्थितीप्रमाणे व समाजाच्या गरजांप्रमाणे परिवर्तन पावणे हा भाषेचा स्वभावधर्म आहे. भाषेच्या उच्चारणाप्रमाणे अर्थ परिवर्तनशील लवचिक असतो.त्यामुळे बोली आणि भाषा यांच्यातील भेद कमी होवून समरूपता येते आणि भाषिक परिवर्तन प्रक्रिया घडून येते.डॅनिश भाषाशास्त्रज्ञ जे.एच्. ब्रेडस् डॉर्फ यांनी इ.स.१८२१मध्ये भाषिक परिवर्तनाची प्रथम शास्त्रीय संकल्पना मांडली आणि त्यानंतर परिवर्तनाच्या अभ्यासाला सुरूवात झाली.

कोणताही भाषिक व्यवहार कधीच स्थिर नसतो. तो स्थळकाल, समाज परिस्थिती, व्यक्तीपरत्वे लवचिक असतो. भाषेचे उच्चारण जसे लवचिक असते, तसा अर्थही लवचिक असतो. साहजिकच बोली भाषांमध्ये गतीने परिवर्तन घडून येते. तर प्रमाणभाषेत ते संथगतीने होत असते. बदलत्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, भौगोलिक स्थित्यंतरामुळे समाजात अव्यवस्था आणि व्यवस्था, अस्थिरता आणि स्थैर्य, धामधूम आणि शांतता नेहमीच प्रत्ययास येते. तसेच दुष्काळ, साथीचे रोग, युध्द या सारख्या आपत्तीजन्य परिस्थितीमध्ये समाजजीवन अंतर्बाहय ढवळून निघते आणि भाषिक परिवर्तनाला गती प्राप्त होते. शांतता, स्थैर्याच्या काळात जीवन व्यवहार सुरळीत चालत असतात. तेव्हा भाषिक परिवर्तनाचा वेग मंदावतो.भाषिक परिवर्तन प्रक्रियेस कोणती एक भाषा आणि प्रदेश अपवाद रहात नाही. भाषेत उच्चारण, वर्ण, प्रत्यय, प्रयोग, शब्द आणि अर्थ या घटक अंगानी अनेक उलथापालथी घडूनभाषिक परिवर्तनहोत असते. अपरिहार्य किंवा स्वाभाविक परिवर्तन आणि

ऐच्छिक वा परिस्थितीजन्य परिवर्तन असे भाषिक परिवर्तनाचे प्रामुख्याने वर्गिकरण केले जाते. स्वाभाविक परिवर्तन हे बहुश: ध्वनिविषयक असते तर अर्थपरिवर्तन ऐच्छिक स्वरूपाचे असते.

भाषापरिवर्तनामागे कधीकधी अनेक कारणे असू शकतात. आणि प्रत्येक वेळी त्या सर्वांचा योग्य निर्देश करता येणे शक्य नाही. अंतर्गत व बाह्य अशा दोन्ही अंगाने भाषिक परिवर्तन घडून येते. यासंबंधी भाषाभ्यासकामध्ये वेगवेगळी मतमतांतरे दिसून येतात.भाषा बोली बदलांवर परिणाम  करणाऱ्या घटकांचा विचार करता येईल.

### ३.४.१ लोकसमूहाचे स्थलांतर

व्यवसाय, शिक्षण, नोकरी, सत्ताकेंद्र, धार्मिक छळ, भूकंप, दुष्काळ, रोगराई तसेच सामाजिक, सांस्कृतिक देवाणघेवाण अशा अनेकविधकारणांनी जेव्हा बोली प्रदेशातील लोकसमूहाचे महानगराकडे स्थलांतर होत असते.तेव्हा त्यांचा भिन्न शहरी जीवन, संस्कृती व प्रमाण भाषिकांशी संबंध येतो.तेव्हा त्यांना महानगरी संस्कृतीची भुरळ पडते. तेथील भौतिक सुखसोयी, रोजगाराची उपलब्धता यांमुळे बोलीभाषिक आपली वसाहत निर्माण करतात. हळुहळू बोलीसमाज नागर जीवनाशी एकरूप होवून जातात. नोकरी, व्यापार, व्यवसाय, प्रसारमाध्यमे, संगणक, इंटरनेट यांच्या प्रभावाने महानगरीय प्रमाणभाषेच्या अनुकरणाचा परिणाम स्थलांतरितांच्या बोलींवर होतो. सानिध्य परिणामामुळे प्रथम उच्चार प्रक्रिया बदलते. बोली भाषेतीलशब्द कमी होवून प्रमाणभाषिक शब्द व्यवहारात वाढत जातात. शहरीकरणामुळे आपल्या बोली भाषा संस्कृती पासून ते दूर जातात. प्रमाणाभाषेशी जवळीकता साधतात. देशांतर अथवा देशांतर्गत स्थलांतर करण्याच्या पध्दतीमुळे बोलीभाषकांच्या उच्चार, शब्द, वाक्यरचना या घटकांनी बोलीमध्ये परिवर्तन घडून येत आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसायानिमित्त शहराकडे धाव घेणारा ग्रामीण, आदिवासी समाज आपली समाज संस्कृती बाजुला ठेवून स्थलांतरीत प्रदेशाच्या आसपासच्या भाषा तो आत्मसात करीत आहे. रोजीरोटीसाठी स्थलांतरीत होणारा आदिवासी आपला परंपरागत इतिहास, भाषा, संस्कृतीचा ठेवा हारवत चालला आहे.

लोकसमूहाचे स्थलांतर हे बोलीच्या परिवर्तनाचे एक प्रमुख कारण आहे. त्याच्या स्पष्टीकरणार्थ डॉ.ना.गो.कालेलकर यांनीफेर्दिना द सोस्युर यांचा भाषांतरीतउतारा दिला आहे. ''एका भाषेचा प्रदेश संपवुन एकदम दुसऱ्या भाषेचा प्रवेश सुरू झाल्याची उदाहरणे थोडी थोडकी नाहीत. हे कसे घडते? याचे उत्तर असे की प्रतिकुल परिस्थितीमुळे मधली लक्षात न येण्यासारखी रूपे टिकू शकलेली नाहीत. लोकसमूहांचे स्थलांतर ही संक्रमणदर्शक परिस्थितीला घातक अशी सर्वात महत्वाची घटना होय. ही स्थलांतरे इतिहासमध्ये एकसारखी चालू असतात.अनेक शतकांच्या स्थलांतरामुळे या भाषाविषयक संक्रमणात ढवळाढवळ होवून पुष्कळ ठिकाणी संक्रमणाच्या खाणाखुणा अजिबात नाहीशा होवून जातात. इंडोयुरोपियन भाषावंश हे याचे सर्वात उत्त्तम उदाहरण आहे. स्लाव्ह व जर्मानिक हे भाषासंघ एकमेकांजवळ येतायेता नैसर्गिक संक्रमण होत एकमेकांत मिसळून जाण्याऐवजी एकमेकांच्या सरहद्दीवर एकदम येवून आढळतात. याचे कारण हे की या दोन भाषासंघाच्या मधली संक्रमक रूपे अथवा पोटभाषा नाहीशा झाल्या आहेत.''

### ३.४.२ राजसत्तेचे स्वामित्व

राजसत्तेचा प्रभाव बोली भेदाची तीव्रता कमी करण्यास जसा कारणीभूत ठरतो. तसेच बोलीना प्रमाण

भाषेचे रूप देण्यात महत्वाचे योगदान देत असतो. जेव्हा एखाद्या प्रदेशावर एखादी प्रबळ राजसत्ता दीर्घकाळ वर्चस्व गाजविते. तेव्हा त्या राज्यसत्तेच्या गटाच्या बोलीचे भाषिक महत्व दिवसेंदिवस वाढू लागते. उच्च दर्जाचे शिक्षण, साहित्यिकांना प्रोत्साहन, विज्ञान तंत्रज्ञानाचा विकास, शासकीय सुविधा, प्रशासनिक कामकाज आणि प्रबळ राजकीय इच्छाशक्तीने बोलीला प्रमाणभाषेचे रूप येवू लागते. तेथील अन्य बोलींचे महत्व हळूहळू कमी होत जाते. बोलीत प्रमाण भाषिक शब्दांचा वापर सुरू होतो.नंतर शिक्षणाचे माध्यम म्हणून तिचा स्वीकार होवू लागतो. त्याने प्रदेशाची सामाजिक प्रगती होते.पण आजूबाजूच्या भागातील बोलीचे महत्व हळूहळू कमी होत जाते. पुढे बोली नावालाच अवशेष रूपाने उरतात. राजसत्तेच्या प्रभावाचा परिणाम थेट भाषिक संस्कृतीवर होत असल्याने भाषिक परिवर्तन प्रक्रिया घडून येते. राजकीय सत्ताकेंद्र, शिक्षण, संस्कृती संक्रमणांमुळे तसेच धार्मिक, सांस्कृतिक चळवळींच्या प्रभावामुळे बोलीचे अस्सल रूप कमी होत आहे. बोलीला महत्त्व प्राप्त झाले की ती नेहमी प्रमाणभाषा होते असे मात्र नाही. असे महत्त्व लाभुनही ती काहीवेळा बोलीच राहाते. हिंदीच्या ब्रज आणि अवधी या भाषांची तशीच स्थिती आहे.

### ३.४.३ प्रसारमाध्यमांचा प्रभाव

सद्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. ज्ञानाचा प्रचंड मोठा खजिना प्रसारमाध्यमांनी सर्वांसाठी खुला केल्यामुळे समाजजीवनांत क्रांती घडून आली आहे. खेडी आणि विशिष्ठ प्रदेश त्याला अपवाद राहिला नाही. आज खेडोपाडी माध्यम तंत्रज्ञानाचा शिरकाव झाला आहे. टी.व्ही, सिनेमा, रेडिओ, वर्तमानपत्रे या प्रसारमाध्यमांचा दिवसेंदिवस समाजमनांवरील प्रभाव वाढत आहे. माध्यम भाषेचा मोठा संस्कार बोलीसमाज भाषिकांवर होत आहे. त्या शब्द भाषेच्या अनुकरणाने बोलीतील शब्द लोप पावत आहेत. त्याने भाषा आणि बोलींतील अंतर धुसर होत आहे. माध्यमांच्या या प्रभावामुळे दिवसेंदिवस बोलींचे वैचिष्य कमी होत आहे. तसेच प्रमाण भाषिक शब्दांचा शिरकाव बोलीमध्ये होण्याने बोली भेदाची तीव्रता कमी होवून भाषेला समरूपता येवू लागली आहे. तथापि प्रमाणभाषेबरोबरच उपभाषा, बोली यांनाही सामावून घेण्याची माध्यमांची क्षमता आहे. विशेषत: बोलीभाषांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यात वृत्तपत्रांचे योगदान मोठे आहे. हे जरी खरे असले तरी सामूहिक विचार विनिमयासाठी प्रसारमाध्यमे अधिक प्रभावी ठरत आहेत.

### ३.४.४ शिक्षणाचा प्रसार

शिक्षण आज खेडोपाडी वाडीवस्ती पर्यंत पोहोचले आहे. अज्ञानी, अशिक्षित, दुर्गम, मागास प्रदेशातील समाजजीवनात शिक्षणाने क्रांती घडवून आणली आहे. विकासी परिवर्तन घडून येत आहे. त्याने ग्रामीण तरूण वर्ग सुशिक्षित बनत आहेत. शिक्षणाने सुसंस्कृतपणा येतो. प्रतिष्ठा लाभते. सामाजिक आर्थिक मागासलेपण दूर होते. व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास होतो. एकंदरीत आजचा ग्रामीण आदिवासी वर्ग विद्वता प्राप्त शिक्षित सार्वजनिक ठिकाणी, नोकरीमध्ये प्रमाणभाषेचाच वापर करीत असतो. पुढे त्यांच्या मुलांच्या भावी पिढीवरही तसे प्रमाणभाषिक संस्कार होतात. खाजगी जीवनात मात्र तो घर कुटुंबामध्ये जुन्याजाणत्या आई वडिलांच्यासोबत काहीसा बोली प्रमाणित संमिश्र व्यवहार करतो. आत्मप्रतिष्ठेपायी बोली व्यवहार करण्याची त्याची मानसिकता राहात नाही. बोलींबाबत मागासलेपणाचा न्यूनगंडही त्याच्या मनाला वाटत असतो. उच्चशिक्षित बुध्दिवादी भाषिक आपल्या परंपरागत बोलीला जाणीवपूर्वक टाळत असतो. शिक्षणामुळे प्रमाणभाषेचा अंगिकार करणारा सुशिक्षितांचा तरूण

भाषिकवर्ग वाढत आहे. बोली, ग्रामसंस्कृती पासून त्याचा संपर्क तुटत चालला आहे.

बोलीतुन व्यवहार करण्याऐवजी हेतूपूर्वक भाषेत बदल केला जातो. व्यक्तिमत्वाच्या शिस्तीसाठी स्वबोलीत बदल घडवून आणत असतो. त्यामुळेच सुशिक्षितांकडून बोलीचे प्रमाणभाषेत रूपांतर करण्याचे प्रमाण वाढत आहे. एखाद्या बोलीचे जेव्हा प्रमाणभाषेत रूपांतर होते. तेव्हा तिच्यामुळे जवळपासच्या बोली प्रभावित होतात. क्वचित त्या नष्टही होतात. रोमची लॅटिन भाषा जेव्हा इटलीची प्रमाणभाषा ठरली तेव्हा लवकरच तेथील आसपासच्या बोली नष्ट झाल्या. शिक्षणप्रसाराने बोली आणि भाषा यांच्यातील परिवर्तनाचा वेग वाढत आहे. बोली भेदाची तीव्रता कमी होवून भाषेला समरूपता येत आहे. प्राचीन बोलीतील शब्द अडगळीला जात आहेत. त्याने बोलीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### ३.४.५ गतिमान दळणवळणाचा परिणाम

मानवी जीवनात विज्ञान तंत्रज्ञान, दळणवळणाने क्रांती घडवून आणली आहे. शहराबरोबर ग्रामीण जीवनही अंर्त:बाहय बदलुन जात आहे. गतिमान दळणवळणामुळे ग्राम-नागर जीवनामधील भेदाची दरी कमी होत आहे. त्यानिमित्ताने निरनिराळया प्रदेशाचे जीवन भाषिकदृष्टया एकत्र येत आहे. आज असे मोठे भौगोलिक अडथळे राहिले नाहीत. भौतिक सुविधा खेडयापाडयापर्यंत पोहोचल्या आहेत. विमान, रेल्वे, बस, ट्रक, ट्रॅक्टर, बाईक, पोष्ट, फोन, इंटरनेट अशा साधनांनीदळणवळणाची प्रक्रिया वेगाने घडून येत आहे. ग्रामीण आदिवासी बोली भाषिकांचा शिक्षण, नोकरी,व्यवसाय, कामधंद्या निमित्ताने शहरी समाजाशी संपर्क वाढत चालला आहे.त्यामुळे ग्रामीण आदिवासी आणि शहर यांच्यातील समाज, संस्कृती भेदाचे अंतर घुसर होत चालले आहे. सामाजिक, आर्थिक विकासाने मागासलेपण जसे दूर होत आहे, तसेच बोली आणि भाषा मधील भेद कमी होत आहेत. महानगरीय सबंधांमुळे भाषा,जीवनपध्दती,समाज संस्कृती यांच्या प्रभावाने अनुकरण त्यांच्याकडून होत आहे. माणसाच्या सवयी, समाज जीवन, भाषा उच्चार यावर भौगोलिक परिस्थितीचा परिणाम होत असतो. प्रतिकुल भौगोलिक परिस्थितीमुळे काहीवेळा लोकांच्या भाषेशी संपर्क राखणे कठीण होत असते. तेव्हा त्या विशिष्ठ प्रदेशातील भाषेला काहीसे स्थिर रूप येऊ लागते. पण आधुनिक गतिमान दळणवळण आणि भौतिक सुखसुविधांमुळे बोली समाज स्वभाषा, संस्कृतीपासून दूरावत चालला आहे. बोलीचे वेगळेपण घूसर होत आहे.

भौगोलिकता आणि सामाजिक मागासलेपणातुन भाषेला बोलीरूप आले होते. ते प्रमाणभाषा आणि अन्यभाषिकांच्या संपर्कामुळे भाषाव्यवहारात समानता संमिश्रता येवून बोलीचे वेगळेपण आता हरवत चालले आहे. महाराष्ट्रात आदिवासींच्या प्रमुख ४७ जाती आहेत.त्यामध्ये उपजाती वेगळयाच आहेत. सर्व आदिवासींच्या एकुण ८० बोलीभाषा आहेत. सर्वेक्षणांअती असे डॉ. पुष्पा गावित यांनी सांगितले आहे.

### ३.४.६ भिन्न भाषिकांचा संपर्क अथवा परभाषा प्रभाव

भाषा हे परस्पर विनिमय साधण्याचे आणि सौहार्द निर्माण करणारे साधन आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या गतिमान दळणवळणामुळे जग जवळ आले आहे. अनेक जाती, धर्माच्या देश विदेशातील भाषिकांचा सबंधं येणे आता स्वाभाविक झाले आहे. भिन्न भाषिकांच्या संपर्कामुळे परभाषा प्रभाव भाषेच्या अंत:बाहयांगी परिवर्तनशीलतेला कारणभूत होतो. सामाजिक सांस्कृतिक व्यवहार, व्यापार, नोकरी किंवा स्थलांतरीत कारणांनी भिन्न भाषा

बोलणारे लोक एकमेकांच्या सानिध्यात येतात. तेव्हा कळत नकळतरित्या उच्चार, शब्द, वाक्यप्रचारांची परस्परांकडून देवाणघेवाण होते. त्यामध्ये उच्चारपध्दतीवर अधिक परिणाम होतात. ज्यावेळी भिन्न भाषिकांशी संपर्क होतो. त्यामुळे स्वभाषा व स्वसंस्कृती यांच्या परिघातून भिन्न वातावरणामध्ये प्रवेश केल्यानंतर शब्दाचे बाहयरूप बदलते. तसेच त्याचे अंतरंगही बदलत असते. स्वभाषेतून परभाषेचा स्वीकार केल्यामुळे हे भाषिक परिवर्तन घडते.

स्वत:ची परंपरागत ऐतिहासिक प्राचीन भाषा सोडून परभाषेचा स्वीकार करणारा लोकसमाज भाषा इतिहासात अनेक वेळा आढळतो. फार्सी, कानडी, इंग्रजी या भिन्न भाषांचा प्रभाव मराठी आणि तिच्या बोलींवर झालेला आहे. भिन्नभाषिक प्रदेशाच्या सीमा जेथे एकत्र येतात तेथील भाषांवर अशा संपर्क प्रभावित खुणा ठळकपणे दिसतात. खानदेश-डांगच्या परिसरामध्ये गुजराथी तसेच नागपूरवर हिंदीचा आणि कोल्हापूर-सोलापूरवर कानडीचा प्रभाव जाणवण्याइतका स्पष्ट आहे. प्रभावित मिश्र भाषा व्यवहाराचे साधन होतात. मात्र त्याना ग्रांथीक रूप येत नाही. द्रविडी-आर्य, हिंदू- मुसलमान, भारतीय-पाश्चात्य यांच्या संस्कृती संकरामुळे बोली भाषेवर आपला खोलवर ठसा उमठविला आहे. इंग्रजी संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा प्रभावामुळे स्वभाषेचा त्याग करून इंग्रजी परभाषा स्वीकारीत असतो.

### ३.४.७ आधुनिक जीवनशैली प्रभाव

समाजाच्या प्रगतीबरोबर मानवी जीवनांत अनेक नवनवीन गोष्टींची भर पडत असते. काळानुसार आवश्यक अशी विज्ञानिष्ठ संशोधनात्मक भौतिक साधने निर्माण होतात. त्यावेळी जुन्या गोष्टी कित्येकदा नष्ट होतात.आणि नव्या वस्तू, नवे शब्द, नवे संकेत निर्माण होत असतात. माणसाला नाविण्याची आस असते. बदल हा माणसाला स्वभावत:च प्रिय असणारी गोष्ट आहे. माणूस हा अनुकरणप्रिय प्राणी आहे. टी.व्ही., सिनेमा या माध्यमांच्या प्रभावातुन नवी भाषा, संस्कृती, आचारविचार जीवनपध्दतीचा स्वीकार करण्याकडे त्याचा कल अधिक असतो. प्रचलित जीवनपध्दतीत आवश्यक ते बदल करून आधुनिकता अंगीकारली जाते. तेव्हा उच्चारी सवयीत बदल होतो. बोलीतील जुन्या शब्दांच्या जागी नवे शब्द संकेत स्वीकारले जातात. भाषेच्या प्रवाही आणि जिवंतपणासाठी तसेच समाज व्यवहारासाठी सामाजिकदृष्टया ते आवश्यक व बरोबर आहे.आधुनिक जीवनशैली अंगीकारण्याने आपली पिढीजात प्राचीन बोली, समाज संस्कृती, जीवन पध्दतीचा त्याग करतो. जूने उच्चार टाकून नवे उच्चार स्वीकारणे हा माणसाचा नैसर्गिक मनोधर्म असून तेही ध्वनीपरिवर्तनाचे कारण म्हणावे लागेल. पर्यायाने समाजाची जीवनमूल्ये, श्रध्दा, संकेत बदलली की त्या व्यक्त करणाऱ्या शब्दांचा अर्थ बदलतो.

आज शिक्षणाचा प्रसार वाढत आहे. अनेक नव नवे विषय मातृभाषेतून प्रथमच शिकविले जात आहेत. शास्त्रीय लिखाण व संशोधन याकडेही अधिक लक्ष पुरविले जात आहे. अशा परिस्थितीत नवे संकेत निर्माण करणे निरनिराळ्या शास्त्रांची परिभाषा निश्चित करणे आवश्यक ठरत आहे. जुन्या शब्दांना नवा संकेत देणे आणि नवे शब्द निर्माण करणे असे विविधांगी प्रयत्न मराठीत होत आहेत. पण जुन्या संस्काराच्या थरावर नव्या सवयींचा थर चढू लागतो आणि भाषेला नवे रूप येवू लागते.

**समारोप :**

भाषिक परिवर्तन निश्चितपणे घडून येणारी एक प्रक्रिया आहे. वर्तमान स्थितीत बोलीभाषांवर आधुनिक भाषांचा मोठा परिणाम होत आहे. समाजव्यवहाराचे स्वरूप बदलत असते. समाजाच्या गरजेप्रमाणे भाषा जशी बदलत असते.तशीच व्यक्ती वैशिष्टयानुसार वेगळी रूपे धारण करत असते. मुलत: भाषा व्यवहार हा स्वायत्त्व असतो. पण त्याला स्वभावशिलता आणि परिस्थितीजन्यता प्राप्त होत असते. भाषेमध्ये बदल किंवा भेद या प्रक्रिया अंतर्गत घडामोडी आणि सभोवतीच्या परिस्थितीमुळे सहज घडून येत असतात. प्रमाण भाषेशी संबंध आला की बोलीचे वेगळेपण स्पष्ट होते आणि तिच्या सहवास सानिध्याने नंतर बोलीचे वेगळेपण घुसर होत जाते. उदय, विस्तार आणि अस्त परिवर्तनाची तीन अवस्थांतरे मानली जातात. ना. गो. कालेलकर यांनी भाषिक परिवर्तनाबाबत महत्वाचे भाष्य केले आहे. ''ध्वनीरूप चिन्हांच्या स्वरूपात होणारा बदल हा बऱ्याच अंशी स्वाभाविक आणि नकळत घडणारा असतो. तर अर्थात घडून येणारा बदल हा बाहय परिस्थितीशी निगडीत असतो.'' सामाजिक संस्थात अंतर्गत किंवा बाहय कारणांनी परिवर्तन होत असते तसेच भाषेतही परिवर्तन घडून येत असते. भाषा ज्या उच्चार, वर्ण, रूप, शब्द, वाक्य या घटकांनी बनलेली असते. त्यांच्या रचनेमध्ये वा रूप वैशिष्टयात भाषा परिवर्तनाची अंतर्गत कारणे सापडतात. भाषा ज्या परिस्थितीशी बांधलेली असते तिच्या स्वरूपात भाषा परिवर्तनाची बाहय कारणे सापडतात. एकभाषिक समाज व्यवहारामध्ये दीर्घकाळ एकजिनसीपणा राहत नाही. महाराष्ट्र शब्दकोशकार य. रा. दाते यांनी भाषेच्या परिवर्तनाचे भिन्नप्रकृतीमुलक, अंत:प्रवृत्तीमुलक आणि जातीसंकरक असे तीन वर्ग केले आहेत.

प्रामुख्याने भौगोलिक, राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक स्थित्यंतरे घडून येतात. त्यामुळे स्थलांतर, शिक्षणाचा प्रसार, माध्यमांचा प्रभाव, गतीमान दळणवळण, व्यवसायीक विशिष्टता, भिन्न भाषिक प्रभाव, आधुनिकता, अनुकरणप्रियता, भिन्न भाषिकांचा संन्निकर्ष, सादृश्य, वर्णविपर्यय, हेतुपूर्वकता, आघात, भौगोलिक परिस्थिती, संस्कृती संकर अशा अनेकविध कारणानी भाषा आणि बोलीमध्ये परिवर्तन घडून येत असते. भाषिक परिवर्तनाची कारणे इतकी एकत्रितपणे व परस्परनिकटत्वाने काम करतात की त्याची गुंतागुंत उलगडणे कठीण आहे. त्यामध्ये नेमकेपणा ठामपणा असत नाही. त्यामुळे भाषा परिवर्तनाची मूलभूत कारणे निश्चितपणे सांगणे अजून शक्य झालेले नाही.

**३.५ सीमा : भाषा बोली आणि बोली भूगोल**

१९ व्या शतकाच्या मध्यास युरोपमध्ये ऐतिहासिक-तुलनात्मक अशी भाषेची शास्त्रशुध्द अभ्यासपध्दती उदयास आली आणि आधुनिक भाषाविज्ञानाची पायाभरणी करणेत आली. भाषाभ्यासाला निश्चित अशी दिशा मिळाली. या अभ्यासपध्दतीची गौरवशाली परंपरा निर्माण झाली. त्याचा परिणाम या शतकाच्या उत्तरार्धात 'बोलीशास्त्र' Dialectology किंवा 'बोली भूगोल' Dialect Geography या नव्या भाषाशास्त्र शाखेचा उदय झाला.भाषाशास्त्रात प्रथमच भौगोलिक सीमारेषांच्या निश्चितीने भाषाबोली भेदांचा चिकित्सक,तुलनात्मक,संशोधनात्मक अभ्यासाला आरंभ झाला. त्यामधुन पुढे समाज भाषाविज्ञान ही भाषाभ्यासाची क्रांतीकारी अभ्यासपध्दती उदयास आली.परंतु भाषा बोलींचेसीमान्त भौगोलिक क्षेत्र निश्चिती करून तिच्या उच्चारी लकबी,सुरावटीच्या पध्दती,वर्ण,रूप,वाक्यरचना प्रयोगी विशेषाच्या साम्य भेदांच्यानोंदीची ठिकाणे रेषांनी

जोडून बोलीचा 'भाषिक नकाशा-संग्रह' Language Atlas जसें तयार करून बोलींच्या क्षेत्रमर्यादा निश्चित करण्याच्या वस्तुनिष्ठ अभ्यासाला प्रथम जर्मनीमध्ये प्रारंभ झाला. नंतर २०व्या शतकात जर्मनी, फ्रान्स, अमेरिका, ब्रिटन मध्ये बोलीभ्यासाचे मौलिक संशोधन कार्य सुरू झाले.

बोली भूगोल Dialect Geography या अभ्यास पध्दतीने भाषा बोलीच्या सीमा निश्चिती करण्याचा प्रयत्न भाषाशास्त्रात प्रथमच सुरू झाला. भाषा आणि प्रदेश, समाज तसेच भौगोलिकता यांच्या अनुबंधाची वीण इतकी घट्ट असते की ती कितीही ताणली तरी तुटत नसते. इतके त्यांचे बंध अनुबंध एकमेकात मिसळुन गेलेले असतात, की त्यांना परस्परांना अलगविलग करता येणे अशक्य होते. काटेकोरपणे सीमारेषांचा निश्चित अंदाज बांधता येत नाही. तसे ''प्रदेश आणि भाषा यांचे संबंध जोडण्याचा प्रकार तसा जुना व सर्वपरिचित आहे. अगदी संस्कृत काव्यशास्त्रातही हा प्रकार दिसतो. उदा. संस्कृतमध्ये काव्यनिर्मितीच्या विविध शैलींचा उल्लेख भौगोलिक नावानी होतो. गौड प्रदेशातली काव्यशैली ती 'गौडी रीती', विदर्भ देशातली ती 'वैदर्भी रीती' वगैरे.''असे डॉ. रमेश धोंगडे यांनी स्पष्ट केले आहे. भाषा बोलीची त्यांच्या स्थानिक भौगोलिक अनुबंधामुळे भाषांच्या अभ्यासाला गतीमानता, वस्तुनिष्ठता, सखोलता, वास्तवता आली आहे. परंतु तेवढयाच प्रमाणात आव्हानात्मकता आणि गुंतागुत वाढली आहे.

### ३.५.१ बोली भूगोल : अभ्यासपध्दती

बोली भूगोलाचा अभ्यास हा संशोधनात्मक तसेच ज्ञानसंवर्धक आहे. बोलीशास्त्र हे मूलत: भौगोलिक आहे. बोली कोणत्या क्षेत्रात, किती रूपांत, किती लोकांकडून बोलली जाते. भाषा बोली प्रदेशाची भौगोलिकता, लोकव्यवहार, लोकसंस्कृती, भूभागी प्रदेश रचना, सभोवतीचे पर्यावरण या प्रदेशविशेष घटकांनी प्रथम बोली प्रदेशाची स्थान निश्चिती केली जाते. भौगोलिक दृष्टया विभागलेल्या एकभाषी प्रदेशातील बोलींच्या ध्वनी-वर्ण-रूप-शब्दसंग्रह-व्याकरण-उच्चारण-रचना-प्रयोग-प्रदेश सीमा या बोली रूपात कसे वैचित्र्य आणि वैविध्य असते ते बोली भूगोलाच्या अंगाने अभ्यासाले जाते. तेथील बोली भाषकांचा उच्चारी सुर, शब्दसंग्रह तसेच तुलनात्मक, सूक्ष्म भेद या अंगाने बोलीच्या सिमा निश्चित केल्या जातात. बोलीचा सीमान्त नकाशा तयार केला जातो. एकंदरीत 'बोली भूगोल'पध्दतीमुळे भाषा बोलींची भौगोलिक सीमा निश्चित करण्याच्या सूक्ष्मतादर्शक अभ्यासाने भाषेच्या मुलभूत संशोधनाला निश्चित आधुनिक वैज्ञानिकदृष्टी मिळाली आहे.

### ३.५.२ बोली भूगोल : व्याख्या

भौगोलिक सीमारेषांच्या आधारे भाषा बोलीतील भेदांचा अभ्यास करण्याच्या पध्दतीला 'बोली भूगोल' असे म्हणतात.

''आपण आपल्या प्रातांची जी भाषा म्हणून समजतो, ती कोठवर आणि कशी पसरलेली आहे आणि तिने कोणती आणि कशी रूपे धारण केलेली आहेत. या जिज्ञासेतुन जो अभ्यास सुरू झाला त्याला 'भाषिक भूगोल' असे म्हणतात.

डॉ. सं. ग. मालशे (प्रमाण भाषा आणि बोली)

''एखाद्या विस्तीर्ण प्रदेशात पसरलेल्या एकाच भाषेची कालांतराने वेगवेगळया भागांत जी वेगवेगळी रूपे

होतात. ती एकमेकांपासून जितकी दूर अंतरावर असतील तितका त्यांच्यातला भेद अधिक तीव्र असतो. आणि जितकी ती एकमेकांपासून जवळ असतात. तितके त्यांच्यातले साम्य अधिक स्पष्ट असते. त्यामुळे एखादी भाषा स्वत:च्या क्षेत्रातल्या वेगवेगळया प्रदेशांत उत्क्रांत होत गेली तर तिची जी अनेक रूपे कालांतराने तयार होतील, त्यांतल्या कोणत्याही दोन संलग्न प्रदेशांतील रूपांची सरहद्द नक्की करणे अशक्य असते. कारण एका निश्चित मर्यादेपर्यंत अमुक एका प्रकारची बोली वापरात असून ती मर्यादा ओलांडताच दुसऱ्या एका विशिष्ट बोलीचा अंमल सुरू होतो असे दाखवता येणार नाही.''

डॉ. ना. गो. कालेलकर (भाषा आणि भूगोल )

प्रामुख्याने भाषा किंवा बोलीच्या मूळाशी भौगोलिक, सामाजिक, मानसिक प्रेरणा असते. त्यामुळे बोलीप्रदेश आणि बोलीसमाज यावरून बोलींचे दोन प्रकार केले जातात. विशिष्ट प्रदेशातील भाषिकांकडून बोलल्या जाणाऱ्या स्थानिकांच्या बोलीस स्थलबोली Regional Dialect असे म्हटले जाते.तर समाजातील विशिष्ट वर्गांच्या बोलीस वर्गबोली Class Dialect म्हणतात. त्यांच्यामध्ये काही भाषिक वैशिष्टये समान असतात. स्थलबोली मध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करणे सूचित होते. बोलीच्या परिवर्तनाची भौगोलिक ठिकाणे आणि भाषिक साम्यभेद स्थळांनी भाषा बोलीच्या सीमा नकाशाद्वारे दाखविल्या जातात. एकंदरीत विशिष्ठ बोली प्रदेशाची सीमा निश्चित करण्याचे काम 'बोली भूगोल' ही अभ्यास पध्दती करते. त्यामुळे बोली भाषांच्या सीमा अभ्यासासाठी 'बोली भूगोल' अभ्यास पध्दतीचा विचार होणे महत्वाचे.

### ३.५.३ उच्चारी ध्वनींचे संकलन व विश्लेषण

उच्चारण हे बोलीचे प्रमुख स्वभाव वैशिष्टय आहे. प्रत्येक बोलीची उच्चारी लकब आणि तिच्या सुरावटी या वैशिष्टयपूर्ण असतात. बोलीची ती एक स्वत:ची वेगळी ओळख असते. त्यांवर तेथील भौगोलिक वातावरणीय घटकांचा परिणाम झालेला असतो. त्यामुळे बोलीच्या भौगोलिक क्षेत्राची सीमानिश्चिती करणेसाठी त्या प्रदेशाच्या उच्चार पध्दतींना महत्व प्राप्त होते. भाषा उच्चारणाचा प्राधान्यक्रमाने विचार करावा लागतो. भाषाविज्ञानामध्ये ध्वनीशास्त्र दुर्लक्षित राहिलेली भाषाभ्यासाची शाखा आहे.

तथापि बोली भूगोलामध्ये मात्र बोलीच्या उच्चार प्रक्रियेचा अधिक सखोलतेने विचार केला जातो. बोली किंवा पोटभाषांच्या उच्चारामध्ये स्थानिक प्रादेशिक वैशिष्टये सामावलेली असतात.त्यामुळे येथे बोलीचे उच्चार, रूप, शब्द, रचना, वाक्य, व्याकरण हे घटक अभ्यासाचे विषय होतात.त्यामुळे बोलीच्या उच्चारी ध्वनींची सुरावली, लकबी, आघातीपणा, हेल, नासिक्यजन्यता, सीमासंधी युक्त ध्वनींचे काटेकोरपणे संकलन करून त्यांचा अन्य भाषांशी तौलनिक अभ्यास करून बोली भेदावर प्रकाश टाकला जातो. क्षेत्रीय बोलीचा वेगळा शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण विशेषांची तसेच वाक्यप्रचार, म्हणी, लोकगीते, लोककथा इत्यादी मौखिक साहित्याद्वारे बोलीच्या वेगवेगळेपणाचे नमुने गोळा करून अन्य भाषा बोलींशी त्यांचा साम्यभेदी संबंध तपासला जातो. नंतर त्यांचे विश्लेषण करून भाषा बोलींचे नकाशे, आलेख तयार करून भाषिक प्रदेशाच्या सीमारेषा निश्चिती केल्या जातात. त्यामुळे बोली प्रदेशातील स्थानिक भाषकांच्या उच्चारी ध्वनींच्या संकलनासाठी अद्यावत ध्वनीयंत्रांचा वापर आवश्यक असतो. विस्तृत प्रदेशातील कोणत्याही बोलींमध्ये समानता आढळत

नसते.परस्परांत साम्यभेद आढळुन येतात.

### ३.५.४ भौगोलिक क्षेत्र निवड

कोणत्याही भाषा बोलीचा प्रदेश हा भौगोलिकदृष्टया वैशिष्यपूर्ण असतो. प्रत्येक बोलीचे एक निश्चित भूभागी केंद्र असते. त्या बोली केंद्राचा शोध घेवून त्यांच्या रचनाविशेषांचा विचार होणे महत्वाचे असते. भौगोलिक स्थितीमुळे बोलीला विशेषत्व प्राप्त झालेले असते. भौगोलिक परिस्थिती आणि आनुवंशिक शरीरवैशिष्टये परस्परावलंबी आहेत. माणसाच्या सवयी, शरीररचना व सामाजिक जीवन भौगोलिक परिस्थतीजन्य असते. निसर्ग, पर्यावरण, हवामान, जंगल, पर्वत, समुद्र, विस्तीर्ण नदी, हवामान, राहणीमान, व्यवसाय धंदा, पारंपरिक शेती, कृषक संस्कृती इत्यादी समाज तसेच जीवन भौगोलिक घटक बोलीवर परिणाम घडवून आणत असतात. त्यांच्या सानिध्य प्रभावाने उच्चारणाला विशिष्टत्व प्राप्त होते. भाषारूपांत साधर्म्य असलेल्या बोली प्रदेशाचे भौगोलिक क्षेत्र निश्चितीने भाषा बोलींच्या वस्तुनिष्ठ अभ्यासाला दिशा मिळते. बोली अभ्यास भौगोलिक घटकांच्या अंगाने झाल्यास त्याला अधिक सखोलता आणि वास्तवदर्शीपणा प्राप्त होतो. एखाद्या प्रदेशातील बोली कुठेपर्यंत आणि कशी पसरलेली आहे, तिने कोणती आणि कशी रूपे धारण केलेली आहेत. या सर्वांवर क्षेत्रीय अभ्यासाने सूक्ष्मदर्शी संशोधनात्मक प्रकाश पडतो. प्रदेशी भौगोलिक वैशिष्टयाद्वारे भाषिक परिवर्तन आणि बोलीसमाज यांच्यातील प्रादेशिक अनुबंध स्पष्ट होतो. भौगोलिक सीमारेषांच्या आधारे बोली भेदांचा जो अभ्यास केला जातो त्या भाषाशास्त्रीय शाखेस‘बोली भूगोल’असे म्हणतात. भाषा बोलींच्या भौगोलिक प्रदेशावरून बोलींना स्थानिक भूभाग तसेच प्रदेशांची नांवे दिली जातात. भाषा बोलीच्या भौगोलिक क्षेत्र निश्चितीच्या अभ्यास पध्दतीतुनच ‘सामाजिक बोली’ ही संकल्पना उदयास आली आहे.

### ३.५.५ बोली : प्रदेशाचे नामकरण

मुख्यत: बोलीची आपणास प्रथम ओळख होते.ती तिच्या नावावरून.परंतु प्रामुख्याने बोलीचा नामोल्लेख हा विशिष्ट प्रदेश, समाज, जाती, वर्गाचा निर्देश करणारा असतो. कांही वेळेस प्रादेशिक भेद हेच बोलीच्या वेगळेपणाचे मुख्य कारण ठरते. तेव्हा त्या बोली प्रदेशावरून स्थानिक बोलींना प्रदेशनिष्ठ नावे दिली जातात. उदा. वऱ्हाडी, माणदेशी, कोकणी, मालवणी, नागपुरी इ. बोली अभ्यासामध्ये भौगोलिक सीमारेषांना महत्व आहे. त्यामुळे भौगोलिक सीमारेषांच्या आधारे बोली भेदांचा जो अभ्यास केला जातो. त्या भाषाशास्त्रीय शाखेस ‘बोली भूगोल’असे म्हणतात. बोलींचा प्रदेश निश्चित करण्याचे काम भूगोल करीत असतो. भौगोलिक क्षेत्राबरोबरच एक भाषिक बोलींच्या भाषा भेदांचाही विचार केला जातो.

बोली स्वतंत्रपणे विकसित होत असतात. प्रदेशभिन्नत्व, व्यवसायभेद, जातिभेद यामुळे बोलीत ठळकपणे भेद दर्शविता येतात. परंतु केवळ प्रदेशाचा उल्लेख केल्याने फारसे कळणार नाही. त्यामुळेच डॉ. ना. गो. कालेलकरांनी यांनी ‘‘पुण्याच्या चित्पावनांची, सातारच्या मराठयांची, सावंतवाडीच्या सारस्वतांची, महाडच्या प्रभूंची, गोव्याच्या ख्रिश्चनांची, वसईच्या दूधवाल्यांची, माहीमच्या कोळयांची अशी विशेषणे बोलीना लावली तर त्यांचे स्वरूप निश्चित आणि स्पष्ट होते.’’असे म्हटले आहे. ते ही वास्तव स्वीकारणीय आहे. परंपराधारी भारतात प्रदेशापेक्षाही जाती, व्यवसाय आणि वर्गानुसार ओळखण्याचा प्रकार अधिक आहे.

### ३.५.६ तुलनात्मक अभ्यास

बोली भूगोलामध्ये एखाद्या भाषेच्या विस्तृत प्रदेशातील वैशिष्टयपूर्ण बोलीचा शोध घेऊन त्यांचे परस्परांतील उच्चार, रूप, शब्द, वाक्यरचना, व्याकरण या भाषा घटकांचा अन्य भाषेशी तुलनात्मक अभ्यास केला जातो आणि परस्परांतील साम्यभेदांचे विशेष नोंदविले जातात. तेव्हा बोलीच्या साम्यभेदी विशेषांवर प्रकाश टाकला जातो. बोली भाषेच्या वेगळेपणास कारण ठरलेल्या भौगोलिक तसेच प्रादेशिक घटकांचे वेगळेपण अधोरेखित केले जाते. भौगोलिकता मानवी जीवन आणि बोली भाषेवर विशिष्ठतेचे परिणाम घडवून आणित असते. तेव्हा एकाच प्रदेशातील भाषेमध्ये भेद निर्माण होऊन नंतर त्यांना उपबोलीचे स्वरूप येते. तौलनिक अभ्यास पध्दतीने बोली साम्यभेदाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. भाषा आणि बोली मधील साम्यतत्व मांडली जातात. तथापि बोलीभ्यासाच्या सीमाभागात काही खेडी अल्पसंख्यांक तर काही बहुसंख्य असतात. तेथील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार तर काही वेळा पोटभाषेच्या रूपानुसार त्यांचे वर्गीकरण, विश्लेषण केले जाते. तुलनात्मक भाषाभ्यासाने भाषा आणि बोली यांच्यातील नातेसंबंधावर प्रकाश टाकला जातो. त्यामुळे 'एखादी बोली निश्चितपणे कोणत्या पोटभाषेत अंतर्भूत होते याहून अधिक किचकट प्रश्न भाषाशास्त्रात दुसरा नाही.' असे डॉ.ना.गो.कालेलकर यानी म्हटले आहे.

भाषेच्या तौलनिक अभ्यासाने एकाच प्रदेशात बोललेल्या जाणाऱ्या भाषा बोलीचे भेद स्पष्ट होतात. बोलींचे भौगोलिक क्षेत्र आणि तिच्या सीमा निश्चित करण्याकामी तुलनात्मक अभ्यास पध्दती महत्वाची ठरते. मराठीच्या चंदगडी बोलीची दोन भिन्न रूपे आढळुन येतात. या बोलीची पूर्वेला कन्नड भाषा प्रभावित चंदगडी बोली आहे.आणि पश्चिमेला सिंधुदुर्ग कोकणीचा प्रभाव असलेली चंदगडी कोकणी बोली अशी एकाच मराठीच्या प्रदेशात दोन परस्पर भिन्न बोली रूपामुळे चंदगडी बोलीचा कानडी आणि कोकणी असा तुलनात्मक अभ्यास करावा लागतो.

### ३.५.७ बोली नकाशा आणि सीमा निश्चिती

एखाद्या विशिष्ट प्रदेशातील बोलीची सीमारेषा निश्चित करून त्या बोलीतील साम्यभेदाच्या स्पष्ट नोंदीची समान ठिकाणे नकाशावर रेषांनी जोडून बोलींच्या सीमान्त क्षेत्रमर्यादानिश्चित करणारा बोली 'भाषिक नकाशा संग्रह' स्दहनंहम ।जसेंतयार केला जातो.आणि भाषा बोलीची सीमारेषा निश्चित केली जाते. 'बोलीभूगोल'अभ्यासाची ही एक प्रमुख संशोधनात्मक आधुनिक अभ्यास पध्दती आहे. भाषाविज्ञानामध्ये नकाशाद्वारे भाषा बोलीच्या सीमारेषा ठरविण्याचा पहिला प्रयत्न जर्मनीमध्ये १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झाला.नंतर फ्रान्स व अमेरिकेमध्ये भाषिक नकाशाद्वारे बोली अभ्यासावर विपुल संशोधन झाले आहे.

बोलींच्या सीमारेषा या एकमेकांत घुसर झालेल्या असतात. जेव्हा एकाच बोलीची दोन किंवा अनेक रूपे असतात.तेव्हा त्यांच्यामध्ये सूक्ष्मदर्शक साम्यभेदाच्या छटा एकमेंकात इतक्या मिसळून गेलेल्या असतात की त्या अलग विलग करून त्यांच्या सीमारेषा निश्चित करणे मोठे गुंतागुंतीचे आणि अवघड काम असते. भाषा अभ्यासकांच्या समोर ते मोठे आव्हान असते. कारण''विशिष्ट भाषा आणि विशिष्ट भाषा बोलणारा समाज यांच्या परिसीमा सांगता येत नाहीत. प्रत्येक भाषिकाचा भाषा उपयोग इतरांपेक्षा अनेक बाबतीत वेगळा असतो. कारण

व्यक्ती ही एकाच वेळी अनेक वेगवेगळया भाषिक गटांची सभासद असते.ते भाषा गट असंख्य असतात.''असे वास्तवदर्शी मार्मिक भाष्य डॉ. रमेश धोंगडे यांनी (सामाजिक भाषाविज्ञान) केले आहे. एवढे सूक्ष्म पदर बोली समाजाचे एकमेकांत सामावलेले असतात की त्यांची गुंतागुंत सोडविता येणे शक्य होत नाही. बोली भाषिक भौगोलिक क्षेत्राची स्थान निश्चिती काटेकोरपणे करणे शक्य होईल. पण बोली भाषेच्या सीमारेषा नकाशाद्वारे तंतोतंतपणे निश्चित करता येतीलच असे नाही. डॉ. गियर्सन यांनी अहिराणीला मराठीचा प्रांतिक भेद न मानता गुजराती भाषेचा प्रांतिक भेद मानला आहे. अशी भाषेतही समांतर व्यवस्था अनुभवास येते. तेव्हा बोली भाषांच्या सीमा ठरविणे अवघड होते.

**समारोप**

एकंदरीत एकाच बोलीतील दोन रूपामध्ये सीमारेषा निश्चित करणे मोठे अवघड काम आहे. बोलीच्या सीमारेषा धुसर असतात. मराठी, हिंदी, गुजराती या भाषांमध्ये सारखेपणा आहे. कुलसाम्य असलेल्या भाषा किंवा एखाद्या भाषेच्या बोली यांचा भूभाग सांगताना फक्त त्यांचा केंद्रबिंदू दाखवता येतो. बोलींचा नकाशा भूभागानुसार काढण्याचा प्रयत्न भाषाविज्ञानामध्ये केला जातो. परंतु अमुक एवढ्याशा भूभागातच एखादी बोली असते. आणि त्या भूभागाच्या सीमेपलीकडे लगेच ती बदलते असे म्हणणे वास्तवाला धरून नाही. भाषा किंवा बोली यांचा क्षेत्रीय भूभाग सांगताना एक प्रकारे फक्त त्यांचा केंद्रबिंदू दाखवता येतो. नेमक्या भौगोलिक सीमारेषा दाखवता येत नाहीत. कारण वाणीला भूभागाच्या सीमा नसतात.

बोलीशास्त्र हे मूलत: भौगोलिक आहे. येथे बोलीतील भाषाभेद प्रामुख्याने भौगोलिक सीमारेषांनी शोधले जातात. अनेक प्रकारचे पुरावे गोळा करून त्यांचे तुलनात्मक वर्गीकरण करण्याचे काम ते करीत असतात. दोन बोली व्याकरणदृष्टया एकमेकींपासून किती भिन्न असाव्यात याचे नेमके वैज्ञानिक निकष भाषावैज्ञानिक देवू शकत नाहीत. ते निकष ज्या त्या स्थानिक प्रदेशिय भौगोलिक स्थितीवरून ठरविण्याचा प्रयत्न बोली अभ्यासात केला जातो.पण त्यामध्ये नेमकेपणा असेलच असे नाही. त्यामुळे समाजभाषा विज्ञानामध्ये समाज, संस्कृती, वर्ग, वर्ण, लिंग, व्यवसाय, इतिहास, भूगोल इत्यादी भौगोलिक व समाज घटकांच्या सहाय्याने भाषाभेदांच्या अंगाने बोलींचा अभ्यास करणे अधिक हितावह समजले जाते. बोलीचे वैशिष्टय असलेले ध्वनिशास्त्र आजही अभ्यासापासून दुर्लक्षित आहे. त्यावर मौलिक संशोधन होणे काळाची गरज आहे.

**३.६ इतर भाषा बोलींचा परिणाम :**

व्यापार, उद्योग, प्रवास, पर्यटन, शिक्षण तसेच सामाजिक, सांस्कृतिक संबंधाबरोबरच युध्द, आक्रमण, दुष्काळ, रोगराई, महापूर अशा अनेक कारणांनी एका भाषिक समाजाचा दुसऱ्या भिन्न भाषिक समाजाशी संबंध येतो. तेव्हा निश्चितपणे त्यांच्यामध्ये परस्परांत भाषिक व्यवहार घडून येतो. कळत नकळत रित्या एकमेकांच्या भाषांची देवाण घेवाण होत असते. त्यावेळी त्या परस्परांत भाषांचा संस्कार व परिणाम होत असतो. त्याला अधिस्तर प्रभाव किंवा अधिस्तर सिध्दांत म्हणून ओळखले जाते. तथापि राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिकदृष्टया भिन्न असलेले आणि भिन्न भाषा बोलणारे लोक एकत्र आले की व्यवहार विचार विनिमयाच्या आवश्यकतेमुळे परस्परांच्या भाषेतील उच्चारी विशिष्ट लकबी, शब्द, वाक्यप्रचार, म्हणी यांची कळत नकळतपणे देवाण घेवाण होत असते. समाजप्रिय प्राणी असलेल्या माणसाला नेहमी परभाषा आणि

संस्कृतीचे आकर्षण असतेच. त्या ओढीतुन परभाषिकांच्या समाजजीवन व्यवहारात भाषा संकराबरोबर संस्कृती संकराची प्रक्रिया घडून येते. खरे तर हा वरवरचा शब्द परिणाम असतो. बोलींच्या जिवंत रसरशित पणामुळे बोली कार्यक्षेत्रात नव्या शब्दांचा समावेश होत असतो. त्यामुळे बोलीभाषांत अधिक गतीने परिवर्तन होत असते. मात्र वर्णप्रक्रिया व प्रत्ययप्रक्रिया यामध्ये होणारे परिर्वतन हे अधिक गंभीर स्वरूपाचे असते. त्याचा मूळ भाषेवर परिणाम होत असतो. तिच्या विशिष्ट रूपाला बाधा पोहोचते.

परंतु प्रत्येकवेळी परभाषेचा परिणाम स्वभाषेला मारक ठरतो असेही नाही. विपुल, वैविध्यपूर्ण शब्द, वैशिष्टयपूर्ण वाक्यप्रचार, भाषेच्या प्रगत अवस्थेकडे नेणारे व्याकरण विशेष या सर्वांच्या देवघेवीमुळे भाषा अधिक संपन्न होते. अभिव्यक्तीची नवनवी क्षितीजे दृष्टीपथात येतात.या परस्पर देवघेवीतून भाषांची वाढ आणि विकास होत असतो. पण ते परके ऋण पचवून त्यावर आपले संस्कार करण्याची भाषेत ताकद हवी. मराठीमध्ये तसे सामर्थ्य होते. म्हणूनच देशी आणि विदेशी भाषेची आक्रमणे तिने परतविली. प्राचीन परंपरा लाभलेल्या मराठी भाषा आणि तिच्या बोलींवर संस्कृत, कानडी, तेलगू, गुजराथी, हिंदी या महाराष्ट्रा शेजारील प्रादेशिक भाषांचा मराठीवर प्रभाव आहे. तसेच फार्सी, इंग्रजी, पोर्तुगिज या परकीय भाषांचे मराठीवर दीर्घकाळ आक्रमण झालेले आहे. साहजिकच स्वकीयांपेक्षाच परकीयांच्या भाषांचा प्रभाव मराठी भाषेवरील स्पष्टपणे जाणवण्या इतका आहे. मराठी ही एक स्वतंत्र भाषा अस्तित्वात आल्यावर ती कोणकोणत्या भाषांच्या संपर्कात आली आणि त्या संपर्कांचा तिच्यावर कोणता परिणाम झाला. याचा विचार येथे करावयाचा आहे.

### ३.६.१ कन्नड भाषेचा प्रभाव :

यादवकाळात मराठी भाषेचा कानडीशी निकटचा संबंध आला होता. प्राचीन काळात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र येथील चालुक्य, राष्ट्रकुट व वासाटक यांच्या राजवटी सारख्याच असल्याने कन्नड, तेलगू, तामिळ आणि मराठी भाषांत भाषिक आदान प्रदान झालेली दिसते. यादवकाळात मराठी भोवती असे द्राविडी भाषांचे वातावरण होते. कानडी भाषा मराठी पेक्षा अतिप्राचीन आहे. तिचा उगमकाळ दुसऱ्या शतकात मानला जातो. म्हैसुरचे गांग राजे, हळेबीडचे होयसळ यादव, देवगिरीचे कृष्णदेव व महादेवराय हे राजे कन्नड भाषा प्रेमी होते. तसेच यादवकालीन पंडित कानडीचे अभ्यासक होते.‘‘ कावेरी पासून गोदावरी पर्यतच्या प्रदेशात कानडी भाषा बोलली जात होती.’’ असे अमोघ वर्ष या कवीने म्हटले आहे.त्यावरून यादवकालीन महाराष्ट्राच्या सीमा आजच्याहून भिन्न होत्या.

बदामीच्या चालूक्यापासून कल्याणीच्या कालचुरी घराण्यापर्यंत महाराष्ट्रावर कन्नड राजांचा अंमल होता. या काळात कन्नड ही राजभाषा होती.त्यामुळे कानडीचा मराठीवर प्रभाव पडला असावा. कानडीचा संपर्क टाळणे त्या काळी मराठीला शक्य नव्हते. महाराष्ट्रीय भागवत संप्रदाय, आराध्य दैवत विठ्ठल मूर्ती आणि क्षेत्र ही सारी मुळात कानडी असल्याची साक्ष महाराष्ट्र कवीनीही दिली आहे.

कानडा हा विठ्ठलु कर्नाटकु ! - ज्ञानेश्वर

तीर्थ कानडे देव कानडे ! क्षेत्र कानडे पंढरीये !!

विठ्ठल कानडे भक्त हे कानडे  पुंडलिक उघडे उभे केले !! - एकनाथ

यादव काळाच्याही पूर्वी कानडीचा विस्तार, ताम्रपटांची स्थळे आणि विठ्ठल संप्रदायाचे मूळ या तीन प्रमाणांवरून मराठी कानडीचा संबंध स्पष्ट होतो. भाषिक देवघेव होणे साहजच होते.शब्द,उच्चार प्रक्रिया, वाक्यरचना बाबतीत मराठीमध्ये हा बदल घडून झाला.

**कानडी शब्द**

मराठीने कानडीपासून अनेक शब्द संस्कृत प्राकृतद्वारा उचलले आहेत. मराठीत आलेले कानडी शब्द विपुल प्रमाणात आहेत.जसे सुत्ताले, सूंक, अडकित्ता, सूड, केळवणे, गुढी,बोडी,लवलव,चीरकुट, अडदर, गुंडी, पोकळ, बिढार, काडी, तूक, पहुडणे, कोंदण, मुद्दल, बाप, तूप, दाटी, कैवार, कडबू असे शब्द कन्नडमधून मराठीत आले आहेत. तसेच तुम, गल्ला, ओटा, बाबू, परडी, मुकटा असे कन्नड शब्द सीमा प्रदेशात आजही वापरात आहेत.

नातेवाईक -अव्वा, अप्पा, अक्का, अण्णा, ताई, आत्ते, काका, मामा, आजा इ.शब्द कन्नड आहेत.

अवयव दर्शक - बोट, पोट, गाल, टाळू, बगल इत्यादी शब्द कन्नड पासून निर्माण झाले आहेत.

वस्त्र- बंडी, टोपी, लंगोटी, चोळणा, कांबळे, रजई, चिंधी, सोगा, पागोटे, गादी

फळे व धान्य - उडीद, मूग, मटकी, अननस, कलिंगड, कोहळा, पडवळ, गाजर, चिंच, कोथिंबिर, खोबरे

भांडी - ओगराळे, झारा, गाडगे, तांब्या, ताम्हण, पेला, हंडा इत्यादी.

पदार्थ - कडबू, कणीक, भाकरी, शेवया, उप्पीट असे पदार्थजन्य शब्द

वस्तू - चिमटा, तागडी, विळी, दाभण, पेटी, नथ, बांगडी, वाळी, खिडकी, गच्ची इत्यादी.

एकंदरीत द्रविडीचा मराठीवर शब्दकोश व वर्णप्रक्रियेवर याबाबत अधिक परिणाम आढळतो. प्रत्यय प्रक्रियेवर त्या मानाने तो फारच अल्प आहे.

**३.६.२ द्राविडी भाषांचा मराठीवरील प्रभाव :**

द्राविडी भाषाकुलात कानडी, तेलगू, तामीळ या भाषांचा समावेश होतो. तसेच मल्याळम् ही द्राविडी भाषागटातील भाषा मानली जाते. सीमावर्ती प्रदेशामुळे महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश यांच्यामध्ये सांस्कृतिक व भाषिक देवाणघेवाण प्राचीन काळापासून होत आहे. दक्षिणेकडील पांडय व आर्य यांचा संबंध तिसऱ्या शतकाच आला होता. त्यामुळे मराठी आणि द्राविडी यांचा संबंध आठशेहे वर्षाहून अधिक जुना आहे. श्री.विश्वनाथ खैरे यांनी तामीळ भाषेचा विशेष अभ्यास केला आहे.

तिरूपती, विठोबा, खंडोबा, तुळजापूरची तुळजा भवानी ही दैवते आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र या तिन्ही प्रदेशात पुज्यनिय आहेत.

**३.६.३ तेलगू भाषा प्रभाव**

तेलगू ही नवव्या शतकात उदयास आलेली भारतीय भाषा आहे. शेजारचा प्रांत म्हणून आणि कानडीशी असलेल्या मराठीच्या निकट संबंधामुळे यादव मराठीचा तेलगू भाषेशी संबंध आला. इस.१३००मध्ये तेलगू

भाषेतील पंडिताराध्य चरित्र या ग्रंथात काही मराठी गाणी आहेत. तसेच नाल, टाळे, तूप, गदारोळ, जाडी, शिकेकाई, मुंड, येकवंकी, बुरी, अनारसा, गजगा, ताळा असे तेलगू शब्द मराठीत आले आहेत. शब्द आदाना व्यतरिक्त तेलगू भाषेचा मराठीशी फारसा संबंध नाही.

### ३.६.४ तामीळ भाषा प्रभाव

मराठी भाषिकांचा संबंध तंजावरमुळे इ.स.१६३४ पासून अधिक्याने येवू लागला. शहाजीराजे, व्यंकोजी, राजाराम यांनी तंजावर, जिंजी, म्हैसूर येथे जहांगिरी केल्या आहेत. त्या भिन्न तामीळ भाषिक प्रदेश वास्तव्यातुन मराठीने काही शब्द तामीळी भाषेपासून स्वीकारले असावेत महाराष्ट्र शब्दकोशा आधारे पंचवीस शब्द तामिळीतून मराठीत आले आहेत. जसे मलय, टेंगूळ, मांजरपाठ, सार, चाटी, अलिकडे ऐल, हळहळ, इश्श, अय्या, वानर असे शब्द तामीळ भाषेतुन मराठीत आले आहेत.

### ३.६.५ फार्सी भाषेचा प्रभाव

महाराष्ट्रामध्ये इस. १३१८ मध्ये देवगिरीच्या रामदेवराव यादवांच्या सत्तेचा पाडाव झाला. आणि भिन्न भाषा, संस्कृती, धर्मिय मुस्लिम राज्यसत्तेचा अखंड महाराष्ट्रात शिरकाव झाला. बहामनी व नंतरच्या बरीदशाही, इमादशाही, निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही या पाच शाहयांच्या काळात मराठीवर फार्सी-अरबी भाषांचा प्रभाव वाढला. तो शिवकाळात काही क्षिण झाला परंतु नंतर पेशवे काळात वाढला.मराठी व फार्सी भाषांचा संबंध केवळ मुसलमानी राजवटीतच आला असे नाही. यादवांच्यापूर्वी इ.स.५व्या शतकापासून भारतीयांचा इराणी लोकांशी व्यापाराच्या निमित्ताने सबंधं येत होता. पुढे हे संबंध दृढ होत गेले हे नागावचा शिलालेखातून स्पष्ट होते. शिवाय मराठीचे संस्कार झालेले फार्सी शब्द ज्ञानेश्वरीत सापडतात.

मराठी भाषेत यादवकाळापासून फार्सी शब्दांचा शिरकाव होत राहीला. मुसलमानी राजवटीत फार्सी भाषेचा मराठी भाषिकांशी जवळचा संबंध आला. फार्सी भाषेचा जोमाने प्रभाव वाढू लागला. १४ व्या शतकातील फार्सीच्या प्रभावाचे वर्णन महाराष्ट्र सारस्वतकार वि.ल.भावे यांनी 'अर्जदाराच्या फिर्यादी काजीपुढे जाऊन त्याचा फैसला किंवा इन्साफ होऊ लागला.' या वर्णनामध्ये मराठी पेक्षा फार्सी शब्द अधिक आहेत. राज्यकारभार व दरबारी लिखाणात शिवकाळात फार्सी शब्दांचे मराठीत प्राबल्य वाढल्यामुळे शिवाजी महाराजांनी यावनी शब्दांचा प्रभाव रोखण्यासाठी अमात्य रघुनाथ हणमंते कडून मराठी 'राज्यव्यवहारकोश' करवून घेतला. त्यामध्ये १६०० फार्सी शब्दांना संस्कृत व मराठी शब्द पर्यायी दिले आहेत.

उच्चार-रूपप्रक्रिया-शब्दसिध्दी-वाक्यप्रचार, शब्दसंग्रह अशा सर्वबाबतीत फार्सीचा मराठीवर परिणाम झाला आहे. जीवनाची विभिन्न क्षेत्रे व्यापू पहाणाऱ्या फारसींचा संसर्ग मराठीला मारक ठरणे अशक्य नव्हते. परंतु मराठी त्यामधुन निभावुन गेली. स्त्रिया, संत आणि पुराणीकांनी तिचे मराठीपण अबाधित ठेवले. शिवाय राजदरबारी व्यवहारात फार्सीचा कितीही पगडा असला तरी सामान्य जनता ज्या धार्मिक जीवनाशी संबंधीत होती. गावगाड्याच्या व्यवस्थेमुळे मध्यवर्ती मुस्लिम राजसत्तेशी सामान्य जनतेचा निकटचा संबंध आला नाही. फार्सीच्या संसर्गाने तिच्यात अवस्थांतरे घडली. पण नामांतर करण्याइतके ते प्रभावी ठरले नाही. किंबहुना

फारसींची संगत मराठीला मानवली नाही. परंतु फार्सीचा परिणाम आणि प्रभाव मात्र मराठीवर कायम राहिला.

### ३.६.६ पोर्तुगिज भाषा प्रभाव :

इ.स. १५ व्या शतकाच्या प्रारंभी व्यापारानिमित्त पोर्तुगिजांचे भारतात प्रथम गोवा येथे आगमन झाले आणि नंतर राज्यकर्ते म्हणून ते स्थायिक झाले. या काळात त्यांनी व्यापार, राजसत्ता, धर्मप्रसारातुन पोर्तुगिज भाषा आणि संस्कृतीचा गोव्यासारख्या मर्यादित प्रदेशावर भाषिक परिणाम घडवून आणला. पोर्तुगिज भाषेचीही पकड दक्षिण कोकणी मराठीवर बसविली. त्यात मुख्यत: शाब्दिक ऋणाचा वाटा फार मोठा आहे. मात्र वर्णप्रक्रिया व प्रत्यय प्रक्रिया यात हे बदल होऊ शकले नाहीत.

**शाब्दिक ऋण**

पोर्तुगिज भाषेच्या साहचर्यान आरमार, हत्यारांची नावे, खलाशांची भाषा, विविध पोषाखांची नावे, सैन्यातील हुकूम, धर्मविषयक शब्द, पशुपक्षांची नावे, आणि काही युरोपीयन पदार्थांची नावे अशा पुष्कळ शब्दांचे लोण मराठीत आले आहे. उदा. चेपे, फालतु, काडतुस, गर्णाल, परात, साबण, शिरपेच, कंपु, घमेलक, पिस्तुल, बतेला, काजे, फित लवाद, पगार, पाव, पसार, पुरावा, तुरूंग, बिजागरी, स्तल, बशी, बटाटा, बिस्कुट, बुराख, चावी, कोबी, खमीस, इस्त्री, कर्नल, लिलाव, मेज, मेस्त्री, पाद्री, पोपयी, पेरू, फमी, खण, बंब, जुगार, पिंप, तंबाखू, वरांडा, भोपळा, बटवा, बूच इत्यादी. पोर्तुगिज राजसत्तेच्या प्रभावामुळे गोव्याच्या दक्षिण कोकणी बोलींवर बरीच छाप पडली आहे.ती आजही टिकुन आहे.

### ३.६.७ इंग्रजी भाषा प्रभाव

फार्सी भाषेनंतर मराठी भाषेवर अधिक प्रमाणात प्रभाव टाकणारी दुसरी भाषा म्हणजे इंग्रजी भाषा होय. इस. १८१८ मध्ये पुण्याच्या शनिवार वाडयावरून मराठयांचे भगवे निशाण खाली उतरले आणि तेथे इंग्रजांचे युनियन जॅक फडकवू लागले. तेव्हा पासून इंग्रजांचा एकछत्री अंमल महाराष्ट्रात सुरू झाला. पण त्यापूर्वीइस.१६०८मध्ये कोकणच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरलेला पहिला इंग्रजी कप्तान हॉकिन्स पासून ते १९४७ पर्यंत जवळपास तीनशेहे पन्नास वर्षे मराठी भाषेशी इंग्रजीचा संबंध आला. इंग्रज प्रथम व्यापारी,नंतर युध्द साहित्य पुरविणारे, तद्नंतर मिशनरी म्हणून आणि शेवटी राज्यकर्ते म्हणून इंग्रजीचा जवळपास ३५० वर्ष मराठीशी संबंध आला. त्यापैकी पेशवाईच्या अस्तानंतर दिडशेहे वर्ष इंग्रजीचा मराठीशी घनिष्ठ संबंधातुन इंग्रजी भाषेचे मराठीवर वर्चस्व राहिले. इस.१८१९ मध्ये मुबई प्रांताचे पहिले गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने शिक्षणाच्या सार्वत्रिक करणासाठी बॉम्बे नेटीव्ह इज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि देशी संस्कृत, मराठी, कोकणी या भाषांभ्यासांना प्रोत्साहन दिले.तर याच दरम्यान मेजर कॅंडी यांची 'मराठी इंग्रजी कोश', 'विरामचिन्हांची परिभाषा' ही त्यांची पुस्तिके प्रसिध्द झाली. त्या प्रभावातुन इंग्रजीच्या अनुकरणाने मराठीत विरामचिन्हे रूढझाली. मेजर कॅन्डी यानी संस्कृत, फार्सीमय लेखनरूपे टाळुन मराठीच्या लेखनपध्दतीत एकजिनसीपणा आणला.

**शब्द ऋण**

आज मानवीजीवनाच्या सर्वच क्षेत्रात इंग्रजी शब्द वापरले जात आहेत. अशिक्षितांपासून शिक्षितांपर्यंतच्या भाषिक व्यवहारात इंग्रजी शब्दांचा समावेश असतो. त्यामुळे नित्याच्या जीवनात इंग्रजी शब्द परवळीचे शब्द झाले

आहेत. महाराष्ट्र शब्दकोशात इंग्रजी शब्दांची संख्या १५५० आहे. त्यामध्ये भाषांतरीत तसेच मूळ इंग्रजी ५६० शब्द आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सर्वत्र पसले आहेत.

शिक्षण-स्कूल, कॉलेज, युनिर्व्हरसिटी, मास्टर, सर, प्रोफेसर, टेबल, रूम, क्लास, प्लेग्राऊंड, बेल, फी, लेक्चर, रबर, नींब, बोर्ड, चॉक, पॅड, कंपास, पेन, बुक,नोटबुक

पोशाख-शर्ट, पॅन्ट, बुशशर्ट, मॅनिला, कोट, टॉय, ब्लाऊज, निकर, कॉलर, सॉक्स, शू, पॉलिश

दवाखाना-पेशन्ट, डॉक्टर, केमिस्ट, बील, फी, व्हिजीट, कॉपाउन्ट, डोस, पावडर, नर्स, ड्रेसिंग

प्रवास - कार, बस, रेल, तिकीट, इंजिन, गार्ड, पार्सल, रिझर्वेशन, सीट, बेल्ट

पोस्ट - कार्ड, पाकीट, मनिऑर्डर, रजिस्टर, डिपॉझिट, लेटर, डिलीव्हरी, मेल, टेलिग्राम,

नातेवाईक - मदर, फादर, मम्मी, डॅडी, मिस्टर, वाईफ, सिस्टर, ब्रदर,

तथापि या शिवाय चित्र, संगितकला, चित्रपट, राजकारण, युध्द अशा क्षेत्रात शेकडो इंग्रजी शब्द आले आहेत. जितांच्या भाषेवर जेत्यांची भाषा कशी वर्चस्व गाजविते याचे हे स्पष्ट होते. इंग्रजांनी पाश्चात्य संस्कृतीचे बीज मराठमोळया महाराष्ट्र संस्कृतीमध्ये रूजविण्याचा प्रयत्न केला.

एकंदरीत प्राचीन परंपरा लाभलेल्या मराठी भाषा आणि तिच्या बोलींवर संस्कृत,कानडी,तेलगू,गुजराथी,हिंदी या प्रादेशिक भाषांपेक्षा फार्सी, इंग्रजी, पोर्तुगिज या परकीय भाषांचे मराठीवर दीर्घकाळ वर्चस्व राहिले.साहजिकच स्वकीयांपेक्षा परकीयांच्या भाषांचा प्रभाव मराठी भाषेवरील स्पष्टपणे जाणवण्या इतका आहे. इंग्रजी भाषा, संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा प्रभाव आपल्या मनावर विलक्षण आहे आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे इंग्रजी भाषेचा मराठी आणि तिच्या बोलीवर दिवसेंदिवस प्रभाव वाढतच आहे. मराठीतील इंग्रजी शब्दात मात्र अर्थपरिवर्तनाची प्रक्रिया फारशी घडलेली नाही. स्थलांतरामुळे वा अन्य कारणाने भिन्न भाषा बोलणारे लोक एकमेकांच्या सान्निध्यात आले की, दोघांच्यांही मूळ उच्चारण पध्दतीवर परिणाम होतात. प्रथम उच्चार प्रक्रियेवर शब्द व वाक्यप्रचार यांची देवाणघेवाण होते. भाषेची व्याकरण वैशिष्टय बदलतात. भिन्न-भाषिक संस्कृतीचा संबंध जित-जेते पध्दतीचा असेल तर त्याचे अधिक स्पष्ट परिणाम होतात असे दिसते.

**३.७ समारोप :**

भाषा हा समाज जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. मानवी समाजव्यवहाराचे आणि मनोव्यापार प्रकटीकरणाचे भाषा सर्वोत्तम साधन आहे. समाजातील बहुविध संस्कृतीला जोडणारी भाषा ही समाजसंस्था सामाजिक ऐक्याचे प्रतिक आणि संस्कृतीचे वाहक आहे. कारणपरत्वे समाज, मानस, संस्कृती, भूगोल, व्यवसाय, इतिहास अशा समाज विषयांचा भाषेमध्ये अंतर्भाव असतो. संस्कृतीबध्द भाषा आणि बोलीच्या या रूप आविष्काराचे निखळ प्रतिबिंब भाषेतुन आविष्कृत होत असते. प्रादेशिकतेने प्रभावित आणि समाज संस्कृतीचे संवर्धन व संक्रमण करण्याच्या प्रक्रियेमुळे भाषेचा आशय संस्कृतीने भारलेला असतो. समाज-भाषा-साहित्य-संस्कृती हे भाषाकेंद्रित आणि परस्परावलंबी घटक एकमेकांच्या साहाय्याने अस्तित्वात येणारे आविष्कारी घटक आहेत. नित्यनेमाने ते एकमेकांचे भरणपोषण करीत परस्परांना गतीमान, समृध्द करीत असतात. भाषा मानवी जीवनाचे अभिन्न अंग आहे. प्रत्येक समाजाच्या गरजा, त्यांचे भौगोलिक स्थान व परिस्थितीनुसार भाषेचे स्वरूप

ठरत असते. स्थळकाळ, सामाजिकता, व्यवसाय, राजकीय विभाजन, भौगोलिक अंतर यामुळे एकभाषिक समाज विभागला गेला की भाषेत अनेकविधता येते. त्यामुळे विविधता हाभाषेचा एक विशेष मानला जातो. भौगोलिक व सामाजिक वैशिष्टयांनी भाषा आणि बोलींची स्वाभाविक रूपविविधता स्पष्ट होत असते.

भाषा आणि बोली हे एकमेकांच्या सहाय्याने अस्तित्वात येणारे भाषिक आविष्कार आहेत. कोणतीही प्रमाणभाषा ही प्रथम बोलीच असते. बोली हे भाषेचे पूर्वरूप व प्रमाणभाषा हे उत्तररूप असते. बोलींच्या समूहाला सामावून घेणारे भाषा हे एक वर्तुळ आहे, तर बोली या त्या वर्तुळाचाएक घटक असतात. बोलीचे स्वरूप स्वाभाविक असते. विविधता आणि वैचित्र्य ही बोलींची प्रकृती असते. आणि उच्चारणी लकब ही बोलीची विशेषत: असते. उत्कटता, उत्स्फूर्तता आणि रसरशीतपणा हे बोलीचे नैसर्गिक गुणविशेष आहेत. बोली या स्थानिक प्रदेशाचे सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक असे प्राचीन वैभव आहे. त्या प्रदेशांवरून तर कधी जाती, वर्गावरून त्यांची स्वतंत्र ओळखनिर्माण होत असते. बोलींना विशिष्टता देण्यात भौगोलिक परिस्थितीचा वाटा मोठा असतो. संबंध मानवी जीवन व्यवहारावर भौगोलिकता परिणामकारी ठरत असते. एक भाषिक प्रदेशाचे भौगोलिक व सांस्कृतिक दृष्टीने अनेक स्वाभाविक भाग पडतात. घनदाट डोंगराळ प्रदेश, सपाट मैदान, जंगली मुलूख, समुद्रकिनारा, वाळवंट, उष्णतामान आणि पाऊस अशा भौगोलिक कारणाबरोरराजकीय सत्तांतर, सामाजिक असंतोष, वर्गकलह यांसारखी मानवनिर्मित परिस्थिती बोलींच्या विशिष्ठतेस सहाय्यकारी ठरत असते.आज माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार गतीने होत आहे आणि तेवढयाच गतीने या परिस्थितीमध्ये आमुलाग्र परिर्वतन बदलत आहे.

आधुनिक काळात भौगोलिक अडथळे शिल्लक राहिले नाहीत. दळणवळणाची साधणे वाढली आहेत. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर प्रमाणभाषेचा अंगिकार करणारा सुशिक्षितांचा वर्ग वाढत चालला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात चित्रपट, टीव्ही, रेडिओ, वर्तमानपत्रे, इंटरनेट, मोबाईल यासारखी माध्यमे प्रभावशाली ठरत आहेत.यामुळे अशा अवस्थेत बोली भेदाची तीव्रता कमी होवून भाषेमध्ये समरूपता येवू लागली आहे. बोली प्रदेशाचा विकास झपाटयांने निरनिराळया प्रदेशांचे जीवन आता भाषिक दृष्टया एकरूप होवू लागले आहे. अशा परिस्थितीत बोलींचे वैचित्र्य कमी होणे अपरिहार्य ठरत आहे. एखाद्या बोलीचे जेव्हा प्रमाणभाषेत रूपांतर होते,तेव्हा तिच्यामुळे जवळपासच्या बोली प्रभावित होतात. क्वचित त्या नष्टही होतात. अशा परिस्थितीत बोलीच्या संवर्धनाची निकड तर भासत आहे.

भौगोलिक परिस्थितीमुळेच बोलींना वेगळेपण प्राप्त होते. दळणवळण क्रांतीमुळे समाज व्यवहाराला गतिमान आली आहे. भिन्न भाषेंचा प्रभाव आणि संस्कृती संकराची क्रिया गतीने घडून येत आहे. संपर्काचे प्रमाण वाढले आहेत. बोलीचे सौंदर्य, रचना विशेष, उच्चारी लकब, प्रदेशाचे सामाजिक सांस्कृतिकता लुप्त होते की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. नैसर्गिक अडथळयामुळे प्राचीन काळात बोली जेवढया प्रमाणात निर्माण होतात. ते प्रमाण आज उणावलेले आहे. येथून पुढे ते आणखीही कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बोली निर्माण होण्याच्या प्रक्रियेपेक्षा बोलींचे अस्तित्व टिकविण्याचे मोठे आव्हान आज आपणांसमोर ठाकले आहे.जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये आणि नवभांडवली जगतात इंग्रजी भाषेचे प्राबल्यवाढत असताना देशी भाषा बोलींच्या सांस्कृतिक वैभवाच्या अस्तित्वाचा यक्ष प्रश्न निर्माणझालेला आहे.बोलीचे ध्वनी, उच्चार, गेयता, शब्द, वाक्य यांची विशिष्ट

फेक, मुलायमता वा कठोरता, आरोह-अवरोह आणि त्यातून साधणारा एकसंध नैसर्गिक परिणाम अभ्यासण्याची एक दुर्मिळ संधी आहे.

**३.८ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**अ. योग्य पर्याय निवडा**

१. बोलींना विशिष्टता देण्यातकोणत्या परिस्थितीजन्य घटकाचा मोठा वाटा असतो.

अ. सामाजिक ब. भौगोलिक क. सांस्कृतिक ड. ऐतिहासिक

२. डॉ. पुष्पा गावित यांना आदिवासींच्या किती बोली अस्तित्वात आहेत असे सांगितले आहे.

अ. ५० ब. ५२ क. ४७ ड.४७

३. 'द फॉर्मेशन ऑफ कोकणी' या भाषा ग्रंथामध्ये डॉ.सु. मं. कत्रे यांनी कोकणीचे बोलींचे किती प्रकार सांगितले आहेत.

अ. पाच, ब. सहा क. पंधरा ड. दहा

४. पगार, पाव, पुरावा, तुरूंग, बशी, बटाटा, बिस्कुट, बुराख, चावी हे कोणत्या भाषेतील मूळ शब्द आहेत.

अ. फार्सी ब. इंग्रजी क. पोर्तुगिज ड. कानडी

५. कानडा हा विठ्ठलु कर्नाटकु असे कोणत्या संत कवीने म्हटले आहे?

अ. ज्ञानेश्वर ब. नामदेव क. तुकाराम ड. एकनाथ

६. महाराष्ट्र शब्दकोश म्हणून ..........यांना ओळखले जाते.

अ. वि. ल. भावे, ब. वि. का. राजवाडे. क. य. रा. दाते ड. प्रा. गं. बा. सरदार

७. भाषिक नकाशा संग्रहाद्वारे बोली भाषांच्या अभ्यासाला ......या देशात प्रारंभ झाला.

अ. फ्रान्स ब. ब्रिटन, क. जर्मनी ड. अमेरिका

८. 'एखादी बोली निश्चितपणे कोणत्या पोटभाषेत अंतर्भूत होते याहून अधिक किचकट प्रश्न भाषाशास्त्रात दुसरा नाही.'असे ..........यानी म्हटले आहे.

अ. डॉ. कृ. पा. कुलकर्णी ब. डॉ.ना.गो.कालेलकर क. डॉ.कल्याण काळे ड. डॉ.अंजली सोमण

उत्तरे- १. ब २. क ३. ब ४. क ५. अ ६. क ७. क ८. ब

**ब. दीर्घोत्तरी प्रश्न :**

प्रश्न १ बोली म्हणजे काय ? ते सांगुन बोली भाषांच्या निर्मितीची सोदाहरण कारणमीमांसा करा. किंवा

प्रश्न २ बोलींचा उगम-वाढ-लोप ही बोलीअवस्थांतरे कोणत्या कारणांमुळे घडून येतात ते सकारण स्पष्ट करा.

**क. लघुत्तरी प्रश्न :**

१. बोली भूगोलाची संकल्पना स्पष्ट करा.

२. इंग्रजीचा मराठी भाषा आणि बोलीवरील परिणाम स्पष्ट करा.

३. भाषा आणि बोली यांचे परस्पर संबंध स्पष्ट करा.

**अधिक वाचन :**

१. भाषा : बोली आणि भूगोल - ना.गो.कालेलकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई. ०४.

२. भाषा आणि संस्कृती - ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई. ०४.

३. भारतीय लोकभाषांचे सर्वेक्षण - डॉ.गणेश देवी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे १४.

४. फार्सी -मराठी अनुबंध - डॉ. यु. म. पठाण, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ पुणे.

५. आदिवासी समाजसंस्कृती, साहित्य - डॉ.अनमुलवाड वैजनाथ इसाप प्रकाशन, नांदेड.

**पूरक वाचन-**

१. आधुनिक भाषाविज्ञान : सिध्दांत आणि उपयोजन - मिलिंद सं.मालशे लोकवाड्:मय गृह मुंबई.

२. आधुनिक भाषाविज्ञान : संपा. कल्याण काळे, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन औरंगाबाद

३. भाषाशास्त्र विचार : डॉ. र. बा. मंचरकर, अजब प्रकाशन, कोल्हापूर.

४. ध्वनिविचार - ना. गो. कालेलकर, डेक्कन कॉलेज, पुणे.

५. भाषा आणि भाषाशास्त्र - श्री. न. गजेंद्रगडकर, व्हीनस प्रकाशन, पुणे.

६. शिविम संशोधन पत्रिका बोली विशेषांक भाग.२ ऑक्टोबर - डिसेंबर २०१८

७. भाषा : अंतसूत्र आणि व्यवहार - संपा. मु. ग. पानसे, म.सा.प.पुणे

८. मराठी भाषा उद्गम आणि विकास- डॉ.कृ.पा.कुलकर्णी

**उपक्रम -**

१. आपल्या परिसरातील एखाद्या मागास प्रदेशातील वाडी,वस्तीला भेट देवून त्या लोकसमुहाच्या बोलीचे ध्वनी संकलन करून बोलीभाषेच्या भाषिक, भौगोलिक, सांस्कृतिक व सामाजिक विशेषांचा अभ्यास करता येईल.

२. ग्रामीण प्रादेशिक लेखकांच्या साहित्यांतून बोलींचा वाड्:मयीन, भाषिक, सांस्कृतिक व सामाजिक संदर्भात अनुभवरूप अभ्यास प्रयोगशाळेद्वारे शास्त्रीय पातळीवर अभ्यास करता येईल.

**खालील उपक्रमांचे आयोजन करून बोली आणि त्यांच्या विविध प्रदेशांची विशेषांची ओळख करून घेता येईल.**

१. बोली भाषांवर आधारीत पुस्तक प्रकाशनाची बाजारपेठ भरवावी.

२. बोली भाषांचे ग्रंथप्रदर्शन भरवावीत.

३. बोलीवर आधारीत लोककथा, स्त्रीगीतांचे संकलन व्हावे.

४. ग्रामीण बोलीभाषा संमेलने भरवावीत.

***

# घटक -४
# बोली अभ्यासाचे महत्त्व

**उद्दिष्ष्ये :**

१. भाषा बोली, आणि समाजाचा परस्पर संबंध अभ्यासणे

२. बोलीचे समाजातील बदलते स्थान समजून घेणे.

३. बोलीवरील संकटे किंवा आव्हाने ओळखणे.

४. बोलीच्या अभ्यासाची आवश्यकता निश्‍चित करणे.

५. बोलींचे सामाजिक आणि सांस्कृतिक संचित लक्षात घेणे.

## ४.१ प्रास्ताविक

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. समाज म्हणजे विशिष्ट गटामध्ये संघटित झालेल्या व्यक्तींचा एकत्रित समूह होय. व्यक्तीचे एकत्रीकरण धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय इ. अनेक कारणांनी होत असते. त्यानुसार समाजाचेही भिन्न प्रकार संभवतात. भाषिक कारणाने एकत्र बांधलेल्या लोकसमूहास भाषिक समाज असे म्हणतात. भाषिक समाज हा आकाराने कितीही लहान वा मोठा असू शकतो. कोणताही समाज सर्व दृष्टींनी एकसंध असा नसतो. त्याच्या घटकस्थानी असलेल्या व्यक्ती अनेक कारणांनी विविध गटांच्या सभासद असतात व त्यांच्या जीवनपद्धतीत संमिश्रता असते. भाषिक समाजाचेही असेच आहे. दोन व्यक्तींची भाषा पूर्णपणे एकसारखी असू शकत नाही. लिंग, वय, कुटुंब, जात, वर्ग, प्रदेश इ. कारणांनी प्रत्येक व्यक्तीचे अनुभवविश्‍व वेगळे बनलेले असते. त्यामुळे एखाद्या भाषेच्या बोलींचा अभ्यास हा अभ्यासकांसमोर आव्हान असते. कारण बोली निर्माण होण्याची कारणे अनेक असतात. मराठीच्या सत्तरहून अधिक बोली आहेत. मराठी भाषेचे स्वरूप ध्यानात घ्यायचे असेल तर, तिच्या सर्व बोलींचा अभ्यास होणे आवश्यक आहे. भाषेच्या स्वरूपात आढळणारी ही बहुविधता सामाजिक गटांच्या भिन्नतेशी समांतर असते. यामुळेच भाषा आणि समाज यांच्या परस्पर संबंधाचे व परिणामांचे अध्ययन करणे ही एक गरज झाली आहे. कोणत्याही समाजाची बोली एक सामाजिक, सांस्कृतिक संचित असते. बोलीतूनच आपल्या परंपरा, श्रद्धा, चालीरीती पुढील पिढीकडे संक्रमित होतात. जागतिकीकरणानंतर बदलणारा समाज विचारात घेतला तर अनेक बोलींचे अस्तित्व धोक्यात असल्याचे दिसते. त्यामुळे आज बोली अभ्यासाला विशेष महत्व दिले गेले पाहिजे. समाजभाषा विज्ञानाच्या अंगाने बोलींचा अभ्यास झाल्यास महाराष्ट्राची सांस्कृतिक विविधता, चालीरीती, जीवनपद्धती, भौगोलिक विविधता इत्यादींच्या अनुषंगाने नवी माहिती उपलब्ध होईल. या दृष्टीकोनातून बोली अभ्यासाची आवश्यकता आणि तिच्यावरील संकटांचा ऊहापोहही या घटकात आपणास करावयाचा आहे.

## ४.२ बोलींचे समाजातील बदलते स्थान

**विषय विवेचन :**

कोणत्याही भाषेत अनेक प्रकारचे भेद असतात. भारतात मराठी, गुजराती, तेलगू, कन्नड, पंजाबी, हिंदी, ओरिया, बंगाली अशा विविध भाषा बोलल्या जातात. पण मराठी भाषेचे एक उदाहरण घेतल्यास परिस्थिती आणखी वेगळी दिसेल. मराठी भाषा सर्वत्र एकाच प्रकाराने, एकाच स्वरूपाची बोलली जात नाही. खानदेश, वऱ्हाड, कोकण, कोल्हापूर, पुणे, ग्वाल्हेर, बडोदा, इंदूर, विजापूर, हैद्राबाद अशा ठिकठिकाणी मराठी भाषा वेगवेगळ्या स्वरूपात बोलली जाते. साहजिकच असे भाषाभेद आपणास प्रत्येक भाषेत आढळतो. एखाद्या मर्यादित प्रदेशात राहणारे लोकही एकसारखी भाषा बोलत नाहीत. वर्ण, जात, व्यवसाय, सामाजिक प्रतिष्ठा, लिंग या भेदाने युक्त गट, विशिष्ट उद्देशाने एकत्र आलेला गट या सर्वांची भाषा एकसारखी असत नाही. जगात आज सहा हजार भाषा बोलल्या जातात. त्यातील ९०% भाषा अशा आहेत की, त्या बोलणाऱ्या लोकांची संख्या एक लाखाच्या आत आहे, तर ४५ भाषा अशा आहेत की, ती भाषा फक्त एकच व्यक्ती बोलते. त्यांचीही संख्या आता कमी होऊन ती भाषा मृतभाषा झाली असावी. भारतात आजमितीला १६५० पेक्षा अधिक मातृभाषा आहेत. यातील २४ भाषा अशा आहेत की, ज्या दहा लाखांपेक्षाही अधिक लोकांकडून बोलल्या जातात. जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मेंडारिन, इंग्रजी, हिंदी, स्पॅनिश, अरबी, रशियन, पोर्तुगीज, बंगाली, मलय-इंडोनेशियन, फ्रेंच या भाषा आहेत.

भाषा सामाजिक संस्था आहे. तिच्यावर कोणा एकाची मालकी नाही. त्यामुळे व्यक्तिगणीक भाषा बदलू शकते. शब्दवापर, विशिष्ट वाक्यरचना, विशिष्ट भाषाशैली इत्यादीमुळे एका व्यक्तीची भाषा दुसऱ्यापेक्षा वेगळी असते. एका व्यक्तीच्या भाषा वापरण्याच्या या लकबीला व्यक्तिभाषा अथवा व्यक्तिबोली म्हणतात. मात्र इतक्या सूक्ष्म भाषाभेदाकडे लक्ष देण्याची गरज नाही. बोली म्हणजे परभाषकांना सारख्या वाटणाऱ्या तर तद्भाषकांना एकरूप वाटणाऱ्या व्यक्तिभाषांचा समूह असतो. काही सामान्य वैशिष्ट्ये असलेल्या बोलींचा एकंदर समूह म्हणजे बोली होय. त्यामुळे बोली म्हणजे एका निश्चित भूभागात बोलले जाणारे भाषेचे स्वरूप होय. उच्चारण, व्याकरण, म्हणी, वाक्प्रचार याबाबत प्रमाणभूत भाषा आणि बोलीत फरक असतो. त्यामुळे बोलीला स्वतंत्र अस्तित्व असते. मात्र हा फरक इतका नसतो की, ज्यामुळे एखादी बोली स्वतंत्र भाषाच मानता येईल. काही बोली एकमेकीला जवळच्या असतात. बोलणे, बोली आणि भाषा असे तीन भेद भाषेच्या अभ्यासात होऊ शकतात. महाराष्ट्राची भाषा मराठी आहे, म्हणजेच अनेक बोलींचा गट एकत्र असणारा पण व्यापकपणे अमूक एक भाषा बोलणारा समाज, अशा नावाने आपण त्यास ओळखतो. 'मराठी' या नावाखाली येणाऱ्या व त्यांच्या प्रादेशिक नावावरून ओळखल्या जाणाऱ्या वऱ्हाडी, खानदेशी, देशी, कोकणी या सर्वमान्य बोली आहेत. शिवाय कोल्हापूरी, पुणेरी, सातारी, बेळगांवी, चंदगडी यासुध्दा मराठीच्या बोलीभाषा म्हणता येतील. व्यक्तिभाषा, स्थानिक बोली, बोलीभाषा, प्रमाणभाषा अशा चार भेदांचा अभ्यास भाषाविज्ञानात होऊ शकेल.

एकाच प्रदेशातील मूळ बोली कालांतराने बदलते. वेगवेगळ्या प्रदेशात ती नवीन रूपासह बोलली जाते. त्या भिन्न बोलीत ध्वनी वाक्य, शब्द यात भेद असले, तरी भाषिकांच्या व्यवहारात अडथळा येत नाही. अशा तऱ्हेने नवीन बोली निर्माण होतात. दोन भिन्न भाषिक एकत्र आल्याने, जित-जेते यांच्यातील आक्रमण-

संक्रमणामुळे बोलीची निर्मिती होते. काही वेळा एकभाषिक प्रदेश कितीही सलग असला तरी भौगोलिक व सांस्कृतिक भेदांनी त्यात अनेक बोली निर्माण होतात. या बोलीचे काही महत्त्वाचे विशेष आपणांस पाहता येतील. बोली केवळ बोलण्यातच वापरली जाते. लेखनव्यवहारासाठी ती क्वचित वापरली जाते. दलित-ग्रामीण साहित्यात अलिकडे बोलीभाषेचा वापर वाढला आहे. सांस्कृतिक-शैक्षणिक व्यवहारात लोक प्रमाणभाषेचाच वापर करताना आढळतात. मराठीच्या विविध बोली बोलणारे लोक परस्परात व्यवहार करताना साधारणपणे पुणेरी मराठीचा आश्रय घेतात. पुणेरी ही मराठीच्या संदर्भात प्रमाणभाषा ठरते. प्रमाणभाषा आणि बोली यात वाक्य शब्द, अर्थ याबाबत साम्य-भेद असतो. साम्य नसेल तर ती स्वतंत्र भाषा होईल. प्रमाणभाषा प्रामुख्याने शासकीय, साहित्यिक, शैक्षणिक स्तरावर वापरली जाते. बोली हे दैनंदिन व्यवहाराचे उत्तम साधन आहे. मानवी संप्रेषणाची व्याप्ती वाढली की बोलीला स्वतंत्र भाषेचा दर्जा प्राप्त होतो. तिच्यामध्ये वाङ्मय, तत्त्वज्ञान, कला, विज्ञान अशा विषयांतर्गत ग्रंथनिर्मिती होऊ लागली की, तिला स्वतंत्र भाषा म्हणावे लागेल. संस्कृती, धर्म, इतिहास, शिक्षण, राजकीय सत्ता, जीवनपध्दती, व्यवसाय, ललितकला, वाङ्मय, परंपरा आणि भौगोलिक  सत्र याबाबत समानता असल्यास बोली निर्माण होणार नाहीत. अनेक बोली निर्माण झाल्या तरी त्या प्रमाणभाषेला मारक नसून पूरक असतात. शब्द, वाक्प्रयोग, म्हणी यांची नवनवीन भर प्रमाणभाषेत घालण्याचे कार्य बोली करीत असतात. त्यामुळे प्रमाणभाषा समृध्द होते, विकसित होते. प्रमाणभाषेचे क्षेत्र अथवा वर्तुळ व्यापक, विस्तारित असते. बोलींची क्षेत्रे अथवा वर्तुळे लहान, सीमित असून अशा बोली प्रमाणभाषेच्या मोठ्या वर्तुळात समाविष्ट असतात. यामुळे विभिन्न बोलीत बोध गम्यता असे. पण दोन प्रमाणभाषांत अशी बोधगम्यता नसते. मराठी व फ्रेंच या दोन मूळ अथवा प्रमाणभाषा आहेत. या दोन्ही भाषांत बोधगम्यता नाही. त्या त्या भाषिकांना परस्परांच्या या भाषा शिकाव्याच लागतील. अर्थातच एकाच प्रमाणभाषेच्या बोली शिकण्याची गरज नसते. सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक संबंधात समाजात भेद निर्माण झाले की बोलीची संख्याही वाढत जाते. अशा पध्दतीचे बोलीचे स्वरूप डॉ. अनिल गवळी यांनी विशद केले आहे. (भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, अनिल गवळी, हिरण्यकेशी काशन, कोल्हापूर २००२, पृष्ठ क्र. १२६ आणि १२७)

मानवाचा सर्व व्यवहार भाषेमुळेच शक्य होतो. म्हणून भाषा ही सर्वश्रेष्ठ सामाजिक संस्था आहे. मागच्या पिढ्यांचे अनुभव व  ज्ञान भाषेमुळेच पुढच्या पिढीपर्यंत येऊन पोचतात, आणि ते ज्ञान मिळविण्यासाठी पुन्हा प्रयत्न करण्याचे टाळता येणे शक्य झाल्यामुळे त्या ज्ञानात नव्या पिढीला भर घालता येते. म्हणजे भाषा हे मानवी प्रगतीचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. सामाजिक जीवनात व्यवसाय, अभ्यास, आवड, इत्यादी अनेक कारणांनी व्यक्ती एकत्र येतात. पत्येक व्यक्तीला आपआपल्या भाषिक वर्तुळात शिरावे लागते. त्या त्या वर्तुळात वेगवेगळ्या पातळीची भाषा वापरणे अगदी स्वाभाविक असते. डॉक्टर लोक आपसात बोलत असले तर ज्या संज्ञा आणि जी भाषा वापरतील ती त्यांना रोग्यांशी बोलताना वापरून चालणार नाही. अल्पशिक्षित वाटणारे शेतकरी, सुतार, गवंडी, कुंभार, विणकर, कोळी, चांभार इत्यादी लोक आपल्या धंद्याबद्दल बोलू लागले तर त्यांची भाषा आपल्याला कळणार नाही. पण याचे कारण ते अडाणी आहेत, त्यांचे जीवन हलके आहे किंवा शुद्ध भाषा त्यांना बोलता येत नाही. हे नसून त्यांच्या जीवनाचे स्वरूप, त्यांच्या गरजा, ते जीवन व्यक्त करण्यासाठी उपयोगात आणली जाणारी शब्द संपत्ती, त्यांची सामाजिक आणि भाषिक परंपरा ह्यांची भिन्नता हे आहे. ही भिन्नता हे

सामाजिक जीवनाचे एक अपरिहार्य आणि नैसर्गिक अंग आहे. म्हणून समाजाचा सर्वांगीण परिचय करून घ्यायचा असेल तर भिन्नतेचा परिचय, प्रत्यक्ष अथवा साहित्यांतून करून घेतला पाहिजे.

समाजाच्या वेगवेगळ्या घटकांची ओळख करून घेताना त्यांच्या भाषेचा अभ्यास मात्र कोणी करत नाही. विविध जाती, धर्म, गट, स्तर, व्यवसाय वर्ग यांचे जीवनानुभव वेगळे आणि शब्दसंपत्तीही वेगळी आहे.त्यांची वेगळ्या स्वरूपाची भाषा - ध्वनी, शब्दसंपत्ती, शब्दप्रयोग, वाक्यरचना, या दृष्टीने वैशिष्ट्य असणारी भाषा हे ही त्यांच्या संस्कृतीचे एक अंग आहे. संस्कृती ही बहुविध असते. या बहुविध संस्कृतीला एकत्र जोडणारा दुवा म्हणजे भाषा अर्थात भाषाही बहुविध असते. या ठिकाणी भाषा ही संज्ञा वापरण्याऐवजी बोली ही संज्ञा योग्य ठरेल. कारण बोलीना खरे अस्तित्व असते. स्थलभिन्नत्वामुळे ज्याप्रमाणे बोलींचे स्वरूप बदलते त्याचप्रमाणे एकच व्यक्ती निरनिराळ्या समूहात वावरतानाही तिच्या भाषेच्या वेगवेगळ्या छटा दिसून येतात. कारण जीवन लवचिक असल्याने भाषा टणक असून चालणार नाही.कारण ती तशी असेल तर गतिमान मानवी जीवनाचे यथार्थ चित्रण तिला करता येणार नाही. म्हणून नित्याचे व्यवहार हे बोलीतून व्यक्त होतात.

ना. गो. कालेलकरांच्या मते, बोलीच्या सापेक्ष स्वरूपामुळे व्यवहार सुलभतेला मदत होते, त्याचप्रमाणे काही क्षेत्रांत अडचणी निर्माण होतात. अशी महत्वाची दोन क्षेत्रे म्हणजे शिक्षण आणि साहित्य निर्मिती होय. बोली भाषा आणि लिखित भाषेतील विरोध मुलांसमोर उभा राहतो. शाळेत गेल्यावर मुलाला पहिली ठेच लागते ती शुद्धलेखनाची. बोलतो तसे लिहून चालणार नाही याची जाणीव त्याला पदोपदी होते. लेखनातील शुद्धाशुद्धतेचा दंडक मुलांच्या विवेकशक्तीचा मुडदा पाडतो. म्हणून लेखनाचा प्रश्न हा प्रारंभी सामाजिक असून नंतर तो शैक्षणिक बनतो. एकभाषिक प्रदेशातील स्थानिक बोलींचे अस्तित्व आणि अनेक पातळ्यांच्या वर्गांनी बनलेल्या समाजातील वर्गनिदर्शक बोलींचे अस्तित्व भाषिक प्रश्नांचा अभ्यास करताना लक्षात घेतले पाहिजे. या बोलींच्या अस्तित्वाची जाणीव लोकाभिमुख साहित्याकडे दृष्टी फिरवली तर अधिक होईल. साहित्यात काव्य-काय यावे यासंबंधी पूर्वसूरींनी काही दंडक घालून दिले आहेत. सुंदर लेखन कसे करावे? याबाबत काही नियम घालून दिले आहेत. यांच्या उलट या नियमांच्या चौकटीत न बसणारे पण बोली भाषेतील परिणामकारक लेखनही झाले आहे. अशा बंडखोर लेखनातूनच साहित्याची प्रगती होत आली आहे.

मराठीच्या लेखनाचे स्वरूप निश्चित होत आहे.मराठीच्या विविध बोली बोलणाऱ्या समाजाचे व्यवहारसाधन म्हणून या प्रश्नाकडे मराठी भाषिकांनी पहावे. याबाबत ना.गो कालेलकर यांनी काही सूचना केल्या आहेत,त्या पुढीलप्रमाणे -

१. मराठीच्या लेखनाचा एक कोश असावा. लेखक योग्य तेव्हा त्याचा उपयोग करतील.

२. स्थानिक बोलीतील लेखन आणि प्रसंगानुरूप करावा लागणारा बोलींचा उपयोग यांना लेखनाचे नियम लागू नसावेत.

३. पारिभाषिक संज्ञांच्या बाबतीत हळूहळू एकवाक्यता होत जावी. पुढे नवे शब्द आणि बोलभाषेतील शब्द यांचे साहित्याने अवश्य स्वागत करावे.

४. भाषेचे स्वरूप एकसारखे बदलत असल्याने आज ठरलेले नियम हे कायमस्वरूपी बंधनकारक न ठरवता दर वीस पंचवीस वर्षांनी त्यांचा पुनर्विचार करावा.

५. बोलीभाषेच्या दृष्टीने लेखन सुलभ असणे आवश्यक आहे. लेखनात व्यवहार सुलभता हे सामोपचाराचे तत्व प्रगतीच्या दृष्टीने हितकारक ठरेल.

(भाषा आणि संस्कृती, ना.गो.कालेलकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई–२०१२, पृष्ठ क्र. ७३ व ७४)

ना. गो. कालेलकरांच्या मते समाजात अनेक प्रवृत्ती असतात. पण सामाजिक दृष्टीने स्वतःच्या गरजानुसार वेगवेगळ्या विनिमय क्षेत्रात वावरणारी प्रत्येक व्यक्ती वैशिष्ट्यपूर्ण असू शकते. विशिष्ट प्रवृत्तींच्या मागे लागल्यामुळे जवळ येणाऱ्या व्यक्तिसमूहात अनेक प्रकारचे सामान्य गुण असतात. त्यातला एक विशेष महत्वाचा गुण विनिमय किंवा अभिव्यक्ती यांचे जवळजवळ एकरूप साधन अशी भाषा वापरणे हा होय. भौगोलिक जवळपणा आणि या जवळपणातही सारखी सामजिक पातळी या दोन गोष्टी व्यक्तींच्या सहजीवनाला आणि अगदी सारखेपणाचे कारण, त्याचप्रमाणे त्यांची रहाणी, भाषा, चालीरीती यांतल्या सारखेपणाचे रहस्य त्यांच्या सामाजिक आणि भौगोलिक जवळपणात सापडेल. याउलट एकभाषिक लोकांतील विनिमयाला अडथळा येण्याचे कारण किंवा दुर्बोधता प्रत्ययाला येण्याचे कारण त्यांच्या सामाजिक किंवा भौगोलिक अंतरावर अवलंबून आहे. एका भाषेचा उपयोग करणाऱ्या व्यक्तीला कोणताही पूर्वपरिचय नसलेली दुसरी भाषा पहिल्याच खेपेला ऐकून किती समजते हा आहे. यासाठी कालेलकरांनी एक कोष्टक तयार करून हा मुद्दा पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. तो पुढीलप्रमाणे–

| **मातृभाषा** | **अन्यभाषा** | **आकलन** |
|---|---|---|
| प्रमाणभूत मराठी | १) इंग्रजी, फ्रेंच, अरबी, चिनी | शून्य |
| | २) बंगाली, उडिया द. कोकणी | किंचित |
| | ३) हिंदी, गुजराती | थोडे अधिक |
| | ४) खानदेशी, डांगी, वऱ्हाडी | आणखी अधिक |
| | ५) कोल्हापूरी, सातारी, पुणेरी | जवळजवळ पूर्ण |

वरील कोष्टक काल्पनिक असले तरी वस्तुस्थितिनिदर्शक आहे आणि आकलनाचे प्रमाण शून्यापासून पूर्णापर्यंत कमी अधिक असू शकेल हे लक्षात आणून द्यायला ते पुरेसे आहे. (भाषाः इतिहास आणि भूगोल, ना. गो. कालेलकर मौज प्रकाशन गृह १९८५, पृष्ठ क्रमांक ५०) हे सर्व पाहिले म्हणजे ऐतिहासिक संबंध, परंपरागत ऐक्य भावना आणि प्रत्यक्ष आकलन यांचे कोष्टक बनवताना पूर्वग्रहापेक्षा किंवा केवळ कल्पनेपेक्षा वस्तुस्थितीचे प्रतिबिंब असा जो अनुभव तोच अधिक मार्गदर्शक आहे. एखादी पूर्वी कधीही न ऐकलेली भाषा प्रथमच ऐकली असता किती कळते ही आकलनाची कसोटी आहे.

सामाजिक स्वरूपाच्या बोलीबद्दलचा आपला अनुभव आपण या बोलींना नावे देऊन व्यक्त करतो. सामाजिक बोलींचे स्थान त्या बोलणाऱ्या वर्गाच्या किंवा जातीच्या प्रतिष्ठेनुसार असते. पूर्वी ही प्रतिष्ठा बहुतांशी जातीवर आधारित होती ब्राह्मणांची बोली हा तिचा उत्कर्षबिंदू आणि तिरस्कृत जातींची बोली हा तिचा अधोबिंदू असे. या दोन वर्गांच्या दरम्यान इतर वर्गांच्या बोली असत. ब्राम्हणांच्या बोलीपासून इतर बोली किती जवळ किंवा

दूर आहेत यावर त्यांच्या प्रतिष्ठेचे स्थान अवलंबून असे. या सर्वांची बेरीज म्हणजे मराठी असा अर्थ घेतला पाहिजे, त्याचप्रमाणे एक विशिष्ट निश्चित स्वरूप असणारी मराठी नावाची एक आदर्श बोली असून तिला मान्यता देणारे पण उच्चार, व्याकरण आणि शब्दसंग्रह या बाबतीत तिच्यापेक्षा कमी अधिक प्रमाणात भिन्न असे भाषिक भेद म्हणजे मराठीच्या बोली असे म्हणावे लागेल.

बोलींचे समाजातील स्थान बदलत आहे. पारंपरिक दृष्टिकोनातून आता बोलींचा अभ्यास करता येणार नाही, तर भाषा वैज्ञनानिक अंगाने बोलीचा अभ्यास करणे गरजेचे बनले आहे. बोलींचा वापर नित्य सुरू आहे. फक्त तिचे महत्त्व कमी-अधिक स्वरूपात दिसत असते.मराठी भाषा जागतिकीकरणाच्या रेट्यात आणि इंग्रजी भाषेच्या वर्चस्वाखाली जगेल की मरेल? असा प्रश्न एकविसाव्या शतकातील भाषाविषयक चिंतनात वारंवार व्यक्त केला जातो. याचे मुख्य कारण म्हणजे जगातील अनेक भाषा विशेषतः आदिवासींच्या भाषा आता कालबाह्य झाल्या आहेत. पूर्वी प्रमाण मराठीचा आग्रह धरणारे पुणेरी लोक बोली भाषा ह्या अशुद्ध आहेत म्हणून कंठशोष करीत होते. बोली ह्या भाषेला तारक आणि उपकारक असल्याचे भाषा मीमांसकांनी सप्रमाण सिद्ध केल्यावर ही ओरड मध्यंतरी काहीशी क्षीण झाली. साठोत्तर कालखंडात दलित, ग्रामीण आदिवासी अशा विविध प्रवाही साहित्यातून प्रादेशिक बोली भाषांना लेखकांनी प्राधान्य दिले आणि बोलीला साहित्यरूप दिल्यामुळे मराठी भाषा संपन्न आणि समृद्ध झाली. जागतिकीरणात मराठी भाषा मृत्यूपंथाला लागल्याची चाहूल भाषाभिमान्यांना लागली आणि अनेक चर्चासत्रांमध्ये मराठी भाषेच्या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित करू लागले. गेल्या दहा वर्षापासून मराठी भाषेच्या अस्तित्वाची चिंता भाषाहितचिंतक करत आहेत. ही समाधानाचीच बाब मानायला हरकत नाही. आपली भाषा हेच आपल्या समाजाच्या जगण्याचे अस्तित्व असते, ही भावना या निमित्ताने व्यक्त होत असल्याची जाणीव मराठी भाषेच्या अस्तित्वाचे प्रश्न सोडविण्यासाठी उपकारकच मानायला हवी.

ब) बोली अभ्यासात प्रथम नामकरण महत्त्वाचे ठरते. खानदेशी, वऱ्हाडी, देशी, कोकणी असे वर्गीकरण भौगोलिक ठरते. तर कधी वर्गानुसार वा जातीनुसार चित्पावनी, सारस्वती, बंजारा असेही बोलीचे नामकरण होते. लोहार, चांभार, बुरूड, सुतार न्हावी अशा व्यवसायनिष्ठ बोली आहेत. स्त्रियांची बोली वेगळी असते. वयोगटानुसारही बोली बदलत असते. शिक्षण, दूरध्वनी, विद्युत, पाटबंधारे येथील कार्यालयाची बोली अभ्यासविषय ठरावा अशी असते. वृध्द, हॉटेल कामगार, शिक्षक, विद्यार्थी, तरुण-तरुणी यांच्याही एकेक बोली निर्माण होतील. अशा बोलींच्या अभ्यासाचे स्वरूप पाहण्यापूर्वी काही संज्ञा पाहू. बोलीच्या अभ्यासाचे एक परिक्षेत्र म्हणून बोली भूगोल ही संज्ञा विकसित झाली. बोलीचे प्रदेशनिष्ठ वर्तन या भूगोलात येते. बोलीतील उच्चारण तपासण्यासाठी शब्दघटक घेतला जातो. यांना भाषांश-घटक म्हणता. यानंतर बोलींमधील साधर्म्य-वैधर्म्य निश्चित करून बोली नकाशाद्वारे त्या त्या बोलीची क्षेत्रमर्यादा आखता येते. बोलीच्या अभ्यासाच्या शास्त्रास बोलीविज्ञान म्हणतात.

बोलीचा अभ्यास करणारे स्वयंसेवक निर्माण झाले पाहिजेत. बोलीचे नमुने गोळा करणे, त्या त्या समाजात स्नेहपूर्वक मिसळणे, बोली ध्वनी, शब्दसंग्रह, वाक्यरचना, रूपरचना या स्तरावर वर्गीकगरण करणे, त्या त्या भाषिक समाजाची सांस्कृतिक, भौगोलिक माहिति गोळा करणे इत्यादी महत्त्वाची कार्ये या स्वयंसेवकांना करावी लागतात. हे कार्य सर्वेक्षणासारखे असते. सर जॉर्ज ग्रिअर्सन यांनी १८९४ मध्ये मराठींच्या बोलींचा अभ्यास सुरू केला होता. १८९४ ते १९२८ इतका दीर्घकाल काम करून त्यांनी १२ खंड प्रकाशित केले. ७व्या खंडात मराठी

व तिच्या बोली यांचे सर्वेक्षण आहे. बोलींचे व्याकरण व नमुना असणारा हा खंड १९०५ मध्ये प्रकाशित झाला. जॉर्ज ग्रिअर्सन यांनी इतरही काही भारतीय बोलींचा अभ्यास केला. डॉ. सु. बा. कुलकर्णी यांनी पोवारी बोलींचा, डॉ. विजया चिटणीस यांनी खानदेशी बोलींचा, डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी झाडी बोलीचा, वसंत वऱ्हाडपांडे यांनी नागपुरी बोलीचा अभ्यास केला आहे. अ. का. प्रियोळकर यांनी 'ग्रांथिक मराठी भाषा आणि कोकणी बोली' या ग्रंथातून कोकणी बोलीचा परिचय दिला आहे. डॉ. माधुरी भागवत यांचा वऱ्हाडी बोली हा अप्रकाशित प्रबंध आहे. चंदगडी बोलीचा अभ्यास आता यजीसीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट झाला आहे. चंदगडी बोलीवर स्वतंत्र स्वरूपाचे संशोधन डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे. तर डॉ. गुंडूक्षराव कांबळे यांनी 'चंदगडी बोलीचा वर्णनात्मक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. चंदगडी बोलीत अनेक शब्द कोकणातून तसेच सीमावर्ती बेळगावामधून आलेले दिसतात. चंदगडपासून पंचवीस किलोमिटर अंतरावर आंबोली हे पर्यटन ठिकाण असून साठ किलोमीटर अंतरावर सावंतवाडी आहे. त्यामुळे चंदगड तालुका तसा कोकणात मोडणारा कोकणी हवामानाचा तालुका आहे. तेथून गोवा सत्तर किलोमीटर अंतरावर आहे. गोव्यातील पोर्तुगीजांच्या भाषेचा प्रभावही चंदगडी बोलीवर आहे. एकेकाळी कोकणी ही मराठीची बोली व उपभाषा आहे की एक स्वतंत्र भाषा आहे, असा वाद गाजला होता. साहित्य अकादमीने कोकणी बोलीला स्वतंत्र साहित्यिक भाषेचा दर्जा दिला. आता तर कोकणी बोली गोवा राज्याची प्रमाणभाषा आणि राज्यभाषा बनली आहे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक प्रभावाने एखाद्या बोलीला स्वतंत्र भाषेचा दर्जा प्राप्त होऊ शकतो. गोव्यातील कोकणीबाबत हेच झाले. डॉ. ना. गो. कालेलकरांनी कोकणी मराठी वादाच्या संदर्भात या 'सांस्कृतिक कसोटी' चा उल्लेख केला आहे. सामाजिक भाषाविज्ञानात अशी कसोटी महत्त्वाची ठरते.

भाषा ही माणसाची अस्मिता सिद्ध करणारी बाब आहे. माणसाचे देशीपण आणि अस्सलपण सिद्ध करणारी बाब आहे. भाषा ही माणसाच्या समग्र अस्तित्वाला व्यापून जगाशी माणसाला जोडणारी मानवी घटना आहे.माणसाचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करून माणसाला एक स्वतंत्र स्थान देणारी शैली भाषा ही एक लौकिक अशी संस्था आहे. एकविसाव्या शतकात ग्लोबल व्हिलेजच्या जगात आणि जागतिकीकरणाच्या वर्चस्वाखालील माणसाला केवळ त्याची मातृभाषाच जिवंत ठेवू शकते आणि माणसाच्या मनाला तृप्ती आणि समाधानाचा अनुभव देवू शकते.

### ४.३ बोलीवरील संकटे

जगातील कित्येक बोली लोप पावत चालल्या आहेत. त्याच्या कारणांचा शोध आपणास घ्यायचा आहे. तत्पूर्वी प्रसारमाध्यमामध्ये आलेल्या काही बातम्यांवर आपण नजर टाकू.भारतीय उपखंडाच्या अंदमान-निकोबार द्वीपमंडलातील 'बो' ही बोली बोलणारी पंच्याऐंशी वर्षे वयाची बोआताई नामक शेवटची व्यक्ती ५ फेब्रुवारी २०१० या दिवशी निधन पावली. आणि मागील पासष्ट सहस्त्र वर्षापासून 'बो' बोलीशी असलेले माणसाचे नाते भंगून गेले. तिच्यासोबत 'बो' ही बोलीदेखील मृत झाली.

या दु:खद वार्तेच्या मागोमाग आणखी एक वार्ता आली ती म्हणजे, पंधराव्या-सोळाव्या शतकातील डच प्रदेशातील कोळ्यांची 'क्रॉमाती' नामक बोली बोलणारी बॉबी हॉग ही ब्याण्णव वर्षीय शेवटची व्यक्ती होती आणि ती २ ऑक्टोबर २०१२ या दिवशी मृत झाली. याचाच अर्थ असा, की तिच्यासोबत 'क्रॉमाती' ही बोलीदेखील मृत झाली.

इस्तानबूलमधील ‘उबीख’ ही कॉकेशियन बोली बोलणारी शेवटची व्यक्ती म्हणजे तेव्हफिक एसेन्स होत. १९९२ मध्ये अठ्ठ्याऐंशीव्या वर्षी वारले. तत्पूर्वी भाषा विद्वानांनी त्या बोलीतील तब्बल ८१ व्यंजने आणि केवळ तीन स्वर असल्याचे नोंदविले होते. हे त्या बोलीचे सुदैव. पण हे सुदैव कित्येक बोलींच्या वाट्याला येत नाही. कित्येक बोली व भाषा मृत होतात, किंवा हरवून तरी जातात.

वरील तीन उदाहरणे बोलींचे भाकित वर्तवण्यास पुरेसी आहेत. ज्या बोली वापरात म्हणजे संप्रेषणात येणार नाहीत, त्या बोलींचे अस्तित्व संपुष्टात येत चालले आहे. केवळ बोलीच संपुष्टात येणार नाहीत तर, त्या समाजाचे सांस्कृतिक संचितही धोक्यात येणार आहे. अशा हरवलेल्या व मृत भाषांचा शोध घेणे महत्वाचे आहे. याविषयी डॉ. सु. म. तडकोडकर ‘भाषा आणि बोली : आजची आणि उद्याची समस्या’ या लेखात म्हणतात, ‘‘कॉष्टिक, प्राचीन ग्रीक, ल्याटिन’ या काही मृत भाषा आहेत असे मानले जाते. प्राचीन इजिप्तमधील ‘हायरोग्लिफिक’ ही मृत नसून, ती एक हरवलेली भाषा आहे असे मानले जाते. ती बोलली जात होती की जपानी, चिनी भाषांप्रमाणे केवळ चित्रलिपी होती, हे अद्यापि स्पष्ट झाल्याचे दिसत नाही. अरबी : SALAM = peace; हायरोग्लिफिक : SENEB = peace; या उदाहरणांच्या आधारे ती हरवलेली भाषा म्हणजे शामितो-सेमिटिक (हिब्रु) कुळ आणि इजिप्तच्या ईशान्येला असलेल्या आफ्रिकेतील मेघराब प्रदेशातील बर्बेरिक (तामाझाइट) भाषांना निकट आणणारा एक प्रकारचा सेतू आहे, असे म्हणतात. त्यामुळे अरबी उपखंडातील भाषांचे व उत्तर आफ्रिकन भाषांचे नाते स्पष्ट होऊ शकते, असे त्यामागचे गृहितक आहे.’’ (बोलीभाषा : संशोधनाच्या नव्या दिशा, संपादक डॉ. म. सु. पगारे आणि डॉ. आशुतोष पाटील, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१२, पृष्ठ क्रमांक : २१) अशा हरवलेल्या भाषांचा आणि त्यांच्या लिप्यांचा शोध घेणे आज अपरिहार्य बनत आहे.

‘भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण-महाराष्ट्र’ या सर्वेक्षण मालिकेच्या खंडात गणेश देशी यांनी काही जागतिक भाषिक समस्यांची निरीक्षणे नोंदविली आहेत. त्यांच्या मते, भाषा अभ्यासकांना एखादी भाषा किती काळ टिकू शकेल, याचा अंदाज बांधणे शक्य झाले आहे. आपल्या भाषिक वारसाचा फार मोठा हिस्सा माणूस वेगाने गमावत चालला आहे. आज अस्तित्वात असलेल्या बऱ्याच भाषा संकटात आहेत. दुसरीकडे भाषिक जागतिकीकरणाच्या पुरस्कर्त्यांना संपूर्ण जगभरात मिळून अगदी मोजक्याच भाषा असणे सोयीचे वाटते. त्यामुळे देशादेशांमधला संवाद अगदी सोपा होईल असे त्यांना वाटते. अर्थात, भाषिक वारसा नष्ट होण्यामुळे मानवी संस्कृती, बौद्धिक संपदा यांच्या जागतिक ठेव्याचे जे नुकसान होणार आहे, त्याचा परिणाम ज्या देशांमध्ये किंवा समाजात एकच भाषा अस्तित्वात आहे, त्यांचे रोजचे जगणे त्यांच्या स्वत:च्या भाषेवर अवलंबून नाही. ज्यांची ज्ञानव्यवस्था त्यांच्या स्वत:च्याच भाषेत आहे. त्यांच्यावरही अप्रत्यक्षरीत्या होणारच आहे, पण एखादी भाषा नष्ट होण्याचा ताण काय असतो, ते त्यांना ताबडतोबीने मात्र जाणवणार नाही.

भाषेमुळेच माणूस इतर प्राण्यांपेक्षा प्रगत ठरला आहे. सांस्कृतिक भांडवलामधला भाषा हा महत्त्वाचा घटक आहे. हे भांडवल पाच लाख वर्षापूर्वीचे आहे. आता मात्र आपण हे भांडवल गमावण्याच्या टप्प्यावर येऊन पोहोचलो आहोत. भाषातज्ज्ञांच्या अंदाजानुसार अस्तित्वात असलेल्या जवळजवळ सहा हजार भाषापैकी २२ व्या शतकापर्यंत दोन हजार भाषा देखील टिकणार नाहीत. या भाषांच नीट सर्वेक्षण केल नाही तर आज खरोखरच किती भाषा अस्तित्वात आहेत हे समजणे कठीण आहे. या अस्तित्वात असलेल्या भाषांपैकी कोणत्या आणि किती भाषा

टिकतील हे सांगणे तर अधिकच कठीण आहे. अनेक भाषांच्या इतिहासात आश्चर्यकारक आणि कधीकधी अत्यंत अनपेक्षित वळणे आली आहेत.

इतिहासात असेही पाहायला मिळते की राजाश्रय असलेल्या काही भाषा नष्ट झाल्या आणि त्यांच्यामधून सत्तेच्या परिघावरच्या भाषांच्या प्रभावातून एखादी नवीन भाषा उदयाला आली. अशी काही आश्चर्यजनक उदाहरणं अस्तित्वात आहेत. नायजेरिया, मेक्सिको, पापुआ न्यू गिनी, इंडोनेशिया आणि भारतामधले लोक त्यांच्या भाषांमध्ये शब्दांचा साठा वेगाने कमी होत असल्याचे अनुभवत आहेत. स्थानिक भाषकांची गुंतागुंतीच्या संकल्पना त्यांच्याच भाषेतून व्यक्त करण्याची क्षमता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे आणि बहुतेक भाषांमध्ये शब्दांचे वेगवेगळे अर्थ व्यक्त करण्याची क्षमता वेगाने कमी होत आहे.

पूर्वापार बोलल्या जाणाऱ्या 'नैसर्गिक' भाषा संघर्षाच्या टप्प्यातून जात आहेत, असं मानायला जागा आहे. अर्थात, यावेळच्या संघर्षाला एक वेगळी झालर आहे. ती म्हणजे मानवी जीवनावर निसर्गापेक्षा तंत्रज्ञानाचा जास्त प्रभाव आहे. तंत्रज्ञान मानवी जीवनातल्या भाषाव्यवहारावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. माणसाचा मेंदू आणि त्याची मानसिकता यांची हुबेहूब नक्कल असणाऱ्या मशीनचा वापरही सुरू झाला आहे. वेगवेगळ्या मानवी समुहांना जोडणारे भाषाधारित तंत्रज्ञान आता जगामध्ये वापरलं जात आहे. त्यामुळे सध्या संपूर्ण मानवी विश्वाची पुन:र्बांधणी होत आहे. जे या विकासाच्या मार्गावर सर्वात शेवटच्या टोकाला आहेत, त्यांचा आवाजही ऐकला जाऊ शकत नाही. त्यांची स्वत:ची भाषा असते, पण त्या भाषेचे स्वत:चे व्याकरण मांडले गेले नाही. त्यामुळे असे गृहीत धरले जाते की ती विकासाच्या प्रक्रियेत अडथळा आहे आणि ती मागासलेपणाचं लक्षण समजली जाते. या भाषांमध्ये असलेले ज्ञानाचं संचित हे अज्ञान म्हणून टाकाऊ ठरवलं जात आहे.

आपल्या भारत देशात १९७१ च्या जनगणनेनंतर जनगणना अधिकाऱ्यांनी असं ठरवलं की जी भाषा दहा हजारांहून कमी लोकांपुरतीच उरली आहे. तिची नोंद करण्याची गरज नाही. इतिहास काळापासून भाषांचं प्रजासत्ताक असलेल्या भारतात त्यामुळे या भाषांचं स्थानच नाकारण्यात आलं. १९७१ च्या जनगणनेमधला हा निर्णय अचानक घेतला गेलेला नव्हता. वसाहतीच्या काळात जेव्हा भारतातल्या एकूण भाषांपैकी जेमतेम दोन टक्के भाषांमधून छपाई होत असे, तेव्हापासून ही प्रक्रिया सुरू झाली होती. वास्तविक केवळ मुद्रित भाषा म्हणजेच भाषा हे गृहीतकृत्य जवळजवळ दोन शतक रूजलेलं आहे आणि त्याने आता अतिरेकाची सीमा गाठलेली आहे. वाढता शिक्षणप्रसार, नागरी जीवनाची ओढ व बदलती सामाजिक मूल्ये यांमुळे आदिवासी, भटक्या जमाती व दलित वर्ग यांच्या विचारसरणी  आशा- आकांक्षा व जीवनमूल्ये आमूलाग्र बदलत आहेत. या सर्वांचा परिणाम त्यांच्या भाषांवर होणे अपरिहार्य आहे. विशेषतः बलवान सामाजिक गटात दुर्बल सामजिक गट विरून गेल्याने आज अनेक बोली नाममात्र राहिल्या आहेत; तर अनेक नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे व्याकरण, शब्दकोश गद्यपद्यपाठ संग्रह इत्यादीद्वारे त्यांच्या स्वरूपाविषयीच्या माहितीचे संकलन, संशोधन व जतन होणे ही आजची निकड आहे.

जग आज एक खेडं बनल आहे. राष्ट्रा-राष्ट्रांमधील अंतर नाहीसे झाले आहे. वेगवेगळ्या देशांतील लोक एकमेकांशी जोडले गेले आहेत. दळणवळणाची, परस्पर संपर्काची साधने मोठ्या प्रमाणात विकसित झाल्यामुळे संवाद साधणे सुलभ झाले आहे. हा संवाद नेमक्या कोणत्या भाषेत साधला जातो? या प्रश्नाचे उत्तरार्थात इंग्रजी

हे आहे. याचे परिणाम आज ठळकपणे पुढे येत आहेत. वेगवेगळ्या देशांतील बोलीभाषा संपण्याच्या मार्गावर आहेत. या सर्व प्रक्रियेविषयी भालचंद्र नेमाडे म्हणतात, ''आपल्याला असं दिसेल की हे जे स्वतःला जागतिकीकरणाचे अध्वर्यू म्हणतात, त्या देशांमधल्या भाषांची परिस्थिती आपण बघू या Atlas of world Languages Dead Languages, Red book या पुस्तकांमधील आकडेवारी घेतली तर उत्तर अमेरिकेत कॅनडा आणि युनायटेड स्टेट्समधल्या भाषा या शंभर वर्षापूर्वी १८७ होत्या, रेड इंडियन एस्किमो यांच्या धरून आज त्यातल्या ३८ उरल्या आहेत, बाकीच्या नाहीशा झाल्या. अलास्कामध्ये २० भाषा होत्या. आज तिथे २ भाषा राहिल्या आहेत. ही जागतिकीकरण करू इच्छिणाऱ्या गोऱ्या लोकांची कर्तबगारी लॅटिन अमेरिकेत बरंच युरोपी सांस्कृतिक दडपण अजूनही आहे. तिथे ४०० भाषा होत्या. आता फक्त १०८ भाषा राहिल्यात. पुढील वीस वर्षात झपाट्यानं या पण नाहीशा होतील अशी भीती आहे.'' (साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण, भालचंद्र नेमाडे, लोकवाङ्मय मुंबई २००९, पृ. १७) नेमाडे यांनी वर्तविलेले भाकित नजीकच्या काळात वास्तवात येण्याची शक्यता वाटते. त्यामुळे बोलीवरील संकटे वाढतच आहेत, हे लक्षात येते.

मराठीच्या बोलीभाषा आणि प्रमाण भाषा यांच्यातील अंतर कमी झाले आहे. बोलीभाषेत प्रमाण भाषेतील शब्दांचे प्रमाण वाढले आहे. बोलीभाषेतील अनेक भाषिक लकबी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. पुढील काही काळात बोलीभाषा व प्रमाण मराठी भाषा यांच्यातील अंतर सूक्ष्म होत जाईल. तसे बोलींच्या अभ्यासास व बोलींच्या सामग्री जमा करण्यास मर्यादा येतील. बोलीभाषेच्या संशोधकांपुढे हे एक महत्वाचे आव्हान असणार आहे.बोलीभाषा या कम अस्सल, कमी प्रतीच्या आहेत, असा न्यूनगंड बाळगल्यामुळे बोलींपेक्षा अवाजवी महत्व प्रमाणभाषेला प्राप्त झाले आहे. बोलींच्या लिप्या मर्त्य होत आहेत. ही एक मोठी समस्या बनली आहे. उदाहरणार्थ 'हळेकन्नड' (हळेगन्नड) लिपीशी नाते सांगणारी अशी लिपी जिला गोव्यात कानदेवी तसेच गोंय कानडी लिपी असेही संबोधले जात असे. गोव्यात पाचव्या शतकापासून ज्ञात असलेल्या या लिपीतील कोकणी भाषेचे आकलन होणे अशक्यप्राय झाले आहे.या लिपीत संस्कृत भाषाही लिहिली जात असे. सहाव्या शतकातील पुलकेशीच्या काळात लिहिलेला बदामी येथील संस्कृत भाषेतील शिलालेख या लिपीत आढळतो.

या लिपीतील कोकणी भाषा जाणणारी शेवटची व्यक्ती होती कैलासवासी गजानन घाटकर ते काही वर्षापूर्वी वारले. आता हळेकन्नड लिपीतील कोकणी भाषा वाऱ्यावर पडली आहे. आशेचा किरण इतकाच आहे,तो म्हणजे त्या लिपीतील शासकीय लेखनपत्रे उपलब्ध आहेत,आणि ज्या पद्धतीने महानुभाव पंथाचे मराठी साहित्य अनेक लिप्यांतील असून देखील त्यांचे लिप्यंतरण करण्यात आले,तसे हळेकन्नड लिपीतील लेखनाचे लिप्यंतर करण्यास वाव आहे. असे मत 'भाषा आणि बोलीः आजची आणि उद्याची समस्या' या लेखात डॉ. सु.म. तडकोडकर यांनी मांडले आहे. (बोलीभाषा : संशोधनाच्या नव्या दिशा, पृष्ठ क्रं. २३)

आज प्रमाणभाषेबरोबर बोलीवरही संकटे येऊ घातलेली दिसतात. काळाच्या ओघात नव्या जीवनशैलीच्या प्रभावामुळे बोलीतील अनेक शब्द नाहीसे होण्याच्या मार्गावर असलेले दिसतात. कृषिव्यवस्थेमधील परिवर्तन,यंत्राधिष्ठितता, नव्या पिढीची आधुनिक मानसकिता,परंपरांची मोडतोड, बोलीकडे पाहण्याचा अनुदार दृष्टिकोन यामुळे अनेक शब्द उच्चारले जाण्याची क्रियाच बंद होत असलेली दिसते. शासनासहित सर्व समाजाची बोलीकडे पाहण्याची दृष्टी पारंपरिक आहे.आजवर शालेय स्तरावर बोली अभ्यासाला कोणत्याही प्रकारचे महत्व

दिले जात नसल्याने शालेय स्तरापासून बोलीकडे उपहासाच्या जाणीवेतून पाहिले जाते. बोलीतील उच्चार अशुद्ध, गावंढळ मानणाऱ्यांचे तसेच आपल्या शहरी, स्वतःला शिष्ट समजणाऱ्या समाजाचे भाषिक अज्ञान बोलीच्या मुळावर आलेले दिसते. त्यामुळे ग्रामीण जीवनातील विविध क्षेत्रातील अनेक शब्द लुप्त होऊ लागले आहेत. असे निरीक्षण गोविंद काजरेकर यांनी 'मालवणी वा कुडाळी' या लेखात (लोकरंग पुरवणी, मायबोली सदर) केला आहे.(दै. लोकसत्ता,दि. २० जानेवारी, २०१३).

नवी जीवनशैली बोलीवर आघात करते. मात्र त्या त्या प्रदेशातील माणसांच्या जीवनव्यवहाराचे साधन आणि क्रीडा करमणुकीचे माध्यम असलेल्या बोली काळाच्या ओघात नष्ट होऊ लागल्या तर प्रमाणभाषेतील शब्दांची मूळ भूमी निश्चित करणे हे कठीण कर्म होऊन बसेल. म्हणून या बोली जतन करणे हे भाषिक आणि सांस्कृतिदृष्ट्या जबाबदारीचे कार्य आहे. वेगवेगळ्या बोली बोलणाऱ्या लोकांना आपली बोलीभाषा एक सांस्कृतिक संचित आहे, याची जाणीव नसते. बोली हा एक सांस्कृतिक ठेवा आहे. याची जाणीव निर्माण झाल्यास हुषार, बुद्धिमान, तज्ज्ञ अभ्यासक बोलींच्या संशोधनाकडे वळतील.

वरील विवेचन लक्षात घेता. बोलीवर अनेक संकटे आहेत याची जाणीव होते. बोलींचे संवर्धन करणे ही आता काळाची गरज आहे. बोलींविषयी आस्था आणि अस्मिता असणाऱ्या अभ्यासकांनी बोलींचे जतन करून ठेवणे गरजेचे आहे. बोलीतील सांस्कृतिक संचित नष्ट होण्याआधी त्यातील सामर्थ्य स्थळे शोधली पाहिजेत. बोली संवर्धनाच्या उपाययोजना आखल्या पाहिजेत. त्या व्यापक पातळीवर आमंलात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण बोलींची आवश्यकता समाजाला अनन्यसाधारण अशी आहे. बोलीची आवश्यकता का आहे? हे आपण पुढील विवेचनात पाहू.

**४.४ बोली अभ्यासाचे महत्व**

अमेरिकेतील डायनीयल एब्राम या गणिताच्या अभ्यासकाने भविष्यात कोणत्या भाषांचे अस्तित्व टिकू शकणार नाही, याचे गणितशास्त्राच्या आधाराने एक सूत्र बनविले आहे. त्यांच्या मते, जी भाषा ती बोलणाऱ्या समाजास व्यवसाय देऊ शकत नाही, ती तो भाषिक समाज सोडून देण्याच्या खटाटोपास लागतो. एब्राम यांच्या सूत्राप्रमाणे २१ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत संपूर्ण जगात सुमारे ३०० भाषा अस्तित्वात राहू शकतील. अर्थात या सूत्राच्या विरूद्ध मुद्दे मांडता येतील, परंतु तूर्तास एब्राम यांचे सूत्र पकडून विचार केला तर आपण असे म्हणू शकतो की, भारतातील आदिवासींच्या व भटक्या जमातींच्या छोट्या छोट्या भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेतच अहिराणी, कच्छी, मारवाडी वगैरेसारख्या प्रचंड संख्येमध्ये बोलल्या जाणाऱ्या भाषा पण स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्षारत राहतील. (उनि. भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण महाराष्ट्र पृ.क्र. एकोणतीस (प्रस्तावना) हा गणेश देवी यांचा निष्कर्ष बोली भाषांची सद्यस्थिती/ वस्तुस्थिती सिद्ध करतो.

बोली भाषांच्या अभ्यासाची आणि त्याविषयीचे संशोधन करण्याची आवश्यकता काय? असा प्रश्न अनेक विद्वान लोकही विचारतात. कित्येकांच्या मते शिक्षणप्रसारांमुळे पोटभाषा नष्ट होण्याच्या मार्गाला लागल्या आहेत आणि हे त्यांना इष्टच वाटते. कारण प्रमाण भाषेचा सर्व प्रदेशांत वापर होणे ही गोष्ट राष्ट्रहिताच्या दृष्टीने जरूरीची वाटते. भाषिक ऐक्यातून सामाजिक ऐक्याकडे आपण जाऊ असा आशावाद ते मांडतात.

कोणत्याही सामाजिक प्रश्नांची उकल त्या प्रश्नाची प्रत्यक्ष माहिती मिळवून आणि त्याचा इतिहास अभ्यासून होते.या गोष्टी लक्षात न घेता बोलीविषयी शास्त्रीय मत बनवणे चुकीचे ठरेल. यासाठी भाषा अभ्यासक फ्रान्सच्या फ्रेंच भाषेचे उदाहरण देतात. फ्रेंच भाषेला महत्वाचे स्थान राज्यकर्त्यांनी देण्याचा प्रयत्न केला. तेथील बोली नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पण त्या बोली मुळीच नष्ट झाल्या नाहीत. याचे कारण स्पष्ट करताना ना.गो. कालेलकर म्हणतात, ''कारण बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुख- परंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. आपले रूप प्रतिष्ठेच्या आरशात पाहून इतरांना ते आकर्षक वाटेल असे करण्याचा प्रयत्न करायला तिला वेळ नसतो. तिची स्वाभविकता हेच तिचे वैशिष्टय. काहींना ते मोहक वाटेल, काहींना ते ओंगळ वाटेल.हा ज्याच्या त्याच्या मनोवृत्तीचा आणि संस्कारांचा प्रश्न आहे.'' (उनि, भाषा इतिहास आणि भूगोल पृ.क्रं. ७०) या विधानातून कालेलकरांनी बोलीच्या स्वाभाविकतेला महत्व दिल्याचे लक्षात येते. अगदी अलिकडे बेळगावचे उदाहरण ही यासाठी महत्वाचे ठरेल. निपाणी, संकेश्वर बेळगाव आणि कारवार हा प्रांत मराठी असूनही भाषावार प्रांत रचनेत कर्नाटकशी जोडला गेला. कर्नाटक शासनाने मराठी भाषिकांची गळचेपी केली. भाषिक अस्मिता दडपण्याचे प्रयत्न नित्यनेमाने सुरू आहेत. तरी बेळगावची बोली कोणीही नष्ट करू शकले नाहीत. उलट तेथील मराठी अस्मितेखातर सीमाभागात दरवर्षी साहित्य संमेलने भरवली जातात. यावरून राज्यकर्ते बोली नष्ट करू शकत नाहीत, हे सिद्ध होते.

फ्रेंच राज्यक्रांतीच्या नेत्यांनी या बाबतीत स्वीकारलेली भूमिका आपल्या मुळीच उपयोगाची नाही. त्यांनी केलेली चूक आपल्याला मार्गदर्शक ठरली पाहिजे. या क्रांतिकारकांना प्रगतीची घाई झाली होती पण प्रगती ही फळासारखी आहे. खत आणि पाणी कितीही घातले तरी रोपाची योग्य रीतीने वाढ होऊन, योग्य वेळी फूल येऊन नंतरच त्याचे फळ बनते. नेते किंवा सामाजिक कार्यकर्ते प्रगती स्वत: करत नाहीत, समाजाकडून ती करून घेतात. त्यासाठी लोकमताची अनुकूलता असणे, लोकांना सुधारणा म्हणजे काय आहे हे कळणे तिच्यामुळे होणाऱ्या प्रगतीबद्दल खात्री पटणे, हे आधी झाले पाहिजे. लोकांच्या आटोक्यात असणारे विनिमयाचे माध्यम वापरूनच हे करता येणे शक्य आहे.

बोलींचा नुसता अभ्यासच झाला पाहिजे असे नव्हे तर मायबोली म्हणून त्यांचा वापर करणाऱ्या लोकांशी बोलता येण्याइतके प्रभुत्व सामाजिक आणि राजकीय कार्यकर्त्यांनी आणि शिक्षणाविषयी कळवळा असणाऱ्या लोकांनी मिळवले पाहिजे. व्यक्ती व्यक्तीतले अंतर दूर करण्याचा यासारखा दुसरा मार्ग नाही. इंग्रजीत बोलून लोकजागृती होत नाही हे ज्यांना कळते त्यांना ती हिंदीत किंवा प्रमाणभूत मराठीत बोलूनही होणार नाही हे कळले पाहिजे. विशेषतः ज्या देशातले शिक्षण प्रसाराचे कार्य मुंगीच्या पावलाने चाललेले आहे, त्या देशात तर शिक्षणाचे राजकीय प्रचाराचे, सामाजिक उद्धाराचे काम लोकभाषेच्या म्हणजे ठिकठिकाणच्या बोलींच्या साह्यानेच अधिक प्रभावशाली होऊ शकेल.

मुद्रणकला सुरू झाल्यानंतर मध्यंतरीच्या बऱ्याच मोठ्या काळात वर्तमानपत्रे आणि पुस्तकांचे महत्व वाढले. सुशिक्षित वर्ग सामाजिक दृष्ट्या महत्वाचा ठरला. पांढरपेशांच्या खुशीवर सर्व काही अवलंबून असे समाजवादी लोकशाहीच्या नव्या युगात परिस्थिती बदलली आहे. विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती झाली. ग्रामोफोन,

टेलिफोन, रेडिओ, बोलपट दूरदर्शन, मोबाईल, सोशल मीडिया या युगात भाषा बोलली जाते. तिचा वापर वेगळ्या ढंगात करता येतो. याची जाणीव झाली आहे. राजकीय प्रचार आणि मतदारांची खुशामत त्यांच्यासमोर जाऊन आणि त्यांना आपले मुद्दे पटवून सांगणे भाग ठरले. कारण अजूनही या देशातला बहुसंख्य मतदारवर्ग स्वतःच्या बोलीखेरीज इतर बोली किंवा भाषा न येणाऱ्या लोकांचाच आहे. लोकनाट्य, लोकसाहित्य यांचे पुनरूज्जीवन होत आहे, तर मग लोकभाषा म्हणजे भाषेचे बोलरूप समजून, शिकून आणि अभ्यासून बहुजनसमाजाशी संपर्क साधायला कुणालाही हरकत नाही.

आतापर्यंत असे मानण्यात आले आहे की, एखाद्या भाषेतील वेगवेगळ्या बोलींपैकी मात्र राज्यकर्त्यांची बोलीच प्रमुख भाषा किंवा मान्य भाषा बनते. या विचारामागे इंग्रजी भाषेतील,लंडनमध्ये बोलल्या जाणाऱ्या Received prononciation (RP) चा ऐतिहासिक अनुभव ठेवला गेला. या प्रकारे भारतातील विचार केल्यास, भारतातील राज्यकर्त्यांची हिंदी भाषेची प्रमुख बोली व्हायला पाहिजे होती. किंवा महाराष्ट्रात राज्यकर्त्या मराठ्यांची बोली प्रमुख मराठी बोली व्हायला पाहिजे होती. या हिंदी व मराठीच्या उदाहरणांवरून असे म्हणता येईल की मान्य भाषा व पोटभाषा यांच्या संबंधीचा विचार मात्र इंग्रजीच्या इंग्लंडमधल्या ऐतिहासिक अनुभवावरून तितकासा नीटपणे करता येणार नाही. शिवाय ज्या समाजात किंवा देशात विशिष्ट प्रदेशाची बोली अथवा भाषा न बोलणारे राजकर्ते असतात. किंवा ज्या संस्कृतीमध्ये समाजातील स्वामित्व असणारा वर्ग एकभाषिक नसतो. अशा देशात किंवा संस्कृतीत कोणती बोली पोटभाषा व कोणती बोली मान्य भाषा बनेल, यासंबंधी पुन्हा एकदा विचार करणे जरूर आहे. असे मत गणेश देवी यांनी मांडले आहे.

जर पोटभाषाच नसतील तर एखादी मान्य भाषा केवळ अर्थविहीन व पुन्हा पुन्हा वापरून थकून गेलेले शब्द या स्वरूपातच शिल्लक राहील. कदाचित व्याकरणाच्या आत्यंतिक शिस्तीमूळे ती भाषा गणितासारखी संकल्पनात्मक प्रगल्भता कमावू शकेल पण त्यातील शब्दचिन्हे बिना चेहऱ्याची बनतील. प्रत्येक भाषेला स्वतःचा चेहरा असणे जरूरी भासते. ती भाषा वापरणाऱ्या व्यक्तींना त्या त्या भाविक चेहऱ्याचा व प्रकृतीचा अभिमान वाटत राहतो. ती भाषा दुसऱ्या अगदी जवळच्याही भाषेत विलीन होण्यास नामंजूर असते. या सर्वांचे कारण, मानवी भाषाव्यवहारातील पोटभाषेची प्राथमिकता हे आहे.

सतराव्या शतकापासून ते आजपर्यंत जर्मन भाषाशास्त्रज्ञ व तत्वचिंतक सर्वात मुळच्या मानवी भाषेच्या शोधात राहिले आहेत. बायबलमध्ये एका बायबलच्या मनोऱ्याची कल्पना आहे.जेव्हा तो मनोरा तुटला तेव्हा मूळच्या एका भाषेतून अनेक भाषा निर्माण झाल्या अशी ती दंतकथा आहे. या जर्मन भाषाशास्त्रज्ञांची ती मूळची भाषा शोधण्याची निंतात इच्छा आहे. वास्ताविक मनुष्यवंशातील प्रत्येक व्यक्ती आपापल्या परीने विश्वाच्या अनुभवाच्या कडा आणि कंगोरे शोधून पाहून त्यातील सत्व व सत्य सांकेतिक स्वरूपात ध्वनिबद्ध आणि जमलेच तर लिपीबद्ध करण्याच्या प्रयत्नात आहेत. हा प्रयत्न शतकानुशतके चालत राहिल्यास भविष्यकाळातील कोण्या एका दिवशी विश्वातील प्रत्येक व्यक्तीचा इतर व्यक्तींशी व मनुष्यप्राण्याचा इतर योनींशी, अर्थपूर्ण संवाद होऊ शकेल. ही प्रक्रिया थांबवणे म्हणजे उत्क्रांतीची नाकेबंदी करण्यासारखे आहे. अशी नाकेबंदी जेव्हा जेव्हा करण्यात येते, तेव्हा तेव्हा विशिष्ट चेहऱ्यामोहऱ्याची पोटभाषा घेऊन अनुभवविश्व धुंडाळण्याची मानवी इच्छा अनेक छुप्या मार्गांनी उफाळून येत राहते. संस्कृत दडपणाखाली प्राकृताचा जो प्रचंड विस्फोट झाला तो,किंवा

इंग्रजीच्या दडपणाखाली वेगवेगळ्या मानवी, यांत्रिक व सांकेतिक  पोटभाषांचे आंदोलन सुरू आहे ते, असेच प्रकार होत. कन्नड कादंबरीकार यू. आर. अनंतमूर्ती म्हणतात त्याप्रमाणे, 'भारतीय भाषांचा मूळ स्त्रोत त्या भाषांच्या अंगणात व परसघरात आहे.' पण ह्याही पलीकडे जाऊन असे स्वीकारले पाहिजे की मान्य भांषाच्या अस्तित्वाची व प्रगतीची गुरूकिल्ली पोटभाषांच्या हाती आहे. भारतीय समाजात आजही अशा असंख्य पोटभाषा तग धरून आहेत आणि गेल्या तीन हजार वर्षात अखंडितपणे भारतीय संस्कृतीचा प्रवाह वाहता ठेवण्याचे महान कार्य या भाषांनी केलेले आहे. प्रवाहाचाच विचार करायचा झाल्यास किनारे म्हणजे मान्य भाषा व प्रवाहाची गती म्हणजे  पोटभाषा. त्यांना न रोखणे, दुर्लक्षित न करणे हे त्या प्रवाहासाठी योग्य ठरेल.

वसाहतपूर्व काळात आपल्याकडे प्रमाणभाषा आणि बोली अशी गल्लतखोर वर्गवारी नव्हती. भाषिक वैविध्याचा जीवनातील वास्तव म्हणून स्वीकार केला गेलेला होता. साहित्यिक एकाच रचनेत अनेक भाषांचा वापर करत आणि सर्वसामान्य रसिकही त्याचा सहज स्वीकार करत. जवळजवळ विसाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत महाभारतासारखी महाकाव्यं वेगवेगळ्या भाषांमध्ये हस्तांतरित होत असत. समीक्षक एखादा सिद्धांत मांडताना अनेक भाषांमधील साहित्य विचारात घेत.

वसाहतीच्या काळात अनेक भारतीय भाषांचं मुद्रण व्हायला सुरूवात झाली. त्यापूर्वी आपल्याकडे लिपीचा वापर होत असे.लिखित भाषा इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी कागदाचाही वापर होत होता. अर्थात लिहिण्यापेक्षाही जास्त व्यापक प्रमाणावर मौखिक परंपरेतून ज्ञान दुसऱ्यापर्यंत पोहोचवलं जात होतं. मुद्रणकलेच्या शोधामुळे मौखिक परंपरा धोक्यात आली. लिखित साहित्यासाठी नवे निकष अस्तित्वात आले. लिखित भाषेने मौखिक परंपरेला छेद दिला. एवढंच नाही तर लिखित साहित्य एकाच भाषेत असायला पाहिजे ही गरज निर्माण झाली. या नव्या कल्पना आणि वसाहतीच्या संदर्भातली सत्तेची गणितं यांचा भारतातल्या भाषांच्या वैविध्यावर परिणाम झाला. मुद्रणकलेच्या कक्षेत न येणारी भाषा कमी दर्जाची ठरवली गेली.

स्वातंत्र्यानंतर भाषेच्या निकषावर राज्यनिर्मिती झाली आणि भाषक राज्यं निर्माण झाली. ज्या भाषांना लिपी होती आणि ज्या भाषा मुद्रणकलेच्या कक्षेत येत होत्या, ज्या भाषांमध्ये मुद्रित साहित्य होते, त्या त्या भाषांना भारतीय संघराज्यात भौगोलिकदृष्ट्या स्वतंत्र राज्याचे स्थान देण्यात आले. ज्या भाषांना समृद्ध अशी मौखिक साहित्याची परंपरा होती, पण ज्यांच्यामध्ये मुद्रित साहित्य नव्हते त्या भाषांना हा दर्जा मिळाला नाही. पुढे प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शिक्षणासाठीचे माध्यम म्हणून त्या त्या राज्याच्या अधिकृत भाषेचा वापर सुरू झाला. त्याचबरोबर राज्यघटनेमध्ये भाषांसाठीची एक सूची निर्माण करण्यात आली. सुरूवातीला त्यात १४ भाषांचा समावेश  होता. नंतर त्यात भर पडून आता त्यात एकूण २२ भाषा आहेत. या सूचीच्या चौकटीत राहूनच,सरकारला भाषांच्या शिक्षणावर सर्व खर्च करणे बंधनकारक बनले. १९६१ च्या देशाच्या जनगणनेनुसार ही संख्या रोडावली. जी भाषा दहा हजारांपेक्षा जास्त संख्येच्या समूहाकडून बोलली जात असेल, त्याच भाषेचा जनगणनेत मातृभाषा म्हणून समावेश करण्यात आला; त्यामुळे १९७१ च्या जनगणनेत १०८ भाषांचीच नोंद झाली. परिणामतः जवळजवळ १५०० हूनही अधिक मातृभाषा या कायमच्या मूक झाल्या.

यातल्या बऱ्याच भाषा या भटक्या विमुक्त समाजात, आदिवासींत बोलल्या जातात. यातल्या कितीतरी भाषा जरी आजपर्यंत संपून गेल्या नसल्या व थोड्याबहुत प्रमाणात शिल्लक असल्या तरी त्या वेगाने नष्ट होण्याच्या

मार्गावर आहेत. त्यांना त्यांच्या भाषाच वापरता येऊ नयेत ही परिस्थिती त्यांच्यावर सोयीस्करपणे लादली गेली आहे. त्यामुळे भारतीय भाषांच्या विस्तृत पटावरच्या आदिवासी, भटके विमुक्त या अल्पसंख्यांच्या भाषा वेगाने अस्तित्वहीन होत चालल्या आहेत. 'पीपल्स लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया' हा भारतातल्या या लोकांना त्यांचा आवाज नोंदवता यावा यासाठीचा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न आहे. ग्रिअर्सनच्या सर्व्हेची ही पुनरावृत्ती किंवा त्याला पर्यायी सर्व्हे नाही. या सर्व्हेचे निकष वेगळे आहेत. भारतातील भाषिक विविधता जगाच्या नजरेस आणून देणे, उर्वरित जगात तिचा प्रसार करणे, ही विविधता जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करणे आणि इतक्या प्रदीर्घ संघर्षांनंतर भारताने जी भाषिक लोकशाही निर्माण केली आहे, ती जतन करण्यासाठी प्रयत्न करणे यासाठीचा 'पीपल्स लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया' हा एक 'अनौपचारिक' प्रयत्न आहे. अशी आपली भूमिका डॉ. गणेश देवी यांनी मांडली आहे.

कोणत्या भाषा नष्ट होऊ घातल्या आहेत, कोणत्या त्या दिशेने प्रवास करत आहेत आणि कोणत्या भाषा नष्ट होण्याऐवजी नैसर्गिकरीत्या दुसऱ्या भाषेमध्ये रूपांतरीत होत आहेत, हे ठरवणे बरेचसे जिकिरीचे काम आहे. ते ठरवण्यासाठी आपल्याकडे असलेला भाषांसंबंधीचा तपशील अपुरा आहे, असं म्हणणं अयोग्य ठरणार नाही.

भारतात होत असलेला भाषिक ऱ्हास हा फक्त अल्पसंख्य तसेच बोली भाषांबाबतच घडतो आहे असं नाही. हीच वस्तुस्थिती ज्या भाषांना मोठी साहित्यिक परंपरा आहे, ज्यांना तात्विक तसंच सृजनशील लिखाणाचा मोठा वारसा लाभला आहे अशा महत्त्वाच्या भाषांबाबतही दिसून येते. मराठी, गुजराती, कन्नड, ओरिया या समृद्ध साहित्याची परंपरा असलेल्या भाषा आपल्या मातृभाषा आहेत असा दावा करणारे जे समाज आहेत,त्यांच्यातील कुमार वयाच्या वर्गाला त्यांच्या भाषेतील या समृद्ध वारशाची फारच थोडी ओळख आहे, किंवा जवळजवळ नाहीच असे म्हटले तरी चालेल. ते त्यांची स्वत:ची भाषा एखाद्या 'परभाषका' इतपत बोलू शकतात. शिक्षणातली उच्च पदवी असलेली सुशिक्षित व्यक्ती, आपल्या मातृभाषेशिवाय दुसरी भाषा वाचू, लिहू शकते. तिच्यामधून बोलू शकते. पण स्वत:ची मातृभाषा फक्त बोलू शकते. संपूर्ण विश्वासाने लिहू शकत नाही. भाषेचा नाश, लोक दुसऱ्या भाषेकडे वळणे आणि भाषिक ठेव्याचा ऱ्हास यांसाठी फक्त शासकीय घटकांना दोष देऊन चालणार नाही. भाषा टिकविण्यासाठी घटनेच्या ३४७ व्या कलमानुसार 'एखाद्या राज्यातल्या लोकसंख्येतल्या मोठ्या घटकाने अशी इच्छा व्यक्त केली की, ते बोलत असलेल्या विशिष्ट भाषेला राज्यभाषेचा अधिकृत दर्जा मिळावा, तर राष्ट्रपती त्या भाषेला त्या राज्यात अधिकृत भाषेचा दर्जा मिळावा यासाठीची तजवीज करावी यासाठीचे आदेश देऊ शकतात.' ह्या प्रकारच्या अन्य तरतुदीही राज्यघटनेत आहेत. पण तरीही भारतीय भाषांची अवहेलना वाढतच चालली आहे.

वेगाने जागतिकीकरण होत असलेल्या जगात विकासाच्या मुद्यावरून होत असलेला संघर्ष हा भाषिक ऱ्हासाला कारणीभूत ठरणारा महत्वाचा घटक आहे. भारतातच नव्हे, तर आशियात तसच आफ्रिकी देशातही पालकांना अस वाटत की त्यांनी त्यांच्या मुलांना इंग्रजी, फ्रेंच किंवा स्पॅनिश माध्यमातून शिक्षण दिलं तर ती मुलं मोठेपणी व्यवसायाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत यशस्वी ठरतील. थोडक्यात ती चांगला रोजगार मिळवतील. त्यांच्या या इच्छेमुळे त्या परिसरात यापूर्वी कधीही बोलल्या न गेलेल्या आंतरराष्ट्रीय भाषेतून शिक्षणाला सुरूवात होऊन त्यांच्या शिक्षणपद्धतीवर मोठा परिणाम झाला आहे.

भारतात एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला, म्हणजेच सामाजिक सुधारणा मोठ्या प्रमाणावर सुरू होत्या, त्या काळात एक मोठा वाद सुरू होता. बंगालमधल्या बुद्धिजीवी वर्गाचं म्हणणं होतं की इंग्रजी भाषेत शिक्षण दिलं जावं. तर एलफिन्स्टनसारख्या इंग्लिश अधिकाऱ्याचं म्हणणं होतं की भारतातल्या शाळांमध्ये भारतीय भाषांमध्ये शिक्षण दिलं जाणं, हेच योग्य ठरेल. १८३५ मध्ये लॉर्ड मेकॉलेच्या 'मिनिटस् ऑन एज्युकेशन' मध्ये भारतात सर्व महत्वाचे शिक्षण हे इंग्रजी माध्यमातून दिले जावे असे नमूद करण्यात आले. हाच दृष्टिकोन नंतर वुड्स साहेबाच्या हुकूमनाम्यातून मांडला गेला, तेव्हा हा वाद संपुष्टात आला. अर्थात, एक नोंदपात्र बाब म्हणजे तेव्हापासून आधुनिक भारतीय भाषांमधले साहित्य अधिकाधिक सृजनशील होत गेले. परंतु त्यामागचे खरे कारण म्हणजे भारतीय भाषा मुद्रित होत राहिल्या व साहित्य म्हणजे मुद्रित स्वरूपात प्रकाशन हे समीकरण आपल्या मनात रूजले.

जेव्हा एखाद्या समाजालाच असं वाटायला लागतं की त्याला उदरनिर्वाहासाठी दुसऱ्या भाषेत शिक्षण घेणं गरजेचं आहे, तेव्हा तो समाज नवीन भाषिक परिस्थिती स्वीकारायचा निर्णय घेतो. म्हणूनच सध्याच्या जगातल्या विकासाच्या प्रक्रियेत मुळातच असे काही आहे का, की ज्यामुळे जगातल्या भाषिक वारशाचा ऱ्हास होतो आहे? ही प्रक्रियाच भाषिक संहाराला चालना देते आहे का ? याचा विचार आत्ताच करणे प्रसंगोचित ठरेल. तसे असेल तर मानवी भाषांचे भवितव्य संकटात आहे, हे मान्य करावे लागेल. सांस्कृतिक पातळीवर जे समाज आधीच अल्पसंख्य आहेत, स्थानिक तसेच राष्ट्रीय पातळीवर जे समाज दुर्बळ ठरले आहेत, त्या समाजांचा आवाज आधीच क्षीण झाला आहे, ते भाषासंहाराला सगळ्यात आधी बळी पडणार हे उघड आहे.

भारतात मुलांना प्राथमिक शिक्षण देणे पालकांना बंधनकारक आहे आणि मुलांचा तो हक्क आहे. सरकारपुरस्कृत शाळा या जवळपास विनामूल्य आणि सर्वात वंचितांनाही परवडण्याजोग्या आहेत. मुलांना शाळेत दुपारचं जेवण दिलं जातं. त्यामुळे भुकेमुळे ती वर्गाबाहेर राहतील अशी परिस्थिती नाही. केंद्र तसेच राज्य सरकार हे शालेय शिक्षण देणे, ही आपली मुलभूत जबाबदारी मानतात. बालमजुरी ही आपल्याकडे बेकायदेशीर मानली गेली आहे. अनेक राज्यांमध्ये स्त्रियांना उच्च शिक्षणही विनामूल्य दिलं जातं. अनुसूचित जाती तसंच अनुसूचित जमातीमधल्या तसंच इतर मागासवर्गातल्या मुलांसाठी शिक्षणामध्ये आरक्षण ठेवण्यात आले आहे. भारत सरकारने जवळजवळ ५० भारतीय भाषांमध्ये व काही परकीय भाषांमध्ये प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. प्रौढ शिक्षण आणि अनौपचारिक शिक्षणालाही सतत प्रोत्साहन दिलं जातं. राज्यघटनेत ज्यांचा समावेश केला आहे. त्या सगळ्या भाषांमध्ये शिक्षण मिळण्याची घटनेनेच हमी दिलेली आहे.

या सगळ्या प्रयत्नांनंतरही अनेक अल्पसंख्य तसंच काही मुख्य भाषा आपल्या अस्तित्वाबद्दल, प्रगतीबद्दल इतक्या उदासीन का आहेत, हा विचार करायला लावणारा प्रश्न आहे. जबर फी भरून बहुसंख्य मुलं इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाताना दिसतात. एखादं मूल भारतीय माध्यमाच्या शाळेत जायला लागलं की त्याकडे एखादी अनिच्छनीय घटना म्हणूनच बघितलं जातं. अशा परिस्थितीत ज्यांच्यासाठी मोठ्या पातळीवरील सामाजिक प्रयत्नांची गरज आहे. अशा भाषांचं जतन करणं हे मोठंच जबाबदारीचं, अवघड होऊन बसतं. रचनात्मक, सामाजिक व सांस्कृतिक बदलाशिवाय ते पूर्ण होणे शक्य नाही.

भाषा टिकवणं, तिचं जतन करणं हे काम पुरातन अवशेषांच्या जतनापेक्षा वेगळं असतं, हे आधी लक्षात घेतलं पाहिजे. भाषा ही एक सामाजिक संकेतव्यवस्था आहे एवढीच व्याख्या गृहीत धरल्यास ती शब्दकोष, तसंच व्याकरण या रूपात टिकवून ठेवता येऊ शकते. त्या सगळ्या लिखित गोष्टींच्या माध्यमातून भाषा प्रत्यक्ष समाजजीवनातून अलिप्त करून ती टिकवून ठेवता येऊ शकते. पण मानवी जाणिवांच्यापासून भाषेला वेगळं काढता येत नाही. त्यामुळे विशिष्ट भाषेचं जतन करणे म्हणजेच ती भाषा बोलणाऱ्या समाजाचं जतन करणे होय.

संबंधित समाजाच्या जाणिवा आणि त्या व्यक्त करण्यासाठी व्यक्ती वापरते ती भाषा, यांचा जागतिक अर्थव्यवहाराशी संबंध असतो. भाषेचं जतन करण्यामध्ये हा जागतिक परिप्रेक्ष्य ध्यानात घेणे महत्वाचे आहे. पृथ्वी आपल्या मालकीची आहे, पृथ्वीवरचे नैसर्गिक स्त्रोत केवळ आपल्यासाठी आहेत असे मानणारा 'विकास' विचार सध्या जगभर चलनात आहे, परंतु हा दृष्टिकोन न मानणाऱ्या समाजांची भाषा, विकासाच्या नावाखाली पृथ्वीवरचे नैसर्गिक स्त्रोत ओरबाडून घेणाऱ्यांसमोर टिकू शकत नाही. अशा परिस्थितीत ह्या समाजापुढे दोनच पर्याय असतात : एक म्हणजे त्याने नैसर्गिक स्त्रोतांचे शोषण करत, त्यांचा निव्वळ व्यापार करणं हा माणसाचा हक्कच आहे, असं मानणाऱ्यांना विरोध करावा, किंवा आपला जागतिक परिप्रेक्ष्य आणि तो देणारी भाषा या दोन्ही गोष्टी नाकाराव्या.

जगभरात सगळीकडे आदिवासी, अल्पसंख्य समाजाच्या मुख्य प्रवाहापासून सांस्कृतिकदृष्ट्या बाजूला पडलेले समाज अशा सगळ्यांच्या भाषांची परिस्थिती धोक्याच्या पातळीवर आहे. त्यासाठी धोक्याची घंटा वाजवण्यासाठी एक क्षणाचाही उशीर होता कामा नये. या भाषा वाचवण्याची जबाबदारी थोड्याफार प्रमाणात का होईना राज्ययंत्रणा पार पाडेल अशी आशा करणे अवास्तव ठरेल. हे अवघड ऐतिहासिक जबाबदारीचे कार्य समाजाने, विद्यापीठांनी, ग्रंथालयांनी, भाषिक संस्थांनी, समाजाच्या हितचिंतकांनी, संघटनांनी, बिगर सरकारी संस्थांनी, विद्वानांनी, संशोधकांनी, कार्यकर्त्यांनी पार पाडायचं आहे. ज्या भाषेचा ऱ्हास होऊ घातला आहे, त्या भाषेत किमान लिखित मजकूर निर्माण करणं, शब्दकोश, व्याकरण, ग्लॉसरीज निर्माण करणं हे सगळं उपयोगाचं ठरू शकतं. दस्तऐवजीकरण, संग्रहालय, अर्काईव्ह बनवणं याचाही उपयोग होऊ शकतो. पण त्याही पलीकडे जाऊन एखादी भाषा वाचवायची असेल तर ती बोलणाऱ्या समाजाला सन्मानाने वागवलं गेलं पाहिजे. ते केवळ मानववंशशास्त्राच्या दृष्टीने महत्वाचे आहेत म्हणून नव्हे, अविकसित घटक आहेत म्हणून नव्हे, ते सांस्कृतिक दृष्टया जसे आहेत, तसं असणं हा त्यांचा हक्क म्हणून त्यांना योग्य तो सन्मान मिळाला पाहिजे. एखाद्या समाजाची भाषा निर्माण होण्यासाठी शतकानुशतकं लागतात. वेगवेगळ्या समाजांनी निर्माण केलेल्या भाषा हे आपल्या सगळ्यांचे सांस्कृतिक संचित आहे. त्यामुळे आपल्याच काळात एक प्रचंड जागतिक भाषासंहार होऊन त्या नष्ट होणार नाहीत, हे पाहणं ही आपल्या सगळ्यांची सामुहिक जबाबदारी आहे. (उनि. भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण, प्रस्तावना पृष्ठ क्र. ३७ ते ४०)

भाषांचा डिजिटल माध्यमांत वाढणारा वापर हा भविष्यातील आर्थिक वाढीचा मंत्र असणार आहे. याबाबत 'भाषेचा आर्थिक मंत्र' हा संदीप नूलकर यांनी महाराष्ट्र टाइम्समध्ये लेख लिहिला आहे. या लेखात ते म्हणतात, भारतातील डिजिटल क्रांती जसजसी पाझरते आहे, तशी इंटरनेटवरील प्रादेशिक भाषांमधील मजकूराची मागणी वेगाने वाढत आहे. सर्व प्रमुख औद्योगिक अहवालांचा निष्कर्ष हाच आहे की, भारतीय भाषांमधील भविष्यातील

हे ५० कोटी वापरकर्ते भारताला महाकाय अर्थव्यवस्थेकडे घेऊन जातील. छोट्या शहरांमधील या इंटरनेट वापरकर्त्यांचा कल हा त्यांच्या मातृभाषेतूनच तंत्रज्ञान वापरण्याकडे असेल. २०१६ ते २०२१ दरम्यान इंटरनेटवर इंग्लिशचा वापर करणाऱ्यांच्या १९.९ कोटी या संख्येत केवळ तीन टक्के वाढ होणे अपेक्षित आहे, तर भारतीय भाषांमध्ये इंटरनेट वापरणारे तब्बल १८% वाढून ५३.६ कोटी होतील. यातून एक कोटी २० लाख नवीन नोकऱ्या तयार होतील. परंतु अर्थातच यासाठी इंटरनेटवर प्रादेशिक भाषांमधील मजकूर पाठवणे, वाचणे सुलभ होण्याची त्याला योग्य तंत्रज्ञानाची जोड हवी.

या क्षेत्रात काम करणारे अनेक वर्षे प्रादेशिक भाषांमधील तांत्रिक व्यवस्था अधिक समृध्द बनवण्यासाठी झटत आहेत. विविध भाषिकांना सहज इंटरनेट वापरता यावे यासाठीचे उपाय शोधले जात आहेत. भारतीय भाषांचे डिजिटल संवर्धन करण्यासाठी तसेच धोरण सुसंवाद साधण्यासाठी मजबूत अशा सार्वजनिवक खासगी क्षेत्रांच्या सहयोगाची गरज आहे. त्यासाठी अनुवादित भाषा वापरण्याऐवजी त्या-त्या भाषांमधील अर्थच्छटा लक्षात घेऊन प्रादेशिक भाषांचा वापर वाढत आहे. स्थानिक भाषांमधील बारकाव्यांचा विचार करुन ई-माध्यमात भाषा वापरली जात आहे. उत्तम, निर्दोष मजकूराची मागणी ओळखून तो तयार करण्यासाठी तसा कोड लिहिण्यावर आणि सॉफ्टवेअर विकसित करण्यावर भर देणारे पुढे येत आहेत. विविध भाषांमधील 'सांस्कृतिक वारसा' समजले जाणारे चांगले साहित्य डिजिटल होत आहे.

डिजिटल व्यवसायाने एक नवीन प्रगतीशील क्षेत्र निर्माण केले त्याप्रमाणे प्रचंड आर्थिक आणि सामाजिक प्रगती घडवून आणण्याची सुपत शक्ती प्रादेशिक भाषांमध्ये आहे.

इंटरनेटवर प्रादेशिक भाषांचा वापर वाढवून अर्थव्यवस्थेचा चेहरामोहरा बदलून टाकायचा तर सर्व संबंधितांनी एक९ आले पाहिजे. मात्र हे प्रत्यक्षात येण्यापूर्वी अजून बऱ्याच गोष्टी व्हाव्या लागतील. इंटरनेट वापराने अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या दृष्टीने भारतीय प्रादेशिक भाषांचे महत्त्व ओळखून त्यांचा वापर वाढावा यासाठी वेगाने प्रयत्न होत आहेत. राष्ट्रसंघाने २०१९ हे स्थानिक बोलीभाषांचे आंतरराष्ट्रीय वर्ष साजरे केले. त्यामुळे जागतिक पातळीवर स्थानिक बोलींकडे व्यापक दृष्टीने पाहण्याचा दृष्टिकोन प्राप्त झाला आहे.

वरील दीर्घ विवेचन लक्षात घेता भारतीय भाषा लोकसर्वेक्षणाचे अध्यक्ष गणेश देवी यांनी अपार कष्ट घेऊन लोकसर्वेक्षणाचे कार्य अत्यंत मेहनतीने आणि जोमाने पुढे नेल्याचे दिसते. शिवाय महाराष्ट्र या खंडात त्यांनी लिहिलेली दीर्घ प्रस्तावना ही बोलींची आवश्यकता पटवून देणारी आहे.

**४.५ समारोप :**

कोणत्याही समाजाची बोली एक सामाजिक व सांस्कृतिक संचित असते. बोलीतूनच आपल्या परंपरा, श्रद्धा, चालीरीती पुढील पिढीकडे संक्रमित होतात. बोलींचे समाजातील स्थान बदलत आहे. पारंपरिक, दृष्टिकोनातून बोलींचा अभ्यास करण्याऐवजी आता भाषावैज्ञानिक अंगाने अभ्यास होत आहे. जागतिकीकरणात मराठी भाषेचे काय होईल ? अशी चिंता व्यक्त होत होती. पण बोली ह्या भाषेला तारक आणि उपकारक असल्याचे भाषा मीमांसाकांनी सिद्ध केले आहे. साहित्य, चित्रपट, नाट्य क्षेत्रात बोलींचा वापर होत आहे. तरीही बोलीवर अनेक संकटे आहेत. बोलींचे संवर्धन करणे ही आता कळाची गरज आहे. बोलीविषयी आस्था आणि

अस्मिता असणाऱ्या अभ्यासकांनी बोलींचे जतन करून ठेवले पाहिजे. बोलीतील सांस्कृतिक व सामाजिक संचित नष्ट होण्याअगोदर त्यातील सामर्थ्यस्थळे शोधली पाहिजेत. प्रत्येक भाषेला स्वत:चा चेहरा असतो. ती भाषा वापरणाऱ्या व्यक्तींना त्या-त्या भाषिक चेहऱ्याचा व प्रकृतीचा अभिमान वाटत राहतो. मान्य भाषांच्या अस्तित्वाची व प्रगतीची गुरूकिल्ली पोटभाषांच्या हाती आहे. भाषा टिकवणं, तिचं जतन करणं हे काम पुरातन अवशेष जतन करून ठेवण्यापेक्षा वेगळे आहे. भाषा ही एक सामाजिक संकेतव्यवस्था आहे. एवढीच व्याख्या गृहीत धरल्यास ती शब्दकोश तसंच व्याकरण या रूपात टिकवून ठेवता येते. लिखित स्वरूपात भाषा जतन करता येते. पण तिला मानवी जाणिवांपासून वेगळं काढता येत नाही. त्यामुळे भाषेचं जतन करणे म्हणजेच ती भाषा बोलणारा समाज जतन करणे होय.

## ४.६ शब्दार्थ व टीपा :

**एलफिन्स्टन –** इंग्लंडमधील सर्वोच्च सत्तेची धोरणे भारतात राबवणारे अधिकारी भारतात इंग्रज गव्हर्नर जनरल आणि कनिष्ठ अधिकारी यांच्यामध्ये असलेला दुवा. नेटिव सरकार, जहागीरदार व रयत यांचा वरिष्ठ.

**डायनीयल एब्राम –** अमेरिकेतील गणिती तज्ज्ञ

**सर जॉर्ज अब्राहम ग्रियर्सन –** (७ जानेवारी १८५१ ते ९ मार्च १९४१)

एक आयरिश प्रशासकीय अधिकारी आणि भाषा वैज्ञानिक म्हणून प्रसिद्ध. इंडियन सिविल सर्विस अधिकारी म्हणून ते भारतात आले. बंगाल व बिहार मध्ये त्यांनी नोकरी केली. भारतीय भाषांचे सर्वेक्षण करून त्यांनी 'लिंग्विस्टिक सर्वे ऑफ इंडिया' (भारतीय भाषा सर्वेक्षण) या सर्वेक्षणाचे १९ खंड प्रकाशित केले.

**लॉर्ड टॉमस बैबिंग्टन मैकॉले –** (२५ आक्टोबर १८०० – २८ डिसेंबर १८५९)

ब्रिटनचे राजनीतिज्ञ, कवी, इतिहासकार, निबंधकार आणि समीक्षक म्हणून प्रसिद्ध. सन १८३४ ते १८३८ पर्यंत ते भारताच्या सुप्रीम लॉ कमिशनचे प्रमुख होते. इंग्रज काळात भारतीय शिक्षण पद्धतीचा त्यांनी पाया घातला.

**वसाहत काळ –** विकसित राष्ट्राने अविकसित राष्ट्रावर आपले वर्चस्व प्रस्थापित करणे व अनेक वसाहती स्थापन करणे याला साम्राज्यवाद असे म्हणतात. भारतात इंग्रजांचा अंमल असलेला काळ म्हणजे वसाहत काळ म्हणता येईल.

**हळे कन्नड –** प्राचीन कन्नड

## ४.७ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

**वस्तुनिष्ठ प्रश्न –**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. भाषिक समाज कोणाला म्हणतात ?

अ) भाषिकदृष्ट्या एकसंघ समाजास    ब) एका देशातील समाजास

क) एका खंडातील समुहास    ड) एका धर्म समुहास

२. बहुविध संस्कृतीला एकत्र जोडणारा दुवा कोणता ?

अ) भाषा ब) कला क) कलाकार ड) ग्रंथ

३. भाषेचे ठरविलेले नियम कायमस्वरूपी बंधनकारक न ठरवता दर वीसपंचवीस वर्षांनी बदलावेत, हा विचार कोणी मांडला ?

अ) अशोक केळकर ब) ना. गो. कालेलकर क) स. ग. मालशे ड) सू. रा. चुनेकर

४. अंदमान-निकोबार द्वीपमंडलातील 'बो' ही बोली बोलणारी शेवटची व्यक्ती कोण ?

अ) बुआ ब) सुकू क) बोआताई ड) निओबा

५. समाजाचे सांस्कृतिक संचित केव्हा धोक्यात येते ?

अ) राजकारणामुळे ब) कलावंतामुळे क) समुहाच्या वितुष्टामुळे ड) बोली संपुष्टात आल्यामुळे

६. भाषेच्या अस्तित्वाचे गणिती सूत्र कोणी मांडले ?

अ) एलफिन्स्टन ब) लॉर्ड मेकॉले क) जॉर्ज ग्रिअसर्न ड) डायनियल एब्राम

७. सामाजिक उद्धाराचे व्यापक काम कशाच्या आधारे प्रभावशाली होऊ शकेल ?

अ) परकीय भाषेमुळे ब) राजकारणामुळे क) बोलीमुळे ड) प्रमाण भाषेमुळे

८. एखादी भाषा दुसऱ्या भाषेत विलीन होण्यास नामंजूर का असते ?

अ) प्रादेशिक वादामुळे ब) पोटभाषेच्या प्राथमिकतेमुळे क) वर्ग संघर्षामुळे ड) वर्ण संघर्षामुळे

९. मुद्रणकलेच्या शोधामुळे कोणती परंपरा धोक्यात आली ?

अ) मौखिक ब) लिखित क) वास्तू ड) धार्मिक

१०. भारतातील शिक्षण मातृभाषेतूनच द्यावे, असे कोणत्या इंग्रज अधिकाऱ्याचे मत होते?

अ) लॉर्ड मेकॉले ब) जनरल डायर क) एलफिन्स्टन ड) जॉर्ज ग्रिअर्सन

**उत्तरे १)** अ २) अ ३) ब ४) क ५) ड ६) क ७) क ८) ब ९) अ १०) अ

## ४.८ सरावासाठी प्रश्न :

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) बोलीचे समाजातील बदलते स्थान निश्चित करा.

२) बोलीवर कोणकोणती संकटे आहेत ? ते लिहा.

३) बोलीच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करा.

**लघुत्तरी प्रश्न :**

१. अल्पसंख्याक समाजातील बोली जलदपणे धोक्यात का येतात? ते लिहा

२. बोली टिकविण्यासाठीच्या उपाययोजना सांगा?

३. बोली समाजाचे सांस्कृतिक संचित कसे ठरते? ते लिहा

**४.९ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**


१. भाषा व साहित्य संशोधन (खंड पहिला) संपादक : डॉ. वसंत स. जोशी महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

२. भाषा : इतिहास आणि भूगोल ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई

३. भाषा आणि संस्कृती; ना. गो. कालेलकर मौज प्रकाशन गृह, मुंबई

४. भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण महाराष्ट्र, मुख्य संपादक : गणेश देवी, पद्मगंथा प्रकाशन, पुणे

५. ग्रामीण बोलीचा शब्द कोश द. ता. भोसले, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

६. जागतिकीकरण – मराठी भाषा : आव्हाने आणि उपाय, संपादक डॉ. जयद्रथ जाधव, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

७. बोली भाषा संशोधनाच्या नव्या दिशा संपादक : डॉ. म. सु. पगारे आणि डॉ. म. सु. पगारे आणि डॉ. आशुतोष पाटील, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

८. शिविम संशोधन पत्रिका (बोली विशेषांक) संपादक, डॉ. शिवकुमार सोनाळकर, शिवाजी विद्यापीठ, मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर.

९. शिविम संशोधन पत्रिका (बोली विशेषांक भाग २) संपादक, डॉ. शिवकुमार सोनाळकर, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर.


**४.१० उपक्रम**

१. आपण रहात असलेल्या परिसरातील किंवा तालुक्यातील बोलीचे नमुने जमा करून त्याचे विश्लेषण करा.

२. ग्रामीण, दलित आणि आदिवासी साहित्यातील बोलीतील शब्द संग्रहित करा.

***

# घटक - १
# बोली संरचना विचार

## १.१ उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस;

१) बोली भाषेचे स्वरूप समजेल.

२) बोली भाषेची संरचना समजावून घेता येईल.

३) बोलीची स्वनिम संकल्पना स्पष्ट होईल.

४) बोलीचा रूपिम विचार समजेल.

५) बोलीचा वाक्यविचार स्पष्ट होईल.

## १.२ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो, यापूर्वीच्या अभ्यासात आपण बोलीविषयी सविस्तर जाणून घेतले आहे. कोणत्याही प्रमाण भाषेच्या विस्तृत प्रदेशात भौगोलिक, जातीय, व्यावसायिक स्तरानुसार अनेक समुदाय वावरत असतात त्यांच्या अंतर्गत व्यवहारासाठी वापरली जाणारी भाषा प्रमाण भाषेला जवळची पण दुसऱ्या समुदायापासून भिन्न स्वरूपाची असते. भाषा वैज्ञानिक दृष्टिकोनातून उच्चार व अर्थदृष्ट्या या भाषांमध्ये फरक असतो. मात्र प्रमाणभाषेचे काही घटक त्यांच्यामध्ये कार्यरत असतात. अनेक पोटभेद असले तरी या भाषांची नाळ प्रमाणभाषेशी जुळलेली असते. एकंदरीत व्याकरणिक संरचना, शब्दयोजना, भाषिक प्रवृत्ती जुळलेल्या असूनही स्वतःचे रूप मात्र वेगळे व स्वयंपूर्ण अशी बोलीची रचना असते. प्रथम दर्शनी बोली वेगळी वाटत असली तरी तिच्यावर ध्वनी, शब्द, वाक्य, अर्थ या सर्वच पातळीवर प्रमाणभाषेचा कमी-अधिक प्रभाव आढळतो. आजवर आपण विस्तृत प्रभावाच्या व मोठ्या प्रमाणावर दैनंदिन व्यवहार व शासकीय पातळीवर वापरात असलेल्या भाषांचा ध्वनी, शब्द, अर्थ या पातळीवर सूक्ष्म अभ्यास केला. प्रस्तुत प्रकरणात बोलींच्या पातळीवर तसाच सूक्ष्म अभ्यास करावयाचा आहे. जगभरातील कोणत्याही भाषेत त्या भाषिक समुदायाने वारंवार व बहुसंख्येने वापरले जाणारे ध्वनी हे मूलभूत घटक ध्वनींच्या संयोगाने तयार होणारे शब्द आणि शब्दांच्या क्रमबद्ध रचनेतून अर्थ व्यक्त करणारी वाक्यरचना अशी भाषिक संरचना असते. बोलीची संरचनाही अशीच ध्वनी शब्द-अर्थ स्वरूपाची असते. बोलीची संरचना ही अशीच ध्वनी-शब्द अर्थ स्वरूपाची असते. प्रस्तुत प्रकरणात या संरचनेचा सोदाहरण परामर्श घ्यावयाचा आहे.

## १.३ विषय विवेचन :

आधुनिक युगात इंग्रजी ही भाषा जगभरातील जीवन व्यवहार प्रभावित करत असली तरी जवळपास तीन

हजार प्रमाण भाषा जगभर वापरल्या जात आहेत. या तीन हजार भाषांना आज प्रमाणभाषेचा, राजभाषेचा दर्जा लाभला आहे. त्यामधून ग्रंथव्यवहार व त्या त्या देशांचा प्रशासकीय कारभार चालतो. त्यांच्या व्याकरणिक संरचना सिद्ध झाल्या असून त्यांना स्वतःची लिपी आहे. मात्र पूर्वी या सर्वच भाषा बोली भाषा होत्या. भाषा वैज्ञानिकांनी अथक संशोधनाने त्यांच्या प्रवृत्ती, परंपरा, शब्दभांडार व साहित्य यांचा अभ्यास करून व्याकरणिक संरचना व आकृतिबंध तयार केला. विशिष्ट संरचना, निश्चित आकृतिबंध आणि भाषेची मर्मस्थळे यांच्या तौलनिक अभ्यासाने त्यांची एकूण अठरा जागतिक कुळात विभागणी केली गेली. भारताच्या विशाल भूप्रदेशातील सद्या वापरात असलेल्या भाषा यातील चार कुळात विभागलेल्या आहेत. इंडो युरोपियन, द्राविडी, ऑस्ट्रीयन आणि सिमो-तिबेटीयन अशी चार कुळे आहेत. यातील इंडो-युरोपियन हे भाषाकूळ सर्वात मोठे आणि प्राचीन भाषांचे आहे. जगातील जवळपास साठ टक्के भाषा या कुळातील आहेत. संस्कृत ही प्राचीन भाषा आणि मराठी, हिंदी, असामी, बंगाली, गुजराती, पंजाबी व सिंधी या आधुनिक भाषा इंडो-युरोपीयन कुळातील आहेत. जॉर्ज ग्रियर्सन यांच्या 'The Linguistic survey of India' (१८९४ ते १९२८) या ग्रंथात १७९ भाषा आणि ५४४ पोटभाषांचे सर्वेक्षण केले गेले आहे. यातील मोजक्याच भाषा भारतीय स्वातंत्र्यानंतर भाषावार राज्यनिमिर्तीमुळे प्रमाणभाषा व राजभाषा म्हणून प्रस्थापित झाल्या, उर्वरीत भाषांना बोली रूपातच राहावे लागले. प्रमाण भाषांची लिपी स्वतंत्र असल्याने ती माध्यमांची भाषा त्या बनल्या व वेगाने प्रसारित झाल्या.बोली भाषा या प्रमाणभाषेच्या भगिनी असल्या तरी लिपी अभावी विशिष्ट प्रदेश, जात समूह यांमध्ये दैनंदिन व्यवहारापुरत्या बंदिस्त राहिल्या. उदा. सद्याची मराठी ही सतराव्या शतकातील पुणे परिसराची बोली, मात्र उत्तर पेशवाई आणि इंग्रजी आमदनीत पुणे महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचा केंद्रबिंदू असल्याने तेथील भाषेचा प्रसार वेगाने झाला. वऱ्हाडी, जंगी, हळबी, कोकणी, वैदर्भी, अहिराणी अशा विस्तृत भूप्रदेशाच्या मराठी बोली पुणेरी बोलीच्या सत्ता वर्तुळातील प्रदेशाने बाजूला पडल्या. गोवा स्वतंत्र राज्य झाल्यावर वरील बोलींपैकी कोकणी राजभाषा झाली पण तिला स्वतंत्र लिपी नसल्याने प्रसारास मर्यादा आल्या.

भारतात सद्यःस्थितीला जवळपास पाचशे बोली बोलल्या जातात. त्यांना स्वतःची ध्वनी व्यवस्था, शब्द भांडार आणि व्याकरणिक रचना आहे. भारतीय व महाराष्ट्रीय बोलींचे काही अपवाद वगळता व्याकरणिक दृष्ट्या काटेकोर मांडणी झालेली नाही. त्यांना स्वतःची लिपी नसल्याने ग्रंथसंपदा निर्माण होऊ शकली नाही. मौखिक साहित्य मात्र विपूल प्रमाणात आहे. आधुनिक प्रसार माध्यमांच्या प्रभावाने इंग्रजी, हिंदीसारख्या भाषा बोलींना गिळंकृत करत आहेत. चित्पावनी सारख्या काही बोली नामशेष झाल्या आहेत तर बाकीही त्याच वळणावर असल्याने त्यांचा विस्तृत व सूक्ष्म अशा दोन्ही पातळीवर अभ्यास करून त्या जतन करण्याची आवश्यकता आहे. संरचनावादी भाषा वैज्ञानिकांनी बोलींचा सूक्ष्म अभ्यास करून तिचे जतन, संवर्धन करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय भाषांचे सूक्ष्मतर अभ्यास प्रकल्प वेळोवेळी हाती घेण्यात आले आहेत. विशेषतः मराठी भाषा व तिच्या बोली यांचा अभ्यास अनेक भाषा अभ्यासकांनी उत्तम रीतिने केला आहे. झुल ब्लॉक व (La formation de la Langue Marathe 1920) डॉ. सु. मं. कत्रे (Formation of Konkani) यांनी दोन महत्त्वाचे शोध प्रबंध मांडले आहेत. प्रा. अ.का. प्रियोळकर व (ग्रांथिक मराठी भाषा आणि कोकणी बोली - १९६६) ना. गो. कालेलकर (भाषा : इतिहास आणि भूगोल-१९६४) यांनी कोकणी बोली संदर्भात महत्त्वाचे संशोधन केले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा 'survey of Marathi dialects' हा १९६२ चा प्रकल्प, डॉ. सु.म.डोळके यांचा 'वैदर्भी बोलींचा कोश' (१९७४), डॉ. व. कृ. वऱ्हाड पांडे यांचा 'नागपूरी बोली' (१९७२) हा प्रबंध, पा. मा. चांदोस्कर यांचा 'खानदेश व खानदेशी भाषा' हा प्रबंध तसेच भा. रं. कुलकर्णी (अहिराणी भाषा व संस्कृती) व डॉ. हरिश्चंद्र बोरकर (झाडी बोली) यांचे ग्रंथ मराठी बोलींचा अभ्यास सविस्तरपणे मांडतात. 'Peoples Linguistic survey of India' हा डॉ. गणेश देवींचा भारतीय भाषांचे लोक सर्वेक्षण मांडणारा बृहद प्रकल्प २०१३ मध्ये पूर्ण झाला आहे.

एकंदरीत भारतीय भाषा व मराठी भाषेच्या बोलींच्या व्यापक अभ्यासाची विस्तृत मांडणी झाली आहे. मराठीच्या कोकणी, मालवणी, खानदेशी, वऱ्हाडी, नागपूरी, डांगी व इंदूरी या प्रादेशिक बोली,कोष्टी कोळी, मांगी, कऱ्हाडी, गावडी, हळबी अशा जातीपर बोली, कातकरी, वारली, ठाकरी अशा आदिवासी जमातींच्या बोलींचे संशोधन झाले आहे. याबरोबरच पोवारी, चंदगडी, कोल्हापूरी, बाणकोटी, कुडाळी चित्पावनी अशा बोलींची अभ्यासपूर्ण मांडणी विविध संशोधनांच्या निमित्ताने झाली आहे. वरील पूर्वाभ्यासाचा परामर्श घेता एक बाब निदर्शनास येते की, वरील बोलींचे परिचय व स्वरूप अभ्यास भरपूर झाले. पण भाषिक संरचनेची काटेकोर मांडणी अगदी मोजक्याच बोलींची झाली आहे. भाषेतील शब्द, म्हणी, वाक्प्रचार, गीते, कथा आदी नमुने गोळा करून भाषेचे वेगळेपण मांडण्यावर अधिक भर दिसून येतो. या माहितीचे विश्लेषण करून भाषेची स्वतंत्र वर्णव्यवस्था, व्याकरणिक रचना, प्रत्यय, संधी, समास, वाक्यविन्यास असा सूक्ष्म अभ्यास फार कमी बोलींचा मांडला गेला आहे. डॉ. सु. मं. कत्रे (कोकणी) व डॉ. हरिश्चंद्र बोरकर (झाडी बोली) यांनी मात्र बोलींची ध्वनीव्यवस्था ते अर्थव्यवस्था अशी संरचनात्मक मांडणी सिद्ध केली आहे. अहिराणी बोलीचेही सूक्ष्म संशोधन झाले आहे.

प्रत्येक बोली भाषेची स्वत:ची सरंचना असते. कोणत्याही प्रमाण भाषेप्रमाणेच तिचा ध्वनी, शब्द, वाक्यरचना आणि अर्थ असा निश्चित आकृतिबंध असतो. बोली बोलणाऱ्या भाषिक समुदायाकडे तो परंपरेने आलेला असतो. प्रवाही लवचिकतेने त्यातील विविध घटकात परिवर्तनही होत असते. वरील विवेचनात आलेल्या मराठी बोलींचे स्वयंपूर्ण रूप प्रमाण मराठीशी साधर्म्य दर्शवते, मात्र ते जसेच्या तसे नाही. ध्वनी, शब्द, अर्थाच्या पातळीवर बारकाईने पाहिल्यास त्यातील फरक आपल्या लक्षात येईल. प्रथम आपण ध्वनी विचारापासून सुरूवात करू.

**१.३.१ ध्वनी विचार :** जगभरातील सर्व मानवी भाषांना स्वत:चे निश्चित ध्वनी आहेत. त्या त्या भाषिक समुदायाच्या भाषिक वापरातून बहुसंख्येन येणारे, वारंवार येणारे आणि आवश्यकतेप्रमाणे मोडून-तोडून वापरले तरी रचनेला अर्थ प्राप्त करून देणारे ध्वनी त्या भाषेचे भाषिक ध्वनी असतात. प्रत्येक भाषेत त्यांची संख्या वेगळी असते. संस्कृत भाषेत-५२, हिंदीत-४९, इंग्रजीत-२६ तर मराठीत-५० अशी ध्वनीसंख्या आहे. या ध्वनींना भाषेचे मूलध्वनी किंवा वर्ण असेही म्हणतात. मराठीत सविस्तर मांडणी झालेल्या 'झाडी' बोलीत ३४ तर कोकणी बोलीत ४६ मूलध्वनी आहेत. झाडी आणि कोकणी या मराठीच्या पोटभाषा असल्या तरी त्या बोली भाषिकांच्या ध्वनी वापरण्याच्या पद्धतींमुळे ध्वनींची संख्या बदलली आहे. मराठी ध्वनीच्या संख्येपेक्षा कोकणीत २ ध्वनी तर झाडी बोलीत १४ ध्वनी कमी आहेत. सविस्तर तुलनेसाठी तिन्हींमध्ये असलेले नेमके

ध्वनी आणि त्यांचे भाषिक वर्तन पाहू.

**१.३.१.१ मराठी वर्ण माला :**

**स्वर**- अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, अॅ, ऐ, ओ, ऑ, औ, = १४

यातील अॅ, ऑ, हे स्वर इंग्रजीच्या संपर्काने आले आहेत. ऋ त लृ पासून स्वतंत्र मराठी शब्द तयार होत नाहीत. पण संस्कृत तत्सम शब्द नित्य व्यवहारात रूढ आहेत. तर 'क्लृप्ती' हा एकमेव शब्द रूढ असल्याने 'लृ' ला वगळता येत नाही.

**स्वरादी –** अं, अः = ०२

**व्यंजने –** मराठीत एकूण ३४ व्यंजने असून ती भाषेत स्वरांच्या मदतीने येतात. म्हणून त्यांना स्वरांत असेही म्हणतात.

क् , ख् , ग् , घ् , ङ्

च् , छ् , ज् , झ् , ञ्

ट् , ठ् , ड् , ढ् , ण्

त् , थ् , द् , ध् , न् ,

प् , फ् , ब् , भ् , म्

य् , र् , ल् , व्

श् , ष् , स्

ह् , ळ् = ३४

**संयुक्त व्यंजने –** क्ष् , ज्ञ् = ०२

संयुक्त व्यंजने ही अनेक व्यंजनांच्या एकत्रिकरणातून येत असल्याने त्यांचा वर्णमालेतील क्रम 'ळ' नंतर ठेवण्यात आला आहे.

(दि. ६ नोव्हेंबर २००९ रोजीच्या महाराष्ट्र शासन निर्णयानुसार वरील ५० वर्ण मराठी भाषेत आहेत.)

**१.३.१.२ 'झाडी' बोलीचा ध्वनी विचार (वर्णमाला) :**

वैनगंगेच्या पूर्वभागाचा म्हणजेच पूर्व नागपूर, चंद्रपूर, भंडारा आणि गडचिरोली या जिल्ह्यांचा अंतर्भाव झाडी पट्टीमध्ये होत असून या प्रदेशाची बोली 'झाडी बोली' म्हणून ओळखली जाते. झाडी बोलीत एकूण ३४ मूलध्वनी असून त्यामध्ये ६ स्वर आणि २८ व्यंजने आहेत.

**स्वर –** अ, आ, इ, उ, ए, ओ = ६

**व्यंजने –**

क् , ख् , ग् , घ् , ङ्

च् , ज् , झ् ,

ट् , ठ् , ड् , ढ् ,

त् , थ् , द् , ध् , न् ,

प् , फ् , ब् , भ् , म्

य् , र् , ल् , व्

स् , ह = २८

झाडी बोलीच्या वर्णमालेचा विचार करता प्रमाण मराठीतील ६ स्वर, २ स्वरारी आणि ६ व्यंजने तिच्यात आढळत नाहीत. मराठीतील दोन संयुक्त व्यंजने आणि इंग्रजीतील २ स्वरांचाही स्वीकार झाडी बोलीने केलेला नाही. झाडी पट्टीतील अधिक लोकांच्या वापरात वरील ध्वनी नसल्याने मराठीची बोली असूनही तिच्या वर्णमालेत या ध्वनींचा समावेश नाही.

### १.३.१.३ कोकणी बोलीचा ध्वनिविचार (वर्णमाला) :

पश्चिम घाट आणि अरबी समुद्र यांच्या दरम्यानच्या भूप्रदेशाला, ज्याच्या उत्तरेस दमण आणि दक्षिणेस म्हैसूरचा प्रदेश आहे. त्याला कोकण असे म्हटले जाते. ठाणे, कुलाबा, मुंबई आणि उपनगरे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, गोवा आणि त्याच्या दक्षिणेकडील काही भाग एवढा भूभाग 'कोकण' मध्ये येतो. त्यापैकी मुंबई आणि उपनगरे मिश्र लोकवस्तीमुळे तर गोवा बहूभाषिक संस्कृतीमुळे भाषिकदृष्ट्या सद्या वेगळे ठरतात. उर्वरीत प्रदेशाची बोली कोकणी मानली जाते. मुंबई आणि उपनगरात आता कोकणी कोकणात मर्यादित व्यवहारासाठी वापरली जाते. गोव्यात राजभाषा व स्थानिक व्यवहारात कोकणी तर इतर बाह्य भाषिकांबरोबर मराठी, पोर्तुगीज, हिंदी, इंग्रजी अशा भाषेत व्यवहार केला जातो. उर्वरीत प्रदेशाची बोली कोकणी असे मानले जात असले तरी त्यामध्ये मालवणी, कुडाळी, बाणकोटी असे अनेक पोटभेद आहेत. कोकणी बोलीच्या ध्वनींचे विवरण पुढीलप्रमाणे -

**स्वर –** अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, अॅ, ओ, औ, अं = ११

**व्यंजने –**

क् , ख् , ग् , घ् ,

च् , छ् , ज् , झ् ,

च़, छ़, ज़ , झ़,

ट् , ठ् , ड् , ढ् , ण्

त् , थ् , द् , ध् , न् ,

प् , फ् , ब् , भ् , म्

य् , र् , ल् , व्

श् , स्

ह , ळ = ३५ . . . .

वरील अॅ, ऑ हे स्वर मराठी प्रमाणेच इंग्रजीतून आले आहेत. तर च् , छ् , ज् , झ् , ही ध्वनिचिन्हे दन्त्य अर्ध स्फोटकांसाठी आली आहेत. (उदा.- चारा, जाडा इ.)

या वर्णमालेत कोकणींचे मूलध्वनी मराठी ध्वनी व्यवस्थेप्रमाणेच वाटत असले तरी मराठीतील तीन स्वर, तीन व्यंजने आणि एक स्वरारी कोकणीत नाही. तसेच लिपीतील ध्वनीचिन्हे सारखी दिसली तरी कोकणातील उच्चार पद्धती, हेल, आंदोलन, आघात इ. बाबतीत मराठीपेक्षा वेगळी आहे.

झाडी आणि कोकणी या मराठीच्या पोटभाषा असल्या तरी त्यांचे स्वरूप पूर्णत: सारखे नसते. हे ध्वनी व्यवस्थेवरून आपल्या लक्षात आले असेल. बोली भाषांचा स्वत:चा आकृतिबंध असतो. कोणत्याही प्रमाणभाषेशी त्या संबंधित असल्या, त्या भाषेची लिपी वापरत असल्या, काही भाषिक घटकांची देवघेव करत असल्या तरी त्या प्रमाणभाषेवर सर्वस्वी अवलंबून नसतात. बोलीला स्वत:चे स्वयंपूर्ण रूप असते. त्यामुळेच अहिराणी, झाडी, कोकणी भाषिक लोकांना मराठी भाषा समजते. पण मराठी भाषिक लोकांना वरील सर्व भाषा समजतीलच असे नाही. वरील वर्णमालांच्या अवलोकनातून काही ध्वनी तिन्ही भाषांमध्ये समान दिसतात. पण त्यांचा भाषिक वापर भिन्न स्वरूपाचा असू शकतो. भाषेच्या मूलध्वनींचा वापर तो भाषिक समाज अशाप्रकारे करतो याचा विचार आधुनिक भाषा विज्ञानामध्ये 'स्वन-स्वनिम-स्वनांतर' या संकल्पनेद्वारे केला जातो. वर्णनात्मक भाषा विज्ञानात भाषिक ध्वनींचा अभ्यास सूक्ष्म पातळीवर करणारी ही संकल्पना आहे. बोलीच्या मूलध्वनींचा अभ्यास आपणास या संकल्पनेच्या आधाराने करावयाचा आहे.

### १.३.२ स्वन-स्वनिम-स्वनांतर संकल्पना :

ध्वनी हे मानवी भाषेचे माध्यम आहे. मानवी मुखावाटे असंख्य ध्वनी उच्चारले जातात. काही ध्वनी स्वतंत्र स्वरूपात असतात तर काही संयुक्त म्हणजे जोड स्वरूपात असतात. (उदा- खोकणे, खाकरणे, शिंकणे इ.) जे ध्वनी स्वतंत्र-सुट्या स्वरूपात अगदी लहान रूपात भाषेत वापरले जातात त्यांना भाषिक ध्वनी असे म्हणतात. ज्या भाषेत जे ध्वनी बहूसंख्य लोक वापरतात आणि वारंवार त्यांचा उपयोग केला जातो ते त्या भाषेचे मूलध्वनी मानले जातात. पारंपरिक व्याकरणात त्यांना मूलध्वनी वर्णाक्षर असे संबोधले जात होते. आधुनिक वर्णनात्मक भाषा विज्ञानात त्यांना स्वन असे म्हंटले जाते. स्वन हा ध्वनीच असतो. तो सर्वात लहान भाषिक असून स्वतंत्रपणे येतो. निव्वळ उच्चारला गेलेला व भाषेत न वापरला जाणारा तो ध्वनी व भाषेत वापरला गेलेला ध्वनी म्हणजे स्वन अशी याची सुटसुटीत संकल्पना आहे. मानवी मुखावाटे उच्चारले गेलेले सर्वच ध्वनी स्वन होऊ शकत नाहीत. काही भाषांतील ध्वनी उच्चारणाच्या दृष्टीने समान असले तरी प्रत्येक भाषेतील त्यांचे कार्य वेगळे असल्याने ते सर्व भाषांचे स्वन ठरू शकत नाहीत.

उदा- इंग्रजी A व आणि मराठी ए, इंग्रजी E आणि मराठी इ

हे उच्चारणदृष्ट्या समान असले तरी दोन्ही भाषांतील त्यांचा वापर भिन्न स्वरूपाचा असल्याने ते एक दुसऱ्याची जागा घेऊ शकत नाहीत.

स्वन म्हणजे भाषेत वापरले जाणारे मूलध्वनी, त्यांचे समान कार्यावरून लक्षणावरून गट बनवता येतात.

समान लक्षणांच्या गटातील ध्वनीसाम्याचा आदर्श ध्वनी म्हणजे स्वनिम होय. 'स्वन', 'स्वनिम' हे प्रत्यक्ष भाषेत मात्र येत नाहीत. भाषेत स्वनांतरे येतात. स्वन हा मूलध्वनी. मूलध्वनी भाषिक गरजेनुसार बदल होऊन प्रत्यक्ष वापरात येतो. भाषेत येताना त्याच्या उच्चारात काही अंशी बदल होतात व मूळ उच्चारापासून थोडे अंतर पडते. अशा मूळ रूपापासून बदललेल्या स्वनाला स्वनांतर असे म्हणतात. स्वन भाषेत येताना काही स्वरूपात बदलला तरी त्याचे मूळ गुण कायम असतात. त्याला स्वनिक साम्य असे म्हणतात. स्वनिक साम्यावरून स्वनांचे गट कल्पिता येतात. स्वनिक साम्यातील आदर्श ध्वनी म्हणजे स्वनिम होय. या संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी त्याची सविस्तर माहिती घेऊ.

### १.३.२.१ 'स्वन' :

मानवी मुखावाटे अनेक ध्वनींची निर्मिती होते, पण अशा सर्वच ध्वनींची भाषेला गरज नसते. जे ध्वनी भाषेत वापरले जातात त्यांनाच स्वन असे संबोधले जाते. स्वतंत्र ध्वनींबरोबरच टक्टक्, चक्चक्, शुक्शुक्, थक्क, शीळ वाजवणे, शिंकणे, खोकणे असे ध्वनी निर्माण करता येतात. मात्र असे गटाने येणारे जोड ध्वनी भाषिक गरजेनुसार मोडून-तोडून स्वतंत्रपणे वापरता येत नाहीत. त्यामुळे त्यांना स्वन म्हणता येत नाही. कोणताही ध्वनी स्वन होण्यासाठी तो त्या भाषेचा सर्वात लहान घटक असला पाहिजे. त्याला स्वत:चा अर्थ नसतो. मात्र तो ज्या रचनेत वापरला जाईल त्या रचनेला अर्थ दिला किंवा बदलला पाहिजे. तो त्या भाषेतील बहुसंख्य लोकांनी वापरला पाहिजे व वारंवार वापरला गेला पाहिजे. या कसोटीवर मराठीचे ५० वर्ण, कोकणीचे -४६ वर्ण आणि झाडीचे ३४ वर्ण हे त्या भाषांचे स्वन आहेत. कारण त्या वर्णाचा वरील निकषांनुसार त्या त्या भाषांत वापर होतो. भाषेतील स्वन म्हणजे ध्वनीच असतात. शब्दांची फोड केल्यावर सर्वात लहान जो घटक असतो त्याला ध्वनी म्हटले जाते. त्याला भाषेत वापरल्याने वर्णनात्मक भाषाविज्ञानाच्या संकल्पनेत 'स्वन' म्हणून संबोधले जाते. स्वनांचे स्वरूप पुढीलप्रमाणे पाहता येईल. यासाठी 'काय' हा शब्द घेऊ यामध्ये प्रथम दर्शनी दोन अक्षरे दिसतात. पण प्रत्यक्षात विग्रह केल्यावर अधिक ध्वनी आढळतात. 'काय' - का, य ही दोन अक्षरे

क+आ  य + अ असा त्यांचा विग्रह होतो.

यातील आ या दीर्घ स्वराचाही अ+ अ असा विग्रह होतो. म्हणजेच 'काय' या एका शब्दात क+ अ+ अ  य+ अ असे पाच ध्वनी आहेत.  यातील 'का' मधील दीर्घ 'आ' मुळे चार स्वन बनले. त्यांच्या एकत्रिकरणातून दोन अक्षरांचा एक शब्द बनला आहे. यातील 'क + आ य +अ' हा काय शब्दाचा स्वनिक परिसर होय. स्वनिक परिसर म्हणजे विशिष्ट शब्दात येणाऱ्या क्रमवार ध्वनींची रचना.

स्वनांची तपासणी करताना अर्थ बदल ही कसोटी वापरली जाते. वरील स्वनिक परिसरातील एखादा स्वन बदलला आणि शब्दाचा अर्थ बदलला तर तो त्या भाषेचा स्वन होऊ शकतो. शब्दातील 'क' च्या ठिकाणी 'ह' हा स्वन वापरला तर ह + आ य+अ असा स्वनिक परिसर होऊन 'हाय' हा कोल्हापूरी बोलीतील आहे या अर्थी वापरला जाणारा शब्द तयार होतो. कोल्हापूरी भाषेत 'क' आणि 'ह' हे ध्वनी येतात त्यांना स्वतंत्र अर्थ नसला तरी '+आ य+अ' या स्वनिक परिसराला दोन स्वतंत्र अर्थ देतात म्हणजेच ते  स्वन ठरतात. याप्रमाणेच कवी-रवी,पाईक,- नाईक चढ-वढ, सोड-तोड, टाच-काच-वाच-लाच-नाच अशा समान स्वनिक परिसरांच्या शब्दांमध्ये केवळ एक स्वन बदलला की अर्थबदल होतो.

मानवी ध्वनी शिवाय निसर्गात किंवा आजूबाजूच्या परिसरात इतर अनेक ध्वनी उदा. पक्ष्यांचा, ढगांचा आवाज, यंत्रांचे आवाज इ.) ऐकू येतात पण ते भाषेत वापरले जात नसल्याने केवळ ध्वनी ठरतात. ते मानवी मुखावाटे सर्वांना सहज उच्चारता येत नाहीत. मोड तोड करून स्वतंत्रपणे भाषेत वापरता येत नाहीत. विशिष्ट संदर्भ सोडून इतर कोणत्याही अर्थ प्रकटीकरणाचे काम ते सहजपणे करू शकत नाहीत या कारणांनी त्यांना स्वन असे म्हणता येत नाही. स्वन म्हणजे काय ते नेमकेपणाने स्पष्ट होण्यासाठी त्यांची लक्षणे, गुणधर्म,वैशिष्टये सविस्तर पाहणे आवश्यक ठरेल. प्रत्येक ठिकाणी बोलीभाषा असा शब्द वापरण्याऐवजी विश्लेषणात भाषा हाच शब्दप्रयोग केला आहे.

**१.३.२.१.अ) स्वनांची लक्षणे :-**

१) मानवी मुखावाटे उच्चारल्या जाणाऱ्या व भाषेत वापरल्या जाणाऱ्या ध्वनीला स्वन असे म्हणतात.

२) स्वनाला स्वतःचा अर्थ नसतो (उदा. क,ख,ग, इ.) पण ते भाषेत येतात तेव्हा त्या शब्द रचनेला अर्थ प्राप्त होतो

३) सुटया स्वतंत्र ध्वनीला भाषेत आल्यानंतर स्वन म्हटले जाते, ते भाषेत क्रमवार रचनेने येतात. क्रमवार रचनेने आलेल्या स्वनांच्या गटांना स्वतंत्र अर्थ प्राप्त होतो, त्यांना 'शब्द' असे संबोधले जाते. शब्दातील क्रमवार ध्वनीरचना म्हणजेच स्वनिक परिसर होय. (उदा. काय- क+आ य+अ, हाय - ह+ आ य+अ)

४) प्रत्येक स्वनाचे भाषेतील लिपी चिन्ह सारखेच असले तरी उच्चार मात्र व्यक्तिपरत्वे भिन्न असतो. व्यक्तीचे वय शरीराची ठेवण,वावरण्याचे क्षेत्र व्यवसाय यांच्या प्रभावाने उच्चारण बदलते. यामुळेच प्रत्येक व्यक्तीचा आवाज वेगळा असतो व तो आपण स्वतंत्रपणे ओळखू शकतो. (उदा. लता मंगेशकर,सचिन तेंडूलकर,अमरीश पुरी यांचे आवाज आपण सहजपणे ओळखू शकतो)

५) प्रत्येक स्वनाचे उच्चारण अद्वितीय असते. एकदा उच्चारलेला स्वन पुन्हा तसाच उच्चारता येत नाही. वय परिस्थिती, हवामान यामुळे आपला आवाज बदलत जातो.

६) प्रत्येक स्वनाचा उच्चार इतर स्वनांपेक्षा वेगळा असतो.उदा. क,ख,ग,प या प्रत्येकामध्ये उच्चारण दृष्ट्या वेगळेपण आहे. व -प क -फ हे स्वन लिहिताना सारखे वाटत असले तरी उच्चारण वेगळे आहे. त्यामुळे शब्दांचे अर्थ वेगळे होण्यास मदत होते.

उदा. वट - पट     कट-फट

या प्रमाणे भाषेतील सर्वात लहान घटक असलेल्या स्वनांची लक्षणे सांगता येतील, प्रमाण व बोलीभाषेतील स्वनांची लक्षणे सारखीच असतात.

**१.३.२.१ ब) स्वनांचे प्रकार किंवा वर्गीकरण :**

भाषेत वापरल्या जाणाऱ्या ध्वनींना स्वन असे म्हटले जाते या न्यायाने बोलीतील ध्वनींनाही स्वन असेच संबोधले जाते. बोलीतही स्वर आणि व्यंजन असे दोन प्रकारचे ध्वनी असतात. त्यावरून स्वनांचे दोन मुख्य प्रकार पडतात. तसेच त्यांच्या प्रकार भेदावरूनही अंतर्गत उपप्रकार पडतात.

**१) स्वर स्वन** : ज्या स्वनांचा उच्चार करताना उच्चारेंद्रियात कुठेही हवेची अडवणूक होत नाही व ज्यांच्या उच्चारासाठी इतर कोणत्याही स्वनाच्या मदतीची आवश्यकता नसते अशा स्वनांना स्वर स्वन असे म्हणतात. कोणत्याही भाषेतील सर्व स्वर कोणत्याही अडथळा व कोणत्याही इतर स्वनांच्या मदती शिवाय उच्चारले जातात उदा.अ, आ, इ, ई, उ इत्यादी मराठी स्वर)

स्वर स्वन आवाजाच्या विविध पातळ्यांवर उच्चारले जातात. उच्चारांच्या लांबी-अवकाशानुसार ते ऱ्हस्व किंवा दीर्घ असतात. ते व्यंजनांच्या मदती शिवाय स्वतंत्र उच्चारले जातात.

उदा. झाडी बोलीतील अ,आ,इ,उ,ए, ओ हे स्वर आणि कोकणी बोलीतील अ,आ,इ,ई,उ,ऊ,ए,अॅ,ओ,ऑ, अं असे अकरा स्वर हे स्वर स्वन आहेत. त्यांच्या उच्चारासाठी कोणत्याही व्यंजनाचा आधार घ्यावा लागत नाही. झाडी बोलीत उच्चाराच्या लांबीवरून 'अ' आणि 'आ' हे ऱ्हस्व आणि दीर्घ स्वर स्वनांचे एकमेव उदाहरण आहे. कोकणी बोलीत मात्र अ-आ-इ-ई-उ-ऊ-अॅ-ऑ अशा ऱ्हस्व दीर्घ स्वर स्वनांच्या चार जोड्या आहेत.

**२) व्यंजन स्वन :-** ज्या स्वनांचा उच्चार उच्चारेंद्रियात कंठ,तालू,जीभ,दात ओठ इ. अवयवांच्या ठिकाणी फुफ्फुसातून येणाऱ्या हवेला अडवून केला जातो त्यांना व्यंजन स्वन असे म्हणतात.हे ध्वनी स्वतंत्र न येता स्वरांच्या आधाराने येतात म्हणून त्यांना व्यंजन स्वन असे म्हणतात. भाषेतील सर्व प्रकारच्या व्यंजनांना व्यंजन स्वन म्हणून संबोधले जाते. मराठीत ३४ व्यंजने, झाडी बोलीत २८ व्यंजने तर कोकणीत ३५ व्यंजने असल्याने त्या सर्वांना व्यंजन स्वन असे म्हटले जाते. कोकणीतील व्यंजनांचे वेगळेपण म्हणजे च्, छ्, ज्, झ् या व्यंजनांबरोबरच वेगळ्या उच्चारामुळे च, छ, ज, झ हे चार स्वतंत्र व्यंजन स्वन मानले जातात.स्वनांचे काही ठळक गुणधर्म पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) स्वर स्वन आणि व्यंजन स्वन भाषेत असतात. मात्र त्यांना स्वतंत्र अर्थ नसतो.

२) स्वन हे भाषानिरपेक्ष असतात. समान उच्चार असणारे स्वन अनेक भाषेत असतात पण त्यांचे प्रत्येक भाषेतील कार्य वेगळे असते.

३) स्वन भाषेत सुटे येत नाहीत

४) प्रत्येक स्वन दुसऱ्या स्वनाहून वेगळा असतो त्यालाच विभेदकता असे म्हणतात.

५) स्वन लवचिक असल्याने त्यांचा उच्चारणासाठी हवा तसा वापर करता येतो.

**१.३.२.२ स्वनिम विचार** : स्वन ही भाषानिरपेक्ष ध्वनींची संकल्पना आहे. स्वन भाषेत अथवा बोलीत वापरले गेले की त्या भाषेतील त्यांच्या कार्यावरून स्वनांचा एक गट कल्पिता येतो त्याला स्वनिम असे म्हणतात. प्रत्यक्ष स्वनिमही भाषेत अथवा बोलीत येत नाहीत बोलीतील स्वनांतराच्या स्वनिक साम्यावरून जे आदर्श ध्वनींचे गट कल्पिले जातात त्यांना स्वनिम असे म्हणतात. स्वनांच्या साम्यावरून मानला जाणारा आदर्श ध्वनी त्या गटाच्या मूळाशी असतो. आधुनिक भाषा विज्ञानात स्वनिम विचार ही संकल्पना सोस्यूर, प्रिन्स त्रूबेत्सकॉय (झेकोस्लोव्हेकिया) सपीर व ब्लूम फिल्ड (अमेरिका) यांनी स्वनिम केंद्रवर्ती मानून वर्णनात्मक भाषा विज्ञानाची उभारणी केलेली आहे. स्वनाचे बोलीतील वर्तन पाहून त्याचा स्वनिमांच्या गटात समावेश केला जातो. स्वनिम हा प्रत्यक्ष भाषेत दाखवता येत नाही.

भाषेत अथवा बोलीत मूळ स्वनावर आजूबाजूच्या ध्वनींचा (म्हणजे स्वनिक परिसरातील अगोदर किंवा नंतर येणाऱ्या स्वनांचा) परिणाम होऊन उच्चारात किंचित फरक पडतो. मूळ उच्चारापेक्षा त्या शब्दापुरता त्या स्वनाचा उच्चार थोडा बदलतो त्याला स्वनांतर असे म्हणतात. प्रत्यक्ष भाषेत स्वन अथवा स्वनिम न येता अशी मूळ उच्चारापासून थोडे अंतर असलेली स्वनांतरेच येत असतात. भाषेतील प्रत्यक्ष ध्वनी मूळ आदर्श उच्चारापासून थोडे बदललेले जाणवत असते तरी आपली ओळख विसरण्याइतके बदलत नाहीत. त्यामुळे ध्वनी साम्य (किंवा स्वनिक साम्य) वरून त्यांचा एक गट बनवता येतो. या गटाच्या केंद्रस्थानी त्या स्वनाचा एक काल्पनिक आदर्श उच्चार असतो. हा काल्पनिक उच्चार त्या भाषिक लोकांना उच्चारदृष्ट्या परिचयाचा असतो. अशा स्वनांच्या गटाला स्वनिम असे म्हटले जाते. आपण प्रत्यक्ष बोलीतील उदाहरणावरून स्वनिम संकल्पना समजून घेऊ.

उदा.-१. महादेव मोरेच्या साहित्यात निपाणी परिसराच्या बोलीतील इंगा (हिसका),इच्चू(विंचू),इस्कोट (सत्यानाश), इब्लीस (व्रात्य, खोडकर इ.) न्हाई (नाही) या प्रत्येक शब्दात 'इ' स्वन आहे. पण त्यांचा उच्चार प्रत्येकी वेगळा असल्याने त्यांना स्वनांतर असे म्हटले जाते.

२) शिराळा तालुका (जि.सांगली) बोलीतील दवखाना (दवाखाना), ग्वॉड(गोड), वटकाण (चूलीवरील भांड्याला दिलेला आधार, वंगाळ (वाईट), लवाण (डबरा), ववाळणी (ओवाळणी) या शब्दांत 'व' हा व्यंजन स्वन प्रत्येक शब्दात वेगळ्या उच्चाराचा आहे.

पहिल्या निपाणी परिसरातील बोलीत 'इ' हा स्वर स्वनिम असूनही त्याच्यावर बाजूच्या ध्वनींचा परिणाम स्पष्टपणे दिसून येतो. 'इच्चू'मधील 'इ' नंतर येणाऱ्या दूहेरी 'च्च' मुळे जोर देऊन उच्चारला जातो तर तेच 'इब्लीस'मध्ये त्यापेक्षा थोडा उच्चार लांबून तो अधिक सहजही येतो. न्हाई' मधील ई उच्चाराने दीर्घ तर आहेच पण त्यानंतर कोणताच ध्वनी नसल्याने मूळ 'ई' प्रमाणे अविकृत ध्वनी प्राप्त होतो. स्वतंत्रपणे भाषेत येणाऱ्या स्वर स्वनात बदल होतो त्यापेक्षा अधिक व्यंजन स्वनात होतो शिराळा बोलीतील वर दिलेले शब्द आणि त्यातील 'व' या स्वनाचे त्यातील वर्तन पाहू.

**१) दवाखाना –** या शब्दाचा द+अ व+अ ख+आ न+आ असा स्वनिक परिसर आहे. यातील 'व'चा उच्चार नंतर येणाऱ्या 'खा'मुळे लवकर संपतो –'व'[१]

**२) ग्वॉड –** ग + व + ऑ, ड+अ या स्वनिक परिसरात अगोदरचा कंठय 'ग' आणि नंतरचा 'ऑ' यामध्ये 'व' चा उच्चार अस्तित्वहीन जाणवतो व शब्दाचा उच्चार गॉड असा येतो व[२]

**३) वटकाण –** मध्ये 'व' वर कोणताच दबाव येत नसल्याने उच्चार सामान्य येतो तर वंगाळ मध्ये नंतर येणाऱ्या 'न' मुळे 'व' वर जोर येतो. दोन्ही शब्दात व सुरूवातीस येऊनही उच्चारात असा फरक जाणवतो – व[३] व[४]

**४) लवाण** मध्ये ल+अ, व +आ, ण्+अ मध्ये मात्र व अ आणि आ' या दोन स्वरांच्या मध्ये येत असल्याने सहज स्पष्टपणे स्वतःचे अस्तित्व दर्शवतो – व[५]

**६) ववाळणी** मध्ये पहिला 'व' सामान्य तर दुसरा व मात्र उच्चारणात वेगळेपणा (विभेदकता) दाखवण्यासाठी मात्र व्वा' असा जोडध्वनी प्रमाणे येतो.– व[६], व[७]

या सर्व शब्दांमध्ये 'व' हा स्वन आलेला आहे,पण भाषेत येताना तो मूळ रूपात न येता थोडा बदल होऊन आलेला आहे म्हणून आपण त्यांना व$^{१}$, व$^{२}$, व$^{३}$, व$^{४}$, व$^{५}$, व$^{६}$, व$^{७}$ असे म्हणून त्यांचे उच्चारण मूळ व पासून थोडे वेगळे आणि एकमेकांपासूनही बरेच वेगळे असल्याचे दिसते.अशा मूळ रूपापासून बदल झालेल्या भाषेतील स्वनांना स्वनांतर असे म्हणतात. पण जरी बदल असला तरी त्यांचे मूळ 'व' शी साधर्म्य पूर्ण लोप पावत नाही. आजूबाजूंच्या ध्वनींच्या प्रभावाने जरी उच्चारात थोडा बदल झाला तरी मूळ ध्वनीशी काही साम्य अबाधित असते यालाच स्वनिक साम्य असे म्हणतात. स्वनातील या साम्यावरून त्यांच्या ध्वनींचा एक गट किंवा वर्ग कल्पिता येतो त्यालाच स्वनिम असे म्हणतात. स्वनिम हा समान स्वनिक साम्य असणाऱ्या स्वनांचा काल्पनिक समूह असतो. तो प्रत्यक्षात भाषिक व्यवहारात नसतो मात्र भाषिक व्यवहारावरून त्याची मांडणी करता येते.भाषेत कार्यरत स्वनांतरावरून स्वनिमांची मांडणी केली जाते.

**१.३.२.२.१ स्वनिम लेखनाची पद्धत** : बोली किंवा भाषेत वापरल्या जाणाऱ्या स्वनांची प्रत्यक्ष वापरात स्वनांतरे बनतात. स्वनांतरातील स्वनिक साम्यावरून त्यांचा गट बनवला जातो. त्याच्या केंद्रस्थानी त्या बोली किंवा भाषेतील आदर्श ध्वनी असतो त्यालाच स्वनिम असे संबोधले जाते.

उदा. वरील विवेचनात शिराळा परिसरातील बोलीतील 'व' हा भाषा निरपेक्ष स्वन आहे. तसा तो सुटा व स्वतंत्र आहे. तेंव्हा त्याचा एक विशिष्ट उच्चार आहे. त्याला आपण आदर्श उच्चार म्हणू, तो जेव्हा वरील ६ शब्दात आला. तेव्हा त्याची व$^{१}$ ते व$^{७}$ अशी वेगवेगळी उच्चारणे मिळाली. ही सर्व स्वनांतरे आहेत. म्हणजे कोणताही प्रभाव नसलेला 'व' हा निव्वळ ध्वनी म्हणजे स्वन, त्यातील बदल म्हणजे स्वनांतरे तर या स्वनांतराच्या केंद्रस्थानी असलेल्या आदर्श उच्चाराचा 'व' म्हणजे स्वनिम होय. स्वनिम हा आदर्श ध्वनी '.।।' अशा दोन तिरप्या रेघांमध्ये लिहिला जातो, तर त्याची स्वनांतरे चौकोनी कंसात दर्शविली जातात. उदा. व् ⇒/व/- (व$^{१}$), (व$^{२}$), (व$^{३}$), (व$^{४}$), (व$^{५}$), (व$^{६}$), (व$^{७}$).

(स्वन) (स्वनिम) (स्वनांतरे)

(मूळ स्वनाचे प्रत्यक्ष शब्दातील वेगळे उच्चारण समजण्यासाठी त्यांना क्रमांक दिलेले आहेत. अशा प्रकारची स्वनांतराची कोणतीही क्रमवारी नाही, उदाहरणांप्रमाणे ती बदलत राहील अभ्यासाच्या सोयीसाठी हे संकेत वापरले जातात. प्रत्यक्ष भाषिक वापरात त्यांचा असा उल्लेख होत नाही)

**१.३.२.२.२ स्वनिमांचे प्रकार :-** बोलीसह सर्वच भाषांत स्वनिम अनेक प्रकारांनी कार्यरत असतात. त्यांच्या कार्यपद्धतीवरून त्यांचे दोन ठळक प्रकार पडतात. दोन शब्द अर्थदृष्ट्या वेगळे ठेवण्याचे काम स्वनिम करतात. ते पुढीलप्रमाणे

**अ) खंडयुक्त स्वनिम-** ज्या स्वनांचे भाषेत स्वतंत्र उच्चार होतात. (ज्यांना लेखनात स्वतंत्र चिन्ह असते) प्रमाण भाषेत अशा स्वर किंवा व्यंजन स्वनास खंडयुक्त स्वनिम असे म्हणतात. ते स्वतंत्र असतात त्यामुळे त्यांना खंडीत स्वनिम असेही म्हणतात.

उदा. अ,आ, क,च,प,इ, स्वर, व्यंजन अर्धस्वर स्वरादी आदी स्वनांचा या स्वनिमांत समावेश होतो.

**ब) खंडाधिष्ठित स्वनिम-** बोलीतील ज्या स्वनिमांना स्वतःचे अस्तित्व नाही (व प्रमाणभाषेतील ज्या

स्वनिमांना स्वतःचे लिपी चिन्ह नाही) पण विशिष्ट ध्वनींच्या उच्चारणात आघात, उच्चारण कमी-अधिक करणे, जोर देणे, विराम घेणे या भाषिक क्रियांनी शब्द किंवा वाक्याच्या अर्थात बदल साधला जातो अशांना खंडाधिष्ठीत स्वनिम असे म्हणतात. खंडाधिष्ठीत स्वनिम भाषेत स्वर, अर्धस्वर, स्वरादी व व्यंजने यांच्या आधाराने येतात. पूर्ण साम्य असणाऱ्या ध्वनीत काही विशेष गुणांच्या आधाराने अर्थबदल घडवण्याची क्षमता या स्वनिमांमध्ये असते.

खंडाधिष्ठीत स्वनिम हे समान भाषिक लोकांच्या परिचयाचे असतात. परभाषिकांना त्यांचे आकलन लवकर होत नाही. खंडाधिष्ठीत स्वनिमांचे उच्चारानुसार पुढील प्रकार होतात.

**१) अवधी –** अवधी म्हणजे ध्वनी उच्चारासाठी लागणारा काळ. भाषिक सवयीनुसार उच्चाराची वेळ निश्चित असते. बोली किंवा भाषिक लोकांच्या ती अंगवळणी पडलेली असते. उच्चाराच्या निश्चित वेळेपेक्षा वाढवून किंवा कमी करून अर्थात बदल करण्याची प्रक्रिया म्हणजे अवधी होय. शब्द लिहिताना सारखेच पण उच्चारताना त्यातील एखादा ध्वनी (स्वन) कमी किंवा जादा वेळ उच्चारून अर्थबदल केला जातो.

उदा- १) पुस्तक - पुस्तकं

या शब्दात शेवटच्या 'क्' नंतरचा अ स्वर नेहमीप्रमाणे उच्चारला की एकवचन तर तोच उच्चार नेहमीपेक्षा लांबवला की अनेकवचन करण्याची ग्रामीण मराठीची शैली आहे. इथे अनेकवचन म्हणून 'पुस्तके' येत नाही. 'अ' चा उच्चार लांबवून दीर्घ केला म्हणून 'अ' चा आ होत नाही. फक्त लिहिताना अनेकवचन दाखवण्यासाठी शेवटच्या 'क' च्या शीरोरेखेवर अनुस्वार दिला जातो.

२) लांबड - लांबडं

यातील 'लांबडं' हा कोल्हापूरी बोलीत कोणत्याही प्रक्रियेस आवश्यकतेहून जास्ती लागणारा अनावश्यक वेळ किंवा एखादी बाब गरजेपेक्षा अधिक ताणून धरणे अशा अनेक अर्थाने येतो. यातील शेवटचा अ स्वर सामान्य असतो. त्याचा उच्चार थोडा लांबवला की त्यातून सर्वस्वी भिन्न असा 'साप' या अर्थी 'लांबडं' हा प्रतिशब्द तयार होतो. भीतीवाचकतेमुळे साप, राक्षस, हडळ अशा शब्दांचा उल्लेख टाळणारी भाषाबंदी यामागे कार्यरत आहे. विशेष म्हणजे 'लांबडं' हा 'अ' चा उच्चार लांबवूनही ऱ्हस्वान्न राहिलेला शब्द 'लांबडा' या दीर्घांत शब्दाशी समानार्थी आहे.

**२) नासिक्य रंजन –** वास्तविक न् आणि म् हे नासिक्य उच्चार स्वतंत्र आहेत. ते खंडीत स्वनिम् आहेत. पण काही ध्वनींच्या नासिक्य उच्चाराने शब्दाचा अर्थ बदल होतो. तेव्हा त्यास नासिक्य रंजन असे म्हणतात. यांना स्वतंत्र अक्षरचिन्हाबरोबरच शीरो रेखेवर शीर्ष बिंदूने दर्शविले जाते.

उदा.- १) कस-कंस

(कस-शुद्धता, कंस-नाव, गणिती चिन्ह)

२) ऐशी-ऐंशी

(ऐशी - अशी, ऐंशी-गणिती अंक)

३) मास - मांस

(मास-महिना, मांस-प्राणी, पक्षाचे मांस, शरीराचा घटक)

३) **बलाघात –** शब्दातील एखाद्या अवयावर (म्हणजेच ध्वनीवर) आघात करून जोर देऊन उच्चार केला की रचनेचा अर्थ बदलतो. ज्याप्रमाणे शब्दातील ध्वनीवर जोर दिला की अर्थबदल होतो. त्याप्रमाणेच वाक्यातील शब्दावर जोर दिला तरी अर्थबदल होतो.

उदा– पुण्याची गोष्ट– सरळ उच्चार केल्यास 'पुणे शहराची गोष्ट' असा अर्थ होतो.

पुण्याची गोष्ट– 'ण्या' अक्षरावर जोर दिल्यास पुण्याई ची गोष्ट असा अर्थ होतो.

४) **सुरावली –** उच्चारातील आरोह–अवरोह (आवाजातील चढ–उतार) म्हणजेच सुरावली होय. एखादे विधान विविध सुरावलीत उच्चारले की विविध प्रकारचे अर्थ त्याच वाक्यातून निर्माण होतात.

उदा– नावात काय आहे – सरळ विधानार्थी उच्चार – 'काही नाही' असा अर्थ

नावात काय आहे ? – प्रश्नार्थी उच्चार – समोरच्याकडून माहिती, उत्तर अपेक्षित

नावात काय आहे – त्रयस्थ, तटस्थ उच्चार – अजिबात काही नाही

**५) सीमा संधी/विराम –** उच्चार करताना वाक्यातील विरामाची जागा बदलली की अर्थबदल होतो. शब्द, वाक्य यातील अर्थानुसार वेगळेपण ठेवण्यासाठी विरामाची गरज असते. पण काही रचनात उच्चारात विरामाची जागा बदलली की अर्थ पूर्णत: बदलतो. याला सीमा संधी स्वनिम असे म्हणतात.

उदा. – १) मी चोरी करणार नाही, केल्यास शिक्षा करा – वचन, खात्री

मी चोरी करणार, नाही केल्यास शिक्षा करा – आव्हान

२) म्या डाका घालणार नाई, घाटल्याव तुमाला वाटल त्ये करा.

म्या डाका घालणार, नाई घाटल्याव तुमाला वाटल त्ये करा.

वरील दोन्ही वाक्यात विरामाची जागा बदलल्याने पूर्णत: विरूद्धार्थी रचना तयार होते.

अशाप्रकारे प्रमाण भाषेतही कार्यरत असलेले स्वनिम बोलीतही तशाच स्वरूपाचे कार्य करताना दिसतात. आता प्रत्यक्ष बोलीत स्वन किंवा स्वनिमांपेक्षा येणाऱ्या स्वनांतराचे स्वरूप पाहू.

**१.३.२.३ स्वनांतर :** बोलीचे ध्वनी हे माध्यम आहे. बोलीत किंवा वापरल्या जाणाऱ्या ध्वनींना 'स्वन' ही संज्ञा वापरली जाते. हे आपण यापूर्वी पाहिले आहे. स्वन भाषेत येताना त्यांच्या क्रमवार रचनेतून शब्द बनतो. स्वन भाषानिरपेक्ष असून त्यांना स्वत:चा अर्थ नसतो. पण ते शब्दाला अर्थ देतात किंवा बदलतात. शब्दात येणारे स्वन एकरेषीय क्रमवार रचनेने येतात. अशा रचनेला शब्दाचा स्वनिक परिसर असे म्हणतात.

उदा.– 'वड' या शब्दाचा 'व्+अ ड्+अ' हा स्वनिक परिसर असून त्यामध्ये व् ,ड् हे व्यंजन स्वन आणि 'अ' हा दोन वेळा आलेला स्वर स्वन आहे. या स्वनिक परिसरात काही वेगळे स्वन मिळवले तर वेगळ्या अर्थाचे शब्द तयार होतात.

उदा– व्+अ ड्+अ – 'वड' – झाडाचे नाव

व्+अ ड्+अ+अ – वडा – पदार्थ, 'ओढा' बोलीत वडा

व्+अ+अ ड्+ह्+अ = वा+ढ = वाढ - विकास, वाढणे प्रक्रियेतील आदेशार्थी रूप.

या उदाहरणावरून कोणत्याही शब्दात 'व्यंजन स्वर+स्वर स्वन' यांच्या क्रमवार रचनेतून शब्द तयार होतो. शब्दातील स्वनांच्या रूपात त्याच्या स्वनिक परिसरातील इतर स्वनांमूळे बदल होतो. या वर लागलेल्या उच्चारण रूपास त्या मूळ स्वनाची स्वनांतरे असे म्हणतात.

उदा- मराठी भाषेत 'ग'हा कंठ्य अघोष ध्वनी आहे. त्याचा गणपती, गणेश, नागपूर या शब्दांतील उच्चार प्रत्येकी वेगळा असल्याचे बारकाईने पाहिल्यास दिसून येईल.

गणपती - मधील ग१ हा स्वन मूळ कंठ्य अघोष स्वरूपाचा आहे.

गणेश - मधील ग२ हा थोडा जोर देऊन उच्चारावा लागतो. शिवाय त्याचे उच्चारण स्थान मूळ कंठ उच्चारापेक्षा थोडे पुढे होते व जीभेचा मागील भाग टाळूला स्पर्श करून हवा पुढे ढकलावी लागते.

नागपूर - मधील ग३ हा त्यानंतर येणाऱ्या प च्या प्रभावाने 'ग' च्या शुद्ध उच्चाराऐवजी तो थोडा स्फोटक होऊन 'क' च्या जवळपास पोहोचतो व नागपूर चा उच्चार 'नाकपूर' असा होतो.

वरील तिन्ही शब्दांमध्ये 'ग' हा व्यंजन स्वनिम एकच असला तरी त्याच्या बाजूच्या स्वनिमांमूळे त्याच्या उच्चारात फरक पडतो. म्हणजेच 'ग' हा मूळ स्वन तर वरील ग१, ग२ ,ग३ हे त्याच्यापेक्षा थोड्या वेगळ्या उच्चाराचे स्वन म्हणजे त्याची स्वनांतरे आहेत. वर्णमालेत असलेला भाषिक ध्वनी म्हणजेच स्वन भाषेत आला की त्या शब्दाच्या आजूबाजूच्या स्वनांमुळे उच्चारदृष्ट्या किंचीत बदलतो. त्याला मूळ स्वनाचे स्वनांतर असे म्हणतात. अर्थात उच्चारात बदल होत असला तरी लिपी चिन्ह मात्र बदलत नाही. उच्चारातील बदल हा त्या भाषिक संरचनेची जाण असणाऱ्यांच्याच लक्षात येतो. त्यामुळे त्या भाषिक संरचनेच्या कक्षेतच स्वनांतराचा विचार करावा लागतो. त्यामुळेच स्वन हे भाषा निरपेक्ष तर स्वनांतरे ही भाषासापेक्ष आहेत असे म्हंटले जाते.

**१.३.२.४ 'स्वन-स्वनिम-स्वनांतर' :**

वरील विवेचनावरून बोलीत किंवा भाषेत बहुसंख्य लोकांनी वारंवार वापरला जाणारा ध्वनी म्हणजे स्वन हे आपण अभ्यासाचे आहे. हे स्वन भाषानिरपेक्ष आहेत. ते प्रत्यक्षात भाषेत न येता त्याची स्वनांतरे येतात. सर्वात लहान भाषिक घटक असलेला ध्वनी जेव्हा भाषेत येतो तेव्हा त्याच्या आजूबाजूला असणाऱ्या स्वनांमुळे त्याच्या मूळ रूपात फरक पडतो. प्रत्येक शब्दातील स्वनिक परिसर वेगळा असल्याने एकाच स्वनाचे अनेक उच्चार निर्माण होतात. ही सर्व त्या स्वनाची स्वनांतरे असतात. सर्व स्वनांतरे एकाच स्वनाची असली तरी त्यांच्या उच्चारात भिन्नता असते. त्यामुळे ती एकमेकांपासून वेगळी असतात. पण एकमेकांपासून उच्चार भिन्नता असलेली स्वनांतरे मूळ स्वनाशी काही साधर्म्य राखून असतात. या साधर्म्यालाच स्वनिक साम्य असे म्हणतात. स्वनिक साम्यावरून स्वनांतरांचा एक गट बनवता येतो. त्याच्या केंद्रस्थानी जो आदर्श ध्वनी असतो त्याला स्वनिम असे म्हणतात. स्वनिम स्वनाप्रमाणेच प्रत्यक्ष भाषेत दाखवता येत नाही. त्या भाषिक लोकांच्या कल्पनेत त्या स्वनाची असलेली आदर्श उच्चार कल्पना म्हणजेच स्वनिम असतो. एकंदरीत भाषेत वापरला जाणारा ध्वनी म्हणजे स्वन. भाषेत प्रत्यक्ष येताना त्याच्या उच्चारात होणारा बदल म्हणजे स्वनांतर आणि या स्वनांतरातील केंद्रवर्ती असणारा आदर्श ध्वनी म्हणजे स्वनिम अशी ही बोलीतील 'स्वन-स्वनिम-स्वनांतर' ही संकल्पना स्पष्ट करता येईल.

## १.४ रूपिम विचार :

भाषेचे कार्य ध्वनी, शब्द, वाक्य,(अर्थ) अशा तीन पातळ्यांवर चालते. जगभरातील सर्वच भाषांमध्ये सुमारे ३० ते ७० ध्वनींच्या आधाराने अगणित शब्दरचना शब्दांच्या जुळणीतून अगणित वाक्यरचना यातून भाषिक व्यवहार चालतो. भाषेतील मूलध्वनींच्या पातळीवर ध्वनींना स्वत:चा अर्थ नसला तरी त्यांच्या एकरेषीय क्रमवार रचनेतून तयार होणाऱ्या शब्दांना एक निश्चित अर्थ असतो. शब्द हा अर्थपूर्ण रचना असते व एकाच शब्दाला अनेक अर्थही असतात. अनेक ध्वनींचे जसे शब्द बनतात त्याप्रमाणेच मी, तू,ते, ती,हा,ही,पू,ऊ असे काही एकाक्षरी शब्दही भाषेत कार्यरत असतात. एका शब्दात अनेक छोटे शब्दही सामावलेले असतात. आपण नेहमीच्या बोलीत अशा एका शब्दात असलेल्या छोट्या अर्थपूर्ण रचनांना शब्द म्हणत असलो तरी वर्णनात्मक भाषा विज्ञानात त्यांना पद, रूप, किंवा रूपिका असे म्हणतात. बोलीची ध्वनी रचना समजण्यासाठी जशी आपण स्वन-स्वनिम-स्वनांतर ही संकल्पना पाहिली त्याप्रमाणे भाषेतील शब्द विचार समग्रपणे लक्षात येण्यासाठी रूपिका-रूपिम- रूपिकांतर ही संकल्पना अभ्यासणे आवश्यक आहे. भाषाविज्ञानात हीच संकल्पना पद-पदिम-पदांतर' या संज्ञेने ही ओळखली-मांडली जाते.

बोलीचा रूपिम विचार हा अर्थाच्या पातळीवरचा आहे. ही आधुनिक वर्णनात्मक भाषाविज्ञानातील संकल्पना असून भाषेचा सूक्ष्म पातळीवरचा विचार त्यामध्ये मांडलेला आहे. अनेक प्रमाणभाषांतून हा विचार मांडला असून मराठीतही त्याची चांगली मांडणी झाली आहे. बोलीतील रूपिम विचार स्पष्टीकरणासाठी विपुल शब्दसंग्रह उपलब्ध आहे मात्र मराठीच्या सर्वच बोलींचा अभ्यास आपणा सर्वांना असणे शक्य नाही त्यामुळे स्पष्टीकरणासाठी काही ठिकाणी प्रमाण मराठीतील उदाहरणे घ्यावी लागणार आहेत. मराठीच्या सर्वच बोलीत विपूल शब्दसंग्रह आहे. पण अभ्यासाच्या मर्यादेमूळे सर्व संज्ञा. संकल्पनांच्या स्पष्टीकरणातील अडचणी वाढतील. अभ्यासाच्या सोयीसाठी काही बोलीतील संदर्भ आणि अपरिहार्य ठिकाणी प्रमाण मराठीची मदत घेणे आवश्यक आहे.

### १.४.१ रूपिका (Morphs)

भाषेचे अर्थप्रकटीकरण हे महत्त्वाचे कार्य असून तिच्या निर्मितीमागे प्रधान हेतू तोच आहे. एका व्यक्तीकडून माहिती, ज्ञान, कल्पना, विचार यांचे ध्वनी माध्यमातून दुसऱ्या व्यक्तीकडे वहन करणारे माध्यम म्हणजे भाषा होय. भाषेतील ध्वनींच्या (स्वन) क्रमवार रचनेतून शब्द तयार होतात.ध्वनींच्या (स्वन) क्रमवार रचनेतून शब्द तयार होतात. ध्वनींना स्वतःचा अर्थ नसला तरी त्यांच्या एकत्रिकरणातून तयार होणाऱ्या शब्दांना स्वत:चा अर्थ असतो. काही एकाक्षरी शब्द अर्थपूर्ण आहेत. तर कधी कधी अनेक लहान शब्दांचा मिळून एक शब्द तयार होतो. एकाच शब्दाअंतर्गत असणाऱ्या लहान अर्थपूर्ण शब्दांना वर्णनात्मक भाषा-विज्ञानात रूप रूपिका किंवा पद अस म्हणतात. प्रस्तूत अभ्यासात आपल्याला 'रूपिका-रूपिम-रूपिकांतर' ही संकल्पना अभ्यासायची असल्याने येथे रूपिका (Morph) ही संज्ञा वापरू. इतरत्र याऐवजी पद किंवा रूप ही संज्ञा वापरली जाते.

रूपिका हा भाषेतील लहानात लहान अर्थपूर्ण घटक आहे.ध्वनींच्या एकत्रित रचनेने तयार होणारी सर्वात लघुत्तम सार्थ रचना म्हणजे रूपिका होय. मी तू, तो, ती, ते, हा, ही, हे अशी सर्वनामे, पू, उ असे एकाक्षरी शब्द यांनाही रूपिका म्हणता येते. त्यांची संख्या मर्यादित आहे. मराठी भाषा आणि तिच्या इतर बोलींमध्ये अनेक शब्द

आकाराने मोठे असून त्यामध्ये अनेक लहान पण अर्थपूर्ण शब्द समाविष्ट आहेत. रूपिका म्हणजे असे लहानात लहान अर्थपूर्ण शब्द असतात. मोठ्या शब्दाचा विग्रह केल्यास मूळ अर्थाशी साधार्म्य असणारे जी सर्वात लहान अर्थपूर्ण रचना मिळते तिला रूपिका असे म्हणतात.

उदा. 'जमीनदार' या शब्दाचा विग्रह केल्यास 'जमीन' व 'दार' अशा दोन रूपिका मिळतात. त्यांना स्वतंत्र पण मूळ अर्थाशी साधर्म्य दर्शविणारा अर्थ आहे. यातील 'दार' म्हणजे 'धारण करणारा' असा अर्थ घ्यावा लागेल. कोल्हापूरी बोलीतील 'दार लावणे', 'दार बांधणे' 'दार धरणे' या शब्द प्रयोगातील अनुक्रमे दरवाजा बंद करणे, सरी लावणे, सरीतील पाणी वळवणे अशा अर्थाने येणारा अर्थ येथे अभिप्रेत नाही.आणि पुन्हा जमीन चा विग्रह करून ज+मीन अशी दोन पदे मिळतील यातील 'ज' ला स्वतंत्र अर्थ नाही आणि मीन- म्हणजे 'मासा' असा अर्थ असलेली रूपिका मिळेल पण तिचा जमीनदार' या मूळ शब्दाशी काही संबंध नाही.

याप्रमाणेच ईनामदार, इमानदार शब्दांचा विग्रह केल्यावर ईनाम, इमान, दार अशी रूपिका मिळतात. पण त्यांच्या पुढे जाऊन नाम, मान अशा रूपिका करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचा मूळ शब्दाशी काही संदर्भ लागत नाही.

यावरून 'रूपिका' म्हणजे विशिष्ट अर्थ असलेला सर्वात लहान भाषिक घटक होय असे म्हणता येते. शब्दाचे अर्थदृष्ट्या विभाजन होते पण रूपिका अर्थदृष्ट्या सर्वात लहान घटक असल्याचे तिचे विभाजन करणे करणे शक्य नसते. रूपिकेला स्वतःचा अर्थ असतो आणि रचनेतील अर्थालाही वेगळे ठेवण्याचे कार्य रूपिका करत असते. रूपिकेला स्वतःचा अर्थ असला तरी तो शब्दसापेक्ष असतो. शब्दानुसार रूपिकेचा अर्थ बदलतो. उदा. विमान, इमानदार, कमान, मानसशास्त्र या सर्वच शब्दात 'मान' ही ध्वनींरचना दिसत असली तरी ती रूपिका होत नाही कारण 'मान' म्हणजे शरीराचा एक भाग किंवा गौरव ,सन्मान या अर्थी कोणत्याच शब्दात अशी रचना येत नाही.प्रत्येक शब्दात फक्त वापर आहे पण समानार्थता कुठेच दिसत नसल्याने ती रूपिका होत नाही. याप्रमाणेच किमयागार, थंडगार, आगार या शब्दांत गार या पदाचे अनुक्रमे कर्ता, विशेषण आणि इंग्रजी Depo साठी येणारा प्रतिशब्द असे भिन्न अर्थ येतात. त्यामध्ये अर्थदृष्ट्या समानता नसल्याने त्यांनाही एकाच प्रकारच्या रूपिका मानता येत नाही.

एकंदरीत रूपिका म्हणजे भाषेतील सर्वात लहान अर्थपूर्ण घटक होय. शब्दरचनेच्या मूळ अर्थाशी संबंधित साम्य दर्शवणारा अर्थ असलेले पदच रूपिका होऊ शकते. स्वतःचा असलेल्या रूपिकांबरोबरच काही स्वतःचा अर्थ नसलेल्या रूपिकाही भाषेत असतात. शब्दाच्या पूर्वी लागणारे उपसर्ग आणि नंतर येणारे प्रत्यय ह्या स्वतःला अर्थ नसणाऱ्या पण रचनेला अर्थ देणाऱ्या रूपिका असतात. उपसर्ग आणि प्रत्ययांना स्वतःचा अर्थ नसतो पण भाषिक रचनेला अर्थ देण्याचे, वाढवण्याचे किंवा बदलण्याचे कार्य त्या करत असतात. अर्थ आणि कार्यावरून रूपिकांचे पुढील प्रकार मानले जातात.

१) मुक्त-रूपिका-ज्या रूपिकांना स्वतःचा अर्थ असतो आणि ज्या वाक्यात स्वतंत्रपणे येतात त्यांना मुक्त रूपिका असे म्हणतात.

उदा. घर, माती, वेल, मूळ, बुंधा, शिंग, शेंडा, कोंभ इ.

२) बद्ध रूपिका - ज्या रूपिकांना स्वतःचा अर्थ नसतो पण त्या दुसऱ्या अर्थपूर्ण रूपिकेच्या आधाराने (म्हणजेच बद्ध होऊन) येतात त्यांना बद्ध रूपिका असे म्हणतात. या शब्दांच्या किंवा मुक्त रूपिकेच्या अगोदर किंवा नंतर जोडून येतात व स्वतंत्र किंवा वेगळ्या अर्थाचा शब्द तयार होतो.

या भाषिक प्रक्रियेमुळे स्वतंत्र अर्थ निर्माण होतो, मूळचा अर्थ बदलतो किंवा क्रियेविषयी अधिक माहिती मिळते. उदा. ईमान-बेईमान-विरूद्ध अर्थ

लायक - नालायक - विरुध्द अर्थ

झाड - झाडाला, झाडास, झाडात, झाडाने, झाडांनी यातील ला, स, त, ने, नी यांना स्वतःचा अर्थ नाही पण त्यांनी झाडाविषयी अधिक माहिती व्यक्त होते. अशाप्रकारे भाषेत,बोलीत स्वतःचा अर्थ असणाऱ्या मुक्त रूपिका आणि स्वतःचा अर्थ नसणाऱ्या पण रचनेला अर्थ देणाऱ्या बद्ध रूपिका कार्यरत असतात. त्यांच्या विविध प्रकारच्या संयोगातून भाषेत शब्दनिर्मिती सतत सुरू असते. त्यातील संयोगाच्या काही भाषिक क्रिया व त्यातून तयार होणारे काही शब्द पुढीलप्रमाणे आहेत.

१) मुक्त रूपिका+ बद्ध रूपिका - बाण +ने -बाणाने

२) बद्ध रूपिका + मुक्त रूपिका - बे+ईमान - बेईमान

अ+ज्ञान - अज्ञान

स+ ज्ञान -सज्ञान

३) मुक्त रूपिका+ मुक्त रूपिका - पोर+ खेळ - पोरखेळ

गाय+ रान - गायरान

४) बद्ध रूपिका+ बद्ध रूपिका - धार+करी - धारकरी

वार+करी - वारकरी

यातील मुक्त रूपिका म्हणजे स्वतंत्र शब्दच असतो. ती एकट्याने येते तेव्हा जशी शब्द रूपात येते त्याप्रमाणे बद्ध अथवा पुन्हा मुक्त रूपिकेशी जोडून येते तेव्हा पुन्हा अर्थात बदल होतो. बद्ध रूपिका मात्र मुक्त अथवा दुसऱ्या बद्ध रूपिकेशी जोडूनच येते. त्यांच्या सहयोगाने अनेक अर्थपूर्ण शब्दरचना तयार होतात.

**१.४.२ रूपिमः-** अर्थदृष्ट्या भाषेतील सर्वात लहान घटक म्हणजे रूपिका रूपिकांमध्ये उपसर्ग व प्रत्यय हे स्वतःला अर्थ नसलेले पण एकूण रचनेला अर्थ देणारे बद्ध किंवा कार्यकर रूपिमही बोली अथवा भाषेत असतात हे आपण रूपिका विचारात पाहिले आहे.काही अपवाद वगळता भाषेत थेट रूपिका येत नाहीत. शब्दाचे अर्थदृष्ट्या विभाजन करून रूपिका मिळवल्या जातात. अर्थ अथवा कार्यावरून त्यांचा एक गट कल्पिता येतो या गटाच्या आदर्श ध्वनीला रूपिम असे म्हणतात. या गटाचा अर्थ वा कार्यदृष्ट्या आदर्श प्रतिनिधी म्हणजे रूपिम होय. बोलीत थेट रूपिका किंवा रूपिम न येता स्वनांतराप्रमाणेच रूपिकांतरे येतात. या रूपिकांतरातील अर्थ किंवा कार्यावरून रूपिम निश्चिती केली जाते.

### १.४.२.१ रूपिम निश्चितीची तत्त्वे –

भाषा किंवा बोलीतील रूपिकांचा रूपिम निश्चित करताना अर्थ किंवा कार्यदृष्ट्या त्याच्यातील समानता पाहिली जाते. या रूपिकांचे भाषेतील उपयोजन कसे आहे या विनियोग तत्वावरून रूपिम निश्चित केले जातात.विनियोग म्हणजे वापर किंवा उपयोजन होय. रूपिम निश्चितीची तत्त्वे पुढीलप्रमाणे :

अ) पूरक विनियोग :- जेव्हा रूपिका अर्थदृष्ट्या समान असतात पण वावरण्याचा परिसर भिन्न असतो तेव्हा त्याला पूरक विनियोग असे म्हणतात. अशा पूरक विनियोगाने एकत्र येणाऱ्या रूपिकांना रूपिम असे म्हणतात.

उदा. १) कागदी लिंबाच्या सालापेक्षा[१] इडलिंबाची साल[२] जाड असते.

२) वडाची साल[३] पिपळाला लावणे

३) दरसाल[४] दुष्काळ गडद होत आहे.

४) फळांच्या सालीत[५] भरपूर जीवन सत्वे असतात.

५) आडसाली[६] ऊस चांगला आला आहे.

६) कठीण सालीची[७] फळे वाहतूकीस चांगली असतात

या वाक्यांत साली[१], साल [२], सालीत[४], सालीची[७] या रूपिका भिन्न परिसरात वावरत असल्या तरी अर्थदृष्ट्या समान असल्याने एकाच रूपिम गटात येतात. तर दरसाल आणि आडसाली या शब्दांत त्यांच्याप्रमाणेच रूपदृष्ट्या समान असणाऱ्या साल आणि साली अर्थदृष्ट्या मात्र त्यांच्याहून भिन्न असल्याने त्यांचा स्वतंत्र गट होतो. पहिल्या रूपिमांचा फळ किंवा झाडांची साल या अर्थाने स्वतंत्र गट होतो. तर दुसऱ्या रूपिकांचा वर्ष या अर्थाने स्वतंत्र गट होतो. दोन्ही गटातील रूपिका या मुक्त रूपिका प्रकारातील आहेत.

ज्या रूपिकांना स्वतंत्र अर्थ आहे व भाषेत त्या मुक्तपणे येऊ शकतात त्यांचा गट बनवणे सोपे जाते. भाषेत कार्यरत कार्यकर रूपिमांची निश्चिती करणे कठीण पण तितकेच आवश्यक असते.

| उदा. एकवचनी शब्द | अनेकवचनी शब्द | अनेकवचनी रूपिका |
|---|---|---|
| वांगे/ वांग | वांगी | ई |
| घूस | घूशी | ई |
| आंबा | आंबे/आंबं | ए/ अं |
| मासा | मासे/ मासं | ए/अ |
| भाजी | भाज्या | या |
| माशी | माशा | आ |

या उदहारणात दिसणाऱ्या ई, ए, अ, या, आ, या रूपिका दिसायला भिन्न आहेत मात्र येथे त्यांनी शब्दांचे अनेकवचन करण्याचे भाषिक कार्य केले आहे. भिन्न परिसरात समान कार्य करणाऱ्या या रूपिकांचा कार्यावरून एक गट बनवता येतो त्याला रूपिम म्हणता येईल.

**ब) वैकल्पिक किंवा मुक्त विनियोग** :- काही रूपिकांमध्ये रूपभिन्नता असते पण अर्थदृष्ट्या त्या समान असतात. शब्दातील एखाद्या अक्षर बदलामूळे एकाच रूपिकेचे समानार्थी अनेक पर्याय उपलब्ध असतात तेव्हा तेथे निवडीस विकल्प उपलब्ध असतो. त्यातील कोणताही पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य त्या भाषिक लोकांना असते आणि कोणताही पर्याय निवडला तरी अर्थदृष्ट्या काही फरक पडत नाही अशा भाषिक विनियोगास वैकल्पिक किंवा मुक्त विनियोग असे म्हणतात.

उदा. १) सिताफळ-शिताफळ २) ज्वारी, जवारी, जेवारी या दोन उदाहरणांतील रूपिकांमध्ये रूपभिन्नता असलेले पर्याय उपलब्ध आहेत. मात्र कोणताही पर्याय वापरला तरी चालतो यास मुक्त किंवा वैकल्पिक विनियोग म्हणतात.

उदा.३) रामाने, रामानं, रामांनी या तिन्ही शब्दांत ने, नं, नी या कार्यकर रूपिका रूपदृष्ट्या भिन्न असल्या तरी समान कार्याने एकमेकांचे पर्याय ठरतात त्यामुळे ते एकाच रूपिम गटात येतात. त्यातील कोणताही पर्याय विकल्पाने निवडता येतो.

**क) व्यवच्छेदक विनियोग :-** जेव्हा रूपिका दिसायला समान असतात पण त्यांच्यामध्ये अर्थ अथवा कार्यदृष्ट्या समानता नसते तेव्हा त्यांना एका गटात आणता येत नाही.दिसायला सारखे असूनही त्यांचा गट बनवता येत नसल्याने त्यांना एकाच रूपिमाच्या रूपिका मानता येत नाही.अशा विनियोगास व्यवच्छेदक विनियोग असे म्हणतात.

उदा. १ गेल्या वर्षी[१], वर्षा[२]व लई झाला

२ वर्षा देखणी पोर हाय.

या दोन वाक्यात वर्षी (वर्ष), वर्षाव (पाऊस), वर्षा (नाम) अशा विविध अर्थांनी येणारी 'वर्ष' ही रूपिका दिसायला रूपदृष्ट्या सारखी असली तरी अर्थ भिन्नतेमुळे ती एकाच रूपिम गटात येत नाहीत.

वरील विवेचनावरून रूपिकांचा वापर किंवा विनियोग तत्त्वावरून रूपिम निश्चिती करण्याची पद्धत लक्षात आली असेल. बोलीतील रूपिका अर्थ अथवा कार्यदृष्टीने समान असतील आणि त्या विविध भाषिक परिसरात आल्या तरी अनुक्रमे पुरक आणि वैकल्पिक विनियोगाने एकाच रूपिम गटात येतात. त्यासाठी त्या रूपदृष्ट्या समान असण्याची आवश्यकता नाही. मात्र रूपदृष्ट्या समान असूनही अर्थ अथवा कार्यदृष्ट्या त्यांमध्ये समानता नसेल तर व्यवच्छेदक विनियोग तत्त्वाने त्या एका रूपिम गटात येणार नाहीत. रूपदृष्ट्या, भाषिक परिसर दृष्ट्या कोणतेही बंधन नसलेल्या पण अर्थ व कार्यदृष्ट्या समान असलेल्या रूपिका एकाच रूपिम गटात येतात. त्यांचा रूपिम हा आदर्श काल्पनिक गट तयार होतो. त्याचे लेखन पुढीलप्रमाणे करण्यात येते.

{साल} → साल
→ सालीत, सालीचा, सालीस, सालीची
→ सालीवर, सालीखाली

रूपिम महिरपी कंसात दाखवला जातो तर त्याची रूपिकांतरे रेषेने दर्शविली जातात.



}

**१.४.२.२ रूपिमाचे प्रकार –**

अर्थ आणि कार्याच्या दृष्टीने रूपिमांचे पुढील प्रकार पडतात.

**अ) अनन्यसाधारण रूपिम –** एखादी रूपिका अत्यंत मर्यादित स्वरूपात, विशिष्ट पदालाच जोडून वापरली जाते. त्यांना स्वतंत्र अर्थ असला तरी विभाजन केल्यास तो मूळ अर्थाप्रमाणे असेलच याची खात्री नसते. अशावेळी अनन्य साधारण रूपिम होतो.

उदा. लांबसडक, लांबलचक, सरळसोट, लालभडक, हिरवागार या उदाहरणांत लांब-सोट, सरळ-लचक अशी पदे जोडली जात नाहीत. किंवा रंगाचे गडद पण दर्शवणाऱ्या दोन्ही रूपिकांत लाल-गार, हिरवा-भडक अशा रूपिका जूळत नाहीत.

**ब) मिलन रूपिम –**जेव्हा एकच रूपिका एकाच रूपात दोन भिन्न भाषिक कार्ये पार पाडते. तेव्हा मिलन रूपिम होतो.

उदा. बसतो – तो-पुल्लिंगी कर्ता; एकवचन

बसते – ती-स्त्रिलिंगी कर्ता; ती- एकवचन

बसतात – ते- नपुसकलिंगी; अनेकवचन; आदरार्थी संबोधन

या तिन्ही शब्दांनी कर्त्याच्या लिंग, वचन याविषयी एकाच वेळी कार्य करताना तेच रूप दर्शविले आहे. तिसऱ्या रूपिमाने तर एकाचवेळी तिसराही अर्थ सूचित केला आहे. रूपदृष्ट्या एकच रूपिका अर्थदृष्ट्या अथवा कार्यदृष्ट्या एकाचवेळी अनेक भाषिक कार्ये करते. तेव्हा मिलन रूपिम होतो.

**क) आशयबोधक रूपिम –** ज्या रूपिकांना स्वत:चा अर्थ असतो, ज्या भाषेत स्वतंत्रपणे येऊ शकतात. अशा मुक्त रूपिका अर्थावरून एका रूपिम गटात येतात.

उदा. हात – हाताला, हातावर, हातात, हाताने, हाताशी इ.

कुदळ – कुदळीने, कुदळीला, कुदळीत, कुदळीस इ.

मेढ – मेढके, मेढीला, मेढीवर, मेढीत, मेढक्याला इ.

**क) कार्यकर रूपिम –** ज्या रूपिकांना स्वत:चा अर्थ नसतो. पण त्यांच्यामुळे इतर रूपिकांना अर्थप्राप्ती होते. अर्थ बदलतो, अर्थात वाढ होते अशा बद्ध रूपिकांच्या गटाला कार्यावरून कार्यकर रूपिम गटात घेतले जाते. अर्थपूर्ण मुक्त रूपिकांच्या आधाराने भाषेत येणारे उपसर्ग आणि विभक्ती प्रत्यय कार्यकर रूपिम गटात येतात.

उदा- स, ला, ते, ने, ए, शी, त, ई, आ, ऊन, हून, अ, इ.

भाषेत स्वत:चा अर्थ असणारे आशयबोधक रूपिम संख्येने जास्त असतात. मात्र संख्येने कमी असलेले कार्यकर रूपिम त्यांच्या आधाराने वारंवार येतात. आशयबोधक रूपिम संख्येने जादा असले तरी त्यांची वारंवार आवृत्ती फारशी होत नाही. कार्यकर रूपिम मात्र संख्येने अल्प असले तरी जवळपास प्रत्येक वाक्य रचनेत आढळतात.

**१.४.३ रूपिकांतर –** प्रत्यक्ष भाषेत वापरल्या जाणाऱ्या अर्थपूर्ण व कार्यकर रूपिकांना रूपिकांतर असे म्हणतात. भाषेत येणाऱ्या रूपिका भाषिक परिसरात येताना त्यांच्या बाह्यरूपात बदल घडतो त्यामुळे त्याचा मूळ रूपात अंतर पडते. अशा रूपिकेच्या बदललेल्या रूपास रूपिकांतर असे म्हणतात. त्यांच्या बाह्यरूपात फरक पडला तरी त्यांचा अर्थ किंवा कार्य अबाधित असते. उदा.– घोडा (मुक्त रूपिका)+ ला (बद्ध रूपिका) 'घोड्याला' हा शब्द तयार होतो. यातील 'घोड्याला' या शब्दात वरील दोन्ही रूपिकात कुठेच नसलेल्या 'य' शब्दाचे सामान्यरूप करण्याच्या प्रक्रियेने आलेला आहे. त्यामुळे शब्दाचे बाह्यरूप बदलले पण दोन्ही रूपिकांची अर्थ व कार्य कार्य राहिले आहे.घोडा या रूपिकेचे ते रूपिकांतर आहे. रूपिकांतर संकल्पना स्पष्ट होण्यासाठी काही वाक्ये उदाहरणादाखल घेऊ

उदा.१) महाराष्ट्रात शेती कामात घोडा[१] उपयोगाचा नाही.

२) घोड्याला [२] चार पाय असतात.

३) घोड्याच्या [३] माथ्यावर चंद्रकोर आहे.

४) बसणाऱ्या घोड्यात[४] दोष असतो.

५) आता कोणी घोड्याने [५] प्रवास करत नाही.

६) चांगली घोडी [६] खूप महाग असतात.

या वाक्यात मूळ 'घोडा' या रूपिकेला प्रत्यक्ष भाषिक वापरात विविध प्रत्यय लागून वरील १ ते६ रूपिकांतरे मिळतात. त्यांची रूपिका – रूपिम – रूपिकांतर' अशी पुढीलप्रमाणे मांडणी करता येईल.

घोडा– (रूपिका) { घोडा–} (रूपिम)

- घोडा – एकवचन पुल्लिंग
- घोड्याला – एकवचन, द्वितीया
- घोड्याच्या– एकवचन, षष्ठी
- घोड्यात – एकवचन, सप्तमी
- घोड्याने – एकवचन, तृतीया
- घोडी – अनेकवचन

(रूपिकांतरे)

यातील पहिले रूपिकांतर वगळता इतर पाच रूपिकांतरे मूळ ‘घोडा’ रूपिकेपासून रूपदृष्ट्या वेगळी आहेत, तरीही ती अर्थाच्या दृष्टीने समान असल्याने {घोडा} या एकाच रूपिम गटात येतात. रूपिकांतरे ही रूपिम सापेक्ष असल्याने त्यांचा स्वतंत्र उल्लेख केला जात नाही. रूपिम दर्शवण्यासाठी { } अशा महीरपी कंसाचा उपयोग केला जातो. तर त्याची रूपिकांतरे दोन तिरप्या रेषेच्या मध्ये स्वतंत्रपणे लिहिली जातात. उदा. {घोडा} । घोडा१ । घोडा२ । घोडा३ । घोडा५ । घोडा६

**१.४.३.१ रूपिकांतर प्रकार :–** भाषेत येताना रूपिकांमध्ये कोणते भाषिक बदल होतात त्यावरून रूपिकांतराचे ठळक तीन प्रकार पडतात.

**अ) स्वनिमाश्रयी रूपिकांतर** – विशिष्ट परिस्थितीत कोणते रूपिकांतर यावे हे जेव्हा स्वनिमिक परिस्थितीने निश्चित होते अशा रूपिकांतरास स्वनिमाश्रयी रूपिकांतर असे म्हणतात.

उदा. मराठी भाषेत नकारार्थी वा विरूद्धार्थी पदे तयार करण्यासाठी शब्दापूर्वी ‘अ’ आणि ‘अन्’ ही पदे लावली जातात. यांना व्याकरणात उपसर्ग तर वर्णनात्मक भाषा विज्ञानात रूपिका असे म्हणतात. यातील कोणती रूपिका त्या शब्दाला लागेल ते त्या शब्दातील सुरूवातीचा स्वनिम निश्चित करतो.

उदा. अज्ञान, अमृत, अमर या शब्दांच्या मूळ शब्दांच्या (ज्ञान, मृत, प्राप्य, मर) सुरूवातीस येणारे सर्व व्यंजन स्वनिम ‘अ’ हा उपसर्ग किंवा रूपिका निश्चित करतात. २)अनोळखी, अनपेक्षित, अनावर यांच्या मूळ शब्दांच्या (ओळखी, अपेक्षित, आवर) सुरूवातीस असणारे स्वर स्वनिम ‘अन्’ ही रूपिका निश्चित करतात.

**ब) रूपिमाश्रयी रूपिकांतर**– ज्या रूपिका रूपिमांच्या आश्रयाने भाषेत येताना तिच्या रूपात बदल होतो तेव्हा रूपिमाश्रयी रूपिकांतर या प्रकारचे रूपिकांतर होते.

उदा. जा → जातो → गेला

ये → येतो → आला

हो → होते → झाले

यामध्ये जा, ये, हो या धातुंच्या अनुक्रमे गेला, आला,झाले या भूतकाळी रूपांमध्ये इतका आमुलाग्र बदल झाला आहे की मूळ धातूचे अस्तित्व या रूपिकांतरांत कुठेच जाणवत नाही. तसेच निकट– निकटचा असे रूप होते पण निकटला असे प्रमाण मराठीत येत नाही.

**क) शून्य रूपिकांतर :–** भाषेतील काही रूपिका कोणत्याही स्वनिक परिसरात गेल्या तरी त्यांच्या बाह्य भाषिक रूपात कोणताही बदल होत नाही. ती रूपिका एकवचनी व अनेक वचनी रूपातही समानता दर्शवते तेव्हा शून्य रूपिकांतर हा प्रकार मानला जातो.

उदा. कवी – तो कवी, ते कवी

गुरू– तो गुरू, ते गुरू

केस – तो केस, ते केस

वचन बदलले तरी रूपिकांतर रूपदृष्ट्या समानच राहते. त्यामध्ये कोणताही बदल जाणवत नाही तेव्हा शून्य रूपिकांतर होते.

**१.४.३.२ 'रूपिका, रूपिम, रूपिकांतर परस्पर संबंध :**

उपरोक्त तपशीलवार विवरणावरून रूपिका, रूपिम, रूपिकांतर यांचे स्वरूप स्पष्ट झाले असेल. थोडक्यात ही संकल्पना भाषेत येणाऱ्या अर्थपूर्ण लहानात लहान ध्वनीरचनेस रूपिका असे म्हणतात काही रूपिकांना स्वतःचा अर्थ नसला (उपसर्ग व प्रत्यय) तरी त्या भाषिक रचनेस अर्थ देतात. अशा रूपिका प्रत्यक्ष भाषेत येताना त्यामध्ये मूळ रूपापेक्षा फरक जाणवेल भाषेत येतात त्यांना रूपिकांतर असे म्हणतात. भाषेत येताना रूपिकांचे रूप बदलले तरी अर्थ व कार्यावरून त्यांचे गट बनवता येतात. अशा गटांच्या केंद्रस्थानी असलेल्या आदर्श रूपिकेस रूपिम असे म्हणतात. अशा प्रकारे स्पष्ट करता येईल.

**१.५ वाक्य विचार –**

ध्वनींच्या क्रमवार रचनेतून शब्द आणि शब्दांच्या अर्थपूर्ण क्रमवार रचनेतून वाक्यरचना तयार होते. वाक्य म्हणजे विशिष्ट क्रियेत सहभागी कर्ता, कर्म, क्रियापद यांच्या विषयी संपूर्ण माहिती देणारी रचना असते. वाक्य हा अर्थ प्रक्रियेतील महत्वाचा टप्पा असून व्यापक अर्थप्रक्रियेतीचा एक भाग असतो. अर्थदृष्ट्या स्वयंपूर्ण आणि त्याचबरोबर मोठ्या अर्थपूर्ण संघटनेतील दूवा असे वाक्याचे दूहेरी स्वरूप असते. क्रियेत भाग घेणाऱ्या कर्ता, कर्म, क्रियापद आणि अनुषंगाने येणाऱ्या इतर घटकांच्या क्रियेतील सहभागाविषयीचा संपूर्ण बोध वाक्यरचनेतून होत असतो. वाक्यात उपस्थित असणाऱ्या घटकांना प्रथमोपस्थित संघटक म्हणतात. वाक्यात उद्देश आणि विध्येय असे दोन भाग असतात. उद्देश विभाग कर्त्याविषयी बोध करतो तर विध्येय विभाग क्रियेविषयी माहिती देतो. वाक्य म्हणजे एक पूर्ण विचार असतो. क्रिया व्यक्त करणारा शब्दसमूह म्हणजे वाक्य होय. अपवादाने कधी कधी एकच शब्द क्रियेविषयी पूर्ण माहिती देतो तेव्हा त्यालाही वाक्याचे स्वरूप येते, पण स्वतंत्र रूपात तो शब्दच राहतो.

उदा. 'कुठे निघालात? हे कुठे निघाला आहात' या प्रश्नार्थी वाक्याचे बोलीरूप आहे. त्याला उत्तर म्हणून गावी, शेतात, पेरणीला, कापणीला असे कोणतेही एक उत्तर येऊ शकते. उत्तरार्थी एकच शब्द असला तरी तो. या क्रियेविषयी पूर्ण माहिती देतो त्यामुळे या संदर्भातील क्रियेपुरता वाक्याचा दर्जा प्राप्त होतो. अल्प शब्दरचना पूर्ण अर्थ व्यक्त करत असेल तर ते वाक्य समजण्यास भाषा विज्ञानाची हरकत नाही. बोली भाषेत अशी एक शब्दाची किंवा कमीत कमी पदबंधाची वाक्ये भरपूर आढळतात. अशा वाक्य रचनांविषयी ऑटो जेस्परसन वाक्य हे (साधारणपणे) संपूर्ण स्वतंत्र मानवी उच्चारण आहे. ते स्वतंत्रपणे राहू शकते किंवा तसे राहण्याचे त्यांच्या जवळ सामर्थ्य आहे, म्हणजे केवळ त्याचाच उच्चार होऊ शकतो. हे मत तंतोतत लागू पडते. अनेक शब्दांच्या रचनेतून क्रियेचा बोध करणारे वाक्य अनेक संघटकांची बनलेली संघटना असते. त्याचा स्वतःचा अर्थ पूर्ण होतो तिथे त्याहून मोठ्या अर्थरचनेशी त्याचा असलेला संबंध तुटतो. भाषेतील नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद क्रियाविशेषण, शब्दप्रयोगी, केवलप्रयोगी, उभयान्वयी अशा शब्दजातींमध्ये सार्थता, सामर्थ्य, आकांक्षा, अन्विती हे गुण असल्यास त्यांच्या रचनेतून अर्थपूर्ण वाक्यरचना तयार होते.

उदा. 'घनसाळ तांदूळ चांगला असतो.'

या वाक्यातील सर्व शब्दांना स्वतःचा अर्थ आहे म्हणजे ते सार्थ आहे.यातील कोणत्याच शब्दाने अर्थप्राप्तीस बाधा येत नाही. म्हणजेच त्यामध्ये अर्थनिर्मितीचे सामर्थ्य आहे. या वाक्यातील प्रत्येक शब्द दुसऱ्यावर अर्थासाठी अवलंबून आहे. या अर्थाने त्यांना या वाक्यबंधात एकमेकांविषयी आकांक्षा आहे. व्याकरणिक दृष्टीने हे सर्व शब्द अनुरूप आहेत यालाच अन्विति असे म्हणतात.

याच वाक्यात 'आजरा घनसाळ तांदूळ अभिनयांसाठी चांगला असतो' असा बदल केल्यास घनसाळ तांदळाचे आजरा हे भौगोलिक उत्पादन स्थान कळेल. त्यामुळे रचनेला बाधा पोहोचणार नाही. पण 'अभिनयासाठी' या शब्दाच्या वाक्यरचनेत अनाहूत येण्याने अर्थ, आकांक्षा, अन्विति या सर्वांनाच बाधा पोहोचते. वाक्यरचनेत शब्द वाढूनही अर्थात मात्र बिघाड होईल. त्याऐवजी वास व चवीसाठी हे शब्द वापरले तर उपरोक्त वाक्य 'आजरा घनसाळ तांदूळ वास व चवीसाठी चांगला असतो' असे अर्थपूर्ण वाक्य तयार होते.

भाषेत किंवा बोलीत ध्वनी, शब्द, वाक्य या प्रत्येक घटकाचे संरचनेत स्वतंत्र व महत्वपूर्ण कार्य असते. ध्वनी आणि शब्द संरचनेपेक्षा वाक्याची रचना वेगळी असते. ध्वनी आणि शब्दांचा अर्थ क्रमबद्ध संरचनेवर अवलंबून असतो तर वाक्य अत्यंत लवचिक संरचनातत्व पाळते. वाक्याचे उपवाक्य, वाक्यांश यातील क्रमवार रचनेबरोबरच क्रमबदल ही अर्थनिर्णायक स्वरूपाचा असतो.

बोलीच्या वाक्यरचनेचा विचार करताना त्यातील लवचिकतेकडे विशेषत्वाने पाहावे लागते. प्रथमोपस्थित संघटक संकल्पना प्रमाण व विदग्ध भाषांना तंतोतंत लागू पडते. ग्रांथिक भाषेत जाणीवपूर्वक कर्ता, कर्म, क्रियापद यांचा वाक्यात समावेश असतो. बोली व्यवहार स्वरूप असल्याने त्यामध्ये काटकसरीचे तत्व प्राधान्याने येते. शब्द, वाक्यांशाचे लघुरूप करण्याची बोलीची प्रवृत्ती असते. त्यामुळे व्याकरणिक शैलीतील 'राम आंबा खातो', 'रामाने रावणास मारले' अशी सुघड वाक्ये बोलीत अभावानेच येतात. विदग्ध वाङ्मयात तर लेखक कल्पनेनेच विश्व निर्माण करत असल्याने तो वाक्यही तशीच परिपूर्ण रूपात घडवत असतो. व्याकरण आणि सौंदर्यशास्त्रीयदृष्ट्या ती परिपूर्ण असतात. बोलीत माहिती-संदेशाची देवाण घेवाण अधिक प्रमाणात चालते.या भाषेतील वाक्यरचना कमीत कमी शब्दात थेट अर्थ व्यक्त करणारी असते. तसेच विशिष्ट प्रदेशातील लकब, कष्टकरी वर्गातील जोमदार उच्चार प्रकट करणारे काही वारंवार आवृत्त होणारे शब्द अशा अनेक कारणांनी भाषेच्या व्याकरणिक चौकटीत न बसणाऱ्या वाक्यरचना बोली भाषेत येतात.

उदा. १) मला लेका काय कळतयं तेच्यात (मला त्याच्यातील काही कळत नाही.)

२) कुठं गेला त्यो इंग्रजीचा सर म्हणत्याला (इंग्रजीचे सर कुठे गेले?)

३) चेहरा मर्दा तुझा मोठा हाय ! (तुझा चेहरा मोठा आहे)

या किरण गुरव यांच्या कथासंग्रहातील कोल्हापूरच्या राधानगरी-गारगोटी परिसरातील बोलीतील काही वाक्यरचना आहेत. त्यांच्यात कर्ता-कर्म-क्रियापाद अशी प्रमाण मराठीतील सुपरिचित रचना दिसत नाही. कंसातील समानार्थी वाक्यांच्या तुलनेत बरेच अनावश्यक शब्द त्यांच्यात आढळतात. बोलीतील अशा स्वरूपाची वाक्ये अर्थ पूर्ण करतात पण व्याकरणिक संरचनेचे वेगळेच बंध निर्माण करतात. त्यांच्या रचनेत व्याकरणिक संरचनेचे रूप शोधता येते पण त्यामध्ये लवचिकता असते. प्रमाणभाषेत ठराविक पद्धतीची क्रमवार शब्दरचना

वाक्य सिद्‌ध करते पण बोलीत अशा बहुविध रचना आढळतात.

**१.५.१ बोली भाषेतील वाक्यरचनेची वैशिष्ट्ये :-**

बोली भाषा ही दैनंदिन व्यवहारासाठी वापरली जाते. व्यवहार सुलभता हे तिचे मुख्य कार्य आहे. दोन भाषिकांमधील भावना, विचार, कल्पना, माहिती यांच्या देवघेवीपुरती ती कार्यरत असते. तिच्यात मौखिक वाङ्मय विपुल असले तरी त्या वाङ्मयातील सौंदर्यपूर्ण भाषा दैनंदिन बोलीत वापरली जात नसते. वाक्यरचना साधी, केवलवाक्य स्वरूपाची, कमी लांबीची अशी प्राधान्याने आढळते.वाक्य अर्थदृष्ट्या पूर्ण असते. पण व्याकरणिकदृष्टया परिपूर्ण असेलच असे नसते. कधी अनावश्यक शब्द प्रयोग, तर कधी केवळ एका शब्दानेही वाक्याचे कार्य साधण्याची अनपेक्षितता बोलीच्या वाक्यरचनेत आढळते.

उदा. 'कुठ चाल्लाय?' (कुणीकडे चालला आहात?) या प्रश्नाला गावी या एकाच शब्दात उत्तर येऊ शकते. या एकाच शब्दातून 'मी गावी चाललो आहे', 'आम्ही गावी चाललो आहोत' असा अर्थ निर्देशित केला जातो. या रचनेत शब्दांचा कमीत कमी वापर तर यापूर्वी किरण गुरव यांच्या साहित्यकृतीतील बोलीच्या अनावश्यक शब्द वापरांची प्रवृत्ती दिसून येते. बोलीतील वाक्यरचनेवर त्या भाषिक लोकांच्या व्यवसाय, भूप्रदेश, शरीररचना, आहार, सामाजिक धारणा, भाषिक संकल्पना यांचा प्रभाव पडत असतो. बोलीतील वाक्यरचनेचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

**१.५.२ बोलीतील वाक्य रचनेचे प्रकार :**

१) केवल वाक्य :- बोली भाषेतील या प्रकारच्या वाक्यात बहुतेक वाक्ये कर्ता-कृती प्रकारातील असतात क्रियापद हा त्यातील मुख्य घटक असतो तर त्यापूर्वी इतर पदबंध असतात.

उदा. झाडी बोलीतील केवल वाक्याची पुढील उदारहणे पहा.

१) तो धान फोकते - तो भात पेरतो.

२) पाण्यात कोण दिसालतं? - पाण्यात कोण दिसत होतं?

३) काय बघालीस? - काय बघत आहेस?

२) एकावयवी वाक्य रचना :- बोलीत अधिकतर संदेशनाचे काम चालते. व्यवहार पातळीवरच बोलीचा वापर होत असल्याने कमीत कमी शब्दात अर्थ प्रकटीकरण साधले जाते. भाषिक काटकसरीच्या तत्त्वाने बोलीत केवळ एका शब्दाचेही वाक्य आढळते.

उदा. १) जाता - (मी जातो) - झाडी बोली

२) चाल्लाव, येताव, जेवाल्लाव - कोल्हापूरी भाषेतील एकावयवी वाक्य रचना बोलीत अशी येणारी वाक्यरचना विशिष्ट क्रियेच्या संदर्भाने येते. मात्र हे स्वतंत्र शब्द आहेत.

३) वाक्य संकोच - शब्दांचा क्रम बदलून अर्थ कसा रूंदावण्याचे पण कमीत कमी शब्द वापराने वाक्याचा संकोच करण्याची दुहेरी प्रक्रिया या व्याकरणिक प्रक्रियेत होत असते.

उदा. १) वढा व्हावतोय- ओढा वाहत आहे

व्हावता वढा - वाहता ओढा - कोल्हापूरी बोली

२) बायको रानदते - बायको रांधते आहे.

राननार बायको - रांधणारी बायको- झाडी बोली

कोल्हापूरी व झाडी बोलीतील वरील प्रत्येकी दोन वाक्ये सारखी वाटली तरी अर्थव्याप्ती संकल्पनेत फरक आहे. दोन्ही बोलीतील पहिली वाक्ये वर्तमान क्रियेविषयी सांगतात तर दुसरी वाक्ये संकल्पना मांडतात. 'ओढा वाहत आहे' हे वाक्य ओढ्यातील पाणी वाहत आहे असे सूचित करते तर 'वाहता ओढा' केवळ पाण्याच्या वाहण्याविषयीच बोलत नसून ओढ्याच्या जिवंत, चैतन्यशील परिसंस्थेविषयीचा अर्थ व्यक्त करते. बायको रांधत आहे' मधून 'ती सध्या स्वयंपाक करत आहे' हा सरल अर्थ सूचित होतो तर 'रांधणारी बायको' म्हणजे केवळ 'स्वयंपाकी स्त्री' असे सूचित न होता संसार समर्थपणे पेलणारी स्त्री असा व्यापक अर्थ व्यक्त होतो. वाक्य संकोचनातून अधिकचा व्यापक अर्थ व्यक्त होतो. वाक्य संकोचातून अधिकचा व्यापक अर्थ व्यक्त करण्याचे कार्य बोलीतील वाक्यरचना अशा प्रकारे करत असते.

**४) प्रश्नार्थक वाक्य :-** प्रमाण भाषेप्रमाणे बोलीतही प्रश्नार्थक वाक्यरचना आढळते. प्रश्नार्थक क्रियाविशेषणांच्या वापराबरोबरच विशिष्ट शब्दावर ध्वनीवर जोर देऊन, आरोही स्वर योजनेने वाक्य प्रश्नार्थी बनवले जाते.

उदा. 'तो वावर नांगरते' या झाडी बोलीतील विधानार्थी वाक्यातील प्रत्येक शब्दावर जोर देऊन उच्चार केल्यास तीन प्रकारची प्रश्नार्थी वाक्ये तयार होतात. आणि त्यांची प्रश्नांप्रमाणे उत्तरेही वेगवेगळी येतात.

उदा. तो वावर नांगरतो? - त्याच्याकडून वावर नांगरणे अपेक्षित नाही

तो वावर नांगरतो? - वावरापेक्षा काही दूसरे नांगरणे अपेक्षित

तो वावर नांगरतो - नांगरण्यापेक्षा वेगळी कृती अपेक्षित

कोणतेही क्रियाविशेषण वापरता केवळ आरोही स्वरयोजनेच्या विशिष्ट शब्दावर जोर देण्याने वरील प्रश्नार्थक वाक्यरचना साध्य केली आहे.

**५) वाक्य संक्षेप -** भाषेत एक क्रिया स्पष्ट करण्यासाठी अनेक छोटी छोटी वाक्ये वापरली जातात. अनेक कारणांनी बोलीत अशा छोट्या वाक्यांच्या एकत्रिकरणातून एकच वाक्य तयार करून अर्थ पूर्वीप्रमाणेच व्यक्त केला जातो या व्याकरणिक रचनेस वाक्य संक्षेप असे म्हणतात. येथे केवळ दोन सरल किंवा केवल वाक्ये जोडून एक त्याच अर्थाचे एक संयुक्त वाक्य बनवले जाते.

उदा. १) 'शामने शेत नांगरले', 'शामने भात पेरले' या दोन सरल वाक्यांच्या एकत्रिकरणातून 'शामने शेत नांगरून भात पेरले' असे एकच संयुक्त वाक्य बनते

२) 'काका मुंबईस्नं आला', 'काका शीक पडला' या दोन सरल वाक्यांचे 'काका मुंबईस्नं आल्यावर शीक पडला' असे वाक्य संक्षेपाने संयुक्त वाक्य बनले.

**६) वाक्य संयोग–** बोलीत वरील प्रमाणेच वाक्य संयोगामध्ये दोन किंवा अधिक वाक्ये एकत्रित केली जातात. दोन केवल वाक्यांचा संयोग करून संयुक्त अथवा मिश्र वाक्य तयार करताना वाक्यातील काही शब्दांचे सामान्यरूप तयार होते. वाक्यांचा संयोग करण्यासाठी समुच्चयबोधक (नी,आणि व) न्युनत्वबोधक (पण,परंतु) विकल्प बोधक (न्हाईतर) कारणबोधक (म्हणून), संबंधबोधक (जर, तर) आदी अव्ययांचा वापर केला जातो.

उदा. १) रामुनं एकुल (गवा) बगिटला नी धुम ठोकली (समुच्चयबोधक)

२) लई शिकवायचा प्रेत्न केला पर पोरंच कच्ची निघाली (न्युनत्व)

३) पोराला आवरा न्हाईतर परिणाम वाईट व्हतील (विकल्प)

४) उस वजनाला भरंना म्हणून खोडवा काडला(कारण)

५) जिकडं खोबरं तिकडं चांगभलं! (संबंधबोधक)

बोलीतील वाक्यरचना ही प्रमाणभाषेप्रमाणेच बहुविध स्वरूपाची असते. वाक्यरचनेत समानता असली तरी बोलीत प्रमाणभाषेप्रमाणे लांबलचक व अर्थच्छल करणारी क्लिष्टता नसते. बोलीची निर्मिती व हेतू दैनंदिन व्यवहाराची परिपूर्ती असल्याने काटकसरीचे तत्त्व वाक्यरचनेतही पाळले जाते. वाक्य रचना कमीत कमी शब्दरचनेची असते. बोलीतील शब्द व वाक्यरचनेवर भाषिक समाजाच्या भूप्रदेश, व्यवसाय, शरीररचना यांचा प्रभाव जाणवतो. बोली भाषेतील वाक्यरचनेत विलक्षण लवचिकता असून व्याकरणिक रचनेला बगल देत नव्या पदबंधात अर्थ प्रकट करण्याची तिची क्षमता प्रचंड आहे. पदबंध, वाक्यांश, उपवाक्ये व शब्द यांच्या क्रम बदलातून अर्थकक्षा बदलण्याचे वाढवण्याचे कार्य बोलीची वाक्यरचना अत्यंत सक्षमतेने करत असते.

**१.६ समारोप :–**

विद्यार्थी मित्रहो आपण या प्रकरणात बोलीच्या संरचनेतील ध्वनी, शब्द, वाक्य या महत्वपूर्ण घटकांची सविस्तर माहिती घेतली. मानवी मुखावाटे उच्चारला जाणारा, बहुसंख्य लोकांकडून वारंवार भाषेत वापरला जाणारा ध्वनी म्हणजे स्वन होय. स्वन स्वतः भाषेत न येता त्याची बदललेली रूपे म्हणजे स्वनांतरे येतात. स्वनांतराच्या साम्यावरून स्वनिम कल्पिला जातो. ध्वनीच्या पातळीवरची ही वर्णनात्मक भाषा विज्ञानातील बोलीच्या संदर्भाने 'स्वन-स्वनिम-स्वनांतर' ही संकल्पना आपण अभ्यासली. शब्दाच्या पातळीवरची सर्वात महान अर्थपूर्ण रचना म्हणजे रूपिका होय. भाषेत स्वतः 'रूपिका' न येता बदलेल्या स्वरूपात 'रूपिकांतरे' येतात. रूपिकांतराच्या भाषेतील कार्यावरून व अर्थावरून 'रूपिम' निश्चित केला जातो .ही शब्दाच्या पातळीवरची 'रूपिका-रूपिम-रूपिकांतर' ही बोलीच्या संदर्भातील संकल्पना आपण सविस्तर पाहिली. वाक्यरचना प्रमाणभाषेप्रमाणेच बोलीतही असते मात्र प्रदेश विशिष्ठ प्रवृत्ती आणि काटकसरीचे तत्त्व यामूळे त्यांचे स्वरूप वेगळे असते. बोलीतील वाक्यविचार व त्याचे प्रकार यांची आपण सोदाहरण चर्चा केली आहे.

महाराष्ट्राच्या विविध प्रदेशातील बोलींच्या उदाहरणावरून प्रमाण मराठीच्या संरचनेच्या आधाराने बोलीची संरचना मांडणी प्रस्तुत प्रकरणात केली आहे. 'झाडी' बोली व काही अंशी 'कोकणी बोली' वगळता मराठीच्या बोलींचा सविस्तर अभ्यास उपलब्ध नाही. बोलीची संरचना मांडताना वर्णनात्मक भाषा विज्ञानातील ध्वनी, शब्द वाक्य रचनेच्या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी मराठीच्या विविध बोलीतील उदाहरणे व संदर्भ घेतले आहेत.

कोणत्याही अर्थाने बोली ही प्रमाणभाषेपेक्षा दूय्यम नाही हे संरचनेतील प्रत्येक घटकाचे स्पष्टीकरण बोलीतील उदाहरणावरून, संदर्भावरून करता येते हे यावरून सिद्ध होते. सर्व प्रमाणभाषा या मूळच्या बोली आहेत. व्यापक पातळीवर त्यांचे उपयोजन व्याकरण सिद्धता आणि ग्रंथव्यवहार याबरोबरच सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे लिपीबद्धता यामुळे त्यांचा प्रचार आणि प्रसार वेगाने झाला. बोली मात्र लिपी अभावी विशिष्ट क्षेत्र, समाजस्तर, व्यवसाय यामध्ये बंदिस्त झाली. परंतु एकंदरीत बोली आणि प्रमाणभाषेच्या स्वरूप व संरचनेत समानता आहे.

**१.७) स्वाध्याय :**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) भाषाकुल संकल्पनेत जगभरातील भाषांची एकूण किती कुळात विभागणी केली आहे?

अ) दहा ब) सतरा क) अठरा ड) शंभर

२) 'The Linguistic survey of India' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

अ) विल्यम कॅरे ब) जॉर्ज ग्रियर्सन क) मेजर कँडी ड) ॲबे कॅरे

३) 'झाडी' बोलीचा सविस्तर अभ्यास कोणी मांडला आहे?

अ) डॉ. गणेश देवी ब) बा.भ. बोरकर क) डॉ. हरिश्चंद्र बोरकर ड) डॉ. सु.मं.कत्रे.

४) गुजरातच्या सीमेवरील 'डांगी' बोली कोणत्या भाषेची बोली आहे?

अ) गुजराती ब) मराठी क) पंजाबी ड) राजस्थानी

५) भाषेते वापरल्या जाणाऱ्या सर्वात लहान घटकाला काय म्हणतात?

अ) रूपिम ब) स्वन क) स्वनांतर ड) रूपिकांतर

६) भाषेत प्रत्यक्ष वापरल्या जाणाऱ्या स्वनांना कोणती संज्ञा वापरली जाते.?

अ) स्वनिम ब) स्वनांतर क) उपसर्ग ड) परसवर्ण

७) भाषेत स्वतंत्रपणे येणाऱ्या रूपिकांना कोणत्या संज्ञेने ओळखले जाते?

अ) मुक्त रूपिका ब) बद्ध रूपिका क) रूपिम ड) रूपिकांतर

८) 'लालभडक', 'लांबसडक', सरळसोट' ही कोणत्या रूपिम गटाची उदाहरणे आहेत ?

अ) मिलन रूपिका ब) कार्यकर रूपिका क) अनन्यसाधारण रूपिम ड) आशयबोधक रूपिम

९) दोन वाक्ये एकत्र करून त्याच अर्थाचे एकच साधे वाक्य तयार करण्याच्या भाषिक क्रियेस काय म्हणतात ?

अ) सरल वाक्य ब) केवल वाक्य क) वाक्य संक्षेप ड) मिश्र वाक्य

१०) विभक्ती प्रत्यय कोणत्या रूपिम प्रकारात येतात ?

अ) कार्यकर रूपिम ब) मुक्त रूपिम क) मिलन रूपिम ड) आशयबोधक रूपिम

**उत्तर सूची –**

१- क, २- ब, ३- क, ४- ब, ५-ब, ६-ब, ७-अ, ८- क, ९- क, १०- अ

**प्र.२ पुढील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.**

१) 'स्वन-स्वनिम-स्वनांतर' ही संकल्पना बोलीच्या संदर्भात स्पष्ट करा.

२) बोली भाषेतील रूपिम विचार सविस्तर स्पष्ट करा.

**प्र. ३ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) स्वनांची लक्षणे स्पष्ट करा.

२) रूपिका म्हणजे काय ते सांगून प्रकार स्पष्ट करा.

३) वाक्यरचनेचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

**१.८ अधिक वाचन –**

१) झाडी-बोली, डॉ. हरिश्चंद्र बोरकर, विजय प्रकाशन, नागपूर.

२) बोली विशेषांक, शिविम संशोधन पत्रिका, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर.

**१.९ पूरक वाचन –**

१) भाषा व भाषाशास्त्र, श्री. न. गजेंद्रगडकर, व्हीनस प्रकाशन, पुणे.

२) आधुनिक भाषा विज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, मिलिंद मालशे, लोकवाङ्.मयगृह, मुंबई.

३) भाषा : इतिहास आणि भूगोल, ना. गो. कालेलकर, मौज प्रकाशनगृह, मुंबई.

***

# घटक २
# समाजभाषावैज्ञानिक दृष्टिकोन

## २.१ उद्दिष्ट्ये

१) बोली अभ्यासाचे स्वरूप समजेल

२) बोली अभ्यासांचे स्वरूप व विशेष यांची पाहणी करता येईल व त्यांच्या निर्मितीची कारणमीमांसा समजेल.

३) बोली अभ्यासाचे सहित्य संकलन आणि विश्लेषण या दोन्ही गोष्टी भाषाभ्यासाठी एकमेकांशी कशा परस्परपूरक असतात हे समजून घेता येईल.

४) समाजभाषा विज्ञानाच्या अभ्यास पद्धतीमधील समाज व भाषा या दोन घटकांमधील अंतरसंबंध लक्षात येईल.

५) समाजभाषाविज्ञानातील मूलभूत संकल्पनांच्या आधारे विविध बोलींचा अभ्यास करता येईल.

## २.२ प्रास्ताविक :

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाहीच्या तत्त्वानुसार भाषावार प्रांतरचना आली या भाषावार प्रांतरचेनेच्या तत्त्वाला अनुसरून दिनांक १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याची स्थापना आली. महाराष्ट्र हा विविध जाती,धर्म,पंथ या विविधतेने नटलेला आहे. विस्तृत क्षेत्रफळ,भरपूर लोकसंख्या आणि जातीजमातींची विविधता यामुळे मराठी भाषेची प्रादेशिक रूपे सहाजिकच भिन्न प्रकारची आहेत. मराठीच्या प्रादेशिक रूपांचा वा बोलींचा अभ्यास म्हणताच भारतीय भाषांचे सर्वेक्षण करणाऱ्या जॉर्न ग्रिअर्सन यांचे नाव प्रथम नजरेसमोर येते.

भारतामध्ये विविध भागांमध्ये प्रचलित असलेल्या भाषेचे सर्वेक्षण सर्वप्रथम ग्रिअर्सन यांनी केले. त्यानुसार मराठी बोली संबंधीचे तपशील लिग्विस्टिक सर्वे ऑफ इंडिया च्या सातव्या भागात आले आहे हा भाग १९०५ साली प्रसिद्ध झाला. बोलींच्या संबंधी विचार करताना सामान्यपणे प्रदेशवाचक आणि जातीवाचक संज्ञाचा उपयोग केला जातो. आणि अमुक प्रदेशाची बोली किंवा अमुक जातीची बोली असा बोलींचा उल्लेख केला जातो.भाषा ही जरी सामाजिक असली तरी बोलणे हे व्यक्तिनिष्ठ आणि संदर्भनिष्ठ असते. 'जितक्या व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' असे म्हणतो त्याप्रमाणे 'जितक्या व्यक्ती तितक्या भाषा' असे ही म्हणता येते. जर आपण एखाद्या व्यक्तीच्या भाषिक सवयीचा अभ्यास केला तर त्या व्यक्तीच्या 'बोलण्याचा' अभ्यास होतो. इथं सर्वसाधारपणे 'बोलणे' याचा अर्थ 'व्यक्तीची भाषा' असे म्हणतो पण इथे आपण भाषिक समाजाचा किंवा गटांचा अभ्यास करतो. पण हा गट कमी –अधिक प्रमाणात एकाच बोलीतील, एकमेकांना समजेल असे बोलतो. तेव्हा त्याला आपण त्या भाषिक गटाला त्या गटाची 'बोली' असे म्हणतो. बोली हे दैनंदिन वापराचे, प्रत्यक्ष व्यवहारातले

भाषिक साधन असल्याने ती आपोआपच जिवंत व स्वाभाविक स्वरूप धारण करून असते. या बाबत डॉ. ना. गो. कालेलकर म्हणतात, 'बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुख्य परंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य.''

प्रशासन व राजकीय व्यवहार, शिक्षणाचे माध्यम, समाजातील लेखी व्यवहार यासाठी सहसा बोलीचा वापर केला जात नाही. बोलीचा वापर करणारे गट लेखन व्यवहारासाठी प्रमाण भाषेचा वापर करीत असतात. अशावेळी ती बोली त्या प्रमाणभाषेची बोली म्हणून किंवा त्या प्रमाणभाषेच्या अधिपत्याखाली वावरणारी बोली म्हणून ओळखली जाते.

एका भाषिक समाजाच्या बोलीचा अभ्यास केल्यानंतर आपण त्या भाषक समाजाला ठराविक एक भाषा बोलणारा समाज असे सर्वसामान्य नाव देतो. हे नाव प्रामुख्याने त्या प्रदेशावरून पडलेले असते. उदाहरणार्थ– महाराष्ट्राची भाषा 'मराठी' असे मानतो. त्या भाषेखाली अनेक बोली त्या एक भाषिक प्रदेशात समाविष्ठ असतात. साहजिकच त्यावरूनच त्या बोलींचे विभाग पाडलेले असतात, त्यावरून त्या त्या बोली ओळखल्या जातात.

उदाहरणार्थ :– 'मराठी' या नावाखाली येणाऱ्या आणि त्यांच्या प्रादेशिक नावांवरून ओळखल्या जाणाऱ्या वऱ्हाडी, खानदेशी, कोकणी इत्यादी प्रमुख बोली आहेत. याशिवाय बेळगावी, कोल्हापूरी, मराठवाडी इत्यादी अनेक बोली अभ्यासासाठी तिचे वैशिष्ट्ये व क्षेत्र नक्की करून आपल्याला त्यांचा समावेश करता येईल.

**२.३ विषय विवेचन :–**

**२.३.१ बोलीच्या निर्मितीची कारणे :**

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. सर्व सामाजिक संस्था परिवर्तनशील असतात आणि भाषादेखील सतत परिवर्तन करणारी संस्था आहे. कोणतेही परिवर्तन घडण्यामागे दोन मूलभूत कारणे दिसतात. ती म्हणजे १) काळ २) स्थळ. जसजसा काळ जातो तसतसे समाजजीवन बदलते. जीवनाच्या गरजेनुसार मग सामाजिक संस्थाही बदलत जातात. भाषा ही तर समाज जीवनाशी अतूटपणे जोडली गेलेली आहे. एक वेळ इतर सामाजिक संस्था नामशेष होतील, पण भाषा ही काही नामशेष होणारी संस्था नाही. या ना त्या स्वरूपात ती सदैव टिकूनच राहील. मानवी अस्तित्वासाठी भाषा ही अत्यावश्यक अशी गोष्ट आहे.

भाषा ही अत्यावश्यक असली तरी ती अपरिवर्तनीय आहे, असे मात्र नाही. भाषा ही एका बाजूने चिवट संस्था असली.तरी तिच्यात आवश्यक तेवढी सहज परिवर्तनाची क्षमता असते. याचे कारण मानवी भाषा ही केवळ ध्वनींची बनलेली नाही. तर ती ध्वनींनी सूचित होणाऱ्या संकेतांनी बनलेली आहे. भाषेतील या दुहेरी व्यवस्थेमुळे दोन गोष्टी साध्य झालेल्या आहेत. पहिले म्हणजे आवश्यक ते परिवर्तन घडण्याची क्षमता तिच्यात आली आणि दुसरी गोष्ट म्हणजे सतत विस्तारत, बदलत जाणारे मानवी जीवन आपल्या कवेत घेण्याची व्यापकता तिच्या ठायी निर्माण झाली आहे. भाषेच्या दुहेरी व्यवस्थेमुळे ज्यांची गरज संपलेली आहे, असे भाषिक संकेत माणूस पुसून टाकू शकता आणि आपल्या नवनव्या गरजांसाठी पाहिजे तेवढे नवे भाषिक संकेत निर्माण करू शकतो. इतकेच नव्हेतर एकच जीवन व्यवहारासाठी एका भाषेत एकाच वेळी एकापेक्षा अधिक संकेत रूढ करू

शकतो. उदाहरणार्थ : कुटुंबातील पितृदर्शक नात्यासाठी एक गट 'वडील'हा शब्द वापरील तर दुसरा गट 'बाप' हा शब्द वापरील. एकच भाषा बोलणाऱ्या समाजातील दोन गटांच्या गरजा व धारणा वेगवेगळ्या असतात. त्यामुळे ते दोन गट एकाच भाषेची दोन रूपे निर्माण करतात व वापरतात असे दिसते.

अशा रितीने एकाच समाजातील लोक आतल्या आत भिन्न-भिन्न गट करून राहतात. असे गट होण्याची कारणे सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक, शैक्षणिक, जातीय अशी कोणतीही असू शकतात. अशा कारणाने निर्माण झालेल्या गटातल्या लोकांची स्वतःच्या गटापुरती अशी विशिष्ट भाषा तयार होते. ही भाषा संपूर्ण समाज वापरत असलेल्या सर्वसाधारण भाषेशी म्हणजेच प्रमाणभाषेशी काही-काही बाबतीत भिन्नता राखून असते. गट प्रमाणभाषेपासून जितका दुरावलेला असेल तितकी त्या गटाची भाषा प्रमाणभाषेशी भेद राखून असेल. उलट हा गट जर प्रमाणभाषेच्या सतत संपर्कात असणारा, अगदी जवळीक असणारा असेल तर किरकोळ-फरकांपेक्षा प्रमाणभाषेहून फारसे वेगळपण या गटाच्या भाषेत असणार नाही.

समाजातील गटांची वेगळी बोली कधी व कशी निर्माण होते. या विषयी डॉ. ना. गो. कालेलकरांनी म्हटले आहे की, 'समाजाच्या सर्वच व्यक्ती सदोहित एकत्र येवून व्यवहार करीत नाहीत. काही व्यवहार एखाद्या विशिष्ट वर्गापुरते मर्यादित असतात कारण समाजरचनेचा तो एक आवश्यक असा भाग आहे. अशा वर्गातल्या लोकांच्या भाषेचे स्वरूप व तिची पातळी सामान्य भाषेपेक्षा वेगळी होते. अशारितीने भिन्न असणारी ही भाषा एकाच व्यवसायातल्या अनेक व्यक्तींना एकत्र आणणारी पण सामान्य भाषेपासून दूर असलेली एक बोली होते.'' थोडक्यात समाजरचनेच्या किंवा सामाजिक व्यवहारांच्या गरजेतून एकभाषिक समाजाच्या आतच विविध गट तयार होणे हे बोलींच्या निर्मितीचे एक महत्वाचे कारण आहे. भाषेच्या अंगी एक लवचिकता असते आणि परिवर्तन होत राहण्याची क्षमता असते. भाषेच्या या अंगभूत वैशिष्ट्यांमुळेही भाषेमध्ये बोली निर्माण होतात. काळाच्या ओघात भाषेत परिवर्तन होते. पण हे परिवर्तन सर्व भौगोलिक परिसरात एकसारखे होत नाही. एकाच भाषेची भिन्न भिन्न रूपे भिन्न भिन्न प्रदेशात विकसित होत जातात. ही रूपे एकमेकांना दुर्बोध वाटावीत इतकी दूर गेलेली नसतात. ही रूपे वापरणारे लोक आपापसात व्यवहार करू शकतात. त्यासाठी ते मूळ भाषेच्या कोणत्या तरी एका वर्तमान कालीन रूपाचाच वापर करतात. अशा रीतिने भाषेच्या ऐतिहासिक विकास क्रमांमध्ये बोली जन्म पावतात.

काही कारणाने एखादा समाज स्वत:च्या भाषेचा त्याग करतो व दुसरी भाषा स्वीकारतो. पण त्यानंतरही त्याच्या स्वभाषेतील काही सवयी, विशेष तसेच राहतात. त्यामुळे स्वीकारलेल्या भाषेचे रूप बदलून नवे रूप तयार होते. व एक नवी बोली तयार होते. सीमाभागातील लोकांचा शेजार-भाषा बोलणाऱ्या लोकांशी संबंध येतो व भाषेचे एक वेगळेच रूप तयार होते. यातून सीमाभागात बोलींचा जन्म होतो. जातीनुसार आचार-विचार ठेवण्याच्या जीवनशैलीमुळे जातीनुसार गट तयार होतात आणि त्या त्या जातीची भाषाही तयार होते. जातिसंस्था हे निदान हिंदुस्थानापुरते तरी बोलींच्या निर्मितीचे एक कारण ठरते.

व्यावसायभिन्नता हे ही बोलींच्या निर्मितीचे कारण आहे. व्यावसायिक गरजेमुळे त्या त्या गटाची एक त्यांच्यापुरती भाषा बनते आणि एक वेगळी भाषा, एक व्यावसायिक बोली निर्माण होते. समाजात काही

प्रभावक्षेत्रे असतात. त्यांच्या अधिपत्याखाली काही दबाव गट वावरत असतात. या प्रभावगटाची व दबावगटाची एक एक बोली तयार होत असते. लिंगभेदामुळे भाषाभेद निर्माण होतात. उदाहरणार्थ, पुरूषांची भाषा वेगळी असते. स्त्रियांची वेगळी असते. त्यांची त्यांची अनुभवक्षेत्रे, रीती, बंधने, भावना या साऱ्यांचा परिणाम भाषावापरावर होत असतो व स्वतंत्र बोली अस्तित्वात येतात. तसेच वृध्दांची, लहान मुलांची 'बालभाषा' याही स्वतंत्र होऊ शकतात.

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, समाजजीवनामध्ये विविध गट निर्माण होत राहतात आणि त्या त्या गटाच्या जगण्याच्या शैलीला पोषक असे रूप भाषा धारण करत असते आणि यातूनच बोलींची निर्मिती ही सातत्याने होत राहते.

**बोलीचे विशेष :**

प्रमाणभाषा बोलणारे लोक सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक दृष्टींनी पुढारलेले असतात. त्यांच्या तुलनेने बोली बोलणारे लोक या सर्व बाबींमध्ये मागासलेले असतात. त्यामुळे अशा सांस्कृतिक, शैक्षणिक इत्यादी दृष्टींनी मागासलेल्या लोकांच्या बोलीला दर्जेदार मानायला समाजातील प्रभावी गट तयार नसतो. याबरोबरच कागदोपत्री व्यवहार, शिक्षण, धर्मवाङ्.मय इत्यादीसाठी प्रमाणभाषाच वापरली जात असते. बोली अशा महत्त्वाच्या जीवनगटांसाठी वापरली जात नाही. त्यामुळे ती प्रमाणभाषेपेक्षा हलकी, कमी दर्जाची अशी समजूत होऊन बसली आहे. बोली तिच्या स्वत:च्या क्षेत्रातल्या गरजेनुसार पुरेशी विकसित झालेली भाषा असते. प्रत्येक बोलीचे उच्चारणाचे व व्याकरणाचे काही नियम असतात आणि त्या बोलीचे सर्व भाषक ते नियम पाळत असतात. प्रत्येक बोलीचा स्वत:चा असा शब्दसंग्रह असतो आणि ती बोली वापरण्यांना तो शब्दसंग्रह चांगला परिचयाचा असतो.

भाषिक संरचनेच्या दृष्टीने सर्व बोली सारख्याच कार्य करणाऱ्या असतात. सामाजिक प्रतिष्ठ-अप्रतिष्ठेच्या आपल्या कल्पना भाषेवर लादतो. त्यातून प्रमाणभाषेच्या तुलनेत बोलींना हीन लेखण्याची प्रवृत्ती जन्म घेते व बोलीमधील शब्दरूपे अशुद्ध ठरविली जातात. बोलीबाबत पूर्ण अभ्यास केल्यावर बोली अशुद्ध असते किंवा बोलीचे उच्चारण चुकीचे असते ही विधाने खोटी ठरतात. कारण ती अशुद्ध किंवा चुकीची नसतात तर त्या त्या बोलीतील ती शब्दरूपे असतात. थोडक्यात बोली हे एक परिपूर्ण भाषिक रूप आहे. बोली ही लेखनाची भाषा होऊ शकत नाही असा गैरसमज आहे. आज जगात सर्वत्र निरनिराळ्या बोलींत समर्थपणे लेखन होताना दिसते आहे. त्यामुळे लेखन पेलण्याची क्षमता बोलीमध्ये आहे, हे सिद्ध झाले आहे.

बऱ्याचशा बोली लिपीबद्ध नसतात. त्यामुळे सर्वच बोली अविकसित असतात असे म्हणणे चूक ठरेल. कारण दैनंदिन व्यवहारात बोलींचाच वापर जास्त केला जातो. ज्या अर्थी समाजातील एका गटाच्या जीवनशैलीचे बोली हे एक अपरिहार्य असे अंग आहे, त्या अर्थी समाजाची भाषिक गरज भागविण्याइतकी ती पुरेशी विकसित आहे. जीवनातील विविध अनुभवांना, कृतींना सामोरे जाण्याइतकी बोली सक्षम असते. ती चैतन्यमय व प्रत्ययकारी असते, प्रत्यक्षनिष्ठ असते. बोलींना व्याकरणे नसतात, भाषिक संरचना नसते, अशासारख्या गैरसमजुती आहेत. पण बोलींचे स्वरूप व कार्य नीट समजावून घेतले तर बोलींबाबतचे अपसमज आपोआप दूर होतील.

### २.३.२ बोली अभ्यासाची पारंपरिक दृष्टी :

अलीकडे झालेल्या एका पाहणीत जगात सुमारे सात हजार इतक्या भाषा असल्याचे आढळून आले आहे. यांतील अनेक भाषांची त्यांच्या नावांपलिकडे कोणतीही माहिती मिळू शकत नाही. भारतात सुमारे दोनशे भाषा बोलल्या जातात. या बोलींची एकूण संख्या दीड हजार हूनही अधिक आहे. जॉर्ज ग्रिअर्सन यांनी एकोणचाळीस बोलींचा उल्लेख केला आहे. आजही कोकणी या बोलीभाषेच्या वीसहून अधिक बोली आहेत. जेव्हा भाषावर प्रांतरचना झाली त्यावेळेस तेव्हा डांगी ही बोली मराठी की गुजराती हे नीटसे समजून घेण्यापूर्वीच डांगी भाषा गुजरातीमध्येच गेली.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये शिक्षणाचा वाढता प्रसार, नागरी जीवनाची ओढ व बदलती सामाजिक मूल्ये यामुळे आदिवासी, भटक्या जमाती व दलित वर्ग यांच्या जीवनात आज बऱ्याच घडामोडी झाल्या आहेत. त्यांच्या जीवनशैलीमधील राहणी, विचारसरणी व जीवनमूल्यांमध्ये बदल घडून येत आहे. साहजिकच या सर्वाचा परिणाम भाषांवर होणे अपरिहार्य आहे. विशेषतः बलवान सामाजिक गटांत दुर्बल सामाजिक गट विरून गेल्याने आज अनेक बोली नावालाच राहिल्या आहेत; तर अनेक नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे व्याकरण, शब्दकोश, गद्यपाठसंग्रह इत्यादींद्वारे त्यांच्या स्वरूपाविषयीच्या माहितीचे संकलन, संशोधन व त्या भाषा जतन होणे ही आज काळाची गरज आहे.

### २.३.३ बोलींच्या अभ्यासाचे स्वरूपः

बोलींचा अभ्यास हा विगमनात्मक प्रक्रियेवर आधारलेला असतो. यामुळे साहित्याचे संकलन करणे व पुढे याचे विश्लेषण करणे हे या अभ्यासाचे प्रमुख टप्पे होत. हे दोन्हीही टप्पे समान महत्त्वाचे व परस्परावलंबित असतात. बोलीच्या हा अभ्यासाची सुरूवात ही संशोधकाने संकलित केलेल्या साहित्याच्या गुणवत्तेवर, प्रातिनिधिकतेवर व विश्लेषणातील काटेकोरपणा व अचूकता या दोन गोष्टींवर अवलंबून असते. संकलनाची सुरूवात ही विश्लेषणा अगोदर होत असली तरी त्याची दिशा विश्लेषणच ठरवीत असते.

बोलीचा अभ्यास करीत असताना संशोधकास क्षेत्र कर्माच्या (field - work) पद्धतींचे व तंत्रांचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच साहित्य संकलनातील विशेषतः ही क्षेत्रकर्मातील (field - work) त्याच्या कौशल्यावर आधारित असते. सर्वसाधारणपणे संशोधकाला स्वतः त्या क्षेत्रात जाऊन साहित्यसंकलन करावे लागते. असे संशोधन करणाचा व्यक्तीला क्षेत्रान्वेषक किंवा क्षेत्रसंशोधक (field - investigator) अशी संज्ञा वापरली जाते. बऱ्याच वेळेला संशोधक हा त्या बोलीभाषेचा अभ्यासक असतो. भाषकांना आपल्या बोलीचा अभ्यास करीत असताना कधीकधी त्या क्षेत्रामध्ये किंवा निवासस्थानी जाऊन अभ्यास करावा लागतो. हे सर्वकष व प्रमाण संशोधनासाठी प्रत्यक्ष भाषकाला त्या समाजात राहूनच साहित्यसंकलन करावे लागते.

बोलीचा अभ्यास करीत असताना त्यास बोलीच्या अभ्यासासाठी शब्द, रूपे, वाक्ये, उक्ती, गृहपाठ इ. स्वरूपातील साहित्य जमा करावे लागते. हे साहित्य ज्या भाषकाकडून जमा केले जाते त्या भाषकास निवेदक, विज्ञापक वा सूचक (informant) अशी संज्ञा आहे. निवेदकाचे स्वरूप हे एक किंवा अनेक असू शकतात. यामध्ये स्त्री, पुरूष, बाल, वृद्ध अशा अनेकविध स्वरूपांची असू शकतात. बोलीच्या अभ्यासाच्या कामास

सुरूवात झाल्यापासून संशोधक व निवेदक यांच्यामधील एकता ही बोलीचा अभ्यासपूर्ण होईपर्यंत असते. संकलनाची सुरवात करण्यापूर्वी संशोधक हा विशिष्ट बोली व तिचा भाषक समाज यांच्याविषयी उपलब्ध असलेले सर्व लिखाण आपल्या अभ्यासातून व त्यासंबंधी सर्व टिप्पणी काढतो ज्या बोलीचा अभ्यास करायचा आहे त्या बोलींच्या साहित्य संबंधाविषयी संकलनासाठी प्रश्नावली, रूपावली, शब्दावली, वाक्यावली तक्ते, कोष्टके इ. साधनांची माहिती गोळा करावी लागते. निवेदकाकडून प्रश्नावलीच्या आधारे त्या क्षेत्रातील साहित्य जमा करण्याच्या क्रियेपासून प्रत्यक्ष क्षेत्रकर्मास सुरूवात होते. संशोधकाने या क्षेत्रकर्मात विचारलेल्या प्रश्नास निवेदकाकडून मिळणारा प्रतिसाद आंतरराष्ट्रीय ध्वनिलिपी वा तत्सम अन्य करीत लिपीत लेखनिविष्ट करतो. टेपरेकॉर्डच्या साहाय्याने आवश्यक त्या सामग्रीचे ध्वनिमुद्रण करतो. विविध तंत्राच्या साहाय्याने निवेदकाकडून भाषक सामग्री काढून घेण्याच्या या क्रियेला निष्कर्षण (Eticitation) असे म्हणतात.

निवेदकाकडून आपण भाषिक सामग्री मिळवतो. ही मिळविलेली भाषिक समग्री आपण निष्कर्षणाने आपल्याकडे जमा होते. ही भाषिक सामग्री पद्धतशीरपणे विभागून ती माहिती संग्रहित करावी लागते. यासाठी संकलित केलेल्या साहित्याचे संपरीक्षण (Collation) करावे लागते. ध्वनिव्यवस्था ,रूपव्यवस्था,वाक्यव्यवस्था, अर्थव्यवस्था इ. संरचनेच्या विविध अंगांशी संबंधित असलेल्या साहित्याचे पृथकपणे स्वतंत्र संचयिका (files) वापरून ठेवल्यास ते पुन्हा वापरण्यास सोयीस्कर होते.

संकलन व संपरीक्षण यांच्या नंतरची प्रक्रिया म्हणजे विश्लेषणाची होय. विशेषतः या तिन्ही प्रक्रिया निष्कर्षणास प्रारंभ झाल्यापासून एकसारख्या चालू असतात. वेळोवेळी संकलित साहित्याचे विश्लेषण करून ते तपासून त्याचे निष्कर्ष काढावे लागतात. पुढे जमा केलेल्या साहित्याशी त्याची सांगड घालावी लागते. त्यात जर विरोधाभास आला तर त्यामध्ये सुधारणा करून घ्यावी लागते. सर्वात शेवटची प्रक्रिया म्हणजे अभ्यासांती हाती आलेले निष्कर्ष. या निष्कर्षाचे वैशिष्टये म्हणजे भाषावैज्ञानिक प्रणाली अनुसरून त्याचे सोदाहरण विश्लेषण केले जाते. अशाप्रकारे बोलीचा अभ्यास संकलन, संपरीक्षण, विश्लेषण व वर्णन या चार विभागणींमध्ये केला जातो.

### २.३.४ भाषासंशोधकास आवश्यक असणारे गुण :–

भाषासंशोधकास भाषाविज्ञानातील मूलभूत संकल्पनांशी त्याला माहिती असावी लागते. तसेच ध्वनिशास्त्र व व्याकरणशास्त्र याचे ज्ञान चांगले असावे लागते. त्याला कोणत्याही बोलीतील भाषणाचे ध्वनिलिपीत लेखन करण्याची त्याला सवय असली पाहिजे. त्याचबरोबर विशिष्ट बोलीत कोणते अपरिचित ध्वनी आढळले यासंबंधीची माहिती भाषासंशोधकास असणे गरजेचे आहे. भाषासंशोधकास आवश्यक असणारे गुण पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) व्याकरणशास्त्रातील विश्लेषणपद्धतीच्या ज्ञानाबरोबरच क्षेत्रीय बोलीत कोणत्या प्रकारची रूपरचना व व्याकरणिक प्रवर्ग आढळणे शक्य आहे. याचा अंदाज भाषासंशोधकास बांधता आला पाहिजे.

२) भाषासंशोधकास हा उत्कृष्ट क्षेत्रान्वेषकही असावा लागते.

३) भाषासंशोधकास उत्तम मनुष्य स्वभावाची पारख असावी लागते. कारण त्याला हरघडी नाना प्रकारच्या,नाना

प्रवृतींच्या,सवयींच्या व्यक्तीशी त्याचा संबंध येत असतो. आणि अशा व्यक्तीमधूनच त्याला योग्य निवेदकाची निवड करावी लागते.

४) भाषासंशोधक हा एखाद्या कुशल कारागिरासारखा असावा लागतो. कारण प्रसंगी एखादे यंत्र बिघडल्यास त्याची दुरूस्तीही करावी लागते. क्षेत्रकर्मासाठी बाहेर पडलेल्या संशोधकावर असे प्रसंग वारंवार येतात.

५) संशोधकाच्या अंगी चिकाटी, पद्धतशीरपणा व दीर्घ प्रयत्न हे गुण असणे अत्यावश्यक असते.

६) कोणत्या प्रकारचे काम करावयाचे आहे व ते साध्य होण्यासाठी कोणत्या पद्धती व तंत्र वापरणे आवश्यक आहे.या संबंधी निश्चित कल्पना संशोधकास असावी लागते.

७) क्षेत्रात गेलेल्या संशोधकाची भूमिका केवळ अभ्यासकाची असावी. नमुना स्वीकारलेल्या भाषाध्ययनाच्या ग्रंथातील प्रत्येक मुद्द्यास, विषयास व शीर्षकास सोयीस्कर अशी उदाहरणे शोधीत बसण्यापेक्षा आपल्या संशोधनाची स्वतंत्र मांडणी करावी. हाती घेतलेले संशोधन जणू प्रथमच चालले आहे अशी त्याची धारणा असावी. भाषासंशोधकास भाषासंशोधन हे एक निर्भर आनंद देणारे कार्य आहे. विविध सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या समुदायात मिसळून त्यांच्या भाषा शिकणे, लण्यंकित करणे व संरचनेतील गुंतागुंतीच्या प्रश्नांची उकल करणे, आपल्या अभ्यासिकेत बसून संशोधन शांतपणे करीत राहणे यात एक वेगळा आनंद आहे.दिवसेंदिवस भाषा-संशोधनाच्या व्यावहारिक उपयुक्ततेचे क्षेत्र विस्तारित आहे. बोलीभाषांचे संशोधन संकलन, संपरीक्षण विश्लेषण व वर्णन या चार टप्प्यांनी तिचे संशोधन केले जाते. यातील प्रत्येक टप्पा हा महत्त्वाचा असून त्याच्या कार्यवाहीची स्वतंत्र तंत्रे व पद्धती आहेत. संशोधकास त्याचा वापर केव्हा व कुठे कसा करावयाचे याचे ज्ञान असणे गरजेचे आहे. साहित्यसंकलन करण्याच्या दोन पद्धती पुढीलप्रमाणे आहेत.

१ **एकभाषा उपगम : (Monolingual Approach**) निवेदकास क्षेत्रन्वेषकाला ज्ञान असलेली कोणतीही भाषा समजत नसेल तर क्षेत्रान्वेषण हे निवेदकाच्या भाषेतच करावे लागते. साहित्य संकलनाच्या या पद्धतीस एकभाषक उपगम असे म्हणतात.

२ **द्वै भाषक उपगम : (Bilingual Approach)** निवेदक व क्षेत्रान्वेषक या दोघांसही एखादी समान भाषा समजत असल्यास साहित्य- संकलनविषयक संभाषण त्या भाषेतच होते. अशा पद्धतीस द्वैभाषक उपगम असे म्हणतात.

एकभाषक उपगमातील प्रारंभीचे निष्कर्षण हे हावभावांद्वारेच करावे लागते, यात कसे हसावे, कसे बोलावे, कसे अभिवादन करावे, कसे प्रश्न विचारावेत, कोणत्या क्रमाने कोणत्या कृती कराव्यात यासंबंधीचे शास्त्रच बनून गेले आहे. संकलनासप्रमाणे साहित्य-संचय, संपरीक्षण, विश्लेषण व वर्णन यांच्या देखील नानविध पद्धती व तंत्रे आहेत याचे परीक्षण भाषासंशोधकांनी करणे आवश्यक आहे.

**निवेदकाची निवड :-**

भाषक संशोधनात निवेदकाचे महत्व अनन्यसाधारण आहे. निवेदक हा भाषा वैज्ञानिक नसतो व प्रायः नसावा. तो अभ्यास विषय झालेल्या बोलीचा केवळ भाषक असावा. त्याने पुरविलेल्या भाषक नमुन्यांच्या व इतर

भाषक साहित्याच्या आधारावर संशोधकाने त्याच्या बोलीचे व्याकरण लिहावयाचे असते. विशिष्ट शब्दाचा अर्थ काय हे त्याने सांगण्यापेक्षा त्या शब्दाचा वेगवेगळ्या संदर्भात केव्हा व कसा उपयोग होतो हे त्याने सांगावे असे अपेक्षिले जाते. अर्थनिश्चितीचे काम संशोधकाचे असते.

बोलीच्या संशोधनाची सर्व इमारत निवेदकाने पुरविलेल्या साहित्यावर आधारली जात असल्याने ती बोली त्याची मातृबोली असणे आवश्यक असते. बालपणापासूनच प्रदीर्घ काळ भाषक समाजामध्येच वाढलेल्या निवेदकास स्वतःच्या संस्कृतीची चांगली ओळख असते. त्याची जडण-घडण ही त्याच समाजामध्ये झालेली असल्यामुळे त्याला समाजातील विविध चालीरीती, धर्मकल्पना, विवाह व जन्मर्तिकादी संस्कार,आप्तसंबंध, पशुपक्षी, वृक्षविशेष, निसर्ग, शेतीवाडी, बाजारहाट, दैनंदिन व्यवहार इ. विषयांवर तो सहजपणे बोलू शकतो. निवेदक हा अत्यंत बोलका व हजरजबाबी , संभाषण चतुर असावा. त्याला कथाकथन व गीतगायन यांचे उत्तम ज्ञान असावे तसेच ग्रामीण वाक्यप्रचार, म्हणी, दाखले इत्यादी उदाहरणांचा वापर करून शैलीदार भाषा बोलणारा असे गुण उत्तम निवेदकाच्या अंगी असणे आवश्यक आहे. एखादी व्यक्ती स्वाभाविकपणे आपल्या भाषेत कशी बोलत आहे हे जाणून घेण्यासाठी क्षेत्रान्वेषकाने त्या व्यक्तीस पंधरावीस प्राणी, पक्षी वा वनस्पतींची नावे निवेदन करण्यास सांगावे. त्याने ती व्यक्ती निवेदन करताना,माहिती सांगताना त्या समाजजीवनाशी, ग्रामीण जीवनाशी समरस झालेली आहे, चौकस आहे व आपली मातृभाषा सहजपणे बोलत आहे. अशाच व्यक्ती आपल्याला बोलीचे संकलन विश्लेषण करताना निवेदक म्हणून कामास उपयोगी पडतात.

**निवेदकांची संख्या :**

सर्वसाधारणपणे भाषासंशोधक हे क्षेत्रकर्मासाठी एका वेळी एकाच निवेदकाचा उपयोग करतात. तसेच आपल्या संशोधनास आवश्यक असणारी सामग्री, प्रश्नावली व विविध निष्कर्षण तंत्रे यांच्या साहाय्याने माहिती जमा करतात. क्षेत्रकर्माचा अनुभव नसलेल्या भाषापंडितांकडून या पद्धतीवर अनेक आक्षेप घेतले जातात. त्यांच्या मते, '' महिनोगणती एकाच निवेदकाबरोबर काम करून भाषेच्या स्वरूपाचे आकलन होणे अशक्य होय. एकाच निवेदकाकडून साहित्याचे संकलन करण्यापेक्षा त नैसर्गिक अवस्थेत, पाचसहा भाषक परस्परांशी संभाषण करीत असताना त्यांच्या भाषणावरील टिपणांवर आधारलेले असावे. त्यायोगे भाषेतील खरीखुरी रूपे प्राप्त होऊ शकतील.'' (आधुनिक भाषाविज्ञान - संपादक डॉ. कल्याण काळे / डॉ. अंजली सोमण पृष्ठ क्र. २२१) या आक्षेपात, त्याच्या कारणमीमांसेत सुचविलेल्या क्षेत्रकर्मपद्धतीत सातत्यता नाही असे म्हटले जाते.

सर्वप्रथम बोलीचे संशोधन करीत असताना तिचा अभ्यास ध्वनिव्यवस्था व व्याकरण यादृष्टीने केला जातो. ही माहिती निवेदकाकडून संकलित करावी लागते. ध्वनिव्यवस्था व व्याकरण यांचे वर्णन करण्यासाठी निवेदकांकडून हजारे उक्तींची (uttreances) सामग्री जमा करावी लागते. भाषेतील कोणतीही उक्ती त्या भाषेच्या विशिष्ट नियमास अनुसरून होत असते. त्यामुळे सर्वच भाषेचे, भाषक हे नियम सारख्याच पद्धतीने वापरत असतात. उदा- प्रमाण मराठीचा भाषक 'मी' या सर्व नामऐवजी 'हम' हे सर्वनाम किंवा षष्ठीच्या 'च्या' प्रत्ययाऐवजी 'का' हा प्रत्यय वापरणार नाही. 'जा' धातूचे भूतकाळी पुल्लिंगी तृतीयपुरूषी एकवचन रूप 'गेला' असेच होईल. 'गेला', 'गये' असे होणार नाही. प्रत्येक निवेदक जोपर्यंत निवेदक हे एकाच भाषेच्या एकाच बोलीचे भाषक आहेत व

त्यांची जीवनपद्धती साधारणपणे एकाच साच्याची आहेत. तोपर्यंत त्यांच्या भाषेच्या संरचनेच्या अर्थ एकच असतो. त्यामुळे उक्तींचे संकलन एक किंवा अनेक निवेदकांनी केले तर विश्लेषणात कोणताही फरक पडत नाही. म्हणूनच साहित्यसंकलनासाठी एकच निवेदक वापरणे अनेक दृष्टीने सोयीचे आहे.

निवेदकांची संख्या ही संशोधन-प्रकारावरही अवलंबून असते. शैली, द्वैभाषिकता, बहुभाषिकता, भाषिक प्रामाण्य, विविध तत्त्वांवर आधारलेले अंतर्भाषिक इत्यादी विषयांवर विषयात: समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन करणाऱ्या संशोधकास, एकाहून अधिक निवेदकांचा वापर करणे सोयीचे ठरते. बोलींचा शब्दसंग्रह बनवायचा असेल तर त्यातील येणारे शब्द, त्याची माहिती संग्रहित करण्यासाठी एकाच निवेदकाकडून माहिती संकलित करणे योग्य नसते. तर त्यासाठी अनेक निवेदकांकडून सांस्कृतिक व व्यवसाय विशिष्ट शब्द संकलित केले जातात. त्यासाठी बोलीच्या संशोधकास अनेक, शेकडो निवेदकांचा उपयोग करावा लागतो. क्षेत्रकर्मामध्ये निवेदक किती असावेत यापेक्षा ते कसे असावेत व त्यांच्याकडून उपयुक्त माहिती कशी गोळा करता येईल हा विचार उपयुक्त ठरतो.

**निवेदकाचे वय :**

बोलीचे संकलन करीत असताना निवेदकाचे वय कमी किंवा जास्त असू नयेत यासाठी वयाला काही मर्यादा नाहीत. त्यांचा वाढत्या वयाबरोबरच भाषकांचा जीवनानुभव, संस्कृती, व्यवसायातील व्यक्तीशी येणारा विविध संबंध त्यातील शब्दसंग्रहाची विविधता महत्वाची असते. यामध्ये भाषकाने त्या समाजातील लोकसाहित्य व लोकसंगीत याचे ज्ञान आत्मसात केलेले असते. तसेच म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, वचने सुविचार इत्यादींचा वापर त्याने त्यांच्या दैनंदिन जीवनशैलीमध्ये केलेला असतो. यामुळे श्रवण, स्मृती किंवा वाणी चांगली असलेली कोणतीही प्रौढ व्यक्ती ही उत्कृष्ट निवेदक होऊ शकते.

**निवेदकाचे प्रशिक्षण :**

सुरवातीपासूनच बोलीचे संकलन व विश्लेषण करीत असताना क्षेत्रकर्म चालू असते. परंतु निवेदकाची निवड झाली म्हणजे क्षेत्रकर्म चालू झाले असे नाही तर त्याला त्या संशोधन प्रकारानुसार त्यास आवश्यक ते प्रशिक्षण द्यावे लागते. त्यासाठी त्याला त्या विषयाची गोडी लावावी लागते. तसेच त्यास प्रोत्साहन देऊन स्वत:शी अधिक विचार करण्यास व माहिती पुरविण्यास उद्युक्त करावे लागते. सर्वप्रथम सुरवातीलाच निवेदकास बौद्धिक व शैक्षणिक कामाची सवय नसल्याने त्यास दररोज चार-पाच तासच त्याच्याकडून क्षेत्रकर्म करणे सोयीचे असते.

निवेदकाच्या कामाचे स्वरूप निश्‍चित केल्यानंतर त्यास प्रश्नावलींच्या साहाय्याने निष्कर्ष काढणे, त्या विषया संबंधित मुद्दे यांची माहिती द्यावी लागते. तसेच कामाची वेळ व स्थान निश्‍चित करावे. तो निवेदक तेथे नियमितपणे येईल अशी त्यास सवय लावावी लागते. नियमितप्रमाणेच अन्य गोष्टी निवेदकाच्या अंगवळणी पडतील असे त्यास शिक्षण द्यावे. निवेदकाचा संबंध अन्य भाषकांबरोबर असल्यास त्यांच्या संभाषणात येणारे नवनवीन शब्द व रूपे यांची टिप्पणी काढणे, बैठकीच्या वेळी मोठ्या आवाजात, स्पष्ट व संशाधकाकडे तोंड ठेवून बोलणे, याचबरोबर आवश्यक तेव्हा एखाद्या उक्तीचा पुनरूच्चार करणे इत्यादी सर्व गोष्टींची सवय त्याला लावावी लागते. निवेदकास आठवतील ते शब्द, वाक्ये, वाक्प्रचार, म्हणी, कथा, गीते निवेदन इ. साहित्य त्याच्या

लेखनपद्धतीने लिहिण्यास त्यास प्रोत्साहन द्यावे. त्यास भाषक संशोधकाबरोबर काम करण्याची सवय लावावी. निवेदक हा केवळ भाषक न राहता एक उपयुक्त सहकारी कसा बनेल याकडे संशोधकाने लक्ष देणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे संशोधकाबरोबर काम केल्याने निवेदकाची बौद्धिक पातळी व विचार करण्याची शक्तीही वाढते. तसेच संशोधकाबरोबर प्रवास केल्यास त्याला प्रत्येक नवनवीन ठिकाणे, समाज, यांचा परिचय होतो. यामधूनच त्याचे व्यक्तिमत्त्व घडत असते. यातूनच काही निवेदक हे आपल्या कला गुणांना वाव देऊन त्यातून नोकरी, धंदा, राजकारण इत्यादी क्षेत्रात मानाचे स्थान मिळवतात. असे अनेक सामान्य व अशिक्षित निवेदक भाषासंशोधकांबरोबर राहिल्याने समाजामध्ये मानाचे स्थान मिळविलेले आहेत. उदा. जोनो केन्यारा, क्वाने नक्रुमा या सर्वसामान्य व्यक्तींनी भाषानिवेदकाचे काम करून पुढे आफ्रिकेतील राष्ट्रीय चळवळीचा पाया घातला आहे.

### २.३.५ भाषिक साहित्याचे लिप्यंकन :

बोलीच्या अभ्यासाची सुरूवात साहित्य संकलनाने (Data collection) होत असते. यातील बहुसंख्य बोली या केवळ बोलभाषाच असल्याने त्यांचे साहित्य हे प्रारंभीच्या स्वरूपात मौखिक स्वरूपातच आढळते आणि बोलीचा अभ्यास हा विगमनात्मक स्वरूपाचा असल्याने यामध्ये संकलित साहित्य, त्यातील विविधता यांस फार महत्व असते. बोलीभाषेतून येणाऱ्या मौखिक भाषेचे स्वरूप सर्व प्रथम लिखित स्वरूपात करावे लागते. आज भारतीय भाषांच्या संदर्भात विचार करावयाचा झाल्यास मौखिक साहित्याचे लिप्यंकन दोन प्रकारे करता येणे शक्य आहे. एक म्हणजे आंतरराष्ट्रीय ध्वनिलिपीचा वापर करून किंवा देवनागरी लिपीतील चिन्हांचा वापर करावा लागेल. येथे आपण मराठी बोलींचा अभ्यास करण्यासाठी देवनागरी लिपीचा वापर करणे सोयीस्कर ठरेल.

देवनागरी लिपी ही ध्वनितत्वांवर आधारलेली असल्याने अधिक ध्वनिनुगामी करण्यासाठी तिच्यावर फारसे संस्कार करावे लागत नाहीत. अक्षराच्या शेवटी व्यंजनाने लेखन हलन्त् चिन्हाने करणे (पठ्ठा, हात), दन्त्य व तालव्य घर्षस्फोटकांतील भेद दर्शविण्यासाठी दन्त्य स्पर्शसंघर्षींच्या अधोभागी बिंदु चिन्ह देणे (चारा, चावडी), इ आणि 'उ' याखेरीज इतर स्वरांचे दीर्घ उच्चारण दर्शविण्यासाठी त्यांचा अधोभाग रेखांकित करणे (आज्, एक्, मोट, बस) 'आ' 'आ' काराचे संवृत उच्चारण दर्शविण्यासाठी त्याखाली अधोमुखी अर्धेदु-चिन्ह काढणे (दक्षिण कोकणी- त् कलि,'डोके'कातकरी-अन् 'अन्न') स्वरांचे नासिक्य रंजन दर्शविण्यासाठी त्यांच्या शिरोभागी बिंदुयुक्त ऊर्ध्वमुखी अर्धेदु-चिन्ह देणे (सँव्शय, सँसयुक्त) असे काही संस्कार केल्याने त्याचा उपयोग होऊ शकतो.

### २.३.६ बोलींच्या अभ्यासाचे प्रकार आणि साहित्यसंकलन :

सर्वसामान्यपणे बोलींचे अध्ययन, त्याची ध्वनि व्यवस्था व व्याकरण यांचे वर्णन करण्याच्या हेतूने संकलन होत असते. बोलीच्या अभ्यासाचे प्रकार अनेक आहेत. त्यांतील एक प्रकार दुसऱ्या साहित्य प्रकारास उपयोगी पडेलच असे नाही. त्यामुळे नियोजित अभ्यास करणे, त्या अभ्यासास कोणते साहित्य उपयुक्त ठरेल याचा विचार करणे आवश्यक आहे. भाषकांच्या संभाषणातून व्यक्त होणारा सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ हाही अभ्यासाचा विषय होतो. तसेच कधीकधी बोलींचा अभ्यास हा ऐतिहासिक व तौलनिक व्याकरण लिहिण्याचे किंवा त्यांचे मानचित्र बनविण्याचे कार्यही केले जाते. गरजेनुसार बोलींचे अध्ययन करण्यासाठी त्यामध्ये पाठ्यपुस्तके बनविली जातात. त्यांच्या लेखनासाठी लिपी नसल्यास लिपी ही बनविले जाते. क्वचितच बोलींतील लोककथा,लोकगीते,

वाक्प्रचार, म्हणी, उखाणे, गद्यपाठ, वाक्ये, शब्द यांचे निरंतर संग्रहाच्या हेतूने संकलन होत असते. या सर्व अभ्यास प्रकारांस भाषिक साहित्य पायाभूत ठरत असल्याने त्याचे संकलन योग्य प्रकारे केले जाते.

बोलींच्या ध्वनिव्यवस्थेच्या अभ्यासाचाच विचार केला तर असे आढळून येईल की, प्रयोजनानुसार त्याचे अनेक उपप्रकार संभवतात. नियोजित अभ्यास हा कधी सामान्य वाचकांसाठी असू शकेल, कधी शिक्षकांसाठी, कधी तंत्रज्ञांसाठी तर कधी तो भाषावैज्ञानिकांच्या सखोल शास्त्रीय निरीक्षणासाठी, परीक्षणासाठी किंवा चर्चेसाठी असू शकेल. अशा विविध वर्णन प्रकारांना उपयोगी पडणारे भाषिक साहित्य साहजिकच कमी किंवा जास्त, मोठे किंवा लहान, सामान्य किंवा तांत्रिक अशा अनेक प्रकारांचे व नमुन्यांचे असू शकतात. ध्वनीसंबंधीच्या सामान्य लेखात  एखादा ध्वनी स्वर आहे की व्यंजन आहे, त्याचे उच्चारस्थान कोणते, उच्चारणप्रकार कोणता एवढी माहिती देणे सोयीचे होईल. ध्वनीसंबंधीचे साहित्यसंकलन बोलींच्या ध्वनिसंरचनेच्या गुंतागुंतीवर व अपरिचित ध्वनींच्या अस्तित्वावरही अवलंबून असते. सामान्यः बोलींच्या ध्वनिव्यवस्थेच्या वर्णनात पुढील गोष्टींचा अंतर्भाव करावा लागतो. सर्वप्रथम बोलीतील एकंदर स्वनिमांची (Phonemes) निश्चित करावी लागतात. यासाठी स्वनिमास्वनिमांतील विरोध स्पष्ट करण्यासाठी अल्पतम  युग्मे (Minimal Pairs) गोळा करावी लागतात. उदा.ः- मराठीतील /ब/आणि/भ् /या स्वनिमातील विरोध स्पष्ट करण्यासाठी /बारा/आणि भारा/ हे युग्मे पुरेसे आहेत. स्वनिमांचे व त्यांच्या स्वनांतरांचे (allophones) वितरण स्पष्ट करण्यासाठी त्यांची स्थानशः उदाहरणे जमवावी लागतात. स्वनिमांच्या शब्दातील विन्यासात्मक (Tactical) वर्तणूक दर्शविण्यासाठी स्वरगुच्छ (vowel -clusters) व व्यंजनगुच्छ (Consonant - clusters) यांची जातिपर उदाहरणे मिळवावी लागतात. ध्वनींच्या खंडाधिष्ठित (suprasegmental) व सहउच्चारणात्मक (Coaticulatory)  वर्तणूकीचेही दिग्दर्शन करावे लागते. यांत ऱ्हस्वदीर्घत्व, बलाघात, तान, अनुतान, महाप्राणत्व, नासिक्यरंजन, औष्ठीकरण, मूर्धन्यीकरण, तालव्यीकरण - इ. अनेक प्रकारांचा समावेश करावा लागतो. शेवटी विरामाधिष्ठित अक्षरव्यवस्थेचे वर्णन करण्यात येते. या सर्व अभ्यासास लागणारे प्रचंड साहित्य जमविण्यास खूप कष्ट घ्यावे लागतात.

बोलींच्या व्याकरणाचे पदस्वनिमिकी, (morphophonemics), रूपव्यवस्था (Morphology) व वाक्य व्यवस्था (syntax) असे तीन विभाग केले जातात. भाषेतील रूपिम (norphemes) हे पदही बृहत्तर रचनांत भाग घेत असताना कधीकधी त्यांच्या स्वनिमिक रूपात काही फरक आलेला दिसून येतो. उदा. मराठीत भूतकाळाच्या प्रत्ययापूर्वी 'कर्'- या धातूचे 'के' असे रूप होते. 'बसला' या 'बस्' धातूच्या भूतकाळी रूपातील-'ला' हा प्रत्यत्य 'कळ्ळा' या 'कळ्' धातूच्या भूतकाळी रूपामध्ये '-ळा' असे स्वनिमिक रूप धारण करतो. अशा प्रकारे एक रूपिम परिस्थितीनुरूप विविध रूपे धारण करू शकतो. अशा रूपांना त्या रूपिमांची रूपिकान्तरे (allomorphs) असे म्हणतात. बोलींच्या पदस्वनिमिकीमध्ये त्यांचा विचार होतो. रूपव्यवस्थेत पदघटना आणि रूपिमविकार या संबंधीची तर वाक्यव्यवस्थेत वाक्याचे अंतरंग, प्रकार व शब्दविन्यास यासंबंधीची चिकित्सा होते. व्याकरणाच्या कोणत्याही अंगाचे वर्णंन करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात भाषिक साहित्य जमा करावे लागते. नामे, सर्वनामे, विशेषणे, क्रियापदे यांना लिंग, वचन, पुरूष, विभक्ती, काळ अर्थ इ. विकारांपैकी एका वेळी एक किंवा अनेक विकार होऊ शकतात. बोलींचा अभ्यास करताना अभ्यासकांना विकारांच्या जाती व त्यांचे निदर्शक असे प्रत्यय शोधून काढावे लागतात. बरीच सुटी वाक्ये व गद्यपाठांतील प्रत्येकांचे रूप यांचे

काळजीपूर्वक निरीक्षण करावे लागते. विविध पदावल्यांच्या (pardigms) साहाय्याने विकारांचे विभेद व मर्यादा निश्चित कराव्या लागतात. वाक्यांचे विभेद व त्यांच्या रचनांचे वर्णन करण्यासाठी हजारो वाक्यांचे सूक्ष्म निरीक्षण करावे लागते. मातृभाषेचे व्याकरण अभ्यासणे आणि एखाद्या अपरिचित बोलीचे व्याकरण शोधून काढणे या दोन कृतींत एक कसोटी लागते.

बोलीचा सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनांतून अभ्यास करणारांसही संकल्पनात्मक व व्याकरनिक विभेदांच्या परस्पर संबंधाचा विचार उपयुक्त ठरतो. भाषेच्या शब्दसंग्रहात भाषिक समाजाच्या जीवनपद्धतीचे पूर्ण प्रतिबिंब पडलेले असते. प्रत्येक भाषिक समाजात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक इ. कारणांनी उत्पन्न झालेल्या गटांच्या विविध बोली व व्यवसाय बोली आढळून येतात. भिन्न भाषिक स्तरांवरील भाषक परस्परांशी बोलताना प्रसंगानुरूप आपली भाषणशैली बदलत असते. उदा. एकच व्यक्ती, पत्नीशी, नोकराशी, वरिष्ठांशी बोलताना आपली वाक्शैली व शब्दांची निवड एकसारखी असेल असे नाही. व्यक्तीच्या नावावरून, भाषणावरून त्याची जात किंवा सामाजिक दर्जा ओळखता येणे सहज शक्य होते. एखाद्या व्यक्तीच्या कुत्र्याचे नाव 'टायगर', टॉमी, विंगो, आहे की, वाघ्या, मोती, विठ्या आहे यावरून त्याचा सामाजिक स्तर ओळखता येतो. आपल्या बोलण्यातून इंग्रजी व हिंदी शब्द आले म्हणजे आपण श्रेष्ठ संभाषण करतो आहे, त्यामुळे आपला दर्जा वाढतो; अशीही भावना असते. बोलींच्या समाजशास्त्राय अध्ययनात या सर्वांची दखल घ्यावी लागते व अध्ययनप्रकार नुरूप भाषिक साहित्य संकलित करावे लागते. बोलींचे मानचित्र बनविण्यासाठी साहित्य संकलनाची भौगोलिक स्थाने प्रथम निश्चित करावी लागतात. या स्थानी उपयोगात असलेले भाषांश जमा करण्यासाठी विशिष्ट प्रश्नांची प्रश्नावली तयार करावी लागते. या प्रश्नावलीत सामान्यतः दोन प्रकारचे भाषांश समाविष्ट केले जातात. त्यांतील एक म्हणजे नियोजित स्थानी विशिष्ट अर्थाचा वाचक असा कोणता शब्द वापरला जातो ते पाहणे उदा.:- 'विहिरीतून रोजच्या वापरासाठी पाणी बाहेर काढण्याचे साधन' या अर्थी बोलीतून स्थानपरत्वे 'पोहऱ्या, टिपरे, घागर, बादली, कळशी इ. शब्द वापरात आहेत. दुसऱ्या प्रकारच्या भाषाशांत विशिष्ट शब्दाच्या अर्थात स्थानपरत्वे होणाऱ्या भेदांचे दिग्दर्शन केले जाते. उदा. 'चौक' या शब्दाचे स्थानपरत्वे चौकनी अंगण, चार रस्ते येऊन मिळणारी जागा, वृंदावन पोवाळ्यातील कडवे, रांगोळीचा एक प्रकार असे अनेक अर्थ होऊ शकतात. ध्वनि विषयक एकरूपता या विभिन्नता हिचेही दिग्दर्शन मानचित्रात होऊ शकते.

**२.३.७ विश्लेषणाची रूढ पद्धत :**

साहित्यसंकलन व विश्लेषण ही भाषाभ्यासाची अंगे परस्परावलंबी व परस्पर पूरकच असतात. विश्लेषण हे संकलनावर अवलंबून असते, तर संकलनाची दिशा विश्लेषण दर्शविते. ध्वनींचे विश्लेषण झाल्याशिवाय रूपरचनेचे सम्यक ज्ञान होत नाही. आणि रूपरचनेच्या अध्ययनाविना वाक्यरचनेचा उलगडा होत नाही. अर्थरचना तर या सर्वांसच पायाभूत ठरत असते. विश्लेषणामुळेच भाषेच्या भिन्न संरचनास्तरांवरील काही (Categories) समजून येतात. विश्लेषण न करता शब्द, वाक्ये किंवा पदावल्यांचे निष्कर्षण करीत राहणे म्हणजे केवळ काळ व्यर्थ दवडणे होय. संकलित होत जाणाऱ्या साहित्याचे संपरीक्षण करणे, विश्लेषण करणे व वर्णन करणे या तीनही प्रक्रिया एकाच वेळी चालू राहतात. संपरीक्षण ही वस्तुःत विश्लेषणाचीच पहिली पायरी होय. यामध्ये संकलित साहित्याचे प्राथमिक निरीक्षण करून त्याची संगती लावणे (Sorting) त्यातील विषय व कोटी यांचे अभिनिर्धारण

(identification) करून त्यांचे वर्गीकरण करणे व वर्गीकृत साहित्याचा योग्य प्रकारे संचय करणे या कृती होत असतात. संकलित साहित्याच्या निरीक्षणास भाषेच्या ध्वनिवैशिष्ट्यांची नोंद करण्यापासून प्रारंभ होतो. प्रश्नावलीच्या साहाय्याने निष्कर्षित झालेले शब्द, वाक्ये, उक्ती यांचे लेखन ध्वनिलिपीत होत असते. हे लेखन प्रारंभी प्रश्नावलीसमोर सोडलेल्या रिकाम्या जागी केले जाते. सोयीच्या दृष्टीने ते पुष्ठिकांवर (Cards) किंवा चिठ्ठीकांवर (slips) स्थानांतरित होणे आवश्यक ठरते. पुष्ठिका किंवा चिठ्ठीका या संचय, पुनर्व्यवस्था (creshuffing) व तुलना करण्याच्या दृष्टीने फार उपयुक्त ठरतात. पुष्ठिकांबरोबरच तालिका, याद्या, आलेख यांचाही उपयोग संशोधक करीत असतो. प्राथमिक निरीक्षणात भाषेच्या संरचनेतील विविध स्तरांवरील मूलघटकांचे अभिनिर्धारण केले जाते. ध्वनिव्यवस्थेचे मूलघटक स्वनिम होत; तर व्याकरणाचे रूपिम होत. अभिनिर्धारणाबरोबर मूलघटकांचे वितरणही (distribution) तपासावे लागते. वितरणानुसार स्वानिमांची स्वनांतरे व रूपिमांची रूपिकांतरे शोधून काढावी लागतात. वाक्यरचनेचे विविध साचे प्रत्येक साच्यामध्ये येऊ शकणारे शब्द किंवा शब्दांचे गट यांचाही शोध घ्यावा लागतो.कोशरचनेच्या बाबतीत मात्र पुष्ठिकांवरील शब्दांचे लिण्यंकन व अर्थनिर्धारण यांची तपासणी होताच त्यांची वर्णक्रमानुसार जुळणी करण्यात येते. बोलींची मानचित्रे बनविताना पुष्ठिकांची भाषांशानुसार पुनर्व्यवस्था करून आलेख बनविण्यास प्रारंभ होतो. बोलीच्या संरचनेच्या विविध अंगांचे विश्लेषण व वर्णन करण्यास उपयोगी पडणारी अन्वेषणात्मक (heurisitic) तत्वे भाषावैज्ञानिकांनी शोधून काढलेली आहेत.

**२.३.८ समाजभाषावैज्ञानिक अभ्यास पद्धती :**

कोणत्याही विषय वस्तूच्या अध्ययन पद्धतीचे स्वरूप हे त्या विषय वस्तूच्या व्याप्तीवर अवलंबून असते. म्हणूनच कोणत्याही विषयाचा अभ्यास करताना त्याचा सामाजिक घटकांवर होणारा परिणाम प्राधान्याने तपासला जातो. म्हणूनच समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप मुख्यतः सामाजिक असून समाजभाषाविज्ञानाच्या अभ्यास पद्धतीमध्ये समाज व भाषा या दोन घटकांचा अभ्यास केला जातो. हा अभ्यास मुख्यत्वे करून या दोहोंतील अंतरसंबंध परिणाम परस्परावलंबन,व्यवहार या गोष्टींवर अवलंबून असतो. अनादीकालापासून मानवी समाजामध्ये भाषेचा वापर हा व्याकरणांच्या नियमापेक्षा सामाजिक भावनिक संबंधावर ठरतो. थोडक्यात भाषेचा अभ्यास हा एक अर्थी त्या समाजाचाच असतो. समाजभाषाविज्ञानात प्रामुख्याने हेच संकेत पाळले जातात. हा अभ्यास करत असताना भाषेचे सामाजिक संदर्भ ही समाजभाषाविज्ञानाची सुरूवात मानली जाते.

'भाषाव्यवहार' हा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास पद्धतीचा मूलाधार आहे. हा भाषाव्यवहार व्यक्ती - व्यक्तींमधील संबंध, व्यक्ती-समाज यामधील संबंध, व्यक्ती स्वभाव, त्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि संदेशनाचे स्वरूप इ. घटकांनी निर्धारित होतो. जे. ए. फिशमन या समाज भाषावैज्ञानिकाने भाषाव्यवहार व मानवी वर्तनाची सामाजिक घडण यातील परस्पर प्रक्रियांचा अभ्यास हे सूत्र स्वीकारून समाजभाषावैज्ञानिक अभ्यासाचे तीन पैलू मांडले ते पुढीलप्रमाणे १) वर्णनात्मक : (Descriptive) : एखाद्या भाषिक समाजात भाषेच्या सामाजिक वापराची घडण कशी आहे याचे वर्णन येथे होते. कोण, कुणाशी, कोणत्या वेळी, कोणत्या कारणांसाठी कोणती भाषा बोलतो याचा थोडक्यात भाषिक वापराची सामाजिक प्रमाणके कोणती यांचा विचार होतो.

२) **गतिशील (Dynamic)** : एकाच भाषिक समाजात वेगवेगळ्या संदर्भात वा परिस्थितीमध्ये भाषाभेद का उपयोगात आणले जातात याचा अभ्यास ३) उपयोजित (applied) भाषाध्यापन व भाषाध्ययन, भाषांतर, लिपीव्यवस्था, भाषा-नियोजन (Language planning) इ.संबंधीच्या प्रश्नांचा विचार या अंगाने होतो. (J.A.Fishman, Sociolinguistic, A Brief Introduction, page -25) फिशमन यांच्या विवेचनात भाषाव्यवहार प्रामुख्याने केंद्रवर्ती आहे. त्याचबरोबर भाषाभेद हा घटकही त्यात आस्थाविषय आहे. भाषाभेद अथवा भाषाबदलाचे परिवर्तनीय घटक जे भाषेत असतात. ज्यांचा वापर भाषिक समाज करतो. त्या परिवर्तनीय घटकांचा संबंध सामाजिक असून या घटकांचे विश्लेषण समाज-भाषावैज्ञानिक अभ्यासात महत्त्वाचे मानले जाते. या संदर्भात रमेश धोंगडे लिहितात, ''परिवर्तनीय घटक शोधणे, त्यांच्या वापराच्या भाषेचे नमुने ध्वनि मुद्रित करणे, भाषितांमागच्या सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण करणे, सामाजिक विश्लेषणातून मिळणारे विविध प्रवाह आणि भाषकांचे संबंध तपासणे आणि त्यातूनच मग कोणता परिवर्तीत पर्याय कोण, कुठे केव्हा वापरतो याचे अनुमान करणे या पद्धतीने सामाजिक भाषावैज्ञानिकाला काम करावे लागते.'' (रमेश घोंगडे, सामाजिक भाषाविज्ञान, पृष्ठ क्र. १४१) समाजभाषावैज्ञानिक अभ्यासातील ही महत्त्वाची पायरी आहे. कारण प्रत्यक्ष भाषावापराचे नमुने येथे महत्त्वाचे आहेत.

समाजभाषा विज्ञानाच्या अभ्यासामध्ये प्रश्नावली तयार करून भाषासामग्री गोळा करण्याची पद्धत वापरली जाते. विल्यम लबव्ह यांनी प्रथमतः तिचा वापर केला आहे. यातून भाषेचा सामाजिक संदर्भात अभ्यास करताना समाज आणि भाषा या दोहोंतील कोणकोणत्या घटकांवर भर द्यायचा याचे दिशादर्शन होते.

अशा प्रकारे समाजभाषाविज्ञान अभ्यास पद्धतीतील बारकावे आपण लक्षात घेतले तर निरीक्षण, व्यवस्थापन आणि विश्लेषण दृष्टीकोनातून तिचा अभ्यास करता येतो.

**२.३.९ समाजभाषाविज्ञानातील मूलभूत संकल्पना आणि बोली :**

१९६० नंतर उपयोजित भाषाविज्ञानाचा विकास होऊन समाजभाषाविज्ञान या अध्ययन शाखेचा उदय झाला असे म्हणता येईल.वास्तविक साठच्या दशकात समाजभाषाविज्ञान या अध्ययनशाखेचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण होऊ लागले. समाजाचा अभ्यास करते ते समाजविज्ञान आणि भाषेचा अभ्यास करते ते भाषाविज्ञान. या दोहोंच्या परस्पर अध्ययन प्रक्रियेतून समाजभाषाविज्ञान उदयास आलेले आहे.भाषेचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे हा समाजभाषविज्ञानाचा मुख्य हेतू होय. आधुनिक भाषाविज्ञानातील फर्दिना -द - सोस्यूरच्या भाषाविभागणीतील पुढे दुर्लक्षित राहिलेली भाषाव्यवहार ही संकल्पना समाजभाषाविज्ञानात केंद्रवर्ती आहे.भाषाव्यवहाराची सामाजिक बाजू प्रभावीपणे मांडून भाषाभ्यासाची नवी दिशा त्याने सुस्पष्ट केली.

समाजभाषाविज्ञान या संकल्पनेचे बीजसूत्र मांडताना रमेश वरखेडे लिहितात, ''भाषा व्यवहार आणि सामाजिक संरचना यांत परस्परावलंबित्वाचे नाते आहे. लौकिक जीवनात भाषेचा उपयोग व्याकरणिक नियमांनी होत नसून सामाजिक संकेतांनी होत असतो. त्यामुळे भाषेचा अभ्यास हा एक अर्थाने समाजाचा अभ्यास होय. समाजभाषाविज्ञानाची नवी दिशा भाषेच्या पारंपरिक अध्ययनाला छेद देणारी आहे'' (रमेश वरखेडे, समाजभाषाविज्ञानः प्रमुख संकल्पना, पृ. क्र. १७) भाषेचा फक्त व्यवस्थाकेंद्री पारंपरिक अभ्यास इथे नाकारून भाषाव्यवहाराला

प्राधान्य दिले गेले, यात भाषा आणि समाज यातील अनुबंध मांडला ही भाषाअभ्यासाला मिळालेली दिशा होती. त्यामुळे समाजभाषाविज्ञान हे आधुनिक भाषाविज्ञानातील महत्त्वाची अभ्यासशाखा होय.

**भाषाव्यवहार :–**

भाषा आणि ती वापरणारी व्यक्ती,त्याचा समाज, त्याची संस्कृती या सर्वांमध्ये परस्परावलंबित्वाचे नाते आहे. 'भाषाव्यवहार' या संकल्पनेविषयी समाजभाषाविज्ञानातील स्वतंत्र भूमिका आहे.सैद्धांतिक भाषाविज्ञानातील व्याकरणिकता नाकारून भाषाव्यवहार आणि सामाजिक संरचना यात परस्परसंबंध असून लौकिक जीवनात भाषेचा उपयोग व्याकरणिक नियमांनी होत नसून सामाजिक संकेतानी होत असतो. ही समाजभाषाविज्ञानाच्या भाषाव्यवहार या संकल्पनेमागील मूलभूत भूमिका आहे.

समाजभाषाविज्ञान हे भाषाव्यवहारांमधील सामाजिक संदर्भाचा विविध पातळ्यांवरील अभ्यास करते. सामान्यतः सामाजिक व्यवस्थेत जातीनुसार वर्गीकरण केले जाते. तसेच जाती-जातीअंतर्गतही भेद, श्रेष्ठ-कनिष्ठता, उच्च – निचता असे भेद पडलेले असतात. त्यांचाही विचार समाजभाषाविज्ञानात प्रामुख्याने केला जातो. अनुसूचित जातींमधील महार, मांग, चांभार, ढोर या समूहांना सवर्ण समाजाने 'अस्पृश्य'ठरवून शताकानुशतके गावकुसाच्या बाहेर ठेवले. गावचा सेवक म्हणून त्याला गुलाम केले. त्यामुळे धर्मव्यवस्थेतून परंपरेनी आलेली श्रेष्ठत्वाची मानसिकता सवर्णसमाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात आली. तशीच मानसिकता भाषाव्यवहारातही आलेली आहे. उदा. योगीराज वाघमारे 'माझा बाप' या कथेमधून लिहितात. 'माझा बाप अधूनमधून मालक, पाटील, धनी .... म्हणायचा पण पाटील अरे सख्या, इतक्या वेळ काय काम केलं.? ... झालं का काम? आज का उशीर झाला... रिकामा फिरायला लाज वाटत नाय का?. असं बोलायचा'' (योगीराज वाघमारे, उद्रेक, पृ.कृ. १०) वास्तविकता दलितेत्तर समाजाच्या भाषाव्यवहारात दलित व्यक्तीला यारे,कारे, अथवा हे न्हारा,ये मांगा असे एकेरी शब्द येतात. जात उतरंडीची ही मानसिकता उच्च-निच,श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव पाळते. त्यामुळेच भाषाव्यवहारातही त्याचे प्रतिबिंब पडते. दलित समाज शहरात गेला त्यात सुधारणा झाल्या. त्यामुळे उपरोक्त भाषिक उपयोजने मागे पडली मात्र जातिनिष्ठ मानसिकता भाषाव्यवहारात गेली नाही. पूर्वी – रूपाने ती अभिव्यक्त होत.आता व्यंगार्थरित्या त्याची मांडणी केली जात आहे. एकूणच अनुसूचित जाती आणि सवर्ण समाज यातील भाषाव्यवहार हा व्यामिश्र सामाजिक सांस्कृतिक परिप्रेक्ष्याने व्यापलेला दिसतो.

**सांकेतिक बोलींचा वापर :–**

भाषाव्यवहाराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'सांकेतिक बोलीचा वापर' होय. सांकेतिक बोलीलाच 'गुप्तभाषा', 'आडबोली' अथवा पारशी' असे शब्दप्रयोग केले जातात. काही समाज अथवा समूह आपापसातील संभाषण इतरांना कळू नये याची खबरदारी घेतात. सामाजिकदृष्ट्या वेगळेपण टिकवून ठेवण्याची वृत्ती आणि संकेत त्याबरोबरच व्यक्तींचे समान हितसंबंध व समूहाबाहेर विरोधी हितसंबंध अशी परिस्थिती असते. यामधूनच सांकेतिक बोलीची निर्मिती होते. मुख्यत्वे व्यवसाय सापेक्षता हे गुप्त भाषेचे महत्वाचे वैशिष्टय आहे. भटक्या – विमुक्त समाजातील रामोशी समाजात सांकेतिक व गुप्त भाषेचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. पूर्वी दऱ्याखोऱ्यात राहून सावकार, खजिनदार, सरकारी तिजोऱ्या लुटण्यासाठी रामोशी समाज आघाडीवर असे. हा

व्यवसाय करताना संवादासाठी तो मुळभाषा अथवा संकेताचा वापर करत. तिला रामोशी समाजात 'पारशी भाषा' असे म्हणतात. रामोशी समाजाच्या भाषेवर कानडीचा प्रभाव आहे. रामोशी समाजाच्या भाषा व्यवहारात 'मुडासात कुकूल खोगडते', (घरात कुत्रे आहे) आडना, चिल्डा, मान इसमड (बायका, मुलांनो बोलू नका) असे वाक्यप्रयोग येतात. समाजभाषा वैज्ञानिक दृष्टिकोनातून गुप्त भाषांचा अभ्यास करताना व्यवसायिकांच्या सामाजिक व्यवहाराचे स्वरूप लक्षात येते. भाषाव्यवहाराचे स्वरूप समाजभाषा वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहताना सामाजिक संदर्भ लक्षात घेणे गरजेचे आहे.

✻ **भाषिक निषिध्दता :–** भाषिक निषिध्दता ही संकल्पना सामाजिक मुल्याधिष्ठित आहे. प्रत्येक समाजामध्ये सांस्कृतिक परिप्रेक्ष्यातून मूल्यसंवर्धन आणि प्रसार केला जातो. या सर्व सामाजिक मूल्यांचा संस्कार व्यक्तीवर पडतो. म्हणूनच त्या त्या समाजातील जीवनसरणीत ही सामाजिक मूल्ये रूढ झालेली असतात. भाषा आणि समाज यातील परस्परसंबंध तपासता उपरोक्त सामाजिक मूल्यांचा परिणाम भाषेवर कसा होतो हे पाहणे महत्वाचे ठरते. म्हणूनच 'भाषिक निषिध्दता' ही संकल्पना समाजभाषाविज्ञानात अभ्यासनीय आहे. रमेश वरखेडे यांनी या संकल्पनेचे स्वरूप साधार मांडलेले आहे. ते पुढीलप्रमाणे– 'हिंदू समाजरचनेत पुरूषाच्या अस्तित्वावरच स्त्रीचे 'असतेपण' अवलंबून असते. म्हणून स्त्रीला अर्धांगिणी म्हणतात. लग्न झालेली स्त्री बांगड्या, मंगळसूत्र, कुंकू यांचा सौभाग्यलेणी म्हणून प्रतिकात्मक उपयोग करते. बांगडी फुटली, मंगळसूत्र तुटले किंवा कुंकू पुसले तर सौभाग्य संपते अशी समजूत आहे. म्हणून स्त्रियांच्या भाषेत 'बांगडी फुटली' असे न म्हणता 'बांगडी वाढली', 'कुंकू वाढले' असे म्हणण्याचा प्रघात आहे. व्यापारी लोकांमध्ये 'दुकान वाढवून घे' असे म्हणतात. 'बंद करणे' हा शब्द दिवाळे निघण्याशी संबंधित आहे. उलट वाढवून घेणे हा शब्द समृद्धीसूचक आहे. आपल्या अस्तित्वावर गदा आणणारे शब्दसुद्धा न वापरण्याची समाजाची प्रवृत्ती असते. सामूहिक नेणिवेतील भयगंडाशी या भाषिक निषिध्दतेचा संबंध आहे.'' (रमेश वरखेडे, समाजभाषाविज्ञान - प्रमुख संकल्पना, पृष्ठ क्र. ४१-४२) एकूणच भाषिक निषिध्दतेवर समाज व्यवस्थेचा प्रभाव असतो ही गोष्ट लक्षात येते.

✻ **द्वैभाषिकता :–**

'द्वैभाषिकता' ही भाषासंपर्क प्रक्रियेतील महत्वाची संकल्पना आहे. कोणत्याही समाजात अथवा देशात केवळ एकच भाषा वापर केला जात नाही. किमान दोन भाषा तिथे महत्वाच्या असतात. उदा– भारतात हिंदी ही राष्ट्रभाषा असली तरी आज इंग्रजी त्या बरोबरीने वापरली जाणारी भाषा आहे. अशा दोन प्रकारच्या भाषावापराला 'द्वैभाषिकता' असे म्हणतात. इंग्रजीत यालाच 'Bilingualism' असा शब्दप्रयोग केला जातो. एखादी व्यक्ती किंवा विशिष्ट समाजगट दोन भाषांतून भाषाव्यवहार करतो, तेव्हा या प्रकारच्या संज्ञापन व्यवहाराला द्वैभाषिकता असे म्हणतात.

भटके-विमुक्त समाज प्राधान्याने द्वैभाषिक आहेत कारण या समाजाची मूळभाषा दक्षिणेकडील कन्नड, तेलगू अथवा उत्तर भारतातील गुजराथी, राजस्थानी या दुसऱ्या राज्यातील भाषांशी संबंधित आहेत. त्यामुळे भटके समाज जेव्हा भाषाव्यवहार करतात तेव्हा कधी स्वत:च्या भाषेत तर कधी मराठी भाषा अथवा त्यांच्या सामाजिक भाषेत बोलतात. उदा-बेरड समाज हा कन्नड ही मूळ भाषा असणारा आहे. उदा - भीमराव गस्ती यांच्या 'सांजवार' या कथासंग्रहातील उदाहरण पुढीलप्रमाणे, '' तो माणूस प्रत्येकाच्या घरात मोर जाऊन 'यार अदेरी?

एन पा। (कोण आहे का?) म्हणून चौकशी करीत होता.'' (भीमराव गस्ती, सांजवार, पृष्ठ क्र. १२) अशाप्रकारे कन्नड-मराठी भाषावापर बेरड समाजाच्या भाषाव्यवहारात अभिव्यक्त होतो.

सामान्यतः मागासवर्गीय समाजांचा भाषिक व्यवहारात द्वैभाषिकता पाहावयास मिळते. त्याबरोबरच शिक्षित उच्चवर्गीय लोकही द्वैभाषिक असतात. समाजभाषाविज्ञानात द्वैभाषिकतेचा अभ्यास अनेक अंगाने होतो.

**❊ भाषाद्वित्व :-**

भाषाद्वित्व आणि द्वैभाषिकता या वेगवेगळ्या संकल्पना आहेत. द्वैभाषिकता ही प्राधान्याने दोन भाषावापरा संदर्भात येते तर भाषाद्वित्व ही एकाच भाषेतील दोन भिन्न भाषा प्रयोगाशी निगडीत आहे. भाषाद्वित्व यालाच इंग्रजीत "Diglossia" असे म्हणतात. आर. ए. हडसन यांनी भाषाद्वित्वाविषयी म्हटले आहे की, 'भाषाद्वित्व ही भाषिक समाजाच्या भाषाव्यवहारातील म्हटले आहे की,'' भाषाद्वित्व ही भाषिक समाजाच्या भाषाव्यवहारातील एक महत्त्वाची संकल्पना आहे. त्यामध्ये भाषिक समाजाच्या व्यापक भाषा वापराचे संदर्भ येतात. यातून भाषिक प्रयोगाची नानाविध रूपे अभिव्यक्त होऊन त्या समाजाच्या भाषिक क्षमतेची जाणीव आपल्याला होते. एकार्थी भाषाद्वित्व ही त्या समाजाच्या भाषा वापरातील नानाविध प्रयोगाची यादीच असते''(R.A Hudson, sociolingusitics, page -49)

भाषाद्वित्व या संज्ञाचा प्रयोग प्रथम चार्लस फर्गसन यांनी केला. अरेबिक, ग्रीक, जर्मन भाषिक समाजांचा अभ्यास करताना फर्गसनला आढळून आले की, समाजाचा भाषाव्यवहार द्विविध स्वरूपाचा आहे. औपचारिक व्यवहारासाठी शिष्टमान्य  भाषाप्रयोग करतात. तर अनौपचारिक, दैनंदिन, कौटुंबिक व्यवहाराशी सतत बोलणारी बोली बोलतात हे दोन्ही भाषाप्रयोग एकाच भाषेतले असतात. या प्रकारांना फर्गसनने 'उच्च व निम्न भाषाप्रयोग' असे म्हटले आहे. एकनाथ सोनवणे यांच्या दृष्टचक्र' या कथेत अशाच प्रकारचे भाषाद्वित्व अभिव्यक्त होते. महार समाजातील दोन व्यक्ती बोलतात तेव्हा ते वेगवेगळ्या पद्धतीने बोलतात. उदा.'' जै भीम साहेब,एक वादळी आवाज कानाचे पडदे फाडून गेला तसं मी काहीसा गांगरून अंग चोरून समोर बघितलं,

'अव  आमी बसावं का?का घंटाभर ताटकळत उभ ऱ्हावं, साबळेने 'सेवा समोरची खुडची बुडाखाली ओढली?

'बोला !... काय सेवा करायची? मी नम्रपणे हात जोडून विचारले 'सेवा कुठची करताय. पयलं जातीला वळखायचं बगा, निस्त जै भीम म्हणायला हगत वाटतीय होय?साबळे, 'तसं नाही हो. इथं कुनाला खपतं का.सगळेजण पाण्यात बघतात तेव्हा...मी'' (एकनाथ सोनवणे,)

इथे एकाच समाजातील व्यक्तींच्या संवादात  दोन वेगवेगळे भाषाप्रयोग असल्याचे स्पष्ट दिसते. साबिक ग्रामीण धाटणीत रांगड्या बोलीत बोलतो तर साहेब मवाळ, प्रमाणभाषेत बोलतो. यात शिक्षित-अशिक्षित परिस्थितीचा संदर्भ आहे. त्यामुळे  हे भाषाद्वित्व परिस्थितीसापेक्ष निर्माण झाल्याचे दिसते.

'भाषाव्यवहार' ही समाजभाषाविज्ञानातील केंद्रवर्ती अभ्यासशाखा असून मुख्यतः भाषाव्यवहाराची समाजसापेक्षता येथे विचारात घेतली जाते. भाषावापराची सामाजिक प्रमाणके, भाषकाचे समाजव्यवस्थेतील स्थान, त्यांचा सांस्कृतिक परिणाम, प्रादेशिकता भाषकाचे वय, लिंग, जात इत्यादी तसेच सांकेतिक बोली,

भाषिक निषद्धता, द्वैभाषिकता, भाषाहित्व आदी घटकान्वये होणारा भाषाव्यवहार समाजभाषाविज्ञानात अभ्यासला जातो.

## २.४ समारोप :–

बोलीअभ्यासाची वाटचाल ही जॉर्ज ग्रिअर्सन यांच्या दृष्टिकोणातून विकसित झाली आहे. महाराष्ट्राच्या विस्तृत प्रदेशात पसरलेला आणि महाराष्ट्राबाहेरही स्थायिक झालेल्या मराठी समाज जी भाषा बोलतो तिला आपण मराठी म्हणतो. परंतु महाराष्ट्रात सर्वत्र सारख्याच रूपाची मराठी बोलली जात नाही. संपूर्ण महाराष्ट्रभर व महाराष्ट्राच्या बाहेर मराठी समाजाकडून बोलल्या जातात. त्या मराठीच्या विविध बोली होत. या सर्व बोलींचा अभ्यास हा विगनात्मक प्रक्रियेवर केलेला असतो. तसेच बोलीचा अभ्यास करीत असताना साहित्याचे संकलन करणे व पुढे विश्लेषण करणे हे या अभ्यासाचा प्रमुख हेतू आहे. एकंदरीत महाराष्ट्रातील बोलींच्या अभ्यासाचे कार्य हे थोडे बहुत मार्गी लागलेले असले तरी त्यात एकसूत्रीपणा व नियोजनाचा अभाव दिसून येतो. परंतु १९६० नंतर समाजभाषाविज्ञान या अभ्यास शाखेचा उदय आलेला आहे. त्यामुळे भाषा आणि समाज यांच्यामध्ये असलेल्या संबंधाचा अभ्यास समाजभाषाविज्ञानाच्या सहाय्याने करणे शक्य आहे.

समजाभाषाविज्ञान अभ्यास पद्धतीमध्ये समाज व भाषा या दोन घटकांचा अभ्यास केला जातो. मानवी समाजामध्ये भाषेचा वापर हा व्याकरणांच्या नियमापेक्षा सामाजिक व भावनिक संबंधावर ठरतो. थोडक्यात भाषेचा अभ्यास हा एक अर्थी त्या समाजाचाच असतो. समाजजीवनामध्ये असंख्य भाषिक रूपे अस्तित्वात आहेत. त्याचबरोबर नाना प्रकारचे भेद समाजाअंतर्गत अस्तित्वात आहेत. त्याचबरोबर नाना प्रकारचे भेद समाजाअंतर्गत अस्तित्वात आहेत. त्यातून भाषेची विविधांगी रूपे समोर येतात. अशा विविधांगी भाषेचे स्वरूप तपासताना अनेक प्रश्न निर्माण होतात. या सर्वच प्रश्नांची चर्चा समाजभाषाविज्ञानातील मूलभूत संकल्पनांच्या आधाराने विविध बोली अभ्यासाचे विश्लेषण करता येते.

## २.५ सरावासाठी प्रश्न

## २.६ वस्तुनिष्ठ प्रश्न :

### अ) योग्य पर्याय निवडा

१) भारतात विविध भागांमध्ये प्रचलित असलेल्या भाषेचे सर्वेक्षण सर्वप्रथम कोणी केले ?

(जॉर्ज ग्रिअर्सन / ना.गो कालेलकर / जे. ए. फिशमन)

२) मराठी ही निरनिराळ्या बोलींना सामावून घेणारी कोणती भाषा आहे ?

(प्रमाणभाषा / भाषा / बोली)

३) प्रशासन, शिक्षणाचे माध्यम व समाजातील लेखी व्यवहार यात कशाचा वापर केला जात नाही?

(बोलींचा / प्रमाणभाषेचा / उच्चारांचा)

४) भाषा ही कोणत्या स्वरूपाची संस्था आहे?

(स्थिर / परिवर्तन पावणारी / धावणारी)

५) बोलींचा अभ्यास हा कोणत्या प्रक्रियेवर आधारलेला आहे ?

(विगनात्मक / संकलन / विश्लेषण)

६) बोलीचे संशोधन करणाऱ्या व्यक्तीस काय संबोधले जाते?

(संशोधक / भाषक/ क्षेत्रान्वेषक)

७) विविध तंत्राच्या सहाय्याने निवेदकाडून भाषक सामग्री काढून घेण्याच्या प्रक्रियेस काय म्हणतात?

(संकलन / संपरीक्षण / निष्कर्षण)

८) निवेदक व क्षेत्रान्वेषक या दोघांसाठी एखादी समान भाषा समजत असल्यास त्या संभाषण पद्धतीस काय म्हणतात?

(द्वैभाषक उपगम / एकभाषक उपगम / विश्लेषण)

९. समाजभाषाविज्ञान या अभ्यासपद्धतीमध्ये कोणत्या दोन घटकांचा अभ्यास केला जातो?

(समाज व भाषा / सामाजिक संदर्भ / व्यक्ती व समाज)

१०) फर्दिना –द – सोस्यूर यांनी भाषाविभागणीतील दुर्लक्षित राहिलेली कोणती संकल्पना मांडली?

(भाषाभेद / भाषिक विषिद्धता / भाषाव्यवहार)

**२.७ उत्तरे**

१) जॉर्ज ग्रिअर्सन २) बोली ३) बोलींचा ४) परिवर्तन करणारी ५) विगनात्मक ६) क्षेत्रान्वेषक ७) निष्कर्षण ८) द्वैभाषक उपगम ९) समाज व भाषा १०) भाषाव्यवहार

**२.८ दीर्घोत्तरी प्रश्न**

१) बोली अभ्यास म्हणजे काय ते सांगून तिचे स्वरूप व विशेष सविस्तर विशद करा.

२) बोलीचे संकलन आणि विश्लेषणाची रूढ पद्धत याविषयी थोडक्यात चर्चा करा.

३) समाजभाषाविज्ञानातील मूलभूत संकल्पनांच्या आधारे बोलींचे महत्व सोदाहरण स्पष्ट करा.

४) समाजभाषावैज्ञानिक अभ्यास पद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा.

**२.९ लघुत्तरी प्रश्न**

१. बोलीच्या निर्मितीची कारणे थोडक्यात सांगा

२. भाषासंशोधकास आवश्यक असणारे गुणविशेष थोडक्यात लिहा.

३. निवेदकाविषयी थोडक्यात माहिती द्या.

४. बोलींचे संकलन आणि विश्लेषण या दोहोंमधील फरक स्पष्ट करा.

५. समाजभाषाविज्ञानातील विविध संकल्पनांची चर्चा करा.

**२.१० अधिक वाचन**


१. कालेलकर ना.गो – भाषा,इतिहास आणि भूगोल, मौज प्रकाशन, तिसरी आ.२०००, मुंबई

२. डॉ. कल्याण काळे/ डॉ. अंजली सोमण (संपादक) – 'आधुनिक भाषाविज्ञान' (संरचनवादी, सामान्य आणि सामाजिक) प्रतिमा प्रकाशन, पुणे आ.२००३

३. कालेलकर ना.गो. – 'भाषा आणि संस्कृती', मौज प्रकाशन, मुंबई

४. वरखेडे रमेश – 'समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना' शब्दालय, श्रीरामपूर

५. धोंगडे रमेश – 'सामाजिक भाषाविज्ञान', दिलीपराज प्रकाशन, पुणे

६. केळकर अशोक – 'मराठी भाषेचा आर्थिक संसार, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद

७. डॉ. अनिल गवळी – ' भाषाविज्ञान आणि मराठी भाषा', हिरण्येकशी प्रकाशन, कोल्हापूर


**२.११ उपक्रम :–**

१. तुमच्या बोलीचे निरीक्षण करा. प्रमाण मराठीमध्ये न सापडणारे अनेक शब्द तुमच्या बोलीत सापडतील त्यांचा संग्रह करा.

२. विशिष्ट व्यावसायिकांच्या भाषेचे निरीक्षण करून त्याचा वैशिष्ट्यपूर्ण शब्दसंग्रह तयार करा.

३. तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही कथा, कांदबरीची भाषा काळजीपूर्वक पुन्हा वाचा आणि या बोली भाषेचे समाजभाषावैज्ञानिक अभ्यास पद्धतीने विश्लेषण करा.

***

# विभाग ३
# बोली : इतिहास आणि भूगोल

## ३.१ उद्दिष्टे

या घटकाचे वाचन केल्याने पुढील गोष्टी समजून घेता येतील.

* बोलीची क्षेत्रविशिष्टता म्हणजे काय? ते स्पष्ट होईल.
* भाषिक प्रदेशाची ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमी लक्षात येईल.
* बोली भूगोल ही संकल्पना स्पष्ट होईल.
* सामाजिक बोलीविज्ञान ही संकल्पना समजून घेणे शक्य होईल.
* विविध व्यावसायिकांच्या बोलींचे स्वरूप लक्षात येईल.

## ३.२ प्रास्ताविक :

मानवी व्यवहारातील भाषा हा एक महत्त्वाचा घटक आहे. मानवाच्या ज्ञानाच्या, संवेदनेच्या व जाणिवांच्या कक्षा भाषेमुळेच रुंदावतात. भाषा हे त्यांच्या अभिव्यक्तीचे माध्यम असते. भाषा हा मानवी जीवनातील एक अविभाज्य घटक आहे. मानवी जीवन आणि भाषा यांना वेगळे करता येणे शक्य नाही. 'भाषा आणि संस्कृती' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ना. गो कालेलकर म्हणतात की, 'मानवाचे वैयक्तिक व सामाजिक जीवन' ज्यामुळे इतर मानवांना जाणवते व काही अंशी समजते अशी भाषा ही एक सामान्य प्रवृत्ती आहे. दुसऱ्याला समजून घेणे, आपले विचार, मन, इच्छा दुसऱ्याला कळवणे, दुसऱ्याशी सहकार्य करून जगण्यातल्या अडचणी, प्रश्न सोडवणे अशी कितीतरी कामे आपण भाषेच्या माध्यमातून साध्य करीत असतो. भाषेच्या माध्यमातून आपण सौंदर्यपूर्ण काव्य, साहित्य निर्माण करतो, समाजजीवनामध्ये विविध प्रसंगी व्यक्त होण्याचे कामही भाषेच्या माध्यमातूनच करीत असतो. ज्ञान मिळविणे, ज्ञान देणे, ते वाढवणे, मिळविलेले ज्ञान जतन करून ठेवणे ही सर्व कार्ये केवळ भाषेनेच शक्य होतात.ङ्ग परंतु भाषेच्या लिखित रुपापेक्षा भाषेचे बोली रूप हेच अधिक महत्त्वाचे असते, असे अभ्यासक सांगतात. कारण संवाद साधणे हे भाषेचे सर्वात महत्त्वाचे कार्य असते. त्याचमुळे भालचंद्र नेमाडे, लिखित भाषा, गौण आणि बोलभाषा प्रधान मानतात. बोलभाषेचे म्हणजेच बोलीभाषेचे हे महत्त्व लक्षात घेतल्यानंतर मराठी भाषेतील विविध बोली भाषांचे महत्त्व आपोआपच अधोरेखीत होते.

## ३.३ विषय विवेचन :

प्रस्तुत प्रकरणामध्ये बोलीभाषा म्हणजे काय? बोली कशा निर्माण होतात, बोलींची क्षेत्रविशिष्टता, बोली : इतिहास आणि भूगोल, सामाजिक बोलीविज्ञान आणि विविध व्यावसायिकांच्या बोली या घटकांचा विचार आपण करणार आहोत.

## ❊ बोली म्हणजे काय? :

महाराष्ट्राच्या विविध भागामध्ये कोकणी, खानदेशी, वऱ्हाडी, नागपूरी, कुडाळी, डांगी, अहिराणी, चंदगडी आदी बोली बोलल्या जातात. यातील काही बोलीभाषांमध्ये मोठ्या प्रमाणात साहित्य लिहिले गेले आहे. विविध मानवी समूहांकडून ज्या विविध भाषा बोलल्या जातात, त्या भाषांमध्ये विविध कारणांमुळे उच्चार भेद जाणवतात. या उच्चार भेदांमुळे एका समूहाची भाषा दुसऱ्या समूहापेक्षा वेगळी ठरते. ज्या भूभागात ज्या समूहाकडून जी भाषा बोलली जाते, त्या भाषेला त्या भूभागाची, त्या समूहाची बोलीभाषा असे म्हणतात. काही भागांमध्ये केवळ एक भाषा न बोलता अनेक भाषांचा वापर केला जातो. म्हणजे व्यवहारात वापरावयाची भाषा वेगळी आणि प्रत्यक्ष बोलताना वेगळी भाषा असे प्रकार अनेक ठिकाणी पहावयास मिळतात. महाराष्ट्रातील काही भागांची रचनाच अशी असते की, तेथील भागात वेगवेगळे समाज एकत्र राहत असतात. त्या समाजांची संस्कृती वेगळी असते. त्या समाजाची आपली म्हणून एक भाषा असते. ते व्यक्तिगत पातळीवर स्वतःच्या भाषेचा वापर करतात, मात्र सामुहिक पातळीवर ते वेगळी भाषा वापरतात. अशातून त्यांच्या भाषांचा संकर झालेला दिसून येतो. हे भाषिक भेद किंवा बोली भाषांचे स्वरूप समजून घेण्यापूर्वी बोली म्हणजे काय? ते समजून घेऊया.

बोली हा शब्द इंग्रजीतील Dialect या शब्दाला मराठी प्रतिशब्द म्हणून आपण वापरतो. भाषा आणि बोली हे जरी अनेकदा समानार्थी म्हणून वापरले जात असले तरी जसे दोन माणसांचे चेहरे दिसण्यास कधीही एकसारखे नसतात, त्याप्रमाणे दोन माणसांचे बोलणे कधीही एकसारखे नसते. भाषाविज्ञानात औपचारिक संज्ञापन व्यवहारातील भाषाप्रयोगाला भाषा असे म्हणतात. तर अनौपचारिक संज्ञापन व्यवहार बोली मधून होत असतो. उच्चार, शब्दवापर, वाक्यरचना यांतील फरकांमुळे आपोआप भाषाभेद दिसून येतो. मात्र याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीगणिक बोली असा होत नाही. प्रा. अ. का. प्रियोळकर म्हणतात की, ङ्गमाणूस जो बोलतो तो स्वतःकरिता बोलत नाही. आपले विचार दुसऱ्याला कळावे, म्हणून बोलतो. तो बोललेले दुसऱ्याला कळले नाही तर त्याच्या बोलण्याचे उद्दिष्टच नष्ट होईल. अशा प्रकारे समाजातील प्रत्येक माणूस आपले विचार दुसऱ्याला कळावे म्हणूनच प्रयत्न करतो, त्यामुळेच समान बोली तयार होते. मात्र समाजातील हे निरनिराळे वर्ग किंवा जमाती इतर जमातींपासून वेगळे राहू शकत नाहीत. एका वर्गांतील माणसे दुसऱ्या वर्गांशी संबंध ठेवतात. आपले विचार दुसऱ्यांना समजावितात व दुसऱ्याचे विचार स्वतः जाणून घेतात. त्यामुळे बोलींचे क्षेत्र विस्तृत होते. एकाच समाजामध्ये जरी भाषिक एकरुपता आली तरी उच्चार, व्याकरणाची रुपे, वाक्यरचना, शब्दसंग्रह यांमध्ये भेद राहतो. (प्रियोळकर, पृष्ठ ८,९) त्यातूनच विविध बोली तयार होतात. अर्थात बोली निर्माण होण्याची अनेक कारणे आहेत. त्यातील काही कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) समाजरचनेच्या किंवा सामाजिक व्यवहारांच्या गरजेतून एकभाषिक समाजाच्या आतच विविध गट तयार होऊन बोली निर्माण होतात.

२) भाषेच्या अंगी असलेल्या लवचिकता या तत्त्वामुळे भाषेत सातत्याने परिवर्तन होत असते. या परिवर्तनामुळे बोली निर्माण होतात.

३) विविध भौगोलिक परिसरातील भिन्न भिन्न भाषिक रुपांमुळे एकमेकांना भाषा समजणे शक्य होत नाही. अशा वेळी मूळ भाषेच्या कोणत्या तरी एका वर्तमानकालीन रुपाचा वापर केला जातो. अर्थात भाषेचा इतिहास

घडत असतानाच त्या विकासक्रमातून बोली जन्म घेतात.

४) समाजातील विविध गटांकडून होणारे स्थलांतर हे देखील बोलीभेदाचे कारण ठरते.

५) काही व्यावहारिक कारणांमुळे एखाद्या समाजाला स्वभाषा सोडून दुसऱ्या गटाच्या भाषेत व्यवहार करावे लागतात. मात्र अशा प्रसंगात त्या समाजाच्या भाषेत त्यांच्या स्वभाषेच्या उच्चारछटा येतच राहतात. अशावेळी त्यातून वेगळीच बोलीभाषा तयार होते.

६) विविध प्रांतांच्या सीमाभागातील समाजांमध्ये विविध भाषेत व्यवहार घडत असल्यामुळे तेथे एका वेगळ्याच बोलीभाषेचे रूप पहावयास मिळते.

७) जातिसंस्था हेदेखील भारतातील विविध बोलीभाषा, गुप्तभाषा, संकेतभाषा निर्मितीचे एक कारण मानता येईल.

८) तसेच प्रत्येक व्यवसायानुसार त्या त्या समूहाचे एक भाषिक भांडार तयार होते. त्यामुळे या व्यवसायभिन्नतेमुळे देखील बोली तयार होतात.

९) मानवी जीवनावर कायमच जीत-जेते संबंधांचा प्रभाव राहिलेला आहे. जो जिंकतो तो हारलेल्या गटावर आपली भाषा, आपले संस्कार लादत असतो. अशा वेळी हरलेल्या गटाची मूळ भाषा आणि जिंकलेल्यांची भाषा यातून तिसरीच बोली तयार होते.

१०) समाजामध्ये पुरुषांची भाषा, स्त्रियांची भाषा, लहान मुलांची भाषा, वृद्धांची भाषा वेगवेगळी असते. या एक प्रकारे त्या समूहाच्या बोली भाषाच असतात.

**३.४ बोली क्षेत्रविशिष्टता**


आपली संज्ञापन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मानवाने भाषा निर्माण केल्या. या भाषांचा महत्त्वाचा घटक म्हणजे ध्वनी. कारण आपण मागे म्हटल्याप्रमाणे भाषेचे बोलीरूप अर्थात ध्वनीरूप सर्वात महत्त्वाचे असते. त्या ध्वनींचे लिखित रूप ही नंतरची प्रक्रिया आहे. अर्थात ध्वनी हे संज्ञापन प्रक्रियेतील महत्त्वाचे साधन आहे. दुसरे असे की, या ध्वनीची निवड, त्याचे उपयोजन या गोष्टी सर्वस्वी ध्वनीचा उपयोग करणाऱ्यावर अवलंबून असते. कारण त्याला जो आशय व्यक्त करावयाचा आहे, तो आशय व्यक्त करण्यासाठी तो त्याच्या समाजात रूढ असलेल्या ध्वनीसमुच्चयाचाच वापर करेल. त्या प्रत्येक ध्वनीला त्याच्या समाजात विशिष्ट अर्थ प्राप्त झालेला असेल आणि तो आशय समजण्यासाठीची विशिष्ट संकेतव्यवस्था त्या समाजातील प्रत्येकाच्या मेंदूत स्थिर झालेली असेल. वास्तविक पाहता एखादा ध्वनी आणि त्या ध्वनीतून निर्माण होणारा आशय यात कोणताही कार्यकारणभाव असतोच असे नाही. उदाहरणार्थ, इंग्रजीतील 'डस्टर' या शब्दातून त्या वस्तूचे कार्य समजते. मात्र मराठीत भाषेतील कावळा या पक्ष्याला इंग्रजीत क्रो तर हिंदीत कौआ म्हणतात. पण कावळा, क्रो आणि कौआ या तीनही ध्वनींचा कावळा या पक्ष्याशी तसा काहीच संबंध नाही. मात्र एक प्रश्न शिल्लक राहतो, तो म्हणजे? मग कावळा या पक्ष्याला उद्देशून विविध ध्वनी का निर्माण झाले असावेत. याबाबतीत 'भाषा : इतिहास आणि भूगोल' या ग्रंथात ना. गो. कालेलकर म्हणतात की, 'ध्वनी आणि अर्थ' यात कोणताही कारण कार्यसंबंध नाही. कारण अनेक भाषांचे किंवा एकच कल्पना वेगवेगळ्या ध्वनिसमुच्चयांनी व्यक्त करणाऱ्या समाजांचे अस्तित्व.

ध्वनी आणि अर्थ यांचा संबंध केवळ योगायोगाचा आहे. कारण समाजव्यवहारात मिळालेली मूक संमतीच संकेत आणि आशय यांच्या साहचर्याला आधारभूत असते. भाषेमध्ये असे ध्वनिपरिवर्तन सातत्याने घडत असते. एकभाषिक प्रदेशांच्या वेगवेगळ्या भागात एकच ध्वनी कित्येकदा वेगवेगळ्या दिशांनी परिवर्तित होत असतो.'(कालेलकर, पृष्ठ ७६)

मराठी राजभाषा असलेल्या महाराष्ट्रामध्ये विविध भागात कोकणी, खानदेशी, वऱ्हाडी, नागपूरी, कुडाळी, डांगी, अहिराणी, चंदगडी आदी भाषा बोलल्या जातात. त्यामध्ये झालेले ध्वनिपरिवर्तन नक्कीच अभ्यासण्याजोगे आहे. शिवाय या बोली भाषांमध्येदेखील उच्चारभेद पडलेले दिसून येतात. कोकणी भाषेचेच उदाहरण घ्यायचे झाले तर गोमंतकात बोलली जाणारी कोकणी, कुडाळात बोलली जाणारी कोकणी, रत्नागिरी-सिंधुदुर्ग परिसरात बोलली जाणारी कोकणी असे कितीतरी भेद कोकणी भाषेत होतात. म्हणून तर दर बारा कोसावर भाषा बदलते, असे आपण म्हणतो. अर्थात ही केवळ लोकोक्ती झाली. पण खरोखरच दर बारा कोसावर भाषा बदलते का? अशा रितीने भाषा बदलाच्या क्षेत्रमर्यादा निश्‍चित करता येतात का? किंवा बोलीची क्षेत्रविशिष्टता कशी ठरवली जाते? या प्रश्नांचा आता आपण विचार करू.

ना. गो. कालेलकर यांनी फ्रेंच भाषाशास्त्रज्ञ आंत्वान मेये यांचे एक विधान त्यांच्या पुस्तकात उद्धृत केले आहे, ते असे की,- 'या किंवा त्या भाषेची क्षेत्रमर्यादा काय, याविषयी उपस्थित झालेले बहुतेक वाद निरर्थक होत. मुळात पोटभाषांना निश्‍चित मर्यादा नसतात आणि केवळ प्रत्येक भाषावैशिष्ट्यांच्याच मर्यादा निश्‍चित असू शकतात. याचा अर्थ असा की, बोलीभाषांचा विस्तार सातत्याने होत असतो. सातत्याने विविध भाषांचा एकमेकींशी संपर्क येत असतो. त्यातून विविध बोलींचा नव्याने जन्म होत असतो. काही बोली मृत पावतात तर काहींचा जन्म होतो. त्यामुळे एखादी बोली या सीमारेषेपासून सुरु झाली आणि त्या सीमारेषेपर्यंत संपली, असे सांगणे जरासे अवघड असते. उदाहरणार्थ चंदगड परिसरात बोलली जाणारी चंदगडी बोली केवळ चंदगड तालुका या भौगोलिक भूभागात बोलली जाते असे नव्हे, तर तिचा विस्तार बेळगाव परिसरातील अनेक गावे, दोडामार्ग-सावंतवाडी तालुक्यातील काही गावे आणि आजरा तालुक्याच्या दक्षिण भागाकडील काही भाग येथपर्यंत झालेला दिसून येतो. ना. गो. कालेलकर याबाबतीत म्हणतात की, ''एखाद्या विस्तीर्ण प्रदेशात पसरलेल्या एकाच भाषेची कालांतराने वेगवेगळ्या भागांत जी वेगवेगळी रुपे होतात ती एकमेकांपासून जितकी दूर अंतरावर असतील तितका त्यांच्यातला भेद अधिक तीव्र असतो आणि जितकी ती एकमेकांपासून जवळ असतात तितके त्यांच्यातले साम्य अधिक स्पष्ट असते. त्यामुळे एखादी भाषा स्वतःच्या क्षेत्रातल्या वेगवेगळ्या प्रदेशांत उत्क्रांत होत गेली तर तिची जी अनेक रुपे कालांतराने तयार होतील, त्यातल्या कोणत्याही दोन परस्परसंलग्न प्रदेशांतील रुपांची सरहद्द नक्की करणे अशक्य असते. कारण एका निश्‍चित मर्यादेपर्यंत अमुक एका प्रकारची बोली वापरात असून ती मर्यादा ओलांडताच दुसऱ्या एका विशिष्ट बोलीचा अंमल सुरू होतो असे दाखवता येणार नाही.''(कालेलकर, पृष्ठ ७७)

हाच मुद्दा कालेलकरांनीच पुढील आकृतीद्वारे स्पष्ट केलेला आहे.



कालेलकरांच्या म्हणण्याचा मतितार्थ असा की, मूळ एकाच भाषेतून निघालेली, परस्परांना लागून असणाऱ्या प्रदेशातली एका विशिष्ट काळातली क, ख, ग ही रुपे घेतली तर क चे ख बरोबर आणि ख चे ग बरोबर जितके साम्य दिसून येईल त्यापेक्षा क आणि ग यांच्यातले साम्य बरेच कमी असेल. शिवाय आता ख हा प्रदेश भाषिकदृष्टीने या दोहोंपैकी कोणत्या प्रदेशात सामील करावा असा प्रश्न नक्कीच निर्माण होईल. कारण क रुपाच्या सीमेजवळ असलेल्या ख व्याप्त भागात क ची भाषावैशिष्ट्ये मोठ्या प्रमाणात आढळतील, तर ग च्या सीमेजवळ असणाऱ्या ख व्याप्त भागात ग ची भाषावैशिष्ट्ये अधिक प्रमाणात दिसून येतील.

म्हणजेच बोलीभाषेचे निश्चित क्षेत्र ठरवणे तसे कठीण असते, हे एव्हाना तुमच्या लक्षात आले असेल. त्यामुळे बोलीची क्षेत्रविशिष्टता कशी ठरवायची, हा प्रश्न नक्कीच उपस्थित होतो. यादृष्टीने हेदेखील लक्षात घेतले पाहिजे की, बोलीच्या सीमा ठरवणे अवघड असले तरी बोलीचा केंद्रबिंदू ठरवता येतो. एकच ध्वनी स्थानभेदानुसार कसा बदलत गेला आहे हे दाखवणाऱ्या समोच्चारदर्शक रेषा काढल्या तर बोलीची क्षेत्रविशिष्टता ठरवता येते. कालेलकरांनी याबाबतीतदेखील एक उदाहरण दिले आहे. ते म्हणतात, 'ग्राम या शब्दाची गांव आणि ग्राम ही परीवर्तने दर्शवणारी क्षेत्रे नक्की केल्यानंतर, म्हणजेच या क्षेत्रांना विभागणारी रेषा शोधून काढल्यानंतर, यांतल्या ज्या क्षेत्रात ग्रामचे गांव हे रूप होते त्याच क्षेत्रात नामचे नांव, हिमचे हींव, इत्यादी रूपे होतील. पण येथे हे लक्षात घेतले पाहिजे की पूर्वीचा स्वर सानुनासिक होऊन स्वरमध्यस्थ म चा व होणे आणि तो म परिवर्तित न होणे एवढे दाखवणारीच ही क्षेत्रे असतात. पण या दोन क्षेत्रात सर्वच ध्वनी नेहमी वेगवेगळ्या मार्गांनी बदलतील असे नाही. प्रत्येक ध्वनीचे परिवर्तनक्षेत्र वेगळे असते.ङ्ख(कालेलकर, पृष्ठ ७९) त्यामुळे कोणतीही निश्चित रेषा काढून केवळ ध्वनीवैशिष्ट्यांतील साधर्म्य लक्षात घेऊन बोलीची क्षेत्रविशिष्टता ठरवता येत नाही. आधुनिक भाषाशास्त्राचे प्रणेते फेर्दिनां द सोस्यूर यांची याबाबतीतील काही मते ना. गो. कालेलकरांनी आपल्या ग्रंथात उद्धृत केली आहेत. ते म्हणतात की, 'एकाच भाषेच्या पोटभाषांतील सरहद्दी निश्चित करणे शक्य नाही, मग त्यांनी व्यापलेल्या प्रदेशाचा विस्तार केवढाही असो. फ्रेंच आणि इटालियन यांच्यामधले संक्रमण दर्शवणारा प्रोव्हांसाल हा ज्या प्रकारचा एक दाट मर्यादित पट्टा आहे तशा प्रकारचे पट्टे दोन भाषाभगिनीत असावेत ही कल्पना वस्तुस्थितीला सोडून आहे. एकमेकांपासून अधिकाधिक पण हळूहळू भिन्न होत जाणाऱ्या एका विशिष्ट प्रदेशातल्या भाषाप्रकारात, कोणत्याही तत्त्वाला धरून का होईना, मर्यादादर्शक निश्चित रेषा कशा काढता येतील? ज्याप्रमाणे पोटभाषा या एकाच भाषेच्या स्वामित्वाखाली असलेल्या संबंध प्रदेशाचे स्वैरपणे केलेले भाग असतात त्याचप्रमाणे दोन भाषांमधील सरहद्द म्हणून मान्य करण्यात आलेली रेषाही केवळ परंपरागतच असते.'(कालेलकर, पृष्ठ ७९) याबाबतीत आंत्वान मेये यांनी सूचविलेला पुढील पर्याय कालेलकरांनी उद्धृत केला आहे. जर बोलीची क्षेत्रविशिष्टता ठरवायची असेल तर 'दोन भिन्न भाषांनी स्वतःच्या एकमेकांपासून दूर अंतरावर असलेल्या केंद्रापासून पुढे पसरत जाऊन एकमेकींच्या जवळ येत एकमेकींना स्पर्श केला पाहिजे. असे झाले तर स्वित्झर्लंडमध्ये फ्रेंच, जर्मन व इटालियन, किंवा बेल्जममध्ये फ्लेमिश व फ्रेंच यांच्या दरम्यान असणाऱ्या मर्यादांसारख्या निश्चित मर्यादा आपल्याला दिसून येतील.

मराठी भाषेतील बोलींची क्षेत्रविशिष्टता ठरवतानादेखील वरील विवेचनातील अडचणी आहेतच. कारण कोकणी, खानदेशी, वऱ्हाडी, नागपूरी, कुडाळी, डांगी, अहिराणी, चंदगडी, सातारी अशा बोलींतील उच्चारभेद

आपल्या लक्षात येतात. मात्र त्या बोली कुठून सुरू झाल्या आणि कुठे संपल्या, हे निश्चितपणे सांगता येत नाही. कोल्हापूर, कराड, सातारा या परिसरातील बोलीचा जरी विचार केला तरी तेथील बोलीतील उच्चारभेद आपल्या लक्षात येईल किंवा कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा, गडहिंग्लज, चंदगड या तालुका परिसरातील बोलीचा लहेजा वेगळा असल्याचे दिसून येते. त्यामुळे बोलीची क्षेत्रविशिष्टता ठरवणे काहीसे अवघड ठरते. तरीदेखील एखादी बोली ज्या भूभागात बोलली जाते, त्या भाषिक प्रदेशाची ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्या बोलीचा इतिहास आणि भूगोल ठरवता येतो आणि केवळ या दोनच गोष्टींमुळे बोलीची क्षेत्रविशिष्टता काही प्रमाणात अधोरेखीत करता येणे शक्य आहे, असे वाटते. या मुद्यांचा विचार आपण पुढे करणारच आहोत.

### ३.५ भाषिक प्रदेशाची ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमी

कोणत्याही भाषेचा अथवा बोलीचा अभ्यास करीत असताना ती भाषा ज्या भूभागात बोलली जाते, त्या भाषिक प्रदेशाची ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमी समजावून घेणे अत्यंत आवश्यक असते. कारण जसा मानवी समाजाच्या उत्क्रांतीचा आणि त्याच्या वृद्धीचा इतिहास आहे. तसेच त्याने निर्माण केलेल्या भाषेचादेखील विशिष्ट असा इतिहास असतो. एका विशिष्ट समाजाच्या विशिष्ट अंगाचा वृत्तांत हा इतिहासाचा खरा अर्थ असतो. समाजजीवनाची स्पष्ट, सुसंगत आणि कालक्रमानुसार माहिती देणे हा इतिहासाचा हेतू असतो आणि पुरावा हे इतिहासाचे मुख्य साधन असते. या साधनाच्या आधारे जसा मानवी समाजाचा, त्याच्या संस्कृतीचा इतिहास मांडता येतो, तसेच एका कालखंडातील किंवा विविध कालखंडातील बोलीची रुपे लक्षात घेऊन बोलीचा इतिहास देखील मांडता येतो.

**❊ बोली इतिहास :**

भाषेचा इतिहास या संदर्भात ना. गो. कालेलकर यांनी 'भाषा : इतिहास आणि भूगोल' या ग्रंथात खूपच सखोल विवेचन केलेले आहे. येथे ते भाषेचा इतिहास हा शब्दप्रयोग करीत असले तरी ते एका अर्थाने मराठी या बोलीचेच विवेचन करतात. भाषेचा इतिहास म्हणजे काय याविषयी ना. गो. कालेलकर म्हणतात की,ङ्गकोणत्याही दीर्घ कालखंडातील एकाच भाषेची काळाच्या दृष्टीने एकमेकापासून अतिशय अंतरावर असलेली दोन रुपे आपण घेतली तर त्यात आपल्याला अनेक प्रकारचे फरक आढळून येतील, यांतले आधीचे रूप हे मूळ रूप आणि नंतरचे रूप हे त्याचे परिवर्तित रूप आहे ही गोष्ट आपण मान्य करतो, या दोन रुपांची तुलना करतो, काय टिकून राहिले आहे आणि काय बदलले आहे ते पहातो, या दोन रुपांच्या मध्ये असलेल्या अवधीत या बदलाला अनुकूल आणि आवश्यक अशा घटना झालेल्या असल्या पाहिजेत हे उघड आहे. या घटना म्हणजे या दोन रुपांमधले दुवे होत. ते शोधून त्यांची क्रमवार मांडणी करणे आणि त्या मांडणीतून बदललेल्या रुपाचा खुलासा होईल असे विवेचन करणे म्हणजेच भाषेचा इतिहास होय. याच ग्रंथाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात की, प्रत्येक भाषा ही एक स्वायत्त सामाजिक संस्था असल्यामुळे तिचा इतिहास हा इतर सामाजिक संस्थांच्या इतिहासाप्रमाणेच पुराव्याच्या, म्हणजे लिखित साधनांच्या, आधाराने तयार करता येतो. साधनांची विपुलता आणि विश्वासार्हता खरा इतिहास लिहायला उपयोगी पडते. भाषेच्या भूतकालीन रूपाचे दर्शन घडवता येते एवढेच नव्हे तर तुलनादी पद्धतीचा उपयोग करून अशा रूपाच्याही आधीचे रूप कमीअधिक प्रमाणात अजमावता येते. 'शुद्ध ऐतिहासिक पद्धती व्यतिरिक्त संबंधित भाषांची तुलना, इतर भाषांच्या अभ्यासाने उपलब्ध झालेले सामान्य सिद्धांत, अंतर्गत तुलना,

अंतर्गत पुनर्घटना, कालनिर्णयपद्धती यांचा अवलंब करून भाषेच्या भूतकालीन अवस्थेची कमीअधिक प्रमाणात आपण कल्पना करू शकतो. संबंधित भाषा, भाषिक कुटुंबे, भाषांचे परस्परांवरील प्रभाव, सांस्कृतिक देवाणघेवाण ही आणि इतर कितीतरी माहिती भाषेच्या इतिहासातून मिळते. (कालेलकर, पृष्ठ ४२)

याचा अर्थ असा की, भाषेचा किंवा बोलीचा इतिहास पाहण्यासाठी एकाच बोलीची दोन रुपे अभ्यासासाठी घेऊन त्या रुपांतील बदलत गेलेल्या रुपांचा किंवा कारणांचा विचार करून संबंधित बोलीचा इतिहास मांडता येणे शक्य आहे, असेच कालेलकरांना म्हणायचे आहे. त्यासाठी भाषाविज्ञानातील ऐतिहासिक पद्धती आणि तुलनात्मक पद्धती अधिक योग्य ठरेल, असे त्यांचे म्हणणे आहे. याशिवाय या पद्धतींबरोबरच अनुमान पद्धत, अंतर्गत तुलना पद्धती, अंतर्गत पुनर्घटना पद्धत, कालनिर्णयपद्धत यांचादेखील बोलीचा इतिहास मांडण्यासाठी अवलंब केला जाऊ शकतो.

भाषेचा इतिहास लिहिण्यासाठीची महत्त्वाची सामग्री म्हणजे भाषेचा लिखित पुरावा, असे कालेलकर म्हणत असले तरी कोणतीही भाषा लिखित स्वरुपात येण्यापूर्वी ती समाजामध्ये मौखिक स्वरुपात अस्तित्वात असते, हे विसरून चालणार नाही. भाषा ही सर्वप्रथम कोणत्या ना कोणत्या तरी मानवी समूहाकडून बोलली जाते. एकदा ती बोली प्रमाणित झाली की नंतर ती लिपीबद्ध होते. म्हणजेच बोलीचे ध्वनीरूप समजून घेणेदेखील महत्त्वाचे आहे. परंतु प्रत्येक बोलीच्या ध्वनींमध्ये काही ना काही कारणांमुळे परिवर्तन घडून येत असते. ध्वनिपरिवर्तन ही अखंडीतपणे चालणारी न थांबवता येणारी प्रक्रिया आहे. त्याचमुळे प्रत्येक बारा कोसावर बोली बदललेली आपल्याला दिसते. पण एखादी बोली आज जर लुप्त झाली असेल किंवा त्या बोलीच्या ध्वनींमध्ये परिवर्तन होऊन जर मूळ बोली आज अस्तित्वातच नसेल तर अशा वेळी त्या बोलीचा इतिहास कसा मांडायचा, हा प्रश्न आहे. म्हणूनच कालेलकरांनी उपरोक्त काही पद्धतींचा आधार घेऊन काहीएक प्रमाणात बोली इतिहास मांडता येतो, असे म्हटले आहे.

### ✻ अनुमान पद्धती :

ना. गो. कालेलकर यांनी सांगितलेली पहिली पद्धती म्हणजे अनुमान पद्धती. या विषयी ते म्हणतात की, भाषेचा इतिहास लिहायला लागणारी सामग्री सर्वच भाषांच्या बाबतीत उपलब्ध असते असे नाही. ही सामग्री म्हणजे लिखित पुरावा. काही भाषा केवळ बोलण्यातच वापरल्या जातात आणि त्यामुळे त्यांचे पूर्वावस्थेतील कोणतेही रूप आपल्याला मिळत नाही. इतर भौतिक साधनांचे प्रत्यक्ष अवशेष राहू शकतात, पण भाषेचे साधनच क्षणभंगूर असल्यामुळे जोपर्यंत एखादी भाषा लिपीचा उपयोग करत नाही तोपर्यंत तिच्या पूर्वकालीन रुपाचे अवशेष आपल्याला मिळणार नाहीत, ज्या प्रमाणात ही लिपिबद्ध रुपे अधिक प्राचीन आणि अधिक विपुल त्या प्रमाणात तिचा इतिहासही अधिक स्पष्ट आणि सूक्ष्म होतो. अशा इतिहासातून मिळालेल्या तत्त्वांचे निरीक्षण करून भाषांच्या अनुपलब्ध अवस्थांबद्दलही अनुमान करणे शक्य असते आणि या अनुमानपद्धतीचा उपयोग करून ज्यांच्याबद्दल लेखी पुरावा नाही अशा बोलभाषांचे पूर्वख्य काय असावे याचा प्रयत्न आपल्याला करता येतो. अशा रीतीने भाषेच्या भूतकाळात डोकावता येत असल्यामुळे हा प्रयत्न म्हणजे ऐतिहासिक संशोधनाचेच एक मर्यादित साधन आहे असे म्हटले पाहिजे.

## ❊ तुलनात्मक व ऐतिहासिक पद्धती :

अनुमान पद्धतीखेरीज अधिक निश्चित आणि विश्वासार्ह निष्कर्ष काढता येण्याचे एक साधन म्हणजे दोन संबंधित भाषांची तुलना. याविषयी ना. गो. कालेलकर म्हणतात की, 'दोन किंवा अधिक भाषा मूळ एकाच भाषेचे भिन्न मार्गांनी परिवर्तन होऊन अस्तित्वात आल्या असे मानायला जेव्हा जागा असते तेव्हा त्यांच्या रुपांची आणि व्याकरणविषयक साधनांची तुलना करून हा तर्क खरा आहे की नाही याचा पडताळा घेता येतो आणि या संबंधित रुपांची पूर्वावस्था उपलब्ध नसल्यास ती कल्पिता येते. अशा रितीने क्रमवार लिखित पुराव्यावर आधारलेली ऐतिहासिक पद्धती, भाषेच्या बाहेर न जाता तिच्या अंतर्गत वैशिष्ट्यांचा उपयोग करून भूतकालीन अवस्थेची कल्पना देणारी स्वावलंबनात्मक पद्धती आणि संबंधित भाषांशी तुलना करून भूतकाळाच्या अनुपलब्ध अवस्थेवर प्रकाश पाडणारी तुलनात्मक पद्धती या तीन पद्धती भाषेच्या उत्क्रांतीबद्दल आपल्याला माहिती देऊ शकतात. इ.स. १७८६ मध्ये विल्यम जोन्स यांनी कलकत्त्याच्या एशियाटिक सोसायटीत इंडो-युरोपिय भाषाकुलांतील साधर्म्यासंबंधीचा निबंध सादर केला. येथूनच तुलनात्मक व ऐतिहासिक पद्धतीला प्रारंभ झाला. त्यानंतर फ्रांझ, बॉप, ग्रिम, रास्क, श्लाइशर, थिमे आदी अभ्यासकांनी या पद्धतींचा अधिक विस्तार केला. रमेश वरखेडे याविषयी माहिती देतात की, भाषेच्या इतिहासात कालक्रमाने होत जाणाऱ्या ध्वनिपरिवर्तनांचा अभ्यास करून ध्वनिपरिवर्तनाचे नियम शोधणे, एकाहून अधिक भाषांच्या तौलनिक अभ्यासाद्वारे या भाषांतील परस्परसंबंधांची निरीक्षणे नोंदविणे, उपलब्ध भाषिक पुराव्याच्या तौलनिक अभ्यासातून अनुपलब्ध मूळ पूर्वजभाषा निर्धारित करणे आणि भाषाकुळाची प्रतिष्ठापना करणे, या बाबी ऐतिहासिक पद्धतीने शक्य होतात. (वरखेडे, पृष्ठ १२,१३) यामध्ये दोन किंवा दोनपेक्षा जास्त कालखंडातील भाषिक परिवर्तनाचा अभ्यास होत असल्यामुळे या पद्धतीला द्वैकालिक किंवा कालक्रमिक पद्धत असेही म्हणतात. कृ. पां. कुलकर्णी या पद्धतींविषयी म्हणतात की, भाषेच्या निरनिराळ्या कालखंडातील तिच्या स्वरुपांचा विचार ऐतिहासिक पद्धतीतच होतो तर एकाच भाषेच्या हयातीतील निरनिराळ्या कालखंडातील स्वरुपे व भिन्न भाषांची स्वरुपे ह्यांची तुलना तुलनात्मक पद्धतीत होते. (कुलकर्णी, पृष्ठ ८७) कालेलकर म्हणतात त्याप्रमाणे,- तुलनात्मक पद्धतीचे काम अधिक पुराव्याच्या अभावी पूर्वरुपाची कल्पना देण्याचे आहे, तर ऐतिहासिक पद्धतीचे काम एकाच भाषेच्या निरनिराळ्या काळांतल्या अवस्था घेऊन त्या कालक्रमानुसार मांडून, त्यातून प्रतिबिंबित होणारे नियम वेगळे काढणे आणि भाषा कसकशी बदलत गेली त्याचे चित्र तयार करणे हे आहे. या दोन्ही अभ्यासांचा हेतू भाषेच्या उत्क्रांतीची कल्पना देणे हाच असला तरी त्यांच्या पद्धती वेगळ्या आहेत आणि त्यांच्या निष्कर्षांचे मूल्यही वेगळ्या प्रतीचे आहे. ऐतिहासिक अभ्यासालासुद्धा तुलना अभिप्रेत असते, पण ती समकालीन अशा भिन्न भाषांतील रुपांची नसून एकाच भाषेच्या भिन्नकालीन रुपांची असते. पूर्वीचा उच्चार काय होता, त्याच्या जागी आता कोणता उच्चार आहे, तो भिन्न असल्यास पहिल्या आणि दुसऱ्या उच्चारांत फरक काय आणि या फरकाच्या मागे परिवर्तनाची कोणती प्रवृत्ती असू शकेल, याचे विवेचन या अभ्यासात येते.(कालेलकर, पृष्ठ ३२)

तुलनात्मक अभ्यासाचे उद्दिष्ट संबंधित भाषांचे पूर्वरूप सूचवण्याचे आहे. दोन भाषिक अवस्थांच्या मधला इतिहास लिहिताना ध्वनी, व्याकरण आणि शब्दसंग्रह यादृष्टीने त्यांचे शक्य तितके तपशीलवार आणि पूर्ण वर्णन करावे लागते. अशी वर्णने निश्चित झाल्याशिवाय आपण कुठून कुठे चाललो आहोत आणि कोणकोणत्या

बाबतीत घडून आलेल्या परिवर्तनांचा खुलासा आपल्याला द्यायचा आहे हे समजणार नाही. ज्ञानदेवकालीन मराठीपासून आजपर्यंतच्या मराठीचा इतिहास द्यायचा असेल तर ज्ञानदेवकालीन मराठीचे स्वरूप उच्चारदृष्ट्या आणि व्याकरणदृष्ट्या नक्की केले पाहिजे. कारण ज्ञानेश्वरीची असंख्य हस्तलिखिते उपलब्ध आहेत, अनेक पाठभेद आहेत. त्यांचा केवळ अर्थाच्या दृष्टीनेच विचार करून भागणार नाही. ज्ञानेश्वरीचे आधुनिक मराठीत भाषांतर करूनही हाच अर्थ त्यात आणता येईल. खरा प्रश्न आहे की त्या काळी बाह्य अभिव्यक्तीसाठी कोणते ध्वनी आणि कोणती रूपे वापरली जात होती याचा. आजच्या मराठी भाषेचे स्वरूप स्पष्ट मांडणे ही गोष्टही तितकीच महत्त्वाची आहे. यासाठी कोणतीतरी एक निश्चित बोलीच स्वीकारली पाहिजे. मराठीच्या सर्व बोलीचा इतिहास अशा रीतीने देणे शक्य होणार नाही. खरे म्हणजे ज्ञानदेव ज्या परिसरात वावरले त्या आपेगाव-आळंदी परिसरातल्या बोलींपैकी कोणतीतरी एक बोली या दृष्टीने योग्य ठरेल आणि त्या अभावी जिला आपण प्रमाणभूत बोलभाषा मानतो असे मराठीचे रूप यासाठी निवडावे लागेल. ही दोन रूपे, म्हणजे जिथून इतिहासाचा प्रारंभ करायचा आहे ते उगमस्थान आणि तो इतिहास जिथे संपवायचा आहे ते स्थान, नक्की केल्यावर त्यांतले दुसरे रूप कोणकोणते बदल होत पहिल्या रूपापासून आले आहे याचा शोध लावला पाहिजे आणि त्यासाठी मधल्या काळातल्या सर्व अवस्था तपासून पाहिल्या पाहिजेत. ही मधली माहिती त्या त्या काळी लिहिल्या गेलेल्या साहित्यावरून मिळते. हे साहित्य जितके अनौपचारिक आणि खासगी स्वरूपाचे तितके त्याचे लेखन वैशिष्ट्यपूर्ण समजायला हरकत नाही. (कालेलकर, पृष्ठ २०,२१)

कालेलकरांच्या म्हणण्यानुसार भाषेतील वर्णपरिवर्तन हा एक महत्त्वाचा पुरावा आपल्याला अभ्यासासाठी घेता येतो. मराठी भाषेतील प्रत्येक वर्णांचा इतिहास पाहिला तर संस्कृतपूर्व - संस्कृत - प्राकृत - अपभ्रंश - मध्ययुगीन मराठी - आधुनिक मराठी या विविध कालखंडातील वर्णातील भेद लक्षात येतात. म्हणजे काही परिस्थितीत पुढील किंवा मागील उत्क्रांतीबद्दल निश्चित विधान करता येते आणि काही परिस्थितीत ते करणे शक्य नसते. पण जी उदाहरणे उपलब्ध असतात त्यांच्या अभ्यासाने मिळालेला पुरावा जरी तात्त्विक असला तरी त्यावरून भाषेच्या परिवर्तनाच्या प्रवृत्तीचे नियम तयार करता येतील आणि प्रत्यक्ष घटनात्मक पुरावा जिथे अपुरा पडत असेल तिथे ते लावता येतील. इतिहासातील प्रत्यक्ष पुराव्याचा आधार घेऊन ही पुनर्घटना केलेली असल्यामुळे कालेलकरांनी तिला 'ऐतिहासिक पुनर्घटना-पद्धती' असे म्हटले आहे.

### ❊ अंतर्गंत पुनर्घटना पद्धती :

उपरोक्त पद्धतीव्यतिरिक्त ना. गो. कालेलकर यांनी बोली इतिहास मांडण्यासाठी अंतर्गत पुनर्घटना पद्धतीचा उल्लेख केला आहे. भाषेतील अंतर्गंत पुरावा घेऊन त्याच्या आधारावर आधीच्या अवस्थेतले वर्ण आणि त्यांची कार्यपद्धती या पद्धतीत येते. भाषेतील ध्वनींची स्वयंप्रेरित अदलाबदल, अंशात्मक पूरक वाटणी आणि वर्णांच्या जोड्यांमधील भाषेच्या घडणीला धरून असणारे साधर्म्य, अशा घटनांचा या पद्धतीत उपयोग केला जातो. भाषेच्या एककालिक वर्णनात्मक पुराव्यातून तिच्या पूर्वावस्थेची शक्य तितकी माहिती मिळवताना आपल्याला हे गृहीत धरावे लागते की अशी अवस्था सुचवणारे धागे या पुराव्यात असतात. त्यांच्या मदतीने या पूर्वावस्थेची वर्णपद्धती शोधणे हे या पद्धतीचे उद्दिष्ट असते. अशा रीतीने कल्पित केलेले वर्ण हे पुनर्घटित म्हटले जातात. या पद्धतीला 'अंतर्गत पुनर्घटना पद्धती' म्हणतात.

## ❊ कालनिर्णय पद्धती :

घटनांची कालनिश्चिती करून बोलीचा इतिहास मांडता येतो, असे कालेलकरांचे म्हणणे आहे. ते म्हणतात की, ही कालनिश्चिती ज्या पुराव्यावरून केलेला असतो, त्याप्रमाणे तिचे स्वरूप असते. उदाहरणार्थ पाली ही संस्कृतनंतर आलेली आर्य भाषेची अवस्था आहे, असे आपण म्हणतो. ध्वनिपरिवर्तनाच्या अनेक घटनांचा आधार घेऊन हे दाखवून देता येते. पण संस्कृतची भाषिकदृष्ट्या परिणती पाली या अवस्थेत केव्हा झाली तो काळ सांगणे कठीण आहे. दुसरीकडे असे म्हणता येईल की प्राकृत या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भाषिक अवस्थेपूर्वीची ही घटना आहे. म्हणजे आधी संस्कृत, नंतर पाली आणि तिच्या मागून प्राकृत असा क्रम ठरवता येतो. पालीचा किंवा प्राकृतचा जो जुन्यात जुना नमुना मिळेल त्यावरून निदान त्या काळापूर्वी केव्हातरी या भाषा रूढ झाल्या असे म्हणता येईल. पण यातली एक अवस्था केव्हा संपली आणि नंतरची केव्हा सुरू झाली हे निर्णयात्मक रीतीने सांगणे आपल्याला अजूनही शक्य नाही. यासाठी शास्त्रज्ञांनी कालनिर्णय करण्याची जी पद्धत सुचवली आहे, त्याला कालेलकरांनी 'भाषिक कालनिर्णय पद्धती' असे नाव दिले आहे. जीवनातील काही प्रवृत्ती अविरत चालू असतात. काही गोष्टी नित्य अनुभवातल्या असतात तर काही जीवनप्रवाह टिकवून ठेवायला अपरिहार्य असतात. अर्थातच त्या व्यक्त करणारे शब्द कोणत्याही भाषेत नेहमी असलेच पाहिजेत. अशा मर्यादित संख्येच्या पण विनिमयाला नित्य आवश्यक अशा शब्दांचा संग्रह म्हणजे भाषेचा मूलभूत किंवा गाभ्याचा शब्दकोशच होय. काळाच्या ओघात या संग्रहातील काही शब्द प्रचारातून जातात आणि त्यांच्या जागी दुसरे शब्द येतात. म्हणजे कल्पना किंवा आशय टिकून असतो, पण त्याचे बाह्य स्वरूप बदलते किंवा नष्ट होते. (कालेलकर, पृष्ठ ३८,३९) एखाद्या बोलीच्या शब्दकोशातले जुने शब्द जाऊन त्यांच्या जागी नवे शब्द येण्याचे प्रमाण अनिश्चित असते. परंतु ज्या बोलींचा हजारो वर्षांचा लिखित पुरावा उपलब्ध आहे अशा ज्ञात भाषांच्या शब्दसंग्रहावरच ही कालनिश्चिती पद्धती अवलंबून असेल.

बोलीचा इतिहास मांडताना उपरोक्त काही पद्धती कमीअधिक प्रमाणात उपयोगी ठरत असल्या तरी ना. गो. कालेलकर यांच्याच भाषेच सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की, केवळ वर्णव्यवस्था लक्षात घेऊन किंवा ध्वनीपरिवर्तनाचे नियम लावून भाषेचा इतिहास मांडता येणार नाही. संस्कृतमधले एखादे विधान घेऊन त्याचे केवळ ध्वनिपरिवर्तनाचे नियम लावून रुपांतर केल्याने प्राकृत किंवा मराठी रूप मिळणार नाही. कारण अभिव्यक्तीच्या क्षेत्रातही बरीच परिवर्तने घडून आलेली असतात. त्यांतली काही अपवादयुक्त उदाहरणे सोडली तर बाकीची सर्व उत्क्रांतीच्या प्रवाहातून जाताना मिळालेल्या नव्या साधनांच्या उपयोगामुळे घडून आलेली आहेत, हे लक्षात येते. याचाच अर्थ असा की, भाषेचा इतिहास हा अभिव्यक्तीच्या साधनांच्या लोपातून आणि निर्मितीतूनही दिसून येतो. याशिवाय प्रभावी शक्तींच्या संपर्काचा भाषेवर काय परिणाम झाला हे राजकीय इतिहासाच्या माध्यमातून शोधून काढता येते. भाषेचा आणि समाजाचे असलेले दृढ नाते लक्षात घेऊनच समाजभाषाविज्ञान ही अभ्यासशाखा उदयाला आली आहे.

## ❊ समाजभाषाविज्ञान :

लौकिक जीवनात भाषेचा उपयोग व्याकरणांच्या नियमांनी होत नसून त्यामागे सामाजिक संकेत महत्त्वाचे असतात. एखाद्या बोलीचा अभ्यास करणे म्हणजे ती बोली बोलणाऱ्या समाजाच्या वास्तवाचा अभ्यास करणे

असते. या धारणेवरच ही अभ्यासशाखा अवलंबून आहे. १९६० नंतर समाजविज्ञान आणि मानववंशशास्त्र या अभ्यास शाखांतील अध्ययनपद्धतीचा आधार घेऊन भाषेचा अभ्यास करणारे हे शास्त्र आहे. एडवर्ड सपिर, बेंडामिन ली वोर्फ, डेल हाईम्स, मॅलिनोवस्की, फिशमन, विल्यम लेबॉव, बर्नस्टीन आदींनी भाषाव्यवहार आणि सामाजिक संरचना यांचे नाते लक्षात घेऊन या अभ्यासशाखेचा विस्तार केलेला आहे.

रमेश वरखेडे यांनी 'समाजभाषाविज्ञान : प्रमुख संकल्पना' या ग्रंथात या अभ्यासशाखेविषयी मांडणी केलेली आहे. समाजभाषाविज्ञानाचे अभ्यासक विल्यम लेबॉव यांचे एक मत वरखेडे यांनी या ग्रंथात उद्धृत केले आहे. ते म्हणतात की, संपूर्ण भाषाविज्ञान हे समाजभाषाविज्ञानच आहे. एककालिक वा द्वैकालिक भाषाभ्यासाचे प्रकार त्याला अर्थपूर्ण वाटत नाहीत. काळाचे बिंदू नक्की करून भाषाभ्यास करणे म्हणजे भाषेच्या गतिशील, परिवर्तनशील रुपाला कालतत्त्वात बंदिस्त करून टाकण्यासारखे आहे. एकाच व्यक्तीच्या भाषेत जेव्हा वारंवार भाषिक विकल्पन आढळते, तेव्हा विशिष्ट काळात भाषेचे एकच एक स्थिर रूप कसे अस्तित्त्वात असेल असा प्रश्न आहे. गतिशील समाजाबरोबर भाषेतही परिवर्तने होत असतात आणि ते दोन्ही एकाच वेळी परिवर्तन प्रक्रियेचे सहयोगी असतात. म्हणून सामाजिक संदर्भातच भाषाव्यवहाराचे अध्ययन इष्ट व योग्य आहे. (वरखेडे, पृष्ठ १७) समाजभाषाविज्ञानात भाषा आणि सामाजिक व्यवहार यांतील आंतरसंबंधांचा अभ्यास केला जातो. उच्च-मध्यम-कनिष्ठ वर्गीय, स्त्री, पुरुष, ग्रामीण, दलित, आदिवासी, विविध धंदे व व्यावसायिक, जित-जेते या सर्वांच्या भाषाव्यवहाराची सामाजिक बाजू लक्षात घेऊन या अभ्यासशाखेत अभ्यास केला जातो. ''भाषा आणि संस्कृती यांतील आत्मिक संबंधावर विश्वास ठेवणारी ही अभ्यासशाखा आहे. भाषाव्यवहार केवळ व्याकरणिक नियमांनी नियंत्रित होत नसतो, तो सामाजिक संकेतांनुसार होत असतो. त्यामुळे भाषेचा समाजनिरपेक्ष विचार हा तांत्रिक ठरतो. व्यक्तीच्या सामाजिकीकरणात भाषेचा सहभाग मोठा असतो. तसा समाजाच्या व राष्ट्राच्या जडणघडणीतील भाषेचा वाटाही तितकाच मोठा असतो. व्यक्तीबोलीपासून राष्ट्रभाषेपर्यंतच्या या सर्व पातळ्यांवरील भाषाव्यवहाराचा समाजसापेक्ष अभ्यास करणे ही समाजभाषाविज्ञानाची नवी दिशा आहे'', असे वरखेडे म्हणतात. (वरखेडे, पृष्ठ ३०)

एखाद्या बोलीचा इतिहास मांडताना केवळ व्याकरणिकदृष्ट्या त्या बोलीतील परिवर्तनाचा विचार करून चालत नाही, तर एखाद्या समाजाची बोली बदलली तर सबंध वास्तव बदलते. सामाजिक संदर्भ बदलतात. मानवाचा जीवनविषयक दृष्टिकोन ती व्यक्ती बोलत असलेल्या बोलीने नियंत्रित होत असतो. प्रत्येक बोलीतील संकेत ती बोली बोलणाऱ्या समाजाने निश्चित केलेले असतात. काळ बदलला, समाजस्थिती बदलली की त्या बोलीतील शब्द बदलतात किंवा त्या शब्दांचे संकेत बदलतात. या सर्व बदलांचा इतिहास समजून घेण्यासाठी समाजभाषाविज्ञान या अभ्यासशाखेचा मोठ्या प्रमाणात उपयोग होऊ शकतो.

### ❊ बोली भूगोल

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात बोली विज्ञानाची एक महत्त्वपूर्ण शाखा म्हणून बोली भूगोल या अभ्यासशाखेचा उदय झाला. बोली भूगोल यास इंग्रजी भाषेत Geographical Dialectology असे म्हटले जाते. भौगोलिक सीमारेषांच्या आधारे बोली-भेदांचा अभ्यास करणे हे या अभ्यासशाखेचे उद्दिष्ट आहे. विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील बोलीचा अभ्यास करणारी ही अभ्यासशाखा Areal Linguisticी या नावानेदेखील ओळखली जाते. कोणकोणत्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये कोणकोणत्या बोली बोलल्या जातात, याचे सर्वेक्षण करून बोलीच्या

प्रदेशनिष्ठ वर्तनासंबंधाने निरीक्षण मांडणे, हे बोली भूगोलचे अभ्यास क्षेत्र असते. देशाच्या विशिष्ट भागात बोलली जाणारी भाषा, अशी बोलीची व्याख्या येथे गृहीत धरलेली असते. एखादी बोलीभाषा कोणत्या क्षेत्रात बोलली जाते, हे ठरविण्यासाठी सर्वेक्षण करून त्या बोलीचा एक नकाशा तयार केला जातो. बोलींमधील साधर्म्ये-वैधर्म्ये आरेखित करणारा हा स्थलनिष्ठ नकाशा असतो. या नकाशांना बोली नकाशा (Dialect Atlas) असे म्हणतात. फ्रान्समध्ये झ्यूल झिल्यरो यांनी सर्वप्रथम बोली नकाशांचा वापर करून तेथील बोलींचा अभ्यास केला होता. हा अभ्यास केवळ बोली भेदापुरताच मर्यादित नसतो. एकाच भाषेपासून निर्माण झालेल्या भाषाभेदांच्या अभ्यासाचाही यात समावेश असतो. जॉर्ज ग्रिअर्सन यांनी 'ए लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया' या प्रकल्पामध्ये भारतातील अनेक भाषांतील भाषाभेदांचे, तसेच बोली भेदांचे दोन्हीही अभ्यास केलेले आहेत. एखाद्या बोलीचा अभ्यास करण्यासाठी त्या बोलीतील भाषाघटक म्हणजेच ध्वनिघटक, व्याकरणघटक, शब्दघटक एकत्र केले जातात. या घटकांना भाषांश (Gloss) असे म्हणतात. क्षेत्रीय अभ्यासाच्याद्वारे हे भाषांश एकत्र केले जातात. त्याआधारे भाषाबदलांचा नकाशा तयार केला जातो. व्याकरण, शब्दसंग्रह, उच्चारधाटणी यावर शेजारच्या बोलीचा काही परिणाम झालेला आहे किंवा होतो आहे, हे अभ्यासले जाते.

मराठी भाषेच्या बाबतीत बोलायचे झाले तर तिच्यातही अनेक बोलीभेद आहेत. सर्वसाधारणपणे कोकणात बोलली जाते ती कोकणी, कुडाळात बोलली जाते ती कुडाळी, मालवण परिसरात बोलली जाते ती मालवणी, चंदगड भागात बोलली जाते ती चंदगडी, नागपूर भागात बोलली जाते ती वऱ्हाडी, खानदेशात बोलली जाते ती खानदेशी किंवा अहिराणी असे कितीतरी बोलीभेद आपणास पहावयास मिळतात. विविध बोलीतील उच्चार, प्रदेशविशिष्ट शब्दसंग्रह, क्रियापदांचा, काळाचा वापर याबाबतीत पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागातील बोलीमध्ये किती विविधता आहे, याविषयी डॉ. नंदकुमार मोरे यांनी एका लेखात विस्ताराने लिहिले आहे.(शिविम संशोधन पत्रिका, पृष्ठ१०३) अर्थात एखादी बोली कोणत्या भूभागात बोलली जाते, याचा आपण अंदाज करू शकतो. मात्र एखादी बोली येथे सुरू होते आणि येथे संपते, असे खात्रीने सांगू शकत नाही. आपण मागे म्हटल्याप्रमाणे बोलीच्या सीमा खात्रीने निश्चित करता येत नसल्या तरी त्या बोलीचे केंद्र सांगणे शक्य असते. उदाहरणार्थ चंदगडी बोली ही चंदगड, आजरा, दोडामार्ग वगैरे विविध भागात बोलली जात असली तरी तिचा केंद्र चंदगड तालुका हाच आहे. कारण त्या भूभागात त्या बोलीचा जास्तीत जास्त वापर केला जातो. तेथे बोलल्या जाणाऱ्या चंदगडी बोलीत उच्चार, शब्दसंग्रह, व्याकरणिकदृष्ट्या जास्तीत जास्त साम्य आढळते. अशाप्रकारे भाषावैशिष्ट्यांद्वारे एखाद्या बोलीचा अभ्यास करीत असताना तिच्या अंदाजे सीमा निश्चित कराव्या लागतात. पण या सीमा काटेकोर नसल्यामुळे त्या तारतम्याने ठरवाव्या लागतात. या सर्व सीमांची टोके एकमेकांना जोडली की तो त्या बोलीचा बोली नकाशा तयार होतो.

बोली भूगोल हा दोन बोलीतील वेगळेपण दर्शविणारा महत्त्वाचा घटक आहे. समुद्रकिनारे, डोंगररांगा, वाळवंट, घनदाट जंगले, दुष्काळी भाग, खूप पाण्याचा भाग, थंडप्रदेश या विविध भूभागातील नैसर्गिक वैशिष्ट्यांमुळे तेथील बोली वेगवेगळ्या झाल्याचे दिसून येते. एखाद्या बोलीच्या सीमा निश्चित झाल्यानंतर त्या प्रदेशातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि भाषिक घटक या तिच्या विविध अंगाचा अभ्यास केला जातो. प्रादेशिक वैशिष्ट्यांचा बोलीवर परिणाम होत असतो. उदा.- समुद्र किनाऱ्यावरील लोकांचे

उच्चार सानुनासिक होतात तर डोंगरी भागातील लोक खूपच मोठ्याने उच्चार करीत असताना दिसतात. अशा रीतीने एखाद्या बोलीतील भाषिक परिवर्तनांचा शोध घेणे, त्या बोलीचा इतिहास ठरवणे, त्या बोलीच्या उपबोलभाषांचा शोध घेणे आदी अभ्यास बोली भूगोलच्या सहाय्याने करता येतो.

### ३.६ सामाजिक बोलीविज्ञान

बोली विज्ञान ही भाषाविज्ञानाचीच एक शाखा आहे. बोलींचा तीन प्रकारे अभ्यास केला जातो. भौगोलिक सीमारेषांच्या आधारे भाषाभेदांचा अभ्यास भौगोलिक बोलीविज्ञानात केला जातो. विशिष्ट बोलीक्षेत्रातील भाषकांच्या बोलींचे संख्याशास्त्रीय विश्लेषण करून बोलण्यातील भाषिक अंतराचा संख्यात्मक अभ्यास भौमितिक बोली विज्ञानात केला जातो. तर सामाजिक बोलीविज्ञानात समाजगटनिष्ठ सर्वेक्षणावर आधारलेले अध्ययन असते. यामध्ये व्यवसाय, लिंग, वर्ग, स्थळ, आर्थिक स्तर, शैक्षणिक पातळी याच्या आधारे बोलीभेदांचे अध्ययन केले जाते. विल्यम लेबॉव या भाषा अभ्यासकाने १९६६ मध्ये न्युयॉर्कमधील इंग्रजी भाषेचा सामाजिक स्तरानुसार अभ्यास केला. सामाजिक संदर्भापासून भाषेला वेगळे काढून भाषाविज्ञान असे काही अभ्यासक्षेत्र असू शकते हेच लेबॉवसारख्या भाषाभ्यासकाला मान्य नाही. त्याच्या मते सामाजिक भाषाविज्ञान हेच खऱ्या अर्थाने भाषाविज्ञान होय. (मालशे, पृष्ठ १४१) लेबॉवच्या या प्रकल्पापासूनच सामाजिक बोलीविज्ञान या शाखेचा प्रारंभ झाल्याचे मानले जाते. सामाजिक बोलीविज्ञानाला इंग्रजीमध्ये (Social Dialectollogy) असे म्हणतात.

रमेश वरखेडे म्हणतात की, 'सामाजिक बोलीविज्ञानात विशिष्ट बोलीकडे पाहण्याचा निजभाषिकांचा व अन्य भाषकांचा दृष्टिकोन, तसेच त्या बोलीची सामाजिक प्रतिष्ठा लक्षात घेऊन बोलीचा अभ्यास केला जातो. नमुने गोळा करताना बोलणाऱ्याचे सामाजिक स्थान आणि परिस्थितीचा संदर्भ लक्षात घेतला जातो. व्यवसायविशिष्टता, आर्थिक-सामाजिक स्तर यामुळे त्या बोलीत जी भाषिक वैशिष्ट्ये किंवा शैलिका निर्माण होतात त्यांचा अभ्यास सामाजिक बोलीविज्ञानात केला जातो. त्यामुळे व्यापक क्षेत्रीय सर्वेक्षणाऐवजी मर्यादित उपयोजनक्षेत्रावर लक्ष केंद्रित करून भाषिक पाहणी करण्याकडे या अभ्यासकांचा कल असतो. उपयोजन क्षेत्रानुसार भाषिक विकल्पनाचे नमुने गोळा करून त्या सामाजिक बोलीचे वर्णन देणे हे या अभ्यासपद्धतीचे उद्दिष्ट आहे. दोन भाषकांना परस्परांच्या भाषेचे आकलन होण्यात भाषिक अडथळे निर्माण होतात, तेव्हा त्या दोन वेगवेगळ्या भाषा ठरतात. भौगोलिक भाषाविज्ञानात अशा भाषा-भेदांच्या सीमा दाखविणारा नकाशा काढता येतो. परंतु सामाजिक बोलीविज्ञानात वर्ग, वय, जात, वंश, धर्म यासारख्या कारणांनी परस्परांच्या भाषेच्या आकलनात पडणारे अंतर आणि अडथळे यांचा विचार केला जातो. उदाहरणार्थ, एखाद्या शेतकऱ्याची भाषा आजूबाजूच्या गावातील शेतकऱ्यांच्या भाषेशी मिळती जुळती असते. परंतु त्यात गावातील ब्राह्मणांच्या भाषेपासून तिचे अंतर खूपच असते. एकाच बांधकाम व्यवसायातील बिल्डरची भाषा, मुकादमाची भाषा आणि गाडी वडार-मातीवडार अशा कामगारांची भाषा यांतील अंतर हे सामाजिक स्तरभेदांनी निर्माण झालेले असते. (वरखेडे, पृष्ठ ५०)

पाश्चात्त्य देशात वर्गीय बोलींचा अभ्यास या दृष्टीने केला जातो. वर्गनिहाय उच्चारसरणी कशी बदलते, व्याकरणिक भेदावरून सामाजिक भेदांविषयी अटकळ कशी बांधता येते यासंबंधीचे विवेचन अशा अभ्यासांमधून आढळते.

उदाहरणार्थ,

| उच्चवर्गीय समाजगट | कनिष्ठ वर्गीय समाजगट |
|---|---|
| I did it yesterday | I done it yesterday |
| He hasn’t got it | He ain’t got it |

पाश्चात्य देशात औद्योगिक संस्कृतीतून सामाजिक श्रेणी उदयाला आल्या, त्यातून सामाजिक बोलीही जन्मल्या. भारतात मात्र सामाजिक स्तरभेद हे प्रामुख्याने जातिनिहाय आहेत. त्यामुळे महारी, धनगरी, लाडशिक्की, भिल्ली अशा जात-जमातनिष्ठ बोलींचे अध्ययन सामाजिक बोलीविज्ञानाच्या मर्मदृष्टीतून करता येऊ शकेल. व्यक्ती ज्या समाजगटात राहते, त्या समाजगटाच्या प्रतिष्ठेनुसार त्या त्या बोलीत भाषा वैविध्याची व शैली विशिष्टतेची उदाहरणे आढळतात. बोलीचा दर्जा हा त्या समाजाच्या सामाजिक दर्जावर अवलंबून असतो.(वरखेडे, पृष्ठ ५१) १९६६ मध्ये लेबॉवने न्यूयॉर्कमध्ये केलेल्या पाहणीनुसार निम्नस्तरीय कामगार वर्गात /I/ चा उच्चार सहज संभाषणात केला जात नाही. मात्र वाचनप्रक्रियेत /I/ चा उच्चार करण्याकडे कल असतो. ५०% कामगार /I/ वाचताना वाचतात. परंतु नेहमीच्या संभाषणात मात्र /I/ टाळतात. इंग्लंडमध्ये /I/ चा उच्चार ग्राम्य मानला जातो. म्हणूनच विनोदी श्रुतिका, फार्स यामध्ये /I/ चा उच्चार केला जातो.

‘बोली आणि समाज यांत खूपच घनिष्ठ संबंध असतो. बोलीविशिष्टतेवरून समाजविशिष्टता लक्षात येते. समाजभाषा विज्ञानात विशिष्ट भाषिक समाजाच्या भाषेचे अध्ययन करताना त्या समाजाच्या भौतिक व मानसिक वास्तवाचेही आकलन अटळ असते. समाजनिष्ठ बोलीविज्ञानात ही मर्मदृष्टी ठेवून बोलींचे अध्ययन केले जाते. उदाहरणार्थ, आदिवासी बोलीत गोरेपण, शिडशिडीतपणा दर्शक शब्द हे त्या परिसरातील तत्सदृश वनस्पती आणि पिकांच्या दृश्य प्रतिमांशी मिळते जुळते असतात. गोरा - काकडीजेवा, तांबूसगोरा - उंबराजेवा, सडसडीत व गौरवर्ण - गहूरजेवा (गव्हासारखा) हे शब्द त्या प्रदेशातील व्यक्तींच्या मनात ठसलेल परिसरातील वस्तूमात्रांतून निर्माण झालेले क्षेत्रविशिष्ट शब्द आहेत. मुलांची नावे ठेवताना तो जन्माला आला त्या दिवशी ज्या गावचा बाजार असेल त्या गावाचे नाव असलेले नाव ठेवले जाते. नोपऱ्या (नवापूरच्या बाजाराचा दिवस. शनिवार ह्या वारालाही नोपऱ्या असेच म्हणतात.) किंवा इसऱ्या (विसरवाडीच्या बाजाराचा दिवस-रविवार-इसऱ्या.) नोपऱ्या-नोपरी, इसऱ्या-इसरी या व्यक्तीनामांमागील ही सामाजिक पार्श्वभूमी भाषेच्या माध्यमातून स्पष्ट करणे हे समाजभाषाविज्ञानाचे कार्य आहे. त्यामुळे ते केवळ संरचनात्मक किंवा व्याकरणिक अध्ययन असत नाही. सामाजिक स्तरभेद आणि परिस्थितीचा संदर्भ लक्षात घेऊनच बोलीचे आकलन यथार्थपणे करता येऊ शकते.(वरखेडे, पृष्ठ ५२,५३)

सामजिक संस्था आणि रूढी इत्यादी गोष्टी भाषेवर कशा प्रकारे परिणाम घडवीत असतात याची काही उदाहरणे मिलिंद मालशे यांनी ‘आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन’ या ग्रंथात दिली आहेत. जसे १८६० नंतरच्या अनेक प्रकारच्या सामाजिक-आर्थिक राजकीय परिवर्तनामुळे रशियन कुटुंबव्यवस्थेतील नवऱ्याच्या भावाची बायको हे नाते दर्शविणारा ‘यात्रोव्ह’ हा शब्द , बायकोचा भाऊ हे नाते दर्शविणारा ‘शूरिन’ हा शब्द, भावाची बायको हे नाते व्यक्त करणारा ‘नेवेस्तका’ हा शब्द आज नष्ट झाली आहेत. कारण तेथे एकत्र कुटुंबव्यवस्थेचे मोठ्या प्रमाणात विघटन झाले आहे. अगदी तसेच मराठी भाषेत नणंद, जाऊ यासारख्या शब्दांचे

झाले आहे. म्हणूनच आणखी दोन-तीन पिढ्यांनंतर हे शब्द कितीसे वापरले जातील याविषयी मालशे यांनी शंका उपस्थित केली आहे. आपल्याकडेही पाश्चात्त्य यंत्रसंस्कृतीमुळे अनेक देशी शब्द जणू हद्दपार झालेले आहेत. याविषयी तारा भवाळकर यांनी 'मायबोलीतले धक्के आणि हिसके' या लेखात चांगले विवेचन केले आहे. त्या म्हणतात की, 'टू रुम कीचन' च्या बदललेल्या जीवनसरणीमुळे घराचे रूप बदलले. कॉल. कीचन, टॉयलेट असलेल्या फ्लॅटमध्ये बेसिन, डायनिंग टेबल, ब्रेकफास्ट, डिनर, डिश, सॅण्डविच, सॉस, केचरप असे अनेक नवीन शब्द शिरले आणि त्याचवेळी पाटपाणी, मोरी, चूल, भानवसा, निखारा, हारोळी, गुणवणी, डेगची, तपेली, घंगाळ, देवळी, फडताळ, कोनाडा यांसारखे शब्द हद्दपार होऊ लागले. घराला टाईल्स बसल्याने, सारवणे, पोतारणे हे शब्द हद्दपार झाले. मिक्सर आल्याने पाखडणे, वेचणे, घोळणे, भरडणे, कुटणे हे शब्दही उपयोगात आणण्याचा प्रसंग निर्माण होत नाही. सामाजिक परिवर्तनामुळे भाषिक परिवर्तन अशापद्धतीने बदलते. या बदलांचा अभ्यास बोलीविज्ञानात होणे गरजेचे आहे. मराठी भाषेत प्रादेशिक बोलींखेरीज व्यावसायिक व सामाजिक बोलींचा सामाजिक बोलीविज्ञानाच्या आधारे अभ्यास होणे गरजेचे आहे, असे वरखेडे यांचे म्हणणे आहे.

## ३.७ व्यावसायिकांच्या बोली

ज्या समाजामध्ये भाषिक प्रयोग आणि भाषिक आकलन यात साम्य आढळते त्या समाजाला भाषिक समाज अशी संकल्पना वापरली जाते. एकाच भाषेचे व्यवहार व बोलीमध्ये उपयोजन करणारा हा समाज असतो. त्या भाषेची जी संकेतप्रणाली असते, ती त्या समाजाने प्रमाणित केलेली असते. त्यामुळे आपोआपच त्या समाजामध्ये भाषेच्या बाबतीत एक कोश तयार होतो. येथे विशिष्ट क्षेत्रातील लोक परस्पर विनिमयासाठी बोलीचा प्रयोग करतात, त्या सर्वांचा मिळून एक भाषिक कोश तयार होतो. यालाच 'भाषिक भांडार' असे म्हणतात. ही संकल्पना जॉन गॅम्पर्झ यांनी मांडलेली आहे.

मुंबईसारख्या शहरात जरी मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी, कोकणी, मालवणी, खानदेशी, वऱ्हाडी आदी अनेक भाषा बोलल्या जात असल्या तरी तेथील भाषेवर औद्योगिक जगताचा प्रभाव असतो. त्यामुळे आपोआप त्या सर्वच बोलींमध्ये औद्योगिक जगतातील शब्दप्रयोग वापरले जातात. या भाषिक कोशावर समाजविशेष, व्यवसायविशेष, आर्थिक- सामाजिक स्तर यांचा प्रभाव असतो. कारण भाषेच्या बाबतीत त्यांचे एक संकल्पनाक्षेत्र तयार झालेले असते. या संकल्पनाक्षेत्रानुसार भाषिक भांडारातील कोणते शब्द वापरावयाचे हे ठरत असते. या संकल्पनाक्षेत्रालाच सामाजिक भाषाविज्ञानात 'लघुक्षेत्र' असे म्हटले जाते. प्रत्येक व्यवसायानुसार किंवा क्षेत्रानुसार भाषेचेदेखील लघुक्षेत्र ठरून जाते. उदाहरणार्थ, शिक्षणक्षेत्र, न्यायालय, क्रिकेट, व्यापार, स्वयंपाकघर, विमानतळ, पत्रकारिता वगैरे प्रत्येक क्षेत्रातील भाषिक लघुक्षेत्र वेगवेगळे असते. या लघुक्षेत्राच्या नियमानुसारच व्यावसायिकांचे देखील स्वतंत्र भाषिक भांडार व भाषिक लघुक्षेत्र ठरून गेलेले असते. याविषयी रमेश वरखेडे म्हणतात की, सर्वसामान्य स्वरूपाच्या दैनंदिन व्यवहारात या बृहत् भाषिक भांडाराचा उपयोग सामाजिक संकेतसरणीनुसार होत असतो. परंतु त्या त्या व्यवसायाच्या लघुक्षेत्रात व्यवसायविशिष्ट बोली (Register) चा प्रयोग होत असतो. उदाहरणार्थ, विणकरांचा भाषाव्यवहार. हातमागावर काम करणाऱ्या मजुरांना रिळाचा धागा संपला की नवी रिळे भरून येईपर्यंत काम नसते. या दहा-पंधरा दिवसाच्या काळात ओढवलेल्या बेकारीचा उल्लेख ते 'तार तुटली' असा करतात. हमालांचेही व्यवसायविशिष्ट शब्दप्रयोग असतात. उदाहरणार्थ, मिरची बाजारातील हमालांना निरनिराळ्या

आकाराची व निरनिराळ्या प्रतीची मिरची एकत्र करण्याचे काम असते. त्याला ते 'पाला करणे' असे म्हणतात. धान्य बाजारातल्या हमालांना निरनिराळ्या पोत्यात साठवलेले धान्य दर पोत्यात शंभर किलो याप्रमाणे सारखे करून अशा संतुलित पोत्यांची थप्पी लावावयाची असते. त्याला ते 'मुंडाफोड करणे' असे म्हणतात. गॅरेजमध्ये काम करणारा मॅकेनिक किंवा मोटारीचा ड्रायव्हर यांनी आपल्या व्यवसायातल्या प्रसंगानुसार विशिष्ट शब्दसरणी निर्माण केलेली दिसेल. जसे बंद पडलेल्या मोटारीला दुसऱ्या मोटारीकडून धक्का देऊन ती सुरू करण्याची प्रक्रिया 'पुठ्ठा लावणे' असा शब्दाने ओळखली जाते. पुठ्ठा लावूनही सुरू न झालेली गाडी दुसऱ्या मोटारीला ट्यूब वा दोरीने बांधून गॅरेजमध्ये नेण्याची क्रिया 'टोचण करणे' या प्रयोगाने ओळखली जाते. सोनेबाजारात सोने भडकले, चांदी भडकली, सोने गडगडले, सोने वधारले, चांदी नरम यासारखे शब्दप्रयोग वापरले जातात. (वरखेडे, पृष्ठ ५३ )

निरनिराळ्या व्यवसायामध्ये प्रत्येक व्यावसायिकाचा म्हणून एक विशिष्ट व्यवसायविशिष्ट शब्दकोश असतो. अशा काही व्यवसायविशिष्ट शब्दांची उदाहरणे वरखेडे यांनी खालीलप्रमाणे सांगितलेली आहेत.

१) भिक्षुखी - दर्भ, तर्पण, यज्ञोपवित, आवर्तन, आचमन, हवन करणे, अंगठा देणे, सव्यापसव्य

२) सोनार - हरण, बागेसरी, वतनी, गावा, सवाणा, जंतरपट्टी, उजळा, ओपसळस, कुंची, बटंग, उडीद, चकला, गोलपोधक, विंचार.

३) तेली - घाणा, चौकट, लाट, ढोक, जांगी, मुडे, नडवळ, कुपरी, हत्तो.

४) न्हावी - धोपटी, वस्तरा, कैची, मिशिन, डोई करणे, चेहरा करणे, चंपी.

५) बुरुड - तट्ट्या, चटई, खुराडी, पाळणा, वेळसा, झाप, नळा, चेकलू, तारापुरी, मेस, गळू.

६) चांभार - आरी, टीप घालणे, टाच शिवणे, मोठ पाडणे, रेशीम भरणे, गळा घालणे, चाकर पाडणे, पोताडी बसविणे, धुना घेणे.

७) ज्योतिषी - मंगळ असणे, अकरावा गुरू, शनी वक्र असणे, राश्‍ंतर होणे, साडेसाती, शांती करणे, षडाष्टक असणे, गडांतर येणे. (वरखेडे, पृष्ठ ५४)

उपरोक्त व्यवसायविशिष्ट शब्दांमध्ये अलीकडे आणखीही काही बदल झालेले आपल्याला आढळतील. पण हे व्यवसायविशिष्ट शब्द त्या त्या समाजाच्या व्यवहाराचे घटक बनतात. अनेकदा त्यांचे व्यवसायविशिष्ट शब्दप्रयोग व्यवहारामध्ये लाक्षणिक अर्थाने वापरले जातात. उदाहरणार्थ एखादा मॅकेनिक सहज 'तुझा स्क्रू ढिला झाला आहे काय?' किंवा एखादा ड्रायव्हर 'चल ऐंशीच्या स्पीडने' किंवा 'टाक टॉप गिअर' यासारखे शब्दप्रयोग लक्ष्यार्थाने व्यवहारामध्ये वापरतो. गाडीचा टायर पंक्चर झाला तर ऐनवेळी जादाचा टायर गाडीत ठेवला जातो, त्या टायरला स्टेपनी असे म्हणतात. परंतु हा स्टेपनी हा शब्द विवाहबाह्य संबंधासाठी लाक्षणिक अर्थाने वापरला जातो. तसेच हजामत करणे, चंपी करणे, भादरणे, इंगा दाखवणे, ठिय्या देणे, समेवर येणे, पाणी पाजणे यासारख्या शब्दांचा अर्थविस्तार होऊन ते व्यवहारामध्ये बृहत् अर्थाने समाविष्ट झालेले दिसतात. द. दि. पुंडे यांनी 'भयंकर सुंदर मराठी भाषा' या ग्रंथात भाषेतील अशा अनेक शब्दातील अर्थविस्ताराचे, बोलीभेदाचे आणि अर्थभेदाचे प्रसंग दिलेले आहेत. अशारीतीने मराठी भाषेचा शब्दसंग्रह वाढण्याच्या दृष्टीने विविध व्यवसाय विशिष्ट शब्दांचा संग्रह होणे गरजेचे आहे. म्हणूनच मराठीच्या समृद्धीसाठी या व्यवसायविशिष्ट शब्दांना औपचारिक संज्ञापन

व्यवहारात रूपकात्मक कारणांसाठी सामावून घेण्याची प्रक्रिया गतिमान झाली तर भाषा समृद्ध होईल, असे विचार श्री. म. माटे यांनी एका लेखात मांडले आहेत.

### ३.८ समारोप

विद्यार्थी मित्रांनो, प्रस्तुत विभागामध्ये आपण बोलीभाषा म्हणजे काय आणि बोली कशा निर्माण होतात याविषयी चर्चा केली. बोलींचा अभ्यास करण्यासाठी बोलींची क्षेत्रविशिष्टता कशी ठरवली जाते याविषयीदेखील माहिती घेतली. बोलीची क्षेत्रविशिष्टता ठरवणे काहीसे अवघड असले तरीदेखील एखादी बोली ज्या भूभागात बोलली जाते, त्या भाषिक प्रदेशाची ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्या बोलीचा इतिहास आणि भूगोल ठरवता येतो आणि केवळ या दोनच गोष्टींमुळे बोलीची क्षेत्रविशिष्टता काही प्रमाणात अधोरेखीत करता येणे शक्य आहे, हे आपण पाहिले. बोलीचा इतिहास कसा लिहिला जातो, तो इतिहास लिहिण्यासाठी काही पद्धतीचा वापर करता येऊ शकतो का, याविषयीदेखील विस्ताराने चर्चा केलेली आहे. भाषाविज्ञानातील ऐतिहासिक पद्धती आणि तुलनात्मक पद्धतींबरोबरच अनुमान पद्धत, अंतर्गत तुलना पद्धती, अंतर्गत पुनर्घटना पद्धत, कालनिर्णयपद्धत यांचा देखील बोलीचा इतिहास मांडण्यासाठी अवलंब केला जाऊ शकतो. याशिवाय सध्याची अत्यंत महत्त्वाची समाजभाषाविज्ञानाच्या आधारे बोली इतिहास कसा लिहिता येऊ शकतो, हेदेखील आपण पाहिले. भाषेच्या अभ्यासातील बोली भूगोल या अध्ययनशाखेविषयी आपण माहिती घेतली. भौगोलिक सीमारेषांच्या आधारे बोली-भेदांचा अभ्यास बोली भूगोल या अभ्यासशाखेत कसा केला जातो, ते आपण पाहिले. बोली भूगोल म्हणजे काय, बोली भूगोल या अध्ययनशाखेचे स्वरूप व तिचे महत्त्व समजावून घेतले. याशिवाय सामाजिक बोलीविज्ञानात समाजगटनिष्ठ सर्वेक्षणावर आधारलेले अध्ययन कसे केले जाते, यामध्ये व्यवसाय, लिंग, वर्ग, स्थळ, आर्थिक स्तर, शैक्षणिक पातळी याच्या आधारे बोलीभेदांचे अध्ययन कसे केले जाते, याचा आपण विचार केला. अखेरीस भाषिक भांडार, लघुक्षेत्र या संकल्पना थोडक्यात समजावून घेऊन विविध व्यावसायिकांच्या बोली कशा तयार होतात, त्यांचे स्वरूप कसे असते आणि या बोलींचे स्थान काय आहे, अशा काही घटकांचा विचार आपण केला. 'बोली : इतिहास आणि भूगोल' या घटकाच्या अध्ययनासाठी उपरोक्त मुद्दे आपणास सहाय्यभूत ठरतील, अशी आशा वाटते.

### ३.९ सरावासाठी प्रश्न

**✻ वस्तुनिष्ठ प्रश्न**

**✻ योग्य पर्याय निवडा**

१. 'भाषा आणि संस्कृती' हा ग्रंथ कोणी लिहिला?

(प्र. के. अत्रे / मिलिंद मालशे / ना. गो. कालेलकर)

२. 'बोली' या शब्दाला इंग्रजी प्रतिशब्द कोणता?

(Dialect / Language / Speech)

३. एका लोकोक्तीनुसार दर किती कोसावर भाषा बदलते, असे म्हणतात?

(बारा / चौदा / दहा)

४. 'भाषा : इतिहास आणि भूगोल' या ग्रंथाचे लेखक कोण?

(डॉ. प्रभाकर मांडे/ ना. गो. कालेलकर / कृ. पां. कुलकर्णी)

५. 'ए लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(विल्यम लेबॉव / जॉर्ज ग्रिअर्सन / झ्यूल झिल्यरो)

उत्तरे : १) ना. गो. कालेलकर २) Dialect ३) बारा ४) ना. गो. कालेलकर ५) जॉर्ज ग्रिअर्सन

❊ **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. चंदगडी बोली प्रामुख्याने कोणत्या भागात बोलली जाते?

२. 'बोली भूगोल' यास इंग्रजीत काय म्हणतात?

३. मराठीच्या कोणत्याही चार बोलींची नावे सांगा.

४. भाषेचा इतिहास लिहिण्यासाठीची महत्त्वाची सामग्री कोणती?

५. सामाजिक बोलीविज्ञानाच्या अभ्यासास कोणाच्या प्रकल्पापासून प्रारंभ झाला?

उत्तरे : १) चंदगड तालुक्यात २) Geographicla Dialectology ३) कोकणी, अहिराणी, वऱ्हाडी, चंदगडी ४) भाषेचा लिखित पुरावा ५) विल्यम लेबॉव

❊ **दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. सामाजिक बोलीविज्ञानेचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

२. बोलीचा इतिहास लिहिण्याच्या पद्धती स्पष्ट करा.

३. बोलीची क्षेत्रविशिष्टता कशी ठरवली जाते, याविषयी सविस्तर माहिती द्या.

❊ **लघुत्तरी प्रश्न :**

१. व्यावसायिकांच्या बोली स्पष्ट करा.

२. बोली निर्माण होण्याची कारणे सांगा.

३. बोली भूगोल संकल्पना स्पष्ट करा.

४. समाजभाषाविज्ञान संकल्पना स्पष्ट करा.

**३.१० उपक्रम**

१. तुम्ही वास्तव्यास असलेल्या आणि शेजारच्या तालुक्यातील बोली भाषांतील शब्दांचा संग्रह करा.

२. मराठी भाषेच्या विविध बोलींवर आधारीत मराठी चित्रपट पहा व त्यातील भाषांचे विश्लेषण करा.

## ३.११ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. भाषा आणि संस्कृती : ना. गो. कालेलकर

२. ग्रांथिक मराठी भाषा आणि कोंकणी बोली : प्रा.अ. का. प्रियोळकर

३. भाषा : इतिहास आणि भूगोल : ना. गो. कालेलकर

४. समाजभाषा विज्ञान प्रमुख संकल्पना : रमेश वरखेडे

५. मराठी भाषा उद्‌गम आणि विकास : कृ. पां. कुलकर्णी

६. आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन : मिलिंद स. मालशे

७. भयंकर सुंदर मराठी भाषा : द. दि. पुंडे

८. वैखरी : अशोक केळकर

९. मध्यमा : अशोक केळकर

१०. शिविम संशोधन पत्रिका (बोली विशेषांक भाग १,२) : (संपा) डॉ. शिवकुमार सोनाळकर

११. मायबोलीतले धक्के आणि हिसके : तारा भवाळकर

१२. दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका (बोली, भाषा आणि संस्कृती) : (संपा.) एकनाथ पाटील


***

# घटक ४

## क्षेत्रिय अभ्यास : कोल्हापूरी बोली

### ४.१ उद्दिष्ट्ये

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला;

* क्षेत्रिय अभ्यास पद्धती समजावून घेता येईल.
* कोल्हापूरी बोलीचा भाषिक प्रदेश कोणता याबद्दल जाणून घेता येईल.
* कोल्हापूरी बोलीचा क्षेत्रिय पाहणी करून त्या बोलीचे वेगळेपण कोणते हे समजावून घेता येईल.
* बोलीचे संकलन आणि विश्लेषण कोणकोणत्या प्रकारे करता येईल हे जाणून घेता येईल.

### ४.२ प्रास्ताविक :

'बोलली जाणे' ही कोणत्याही भाषेची पहिली आणि प्रधान अट असते. 'बोली' म्हणजे एखाद्या व्यापक भाविक परिसरातील प्रादेशिक भाषा या अर्थाने 'बोली ही संज्ञा वापरली जाते. 'सामान्यतः ज्या भाषाभेदांना लेखनपरंपरा नाही व जे आपल्या अस्तित्वात केवळ मौखिक परंपरेवर अवलंबून असतात अशा भाषाभेदांना बोली (dialect) अशी संज्ञा आहे' अशी बोलीची व्याख्या सु. बा. कुलकर्णी यांनी केली आहे. (प्र.७१, भाषा व साहित्य : संशोधन-संपादक डॉ. वसंत जोशी)

प्रमाणभाषेच्या अनेक बोली असतात तसेच कमी अधिक प्रमाणात प्रत्येक स्थानीय बोलीही तिच्या तिच्या भागात प्रमाणच असते. त्या स्थानीय बोलीतच त्या परिसरातल्या लोकांचा भाषिक व्यवहार चालतो. त्या बोलीशी त्यांचे अंतरंग जोडलेले असते. त्या समाजातील व्यक्तीने हुंकार जरी टाकली तरी तो त्या बोलीचाच भाग असतो. त्याला एक अर्थ प्राप्त झालेला असतो.

बोलीची व्याख्या करताना विजया चिटणीस-माडगूळकर म्हणतात,'' बोली म्हणजे परभाषकांना जवळजवळ पूर्णपणे कमी अधिक प्रमाणात सारख्या वाटणाऱ्या तर तद्भाषकांना पूर्णपणे एकरूप वाटणाऱ्या व्यक्तीभाषकांचा समूह होय.'' (पृ.१९७, आधुनिक भाषाविज्ञान) बोली म्हणजे एका निश्चित भूभागात बोलले जाणारे भाषेचे स्वरूप होय. उच्चारण व्याकरण, म्हणी, वाक्यप्रचार याबाबत बोलीला स्वतंत्र अस्तित्व असते. ग्रामीण कथा, कांदबरीचा सगळा जिवंतपणा तिच्या बोलीवर आधारित असतो. साठोत्तरी मराठी साहित्यात प्रमाणभाषेबरोबर बोलींचा वापर होऊ लागला. साहित्यातील जीवनदर्शनांच्या सखोलतेचे मूल्यमापन करताना बोलींच्या वापराची अर्थपूर्णता विचारात होता येते. बोलींमधील सूक्ष्म असे प्रादेशिक भेद आणि हेल या गोष्टी अभ्यासाअंती ध्यानात येतात. बोलीचा त्या त्या समूहाचा सामाईक वारसा ठरतो म्हणूनच बोलींच्या अभ्यासाचे महत्त्व विशद करताना डॉ. निलिमा गुंडी म्हणतात,'' बोलीच्या अभ्यासातून आपणास आपली भाषा आणि संस्कृती यांच्या प्रवाहीपणाचा अनुभव येतो.'' (पृ. ३९, भाषाप्रकाश)

मराठी या नावाखाली येणाऱ्या व त्यांच्या प्रादेशिक नावावरून ओळखल्या जाणाऱ्या वऱ्हाडी, खानदेशी, देशी,कोकणी या सर्वमान्य बोली आहेत. याशिवाय कोल्हापूरी, पुणेरी, चंदगडी, मराठवाडी, सातारी या सुद्धा मराठीच्या बोलीभाषा म्हणता येतील. कोल्हापूरी, पुणेरी,सातारी या भेदांना आपण बोलींचे स्थानिक भेद म्हणतो. क्षेत्रभेदानुसार बोलीची वेगवेगळी रूपे आहेत, कोल्हापूर क्षेत्राशी मर्यादित त्यामुळे 'कोल्हापूरी बोली' एकाच प्रदेशात बोलली जाणारी मूळ बोली काळाच्या ओघात त्या प्रदेशाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारे बदलते आणि तिच्यातून एकमेकांशी नाते असणाऱ्या पण वेगवेगळ्या अशा नव्या बोली निर्माण होतात त्या बोली त्यांच्या त्यांच्या भागांच्या नावानी ओळखल्या जातात.

साहित्यकृतीतून व्यक्ती आणि समाजमन यांची बोलीशी जुळलेली नाळ लक्षात येते. लेखक ज्या परिसरात राहतो. त्या परिसरातील बोली लेखकाने चिकटुलेली असते. त्यामुळेच लेखकाला बोलीच्या वापरातून आपले अनुभव अधिक परिणामकारकतेने मांडता येतात. बोली ही त्या खेड्यातील संस्कृतीचे दर्शन घडविते. कोल्हापूर परिसरातील महत्त्वाच्या ग्रामीण साहित्यिकांमधील आनंद यादव, शंकर पाटील, चंद्रकुमार नलगे, राजन गवस, मोहन पाटील, कृष्णात खोत, किरण गुरव यांनी कोल्हापूरी बोलीचा आपल्या कलाकृतींमधून वापर केला आहे. त्या त्या परिसरातील कोल्हापूरी बोलीचे वेगळेपण त्यांच्या कलाकृतीतून दिसून येते.

**४.३ क्षेत्रीय अभ्यास पद्धती :–**

भाषा ही एक सामाजिक संस्था असून भाषेचा अभ्यास करताना सामाजिक शास्त्रांशी निगडीत असणाऱ्या क्षेत्रीय अभ्यास पद्धतीचा वापर करणे भाग पडते. सामाजिक शास्त्रांच्या संशोधन क्षेत्रातील ही एक नवी दिशा व आधुनिक प्रवृत्ती आहे. ग्रीयरसन ह्या भाषाशास्त्रज्ञाने भारतीय भाषांची अशीच पाहणी (लिंग्विस्टिक सर्व्हे) केलेली आहे. क्षेत्रीय अभ्यास पद्धतीनुसार भाषेचा अभ्यास करताना भाषेचे क्षेत्र समाज, जात, व्यवसाय याप्रकारे मर्यादित करून त्यांच्या मौखिक किंवा लिखित भाषारूपांची पाहणी व नोंद करणे, प्रायोगिक पाहणी करणे या दृष्टीने क्षेत्रीय भाषा सर्वेक्षण हा उत्तम मार्ग असल्याचे ध्यानात येते.

क्षेत्रीय अभ्यास म्हणजे विशिष्ट क्षेत्राची निवड करून त्या क्षेत्राचा अभ्यास करणे होय. ज्या क्षेत्रात अभ्यासक जाणार असेल त्या क्षेत्रासंबंधी म्हणजे त्या प्रदेशाचा इतिहास, व्यवसाय, चालीरिती, शिक्षण, धार्मिक, आर्थिक बाबीसंबंधी माहिती एखाद्या प्रकाशित ग्रंथावरून किंवा प्रत्यक्ष एखाद्या व्यक्तीकडून मिळणे अपेक्षित असते. क्षेत्रीय कामासाठी कोण कसे उपयोगी पडू शकतील हे जाणायला हवे. दूरदर्शन, आकाशवाणी, माहितीपट इत्यादी द्वारे अभ्यासकाला माहिती मिळवावी लागते.

एखाद्या बोलीचा क्षेत्रीय अभ्यास करताना त्या संशोधकास क्षेत्रकर्मातील (field work) कुशलतेवर अवलंबून रहावे लागले. बोलीच्या संशोधकास क्षेत्रकर्माच्या पद्धतीचे व तंत्राचे सखोल ज्ञान असणे आवश्यक असते. कित्येकदा संशोधक हा स्वतःच अभ्यासविषय झालेल्या बोलीचा भाषक असतो. संशोधनाखाली प्रत्यक्ष भाषिक समाजात राहून साहित्य संकलन करावे लागते.

बोलीच्या संशोधकाने क्षेत्रकर्माला (field work) किती महत्त्व द्यायला हवे यासंबंधी सु.बा.कुलकर्णी म्हणतात, ''भाषासंशोधक हा केवळ टेबल पंडित असून भागत नाही; तो उत्कृष्ट क्षेत्रान्वेषकही असावा

लागतो.''(पृ.७६, भाषा व साहित्य : संशोधन, संपा. डॉ. वसंत जोशी) संशोधकाची भूमिका केवळ अभ्यासकाची असावी. आपल्या संशोधनाची मांडणी त्याने करावी. त्या भाषिक परिसरातील एखादा निवेदक सोबत घेऊन बोलीचा अभ्यास करता येतो पण तो निवेदक भाषिक समाजात सतत राहणारा,भाषिक समाजापासून फार काळ दूर न राहिलेला, परभाषिकांशी कमी संपर्क राखणारा अधिक उपयोगी ठरतो. क्षेत्रीय अभ्यासामध्ये निवेदक किती असावेत यापेक्षा ते कसे असावेत व त्यांच्याकडून उपयुक्त माहिती कशी गोळा करता येईल हा विचार महत्त्वाचा ठरतो.

### ४.४ कोल्हापूरी बोलीचा भाषिक प्रदेश :-

कोल्हापूरी बोलीच्या भाषिक प्रदेशाचा विचार करताना कोल्हापूरी बोली ज्या क्षेत्रमर्यादेपर्यंत बोलली जाते तालुक्याचा, गावांचा विचार करावा लागेल. 'कोल्हापूरी बोली' हे नाव कोल्हापूर जिल्ह्याच्या नावावरून पडले आहे. त्यामुळे कोल्हापूर जिल्हा क्षेत्रमर्यादा गृहित धरावी लागते. कोल्हापूर शहर तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, कागल, भूदरगड, राधानगरी, शिरोळ, शाहुवाडी, हातकणंगले, पन्हाळा, गगनबावडा या तालुक्यात बोलली जाणारी बोली ही कोल्हापूरी बोली म्हणून ओळखली जाते. हा कोल्हापूरी बोलीचा क्षेत्रविस्तार आहे.

कोल्हापूर शहरातील शहरी वळणाची कोल्हापूरी बोली ही शहरात राहणाऱ्या लोकांच्या बोलण्यातून जाणवले. कोल्हापूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातून नोकरी, व्यवसाय, शिक्षणानिमित्त येणाऱ्या लोकांच्यावरही शहरी वळणाच्या कोल्हापूरी बोलीचा प्रभाव पडलेला आढळतो. तरीही प्रत्येक तालुक्यात कोल्हापूरी बोली बोलली जात असताना काही शब्द त्या तालुक्याची, त्या परिसराची वेगळी ओळख दाखविणारेही असतात.

कोल्हापूरी बोलीला कन्नड आणि कोकणी प्रदेशाच्या सीमा लाभल्यामुळे कानडी आणि कोकणी भाषेचा हेल कोल्हापूरी बोलीत जाणवतो. 'ते आलं', ते जेवलं' असे कानडी प्रभावित शब्द आढळतात. एकूणच भौगोलिक विविधतेमुळे कोल्हापूरी बोलीमध्ये वैविध्यता आढळते.

स्त्रियांच्या भाषेत 'येतो', 'जातो', 'करतो', 'आलो' अशा - क्रियापदांचा वापर आढळतो त्यातून कोल्हापूरी बोलीचे व्याकरण ध्यानात येते.

सुलभीकरणाची रूपेही काही शब्दातून आढळतात. उदाहरणार्थ, शामदा, वसुदा, फव्वं, 'वडाप'असा नवा शब्द कोल्हापूर परिसरातल्या रिक्षा, टेंपो संस्कृतीचे घडविला. वढा, डांबा आणि पळवा अशा तीन शब्दांतून तो बनला आहे. वडाप करणाऱ्या वहानांसाठी डुगडुग, टमटम असे शब्दही वापरले जातात. शिराळा तालुक्याचा पश्चिम भाग तसेच शाहूवाडीच्या उत्तर भागात 'हिकुडं', तिकुडं' असे शब्द ऐकायला मिळतात.

### ४.५ कोल्हापूरी बोलीची क्षेत्रिय पाहणी :-

कोल्हापूरी बोलीची क्षेत्रिय पाहणी या मुद्याचा विचार करताना असे म्हणता येईल की, ही क्षेत्रिय पाहणी त्या त्या तालुका परिसरात प्रत्यक्ष स्थल भेटीतील संवादाच्या आधारे तसेच त्या परिसरातील बोलीने प्रभावित कथा, कांदबरीतील बोली अभ्यासातून करता येते. एकाच प्रदेशातील मूळ बोली काळांतराने बदलते. बोलींना स्वतःची व्याकरणिक व उच्चारण व्यवस्था असते. बोलीत त्या त्या परिसरानुसार उच्चारण व्यवस्था बदलते. तिच्या उच्चारात ध्वनीरचनेत भेद आढळतात. एकच वैशिष्ट अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दांची स्वनिमव्यवस्था

वेगवेगळी आहे त्यामुळे ते शब्द एकाच अर्थाने पण वेगळ्या रूपात येतात. कोल्हापूरी बोलीची क्षेत्रिय पाहणी केल्यानंतर बोलीचे वेगळेपण पुढीलप्रमाणे आढळते.

उदाहरणार्थः १) बैलगाडी अथवा औत ओढण्यासाठी बैल जुंपताना गळ्यात बांधलेल्या चामडी पट्ट्यांना कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, पन्हाळा परिसरात 'सापत्या' तर काही भागात 'जुपण्या' म्हणतात.

२) बैलांना कडधान्य किंवा भूईमूगाच्या शेंगेची पेंड खाद्य म्हणून देतात त्याला 'भरडा' आणि 'चंदी' असे वेगवेगळे शब्द वापरतात. आनंद यादव यांच्या 'खळाळ' या कादंबरीतील स्त्रिया कागल परिसरातील कोल्हापूरी बोलीत 'ई' कारान्त क्रियापदाचा वापर करतात. उदाहरणार्थ १) 'लगीच चार-पाच दिसात देती' (पृ.२६,खळाळ), २) 'तुमच तुम्हाला देऊन टाकती' (पृ. २६, खळाळ)

राजन गवस यांच्या कलाकृतीतील बोलीभाषा सीमाभागातील आहे. त्यामुळे त्यांच्या कथा, कांदबऱ्यांतून कन्नड भाषेचा प्रभाव असलेली बोली आढळते. 'चौडंक' या कादंबऱ्यांतून कन्नड भाषेचा प्रभाव असलेली बोली आढळते. 'चौडंक' या कादंबरीतील एक स्त्री पात्र म्हणते, '' तिला माझ्या सल्यानं करायल्यासा म्हणून कडू लागलं असेल घे' ऽ (पृ.२१) या वाक्यातील शेवटच्या 'घे' या अक्षरावर जोर देण्याची पद्धत ध्यानात येते. 'करायल्यासा' या क्रियापदाचा 'करायला लागलासा' असा प्रमाण भाषेतील विस्तारित उच्चार होतो. 'काय बघालीस'? 'पाण्यात कोण दिसालतं?' (पृ. ७८) अशी संक्षिप्त स्वरूपातील उच्चार पद्धती आढळते.

चंद्रकुमार नलगे यांच्या कथातून शाहुवाडी तालुक्यातील मलकापूर, भेडसगाव तसेच चांदोली धरण, कोकरूड या परिसरातील कोल्हापूरी बोलीचा प्रभाव असलेला दिसतो. धनगर समाज त्याचप्रमाणे अशिक्षित अडाणी वर्गाच्या बोलीचे वेगळेपण पुढील उदाहरणावरून ध्यानात येते. उदाहरणार्थ १) 'माझ्या देवावानी आलास पगा तुमी ! लय आनंद झाला पगा आमास्नी' ! ('राजीनामा' कथा) या वाक्यातील 'पगा म्हणजे 'बघा' असा उच्चार अपेक्षित आहे. इथे 'प' चा 'ब' आणि 'ग' चा 'हा' असा उच्चार बदल झालेला दिसतो.

२) ' भ्यो ऽऽ भ्योऽऽ - पगा वाक्याघोल ' या वाक्यातील 'भ्यो' चा 'तो' असा उच्चार आहे.

मोहन पाटील यांच्या 'साखरफेरा' या कादंबरीत शिरोळ,हातकणंगले परिसरातील कोल्हापूरी बोलीचे वेगळेपण आढळते.

उदाहरणार्थ, १) 'मर्दानिशा, कारखान्यावर नोकदाराच सा-सा म्हैण्याच पगार थटल्यात,' (पृ.७) या वाक्यात 'मर्दा'चे 'मर्दानिशा' तर 'थकला'चे 'थटला' असे रूप बदल झाले आहे

कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यांतील बोली पन्हाळा परिसरातील आहे. तिथक्या परिसराच्या बोलीची वैशिष्टये कादंबऱ्यांतून पहायला मिळतात. तिथली उच्चारण व्यवस्था, म्हणी, वाक्यप्रचार, प्रथा, परंपरांच्या संदर्भाने येणारे शब्द, संस्कृती, नात्यांची ओळख त्या बोलीतून जाणवते.

उदाहरणार्थ, १) बोलीतील काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द-

आडदानी - कपडे टाकण्यासाठी बांधलेला बांबू, ईदमान-त्याशिवाय, खर्ची-स्वयंपाकासाठी लागणाऱ्या तांदूळ पीठ, डाळ, इ. वस्तू, चांदी-घराची भिंत, कडान-मटणाचा रस्सा, व्हाईच-थोडसं,

२) वाक्प्रचार - दवास्न्या तोडणे (बेचैन होणे), मिंध असणे (उपकाराच्या ओझ्याखाली असणे),

किरण गुरव यांच्या कथा, कादंबऱ्यांतून राधानगरी, गारगोटी परिसरातील बोली आढळते किरण गुरव यांच्या 'श्रीलिपी' या कथासंग्रहातील संवादाची वाक्ये पुढीलप्रमाणे- 'आरं, फ्लॅश मर्दा उलटी जोडली जगू'(पृ.७०), 'मर्दा' शब्दांतून अधिक जवळीकता साधण्याचा भाव आढळतो तसेच प्रसंगानुरूप 'मर्दा' शब्दातून रागावलयाचा भावही व्यक्त होतो. तसेच 'पोचताव' (पोहचतो), येताव (येतो), जाताव(जातो) अशी क्रियापदे वापरली जातात. त्या त्या परिसराची ओळख त्या बोलीतून होत असते. कोल्हापूरी बोलीतील शब्द,म्हणी, वाक्यप्रचार यांतून बोलीचे वेगळेपण जाणवते.

**कोल्हापूरी बोलीतील शब्द –**

आग्रेव (आग्रह), यदुळा(यावेळी), आगत (गरज), वाडूळ (वेळ), वैवाट (वहिवाट), माळवं (भाजीपाला), हारा (बांबूपासून बनवलेली अधिक खोलगट टोपली), झमामा (झटपट), चिवा (बांबू), काकत (कडेवर), फोलार (हळुवार), इस्वाटा (विश्रांती), झरारा (भरभर), बैदा (अडचण, संकट), ढाळा–(ढापी), ढाकी, (झाडाची फांदी), सराजमा (तयारी), येदूळ पतोर (आतापर्यंत)

**कोल्हापूरी बोलीतील वाक्यप्रचार –**

१) आचारी का बिचारी होणे - घाबरणे

२) एका जगत देव म्हातारा न होणे - एखादी गोष्ट कमी असेल तर नुकसान न होणे.

३) कोळसा ओढणे - नकारार्थी विचार करणे

४) खुशीची गाजर खाणे - आनंद होणे

५) जीव कूक दम्याला येणे - प्रचंड कष्ट होणे.

६) झक मारणे - विनाकारण एखादी गोष्ट करणे

७) हालगू मालगू करणे - टाळाटाळ करणे.

**कोल्हापूरी बोलीतील म्हणी :**

१) आलुबाचा माल कालुबाला - एखाद्याची हक्काची गोष्ट दुसऱ्याला मिळणे.

२) कशात काय नि फाटक्यात पाय - काहीही नसताना उगीच दिमाख दाखविणे

३) गावात न्हाई घर नि शेतात न्हाई श्यात- कुठेही अस्तित्व नसणे.

४) नाक न्हाई जाग्यावर तोरा बारा बिघ्यावर - काहीही नसताना मोठेपणाचा आव आणणे

५) माप उठतील नि कोनात बसतील- आगंतुकपणे येऊन एखाद्या गोष्टीवर हक्क सांगणे

६) लाव लिजाव टिमकी बजाव - एखाद्या गोष्टीकडे तात्पुरत्या स्वरूपात पहाणे

७) सुंभ जळाला तरी पीळ तसाच - एखाद्याची सवय न जाणे.

*** कोल्हापूरी बोली – क्षेत्रिय पाहणी पद्धती**

१) प्रश्नावली

२) मुलाखती

३) प्रकाशित साहित्य

४) प्रत्यक्ष सर्वेक्षण

**प्रश्नावली –**

क्षेत्रिय पाहणी पद्धतीमध्ये प्रश्नावलीला प्रथम स्थान द्यायला हवे. निरनिराळ्या व्यक्तीकडून माहिती मिळविण्याकरिता प्रश्नावली तयार केली जाते. सर्व उत्तरे आल्यानंतर त्यांचे पृथकरण करून निष्कर्ष काढले जातात. प्रश्नावलीतील प्रश्नांची भाषा सोपी असावी. प्रश्न तयार करताना कोणत्या प्रकारची माहिती आपण मिळविणार आहोत, कोणाकडून माहिती मिळवावयाची आहे या गोष्टी महत्तवाच्या आहेत.

**मुलाखत –**

प्रश्नावलीतून उत्तर देणारा हा लिहिता वाचता येणारा असावा लागतो. कित्येक वेळा तो चांगला तज्ज्ञ असतो. पण अल्पशिक्षित किंवा जवळजवळ अशिक्षित अशा लोकांपासून नवी माहिती मुलाखतीच्या द्वारेच मिळविणे शक्य आहे.व्यक्तीचा अनुभव व कल्पना यांची जाणीवपण मुलाखतीच्या मार्गाने अधिक स्पष्टपणे होते. या मार्गाच्या काही मर्यादापण जाणवतात. हा मार्ग बराच खर्चिक आहे. मुलखतीसाठी संबंधितांकडे मुद्दाम जावे लागते त्याशिवाय व्यक्तिगत संबंध येत असल्याने दोन्ही संबंधित व्यक्तींच्या परस्पर संबंधावर,स्वभावावर बरेच अवलंबून असते.

**प्रकाशित साहित्य :–**

कोल्हापूरी बोलीचा अभ्यास करताना उपलब्ध प्रकाशित साहित्य अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. साहित्यातून आलेली बोली कोणत्या तालुक्यातील कोणत्या परिसरातील तिचे व्याकरण, स्वनिम व्यवस्था, भौगोलिक सांस्कृतिक वेगळेपण या सर्व गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या परिसरातील लेखक कवींचे साहित्य उपयुक्त ठरते.

**४.६ सर्वेक्षण :**

सर्वेक्षण (सर्व्हे) किंवा पहाणी ही संशोधनाची एक पद्धती आहे. ‘‘ सर्वेक्षण (प्रश्नावली, मुलाखती इ.) साधनाने मिळविलेल्या माहितीचे संघटन, विश्लेषण व अर्थनिर्वचन करणे म्हणजे संशोधनाची सर्वेक्षण पद्धत होय’’ (पृ.२५, संशोधनाची क्षेत्रे आणि पद्धती) अशी डॉ. जयश्री पाटणकर यांनी संशोधनाच्या या पद्धतीची व्याख्या मांडली आहे. पहाणी किंवा सर्व्हे पद्धत ही बरीच उपयुक्त असली तरी तिच्या काही मर्यादा मान्य कराव्या लागतात. व्यक्तीगत संशोधनासाठी ही फारशी उपयुक्त नसली तरी एखादे खेडेगाव, विशिष्ट प्रदेश अभ्यासासाठी घेतला तर व्यक्तीत सुद्धा या पद्धतीचा अवलंब करता येतो. पाहणी पद्धतीच्या अनुषंगाने नवीन माहिती उपलब्ध करून घेण्याच्या दृष्टीने संशोधनाच्या बाबतीत अनेक उपाय अवलंबिले जातात यामध्ये प्रश्नमालिका, मुलाखत,

कोष्टक यांना स्थान दिले जाते असे. दु.का.संत म्हणतात. प्रश्नावली ही सर्वेक्षणाची पहिली पायरी आहे. आपल्या अभ्यासाची गटमर्यादा ,क्षेत्रमर्यादा निश्चित करून त्या विशिष्ट घटकाकडून प्रश्नावली, मुलाखतीच्या आधाराने माहिती गोळा केली जाते. या संकलित माहितीचे वर्गीकरण,विश्लेषण व व्यवस्थापन करणे ही पुढील पायरी असते.

बोलीचे संशोधन हे त्यांची ध्वनीव्यवस्था व व्याकरण यांचे वर्णन करण्याच्या हेतूने होत असते. कोल्हापूरी बोलीतील क्रियापदाची रूपे, विभक्तीची रूपे, सामासिक शब्द यांतून या बोलीचे विश्लेषण करता येते

**क्रियापदाची रूपे-** येडबडली- अडखळली, बघचाल-बघाल, घुलमाडला-रेंगाळला, ढेपाळला-दमला, लढलाव-लढलो, टाकती-टाकते, दिसालत-दिसत होत, दंबवायलीस-दमविणे, करतू-करतो, हुंदे-होऊन जावू दे, हिंगा - हे घे, हाय-आहे, व्हयालय - व्हायला लागल आहे, हैच-आहेच, वटवटाली - वटवटत होती.

**कोल्हापूरी बोलीतील विभक्तीचे शब्द -**

हबकलोच (हबकणे-दचकणे) 'च' प्रत्ययामुळे त्या शब्दावर जोर दिला जातो.

बघचाल (बघणे-बघाल, टिपणास (टिपण-वेळ) त्यावेळी

किचाकतोयास (किचाकणे-रागावणे, ओरडणे चिडणे,)

पोलमीनं -(पोलमी-प्रतिष्ठा मान) प्रतिष्ठेने (हा शब्द तेलुगू भाषिक आहे)

**सामासिक शब्द**

झटयाझोंबला - त्रास ,कष्ट,शेंडाबुडका-रितभात,

आडामोडा - विसंगतपणा, हिडीस फिडीस - टाकून बोलणे

उलंडा भालंड - उलाढाल, धडुतकपडा - अंगावर परिधान करावयाची कपडे

काऊबाऊ - कावरीबावरी, बेचैन, अस्वस्थ, सुताडगुताड - एकमेकांत गुंतलेले

**कोल्हापूरी बोलीतील शब्दांची रूपे-**

सोम्मार, सुक्कीवार, आंगुळ, दक्कल, दिष्ट, इतकिंदी, गाडाव, पोकाळ, प्वॉट, इंजान, वैवाट, रॅंड, यडवान, झोमडं.

**तरूणांची कोल्हापूरी बोली-**

कोल्हापूर परिसरातील तरूणांच्या बोलण्यात कोल्हापूरी बोलीचा वेगळाच ढंग आढळतो.

उदाहरणार्थ - काय भावा, नाद नाही करायचा, शिफारस, चेष्टा नाय, आकईस की लाडात, वाट बग, खटक्यावर ब्वॉट जाग्याव पलटी.

कोल्हापूरी बोलीतील सर्वनामांचा विचार करता तू, तो, ती या प्रचलित सर्वनामाबरोबर म्या, तुन, आमास्नी, त्यो, आमासारा अशी सर्वनामे वापरली जातात.

### ४.७ बोली : नमुना संकलन आणि विश्लेषण

**बोली संकलन :**

बोली अभ्यासासाठी बोली संकलन महत्त्वाचे ठरते. आजूबाजूला ऐकायला येणारे, बोलीतील शब्द टिपून ठेवणे, त्याचे वर्गीकरण करणे, त्यांचे अर्थ शोधणे या गोष्टीबरोबर दोन व्यक्तींचा संवाद घडवून त्यातून बोलीचे संकलन करता येते. बोलीच्या अभ्यासात कोणत्या स्वरूपाचे साहित्य उपयुक्त ठरेल व त्यासाठी कोणती तंत्रे वापरणे आवश्यक आहे याचे भान ठेवणे गरजेचे आहे. बोलीच्या अभ्यासाचा हेतू स्पष्ट करताना सु. बा. कुलकर्णी म्हणतात, ''बोलीचे अध्ययन, त्यांची ध्वनिव्यवस्था व व्याकरण यांचे वर्णन कराण्याच्या हेतूने होत असते.'' (पृ. ८५, भाषा व साहित्य : संशोधन, संपा. डॉ. वसंत जोशी) बोलीतील लोककथा, लोकगीते, वाक्प्रचार, म्हणी, उखाणे, प्रहेलिला, गद्यपद्यपाठ, वाक्ये, शब्द यांचे संकलन होत असते.

ध्वनिसंबंधीचे साहित्यसंकलन बोलींच्या ध्वनिसंरचनेच्या गुंतागुंतीवर व अपरिचित ध्वनींच्या अस्तित्वावरही अवलंबून असते. बोलीच्या ध्वनिव्यवस्थेच्या वर्णनात बोलीतील स्वनियांची (Phonemes) निश्चिती करावी लागते. व्याकरणाच्या अंगाने बोलीचा अभ्यास करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात भाषिक साहित्य जमा करावे लागते. बोलींचा अभ्यास करताना विकारांच्या जाती व त्याचे निदर्शक असे प्रत्यय शोधून काढावे लागतात.

बोलीचा शब्दकोश बनवीत असताना भाषिक समाजाच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीचा सखोल अभ्यास करावा लागतो. शब्दकोशासाठी विविध प्रकारच्या शब्दावल्या उपयुक्त ठरतात. बोलींचे मानचित्र बनविण्यासाठी साहित्य संकलनाची भौगोलिक स्थाने प्रथम निश्चित करावी लागतात. भाषांश जमा करण्यासाठी विशिष्ट प्रकारची प्रश्नावली तयार करावी लागते. यात दोन प्रकार आहेत. एक म्हणजे नियोजित स्थानी विशिष्ट अर्थाचा वाचक कोणता शब्द वापरतो ते पहाणे. उदा– 'विहिरीतून रोजच्या वापरासाठी पाणी बाहेर काढण्याचे साधन' या अर्थी मराठी बोलीतून स्थान परत्वे घागर, बादली, बालटी, कळशी इत्यादी शब्द वापरतात. 'डोकं' या अर्थी डोके, टकले, टाळके, डोसके, डोकसे, टकुरे, बोडके इ. पर्याय वापरतात. दुसऱ्या प्रकारात भाषांशात विशिष्ट शब्दाच्या अर्थात स्थानपरत्वे होणारा भेद ध्यानात आणून दिला जातो. उदाहणार्थ –'चौक' या शब्दाचे स्थानपरत्वे 'चौकोनी अंगण', 'चार रस्ते येऊन मिळणारी जागा', 'पोवाड्यातील कडवे' असे अनेक अर्थ होऊ शकतात.

**बोली विश्लेषण :**

बोलीचा अभ्यास करताना साहित्य संकलन केल्यानंतर विश्लेषणाचा टप्पा महत्वाचा आहे. विश्लेषण हे संकलनावर अवलंबून असते. तर संकलनाची दिशा विश्लेषण दर्शविते. ध्वनींचे विश्लेषण झाल्याशिवाय रूपरचनेचे ज्ञान होत नाही. तसेच रूपरचनेचा अभ्यास केल्याशिवाय वाक्यरचनेचा उलगडा होत नाही. संकलित होत जाणाऱ्या साहित्याचे संपरीक्षण करणे, विश्लेषण करणे व वर्णन करणे या तीनही प्रक्रिया एकाचवेळी चालू राहतात. संपरीक्षण ही विश्लेषणाची पहिली पायरी होय. यामध्ये संकलित साहित्याचे प्राथमिक निरीक्षण करून त्याची संगती लावणे (sorting) त्यातील विषय व कोटी यांचे अभिनिर्धारण (identification) करून त्यांचे वर्गीकरण करणे व वर्गीकरण केलेल्या साहित्याचा योग्य प्रकारे संचय करणे ह्या कृती होत असतात. संकलनानंतर त्या शब्दाचा इतिहास शोधता येतो. तो कोणत्या प्रदेशातील, कोणत्या जातीतील, कोणत्या व्यवसायातील असे

विश्लेषण करता येते. भाषिक संरचनेच्या अंगानेही विश्लेषण करता येते.

**संकलन – विश्लेषण नमुना :**

१) 'उद्या पयल्या गाडीनं कोल्हापूर गाठूया. मंजे धा-साडेधापतर पोचतात.' ('श्रीलिपी' – किरण गुरव, पृ. ७५) या वाक्यातील 'पोचतात' हे क्रियापद असून 'पोहचू' असा त्याचा अर्थ होतो. 'येतात' (येतो), 'जातात' (जातो) अशी क्रियापदे गारगोटी, राधानगरी परिसरात वापरली जातात.

२) 'मर्दानिशा, कारखान्यावर नोकरदाराचं सा-सा म्हैण्याचे पगार थटल्यात.' ('साखरफेटा' – मोहन पाटील पृ. ७) या वाक्यात 'मर्दा' याच अर्थाचा 'मर्दानिशा' असा शब्द शिरोळ, हातकणंगले परिसरातील पुरूष दुसऱ्या पुरूषाला उद्देशून वापरतात.

३) 'तिला माझ्या सल्ल्यानं करायलयासा म्हणून कडू लागलं आसलं घे' ('चौंडक' – राजन गवस, पृ.२१)

वरील वाक्यातील 'करायलयासा' या क्रियापदाचा 'करायला लागलासा' असा प्रमाण भाषेत विस्तारित उच्चार होतो. 'काय बघालीस?', 'पाण्यात कोण दिसालतं?' (पृ.७८) अशी संक्षिप्त क्रियापदे वापरण्याची सीमाभागातील पद्धत कोल्हापुरी बोलीत आढळते. कन्नड भाषेचा प्रभाव असलेली ही बोली आहे.

कोल्हापूरी बोलीतील काही शब्दांचे संरचनेच्या अंगाने पुढीलप्रमाणे विश्लेषण केले आहे.

उदाहरणार्थ – (१) हुटी = व्हळी (मूळ शब्द – वळई) गवत, पिंजर यांचा रेखीव पद्धतीने रचलेला ढीग.

ह+उ+ट्+ई (स्वनिम)

(२) अड्याळसाली = अड्याळ + साली (रूपिम), अड्याळ = अलिकडील, साली = मूळशब्द = साल (वर्ष)

**४.८ समारोप :**

'क्षेत्रिय अभ्यास : कोल्हापूरी बोली' या घटकाचा विचार केल्यानंतर क्षेत्रिय अभ्यासपद्धती नेमकी कशी असते हे समजावून घेतल्यानंतर कोल्हापूरी बोलीचा भाषिक प्रदेश किंवा कोल्हापूरी बोलीची क्षेत्रमर्यादा कोणती यासंबंधी अभ्यास करताना कोल्हापूरी बोली कोणकोणत्या तालुक्यात प्रामुख्याने बोलली जाते याचा विचार केला गेला. कोल्हापूरी बोलीतील शब्द, वाक्ये, म्हणी, बोलीची उच्चारण पद्धती, व्याकरण याविषयी काही उदाहरणांच्या आधारे कोल्हापूरी बोलीचे संकलन आणि विश्लेषण कसे करता येईल. याविषयीचा विचार केला आहे.

**४.९ सरावासाठी प्रश्न :**

**✲ योग्य पर्याय निवडा.**

१) बोलींना स्वत:ची व्याकरणीक व .................. व्यवस्था असते.

अ) उच्चारण   ब) संवाद   क) परिसर   ड) वर्तमान

२) ................ या तालुक्यात बोलली जाणारी बोली ही कोल्हापूरी बोली म्हणून ओळखली जाते.

अ) शाहूवाडी   ब) गडहिंग्लज   क) चंदगड   ड) आजरा

३) ‘माळवं’ या कोल्हापूरी शब्दाचा अर्थ सांगा.

अ) माळ ब) मावळणे क) भाजीपाला ड) कडधान्य

४) ‘वांड’ या शब्दाचा अर्थ सांगा.

अ) आगाऊ ब) गर्विष्ठ क) शहाणा ड) मूर्ख

५) ‘हालगू मालगू करणे’ या वाक्प्रचाराचा अर्थ –

अ) अंग हालवणे ब) टाळाटाळ करणे क) कष्ट करणे ड) यापैकी नाही

उत्तरे : १– अ) उच्चारण २– अ) शाहूवाडी ३–क) भाजीपाला ४–अ) आगाऊ ५–ब) टाळाटाळ करणे

**✻ दिर्घोत्तरी प्रश्न –**

१) कोल्हापूरी बोलीचा क्षेत्रिय अभ्यास पद्धतीने कसा अभ्यास करता येईल ते सविस्तर लिहा.

२) कोल्हापूरी बोलीच्या भाषिक प्रदेशानुसार कोल्हापूरी बोलीचे वेगळेपण कोणते ते सोदाहरण लिहा.

**✻ लघुत्तरी प्रश्न–**

१) कोल्हापूरी बोलीची क्षेत्रिय पाहणी यांविषयी लिहा.

२) कोल्हापूरी बोलीचे संकलन आणि विश्लेषण कसे करता येईल ते उदाहराणासह स्पष्ट करा.

**४.१० अधिक वाचन :**

१) आधुनिक भाषाविज्ञान – संपा. कल्याण काळे, अंजली सोमण

२) संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग – डॉ. पु. का. संत

३) संशोधनाची क्षेत्रे आणि पद्धती – डॉ. जयश्री पाटणकर

४) लोकसाहित्य : क्षेत्रीय अभ्यास – डॉ. गंगाधर मोरजे

५) भाषा व साहित्य : संशोधन (खंड पहिला) – संपा. वसंत जोशी

६) भाषा प्रकाश – डॉ. निलिमा गुंडी

७) कोल्हापूरी बोली – डॉ. एकनाथ आळवेकर (‘भाषा आणि जीवन’, बोली विशेषांक, दिवाळी २०१२, पृ. ४३ ते ४६)

८) कोल्हापूरी बोली – डॉ. एकनाथ आळवेकर (‘शिविम संशोधन पत्रिका’, बोली विशेषांक, एप्रिल ते सप्टेंबर २०१८, पृ. ८४ ते ९४)

**४.११ उपक्रम :**

१) कोल्हापूरी बोलीचा नमुना संकलित करून त्याचे विश्लेषण करा.

२) कोल्हापूरी बोलीतील म्हणी, वाक्प्रचार संग्रहित करा.

३) कोल्हापूरी बोलीचा शब्दकोश तयार करा.

✻✻✻